2004

50

1954

सद्गुरू सुवर्णस्मृती

रयत शिक्षण संस्थेचे,

सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड

आमचे थोर देणगीदार

श्री.राम प्रधान

श्री.मधुकरराव सावंत

श्री.जितेंद्रसिंग गडोख

श्री.अशोकराव थोरात

"स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद" - कर्मवीर

रयत शिक्षण संस्थेचे

सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज, कराड

सुवर्ण महोत्सवी वर्ष

२००३-२००४

सद्गुरु सुवर्णस्मृती

स्मरणिका

रयत शिक्षण संस्थेचे

सद्‌गुरु गाडगे महाराज कॉलेज, कराड.

सद्‌गुरु सुवर्णस्मृती

२००३-२००४

संपादक मंडळ

अध्यक्ष :

प्राचार्य अरुण बर्गे

प्रमुख संपादक :

प्रा. मानसिंग कदम

सहसंपादक :

प्रा. निकम व्ही. के.
प्रा. जाधव एस्. एम्.
प्रा. देशमुख आर्. एस्.
प्रा. पोंधे एम्. एस्.
प्रा. कल्याणशेट्टी जी. बी.
प्रा. सौ. जगदाळे यू. व्ही.
श्री. देशमुख एस्. एन्.
श्री. यादव ए. आर्.
श्री. मगरे यू.एच.
प्रा. जाधव एस्. टी.
प्रा. डॉ. पाटील आर्. एन्.
प्रा. पाटील एस्. बी.
प्रा. सौ. रैनाक एस्. डी.
प्रा. धर्मे डी. एन्.
प्रा. सौ. भोसले के. एस्.
प्रा. सौ. मोहिते एस्. एस्.
प्रा. पाटील ए. आर्.

निमंत्रीत सदस्य :

प्रा. पाटील एन्. डी.
प्रा. जाधव आर्. एम्.
प्रा. जगताप एस्. एम्.

प्रकाशक :

प्राचार्य अरुण एकनाथ बर्गे (सद्‌गुरु गाडगे महाराज कॉलेज,कराड.)

मुखपृष्ठ संकल्पना : प्रा.देशमुख आर्. एस.
संगणक : टाईप इनोव्हेटर्स, १९५, सदाशिव पेठ, सातारा. फोन : २३४३७२
मुद्रक : प्रिन्ट ओम ऑफसेट, २६९ ब/२, दौलतनगर, सातारा. फोन : २३४०४९/२३२०८२

'सद्‌गुरु सुवर्णस्मृती' मधील लेखकांच्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

विनम्र अभिवादन

रयत शिक्षण संस्था, सातारा

✶ संस्थापक ✶

पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील



शुन्यातून केलेस निर्माण तू या जगा, तूच पाहिलेस कष्टात परमेश्वरा।
कड्याकपारीत निर्मिले तू शिलेदार, महाराष्ट्रावरती तूझे अनंत उपकार॥

संत गाडगे महाराज



खराट्याचे बादशहा.....ग्रामस्वच्छतेचे जनक

अज्ञानाचा अंधकार दूर करुन गावोगाव ज्ञानाचा दिवा लावणारे ।

अस्वच्छ ते आपल्या झाडूने झाडून काढणारे बाबा ।खरोखर एक महामानव होत ॥

दानशूर बंडो गोपाळा मुकादम



शतेषु जायते शुर :, सहस्त्रेषु च पण्डित : ।
वक्ता दशसहस्त्रेषु च दाता भवति वा न वा ।।

आमची प्रेरणा

छत्रपती शिवाजी महाराज

महात्मा जोतीराव फुले

राजर्षी शाहू महाराज



महात्मा गांधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर



महर्षी विठ्ठलरामजी शिंदे



ॲड.केशवराव पवार (दादा)

रयत शिक्षण संस्थेचे पदाधिकारी

कराडचे सुपुत्र व संस्थेचे माजी अध्यक्ष

मा.यशवंतरावजी चव्हाण

अध्यक्ष, रयत शिक्षण संस्था



मा.ना. शरदरावजी पवार

चेअरमन, रयत शिक्षण संस्था

मा.प्रा. डॉ.एन.डी.पाटील

संघटक, रयत शिक्षण संस्था

मा. आप्पासाहेब पाटील

आमचे थोर देणगीदार

मा.ना.डॉ.पतंगरावजी कदम

संस्थापक – भारती विद्यापीठ,

कुलपती – भारती विद्यापीट अभिमत विश्वविद्यालय.

सहकार, पुनर्वसन व मदतकार्य मंत्री, महाराष्ट्र राज्य.

अध्यक्ष, स्थानिक व्यवस्थापन समिती स.गा.म. कॉलेज, कराड.



मा.प्राचार्य अरुण बर्गे

स्थानिक व्यवस्थापन समिती
२००४-०५ - २००८-०९

रयत शिक्षण संस्थेचे,
सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज, कराड

स्थानिक व्यवस्थापन समिती
२००३-०४ व २००४-०५



अध्यक्ष :

मा.नामदार डॉ.पतंगरावजी कदम

सभासद :

मा.सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा
मा.ॲड्.रवींद्र केशवराव पवार
मा.विठ्ठलराव रघुनाथराव जाधव
मा.जितेंद्रसिंग संतोखसिंग गडोख
मा.प्रा.एस्.एम्.जगताप (प्राध्यापक प्रतिनिधी)
मा.प्रा.सौ.एम्.एस्.पवार (प्राध्यापक प्रतिनिधी)
मा.प्रा.एस्.बी.पाटील (प्राध्यापक प्रतिनिधी)
मा.श्री.ए.आर.यादव (शिक्षकेतर सेवक प्रतिनिधी)

निमंत्रित :

मा.ॲड्.सदानंद चिंगळे
मा.श्री.मधुकरराव सावंत
मा.श्री.दत्तात्रय धर्मे

सचिव :

मा.प्राचार्य एस्.जी.एम्. कॉलेज, कराड

प्राध्यापक सदस्य :

मा.प्रा.डी.बी.रैनाक
मा.प्रा.सौ.एस्.ई.निकम
मा.प्रा.डॉ.एस्.टी.पवार

शुभसंदेश

सत्यमेव जयते

SHARAD PAWAR M. P.
Vice Chairman,National Committee on Disaster Management

दिनांक : १६ सप्टेंबर २००३

प्रिय प्रा. बर्गे
स.न.वि.वि

रयत शिक्षण संस्थेच्या कराड येथील सद्‌गुरू गाडगेमहाराज कॉलेजतर्फे 'सुवर्ण महोत्सवानिमित्त' प्रकाशित होत असेलल्या 'सद्‌गुरु सुवर्णस्मृती' या स्मरणिकेस माझ्या हार्दिक शुभेच्छा !

धन्यवाद !

आपला

(शरद पवार)

शुभसंदेश

सत्यमेव जयते

बालासाहिब विखे पाटील
संसद सदस्य
(लोक सभा)

संदर्भ संख्या : ५९२

प्रति,
मा. प्राचार्य
सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड.

महोदय,

आपले सद्‌गुरू गाडगे महाराज महाविद्यालय सुवर्ण महोत्सवानिमित्त ''सद्‌गुरु सुवर्णस्मृती' ही स्मरणिका प्रकाशित करीत आहे.

आपण आयोजित केलेल्या या सांगता समारंभास व प्रकाशनास माझ्या हार्दिक शुभेच्छा.

कळावे.

आपला विश्वासू

(बाळासाहेब विखे पाटील)

शुभसंदेश

शंकरराव काळे

बी.एस्सी.,बी.ई (सिव्हील)

माजी खासदार,

चेअरमन

दि कोपरगांव सहकारी साखर कारखाना लि.,

गौतमनगर पोष्ट - कोळपेवाडी, पिन - ४२३६०२,

तालुका- कोपरगांव, जिल्हा - अहमदनगर

एस.टी.डी.नंबर - (०२४२३)

कोळपेवाडी - २६१२१० ते २६१२१८

निवास - कोळपेवाडी २६२२२८

फॅक्स - २६१२१९

मु.पो.माहेगांव देशमुख

ता.कोपरगांव, जि. अहमदनगर.

जावक नं. ६००

दिनांक - २० सप्टेंबर २००३

स.न.वि.वि.

महाशय,

आपल्या महाविद्यालयाचे हे सुवर्णमहोत्सवी वर्ष ! या निमित्त आपण प्रकाशित करीत असलेल्या 'सद्‌गुरु सुवर्णस्मृति' या स्मरणिकेस माझ्या हार्दिक शुभेच्छा. सदरचा कार्यक्रम आनंदाचे व उत्साहाचे वातावरणात पार पडो. आपल्या महाविद्यालयाची उत्तरोत्तर प्रगती होवो, नावलौकिक वाढो अशी सदिच्छा मी याप्रसंगी व्यक्त करतो. आपले निमंत्रणाबद्दल परत एकदा मनःपूर्वक आभार मानतो.

कळावे,

आपला विश्वासू

१९/९/०३

(शंकरराव काळे)

माजी खासदार

शुभसंदेश

आमदार शंकरराव कोल्हे

बी.एस्सी. (ॲग्री.)
सहजानंदनगर, पो.शिंगणापूर,
ता.कोपरगांव, जि.अहमदनगर,
पीन : ४२३ ६०३. (महाराष्ट्र)
E-mail : sssklld@vsnl.com Fax - 02423-224130

॥ हार्दिक शुभकामना ॥

महोदय,

महाविद्यालयाचा सुवर्णमहोत्सवा निमित्त ''सद्‌गुरु सुवर्णस्मृती' ही स्मरणिका प्रकाशित करीत आहात त्याची निमंत्रण पत्रिका मिळाली. इच्छा असूनही सुवर्ण महोत्सवी कार्यक्रमास उपस्थित राहू शकत नाही. कार्यक्रमास संजिवनी उद्योग समुहांच्या वतीने हार्दिक शुभेच्छा !

स्नेह आहेच तो अधिक वृद्धिंगत होवो हिच शुभेच्छा !

आ.विश्वासू

आ.शं.कोल्हे

शुभसंदेश

मंत्री
पाटबंधारे (कृष्णा खोरे व कोकण
पाटबंधारे महामंडळ) फलोत्पादन
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०००३२

दिनांक : १९.९.२००३

प्रा. अरूण बर्गे यांना

स.न.

आपल्या महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त सांगता समारंभ व 'सद्‌गुरु सुवर्णस्मृती' या स्मरणिकेच्या प्रकाशन सोहळ्याची निमंत्रण पत्रिका मिळाली. या आनंद सोहळ्यात सहभागी होण्यास मला निश्चित आनंद झाला असता.

आपल्या समारंभास व स्मरणिकेस माझ्या हार्दिक शुभेच्छा.

आपला

अजित पवार

सुवर्ण महोत्सव कार्यकारणी

१. प्राचार्य ए.ई.बर्गे ..... अध्यक्ष
२. प्रा.एम.जी.कदम ..... सचिव
३. प्रा. एस. एम. जाधव ..... सदस्य
४. डॉ.आर.एन.पाटील ..... सदस्य
५. डॉ. एन. एस. पंडीत ..... सदस्य
६. प्रा. एन. डी. पाटील ..... सदस्य
७. प्रा. एस. एम. जगताप ..... सदस्य
८. प्रा. एस. ई. निकम ..... सदस्य
९. डॉ. एस. टी. पवार ..... सदस्य
१०. प्रा. आर. एम. जाधव ..... सदस्य
११. प्रा. डी. बी. रैनाक ..... सदस्य
१२. प्रा. डी. एन. धर्मे ..... सदस्य
१३. प्रा. ए. एस. पवार ..... सदस्य
१४. प्रा. आर. टी. पवार ..... सदस्य
१५. श्री. एस. एन. देशमुख ..... सदस्य
१६. श्री. अशोक यादव ..... सदस्य
१७. श्री. व्ही. डी. भोज ..... सदस्य
१८. श्री. उत्तमराव मगरे ..... सदस्य
१९. कु. सीमा चव्हाण ..... विद्यापीठ प्रतिनिधी

सुवर्ण महोत्सव निधीसंकलन समिती

❖ अध्यक्ष
मा.प्राचार्य अरुण बर्गे

❖ चेअरमन
प्रा.डी.एन्.धर्मे

❖ सदस्य ❖

प्रा. एम्. जी. कदम
डॉ. आर्. एन्. पाटील
प्रा. एस्. एम्. जगताप
प्रा. सौ. ए. एस्. पाटील
प्रा. डी. बी. रैनाक
प्रा. आर. टी. पवार
श्री. अशोक यादव
प्रा. आर्. एस्. देशमुख
प्रा. एस्. बी. पानस्कर
प्रा. सौ. यु. व्ही. जगदाळे
कु. सीमा चव्हाण-विद्यार्थी प्रतिनिधी

प्रा. एस्. एम्. जाधव
डॉ. एन्. एस्. पंडीत
प्रा. एस्. बी. पाटील
प्रा. आर. एम्. जाधव
प्रा. ए. एस्. पवार
श्री. व्ही. डी. भोज
श्री. उत्तमराव मगरे
प्रा. एस्. एम्. पाटील
प्रा. सौ. एस्. डी. रैनाक
प्रा. जे. के. गुजर

NAAC
मानांकन

राष्ट्रीय मूल्यांकन एवं प्रत्यायन परिषद

विश्वविद्यालय अनुदान आयोग का स्वायत्त संस्थान

NATIONAL ASSESSMENT AND ACCREDITATION COUNCIL

An Autonomous Institution of the University Grants Commission

Certificate of Accreditation

The Executive Committee of the
National Assessment and Accreditation Council
on the recommendation of the duly appointed
Peer Team is pleased to declare the

Rayat Shikshan Sanstha's

Sadguru Gadage Maharaj College

Vidyanagar, Karad, Dist. Satara, affiliated to Shivaji University, Maharashtra

Accredited

at the B+ level.

Date : September 16, 2004

Director

- This certification is valid for a period of *Five* years with effect from September 16, 2004
- An institutional score (%) in the range of 55-60 denotes C grade, 60-65-C' grade, 65-70-C'' grade, 70-75- B grade, 75-80- B' grade, 80-85-B'' grade, 85-90- A grade, 90-95-A' grade, 95-100-A'' grade

सुवर्णस्मृती

संपादक मंडळ

महाविद्यालय विद्यार्थी संसद २००४ - २००५

कर्मवीर जयंती सोहळा २००४ - ०५ उपस्थित सर्व मान्यवर

महाविद्यालयाचे माजी प्राचार्य
१९५४-५५ ते २००४-२००५

मा. प्रा. आर. के. कणबरकर
१/५/१९५४ ते ९/५/१९५७

मा.प्रा.बी.ए. चौगुले
१०/५/५७ ते २३/४/६०

मा.प्रा.एस.आर. शिंदे
२४/४/६० ते २३/५/६१



मा.प्रा.ए.डी. आतार
२०/६/१९६१ ते ३०/५/१९६४

मा.प्रा.बॅ. पी. जी. पाटील
१/६/१९६४ ते ५/६/१९६७
३/८/१९६९ ते ३१/५/१९७२

मा.प्रा. सुमितीबाई पाटील
६/६/१९६७ ते २/८/१९६९

मा.प्रा. ए.बी. मगदुम
१/६/१९७२ ते ३१/५/१९७८
१०/५/१९८१ ते१५/४/१९८३

मा.प्रा. डॉ.एस.आर.सुर्यवंशी
१/८/१९७८ ते ९/५/१९८१

मा.प्रा. डॉ.डी.बी. पठाण
१६/५/१९८३ ते ७/८/१९८३

मा.प्रा.एन.एन.भगरे
८/८/१९८३ ते ३०/४/१९८४

महाविद्यालयाचे माजी प्राचार्य

मा.प्रा. एस.एन. यादव
१/५/१९८४ ते ३१/७/१९८४



मा.प्रा. डॉ.एस.व्ही. तिरोडकर
१/८/१९८४ ते १५/५/१९८५

मा.प्रा. डी. के. खोत
१६/५/१९८५ ते ९/५/१९८७
१/६/१९८८ ते १३/६/१९८९

मा.प्रा. एम्.ए. शेख
१०/५/८७ ते ३०/४/८८

मा.प्रा. एम्.एम्. स्वामी
१/७/८९ ते १४/७/९०

मा.प्रा. डॉ. व्ही.के. घाटे
१५/६/९० ते ३१/५/९१

मा.प्रा. पी. ए. पानवळ
१/६/९१ ते ३१/७/९३

मा.प्रा. ई.जी. निकम
१/८/९३ ते १३/९/९८

मा.प्रा. डॉ. के. बी. कुंदप
१४/९/९८ ते ३१/७/९९

मा.प्रा. डॉ. एस्.डी. जाधव
१/८/९९ ते ३१/५/०३

मा.प्रा. ए. इ. बर्गे
१/६/२००३ ते ३१/१/२००५

रयत शिक्षण संस्थेचे,

सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज, कराड

सुवर्ण महोत्सवी वर्ष स्मरणिका

अनुक्रमणिका

- **थोडंसं हितगुज : दिवस सोनियाचे** ..... प्राचार्य अरुण बर्गे
- **संपादकीय** ..... प्रा.मानसिंग कदम
- **विचारधारा ...**
  - रयत शिक्षण संस्थेचे शैक्षणिक व सामाजिक योगदान ..... प्रा.डॉ.एन.डी.पाटील १९
  - कर्मवीर अण्णांच्या कार्याची फलश्रुती ..... आप्पासाहेब भाऊराव पाटील २५
  - मी असा घडलो..... ! ..... ना.डॉ.पतंगराव कदम २९
  - बहुजन समाजाचे शिक्षण : एक चिंतन ..... प्राचार्य रा. कृ. कणबरकर ३१
  - यशाची गुरुकिल्ली ..... मधुकरराव सावंत ३५
  - गोपाला । गोपाला । ..... प्रा.सुमंत जगताप ३९
  - बॅरि.पी.जी.पाटील : एक ज्ञानज्योत ..... प्रा.मानसिंग कदम ४३
  - अर्धशतकातील पाऊलखुणा ..... प्राचार्य अरुण बर्गे ४५
  - दानशूर मुकादम तात्या व एस्. जी. एम्. कॉलेज ..... अशोक यादव ५९
  - कराडचा ऐतिहासिक वारसा ..... प्रा.दिनकरराव थोरात ६१
  - महाविद्यालयाची निर्मिती ..... मा. भि. काटकर ६९
  - शेतीतून स्वयंरोजगार : बेरोजगारांसाठी आशास्थान ..... प्रा.डॉ.बी.जे.पाटील ७१
  - जागतिकीकरण आणि शिक्षण ..... प्रा. मुकुंद पोंधे ७३
  - महाविद्यालयीन स्तरावर मूल्यशिक्षणाची आवश्यकता ..... प्रा.सौ.कौसल्या भोसले ८१
- **मान्यवरांच्या मुलाखती ...**
  - प्राचार्य ए.एस.महादार ८३
  - प्राचार्य के.एस.मोहिते ८७
  - प्राचार्य प्र.आ.तथा आप्पासाहेब पानवळ ९१
- **मागे वळून पाहताना ...**
  - सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज : काही आठवणी ..... प्राचार्या श्रीमती सुमतिबाई पांडुरंग पाटील ९३
  - विद्यानगरात । स.गा.म.कॉलेज ॥ सर्वांना नॉलेज । देत आहे ॥ .. प्राचार्य आ.भा. मगदूम ९५
  - स.गा.म. महाविद्यालय - एक भाग्यविधाते ज्ञानमंदीर ..... प्राचार्य डॉ.एस.आर.सूर्यवंशी १०१

वन् - हाफ् ..... प्रांचार्य डॉ. डी. बी. पठाण १०३
स.गा.म.मधील योगदान ..... प्राचार्य एन.एन.भगरे १०५
स. गा. म. : एक स्मरण ..... प्राचार्य डी. के. खोत १०७
स्मरण स. गा. म. चे ..... प्राचार्य एम.एम.स्वामी १०९
सद्‌गुरू : त्रिवेणी संगमातील निर्मळ क्षण ..... प्राचार्य ई. जी. निकम १११
सोनेरी पाने ..... प्राचार्य डॉ. कन्हैया कुंदप ११३
सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेज : यशस्वी आयुष्याची पायाभरणी प्राचार्य विश्वास सायनाकर ११५
आत्मसन्मान जागविणारा गाडगेबाबांचा मठ ..... प्राचार्य मा.के.यादव ११७
'सगाम' मधील ओलसर आठवणी ..... प्राचार्य आर.के.शिंदे ११९
स.गा.म.: जडणघडण ..... प्रा.डॉ.सुमन पाटील १२१
सद्‌गुरू गाडगे महाराज : लोकशिक्षण मठ ..... प्रा.डॉ. वसंतराव मोरे १२५
स.गा.म. कॉलेज : काही आठवणी ..... प्राचार्य शिवाजीराव भोर १२७
माझे दैवत : स.गा.म.कॉलेज ..... प्राचार्य अण्णासाहेब गरुड १२९
मागे वळून पाहतांना... ..... प्रा.डॉ. पांडुरंग पाटील १३१

✦ **स्मृतींची चाळता पाने** १३३
श्री. रघुनाथ शंकर सुभेदार
श्री. श्रीकांत गोपाळ खिरे
श्री. दादू लक्ष्मण जगताप
श्री.भालचंद्र दत्तात्रय कुमठेकर
श्री. दत्तात्रय यशवंत विदार
श्री. सदाशिव दत्तात्रय पेंढारकर
श्री. प्रभाकर शामराव वाचासुंदर
श्री. नारायण ज्ञा. शिंदे
श्री. नारायण माधव आचार्य
श्री. अशोकराव किसनराव थोरात
ॲड. रविंद्र पवार
श्री.आनंदराव रामचंद्र जाधव
श्री.विठ्ठलराव रघुनाथ जाधव
ॲड.सदानंद नारायण चिंगळे
ॲड. संभाजी ह. मोहिते
श्री.संग्रामसिंह देशमुख
श्री. मानसिंग दादोबा जाधव
श्री. जीवन पवार
श्री. बरकत बकस मुजावर
कुशल कृषितंत्रज्ञ - 'एम.आर.डी.'बापू

✦ **इथेच उमललो अन् इथेच बहरलो** १४५
श्री. युवराज विठ्ठल पवार
रोहित वसंतराव चव्हाण
कु.सीमा चव्हाण
विठ्ठल दुधनी

थोडंसं हितगुज : दिवस सोनियाचे !

महाराष्ट्राच्या शिक्षणक्षेत्रात योगदान देणारे सद्‌गुरु गाडगे महाराज कॉलेज, कराड हे रयत शिक्षण संस्थेचे दुसरे महाविद्यालय. १९५३ चा स्वातंत्र्यदिन या दृष्टीने सुवर्णदिन ठरला. याच दिवशी कर्मवीरांनी सातारच्या धनिणीच्या बागेत अचानक कराड येथे कॉलेज स्थापनेची घोषणा केली, यासाठी पुणे विद्यापीठाकडे अनामत रक्कम रु. ५०,०००/- भरण्यासाठी पुण्याचे महापौर मा. बाबुराव सणस आणि मा. शंकरराव उरसळ यांच्या मदतीने पुण्याच्या महात्मा फुले मंडईतील व्यापारी, हमाल, भाजी विक्रेते यांनी स्वयंस्फूर्तीने एक दिवसाची कमाई अण्णांना दिली. महाविद्यालयाच्या उभारणीमध्ये मा. केशवराव पवार (दादा) यांचा सिंहाचा वाटा आहे. मा. ॲड. पी. डी. पाटील आणि इतर संस्था हितचिंतकांनी कर्मवीर अण्णांचे समवेत देणगी मिळविण्यासाठी बहुमोल सहकार्य केले.

महाविद्यालयाच्या पन्नास वर्षांच्या (१९५४ ते २००३-०४) गौरवशाली वाटचालीचा आढावा घेण्याची संधी मला मिळाली, हे मी माझे सद्‌भाग्य समजतो. महाविद्यालयाचा सुवर्ण महोत्सव हा माझ्या जीवनातील सुवर्णाक्षरांनी कोरण्याचा 'सुवर्णक्षण' समजतो. याचे कारण म्हणजे मी या महाविद्यालयात दिनांक १९ जून १९७० पासून २० मे १९८६ पर्यंत भूगोल विषयाचा अधिव्याख्याता म्हणून काम केले. अजूनही ते सोनियाचे दिवस मला जसेच्या तसे आठवतात. याच काळात मी माझ्या व्यक्तिमत्वाला मा. प्राचार्यांच्या आणि अनेक वरीष्ठ सहकाऱ्यांच्या प्रेमाने, ममतेने आणि सहृदयतेने आकार देऊ शकलो, माझे व्यक्तिमत्व खऱ्या अर्थाने येथेच फुलले ! म्हणूनच स. गा. म. कॉलेज व परिसर मला एक नंदनवनच वाटते.

मी १ जून २००३ साली या महाविद्यालयाच्या प्राचार्यपदाची धुरा स्वीकारली. अनेक जुने सवंगडी आणि माझ्याच संपर्काने तयार झालेले असंख्य माजी विद्यार्थी प्राध्यापक म्हणून कार्यरत असल्याचे पाहून माझा आनंद द्विगुणित झाला. यापूर्वी संस्थेच्या विविध महाविद्यालयात कार्यरत असताना आलेल्या अनुभवांची शिदोरी उराशी बाळगून या महाविद्यालयाचे सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करण्याचा मानस केला. सर्व सहकारी प्राध्यापक, प्रशासकीय सेवक वर्ग आणि विद्यार्थी विद्यार्थिनींना विश्वासात घेऊन काही संकल्प सोडले. सुवर्ण महोत्सवी वर्षाचा उद्‌घाटन सोहळा शनिवार दि. २० सप्टेंबर २००३ रोजी संस्थेचे चेअरमन, मा. डॉ. एन्. डी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आणि मा. ना. डॉ. पतंगरावजी कदम, उद्योग व संसदीय कामकाज मंत्री, महाराष्ट्र राज्य, कुलपती, भारती अभिमत विद्यापीठ, पुणे यांच्या शुभहस्ते आणि मा. सचिव, प्राचार्य अशोक महादार आणि अनेक मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

या उद्‌घाटन सोहळ्यानंतर सुवर्णमहोत्सवाच्या यशस्वितेसाठी आणि तो कॉलेजच्या उज्जवल परंपरांना साजेसा व्हावा म्हणून सहकाऱ्यांच्या अनेक बैठकांचे आयोजन केले. पालक, विद्यार्थी संसद आणि सर्व विद्यार्थी यांच्याशी मनमोकळी चर्चा केली. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधून मार्गदर्शन घेतले. माजी विद्यार्थीसंघ स्थापन करून त्यांच्यांशी विचारविनिमय केला. मान्यवरांच्याकडून सूचना मागविल्या आणि स्थानिक व्यवस्थापन समिती, सेवक, विद्यार्थी-विद्यार्थिनी यांच्या सूचनांचा पारदर्शकपणे विचार करून खालील उपक्रमांचे आयोजन करण्याचे ठरविले. त्यापैकी काहींची कार्यवाही झाली आहे व काहींची कार्यवाही व्हावयाची आहे.

सुवर्ण महोत्सवानिमित्त कॉलेजने हाती घेतलेले महत्वाकांक्षी उपक्रम :

१) महाविद्यालयाची सर्व सोयींनी युक्त अशी भूकंपरोधक वास्तू उभारणे
२) कै. अभिजीत पतंगराव कदम क्रीडासंकुल पूर्णत्वास नेणे.
३) परीसरातील एक खेडे दत्तक घेऊन त्याच्या विकासासाठी विविध उपक्रम राबविणे.
४) शेतकऱ्यांसाठी ग्रंथालय व मार्गदर्शन केंद्राचे विस्तारीकरण करणे.
५) विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढ व रोजगारसंधीसाठी विविध व्यवसायाभिमुख प्रकल्प राबविणे
६) 'कर्मवीर वसतिगृह' व 'सौ. सुमतिबाई पांडुरंग पाटील विद्यार्थिनी वसतिगृह' यांचे विस्तारीकरण करणे.
७) कै. दानशूर मुकादम तात्या यांच्या समाधीचे सुशोभिकरण करणे.

८) सुवर्ण महोत्सवानिमित्त स्मरणिका प्रसिध्द करून महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा जनसामान्यांपर्यंत पोहचविणे.

९) माजी विद्यार्थ्यांचे व पालकांचे स्नेहमेळावे आयोजित करणे.

१०) 'कमवा व शिका' योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे.

११) 'स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र 'अधिक सक्षम करणे.

१२) समाजोपयोगी आणि विद्यार्थीकेंद्रीत कॅपसूल व सेल्फ फायनान्सिंग कोर्सेसची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे.

१३) तज्ञांची व्याख्याने व शैक्षणिक परिषदांचे आयोजन करणे.

१४) सुवर्ण महोत्सव सांगता समारंभाचे आयोजन करून महाविद्यालयाचे थोर देणगीदार, सर्व माजी सेवक, माजी विद्यार्थी आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा यथोचित गौरव करणे.

१५) जलतरण तलावाची उभारणी करणे.

१६) ग्रंथालय व प्रयोगशाळांचे विस्तारीकरण करणे.

१७) परिषद सभागृह (**Conference Hall**) बांधणे.

कॉलेजची पन्नास वर्षाची गौरवशाली वाटचाल (सन १९५४-५५ ते २००३-२००४)

- जून १९५४ मध्ये अवघ्या ५४ विद्यार्थ्यानिशी सुरू झालेल्या या कॉलेजमधील या वर्षाची विद्यार्थी संख्या ४,९५७
- अध्यापक संख्या : वरिष्ठ महाविद्यालय ७६, कनिष्ठ महाविद्यालय ४८, व्यवसाय अभ्यासक्रम १३, प्रशासकीय सेवक वर्ग ६९.
- बालवाडी ते पद्व्युत्तर वर्ग, एम.फिल.पर्यंत अध्यापनाची सुविधा असलेले कला, विज्ञान, वाणिज्य, बी.सी.एस.शाखेचे शिवाजी विद्यापीठ कक्षेतील एक मोठे महाविद्यालय.
- पद्व्युत्तर अभ्यासक्रमासाठी मराठी, इंग्रजी, हिंदी, इतिहास, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र आणि समाजशास्त्र या विषयांच्या अध्यापनाची सुविधा.
- मराठी एम्.फिल. अध्यापन व संशोधन वर्गाची सुविधा.
- विविध विषयांवरील ४२,३७०-ग्रंथ आणि ६२,४८४-संदर्भग्रंथ, विविध ज्ञानकोश विश्वकोश-९५०, नियतकालिके-९०, दैनिके-१६, आणि सी.डी.-२०० यांनी सुसज्ज ग्रंथालय.
- अध्यापनासाठी प्रशस्त अशा अनेक वास्तू, ग्रंथालयाची सर्व सोयीनी परिपूर्ण इमारत, अभ्यासिकेची सुविधा, संगणक सुविधेसह कार्यालयाची इमारत, विज्ञान व व्यावसायिक स्तरावरील शिक्षणक्रमासाठी अत्याधुनिक उपकरणांनी युक्त प्रयोगशाळा, भव्य शिक्षक कक्ष, सुसज्ज प्राचार्य कक्ष, सर्व सोयीनीयुक्त प्रेक्षागृह.
- देशी-विदेशी खेळांच्या साहित्याने परिपूर्ण क्रीडा विभाग, तज्ञांचे मार्गदर्शन, विद्यापीठ, विभागीय, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर क्रीडा स्पर्धात नेत्रदिपक यश.
- सर्व सोयीनीयुक्त विद्यार्थी व विद्यार्थिनी वसतिगृहे. विद्यार्थी वसतिगृहात ८० विद्यार्थ्यांना तर विद्यार्थिनी वसतिगृहात १३५ विद्यार्थिनींना प्रवेश.
- स्पर्धा परीक्षा, व्यवसाय मार्गदर्शन केंद्र.
- कमवा व शिका योजनेची सुविधा.
- शिवाजी विद्यापीठाच्या विविध व्याख्यानमाला, क्रीडा स्पर्धा, परिषदा, युवक महोत्सव इ. चे यशस्वी आयोजन.
- सुवर्ण महोत्सवी वर्षाची विद्यार्थ्यांना भेट : सुसज्ज क्रीडा संकुल व मिडीया सेंटर
- राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना (मुले, मुली) यांची सुविधा.
- आरोग्य केंद्र, विज्ञान मंच, माहिती व तंत्रज्ञान केंद्र, दत्तक-पालक योजना, नेचर क्लब, लोकसंख्या शिक्षण, प्रौढ शिक्षण, संगणक कक्ष, शिक्षक-विद्यार्थी संशोधन कक्ष सुविधा.
- विविध सेल्फ फायनानसिंग व कॅप्सूल कोर्सेस, रेमिडिअल कोर्सेसची सोय आणि यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे अभ्यास केंद्र.

❖ कर्मवीर आण्णांच्या शैक्षणिक तत्वज्ञानाचे, स्वप्नांचे मूर्त रूप !

याशिवाय कॉलेजचा सुवर्ण महोत्सवी मोनोग्राम तयार केला. नॅक पिअर टीम कडून कॉलेजचे मानांकन करून घेण्यासाठी आवश्यक ती पूर्तता करून महाविद्यालय पीअर टीम ला सर्व शक्तिनिशी सामोरे गेले. महाविद्यालयाचे मूल्यांकन झाले, 'बी+' श्रेणी मिळाली पण हीच टिम आपल्या अहवालात ५/६ वेळा "**Excellent**" हा शेरा देवून नमूद करते की,

> **"The academic atmosphere prevailing in the campus, discipline existing among students and the commitment and dedication of the staff and the positive approach of the Management has earned the college a good name and fame in Karad and in Satara."**

सुवर्णमहोत्सवी सुकाणू समिती तयार करून उपक्रमांच्या कार्यवाहीसाठी विविध समित्या नेमल्या. प्रत्येक घटकाने आपल्यावर सोपविलेली जबाबदारी जाणिवपूर्वक पार पाडली. निधी संकलनाचे उद्दिष्ट ठरवून स्मरणिकेसाठी जाहिराती मिळविल्या. निधी संकलन समिती-ने प्राध्यापक, सेवक, विद्यार्थ्यांचे गट तयार करून कराड शहर आणि परिसरातील विशिष्ट विभागाची जबाबदारी सोपविण्यात आली. महाराष्ट्रातील अनेक हितचिंतक, व्यावसायिक, कारखानदार, वित्तिय संस्था इ. यांना भेटी देवून निधी संकलन मोहिम यशस्वीरीत्या राबविली.

महाविद्यालयातील सर्व सेवकांना आवाहन केल्यानंतर त्यांनी प्रत्येकी पाच दिवसाचे वेतन स्वखुशीने दिले. याशिवाय प्रत्येक सेवकाने सांघिक निधी संकलनाखेरीज रु. ८,५००/- निधी वैयक्तिकरित्या जमा केला. आमची विद्यार्थी संसद व विद्यार्थी वर्ग हिरीरीने पुढे येऊन प्रत्येकी रु. १००/- निधी देण्याचे मान्य केले. याशिवाय त्यांनी सांघिकरीत्या गावोगावी जाऊन निधी संकलन केले. स्थानिक व्यवस्थापन समितीच्या बैठकीमध्ये प्रत्येक सदस्याने रु. ५०००/- देण्याचे मान्य केले.

माझे सर्व सहकारी प्राध्यापक, शिक्षकेतर सेवक आणि विद्यार्थी कॉलेजचा सुवर्णमहोत्सवी सोहळा हा 'घरचा सोहळा' समजून रात्रंदिवस झटले. खरोखर आम्ही सर्वजण, या सुवर्णमहोत्सवी वर्षाचे साक्षीदार झालो. आमच्या जवळील ही 'रयतनिष्ठा' केवळ महामानव पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कर्तृत्वाची किमया.

सद्गुरु सुवर्णस्मृती या स्मरणिकेचे कामकाज माझ्या मार्गदर्शनाखाली प्रमुख संपादक प्रा. मानसिंगराव कदम आणि त्यांच्या समितीतील सहसंपादकांनी व सदस्यांनी रात्रीचा दिवस करून कशाचीही तमा न बाळगता सुवर्णमहोत्सवी सांगता समारंभापूर्वी स्मरणिकेस आकर्षक स्वरुपात साकार केले. प्रिंट ओम ऑफसेटचे श्री. संदेश शहा, श्री. जतीन शहा तसेच टाईप इनोव्हेटर्सचे श्री. प्रशांत गुजर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी स्मरणिका सुबक व आकर्षक केली. मुद्रण देखणे आहेच. स्मरणिकेच्या यशाच्या श्रेयाचे खरे वाटेकरी तेही आहेत !

सर्व सहकारी, विद्यार्थी, माजी विद्यार्थी, हितचिंतक, पालक, देणगीदार, जाहिरातदार आणि जनता-जनार्दन यांच्या सहकार्याबद्दल मन:पूर्वक आभार ! असाच स्नेहबंध वृध्दींगत व्हावा आणि जरी मी जानेवारी २००५ अखेरीस सेवानिवृत्त होणार असलो तरी मी या कॉलेजमधील माझे 'दिवस सोनियाचे' कधीही विसरणार नाही.

संस्था, संस्थापक यांच्यावरील माझी निष्ठा तसूभरही ढळणार नाही, कारण मी कर्मवीरांचा सच्चा पाईक आहे. या 'कर्मवीर ज्योती'नेच माझे जीवन फुलविले आहे आणि सेवानिवृत्तीनंतर देखील मी माझ्या सामाजिक बांधिलकीचे भान राखून कार्यरत असणार आहे.

सद्गुरु गाडगे महाराज कॉलेजच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त प्रकाशित होणाऱ्या 'सद्गुरु सुवर्णस्मृती' चे आपण आनंदाने स्वागत कराल, ही अपेक्षा व्यक्त करुन, माझं 'थोडसं हितगुज...' पूर्ण करतो.

धन्यवाद !

अरुण बर्गे

प्राचार्य, स.गा.म.कॉलेज; कराड

संपादकीय...!

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक व लोकोद्धारक शिक्षण महर्षी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यानी जून १९५४ मध्ये देशातील तालुक्यांच्या ठिकाणी पहिले आणि संस्थेचे दुसरे 'सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड' सैदापूर येथे कृष्णा-कोयनेच्या प्रीतीसंगमावर सुरू केले. या कॉलेजने २००३-२००४ या वर्षी सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण केले. या निमित्त 'सद्गुरू सुवर्णस्मृती' ही सुवर्ण महोत्सवी स्मरणिका रसिक वाचकांच्या हाती देताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. कारण

अनंत आमुची ध्येयासक्ती
अनंत अन् आशा
किनारा तुला पामराला

या उक्तीप्रमाणे आम्ही शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्रातील शिखरे पादाक्रांत करण्याचा प्रयत्न केला आहे.

'रयते'ची निर्मिती लौकिकार्थाने संपूर्ण मानवतेला मिळालेली अलभ्य देणगीच ! 'बहुजन हिताय बहुजन सुखाय', 'स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद', 'मोडेन पण वाकणार नाही' आणि 'स्वातंत्र्य, समता, स्वाध्याय व स्वावलंबन' ही चतुःसूत्री असे आगळे वेगळे शैक्षणिक तत्वज्ञान आचरणात आणून पिढ्यान पिढ्या शिक्षणापासून वंचित, अज्ञान नि अंधकारात खितपत पडलेल्या बहुजन समाजाच्या उद्धाराचे कंकण हाती बांधून कर्मवीरांची 'रयत'महन्मंगल कार्य करीत शताब्दी महोत्सवाकडे वाटचाल करीत आहे. या दैदिप्यमान कार्याची पोहोच पावती म्हणजे संस्थेला आजपर्यंत मिळालेले सहा भुषणावह पुरस्कार !

जिथे तहानलेली मने शिक्षणासाठी आक्रंदन करतात तेथे शिक्षण असावे ही सामाजिक दृष्टी संस्थापकाजवळ होती. म्हणूनच त्यांनी फक्त ५४ विद्यार्थ्यानिशी भारताचे माजी उपपंतप्रधान कै. यशवंतराव चव्हाण यांच्या कराड नगरीत 'स.गा.म.' ची स्थापना करण्याचे धाडस केले. स्वर्गीय चव्हाण साहेब महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष झाले त्यावेळी अण्णांनी विचारले तेव्हा ते आनंदाने म्हणाले, ''महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदापेक्षा मी रयत शिक्षण संस्थेचा अध्यक्ष झालो याचा मला जास्त अभिमान आहे.'' आज त्यांचे मानसपुत्र, महाराष्ट्राचे पुरोगामी नेतृत्व, राष्ट्रीय नेते नामदार शरदचंद्रजी पवार, कृषिमंत्री, भारत सरकार यांच्या अध्यक्षतेखाली आणि कुशल मार्गदर्शनानुसार संस्थेची चौफेर प्रगती सुरू आहे.

या महाविद्यालयात आज मितीस सुमारे २०५ सेवक ५००० सरस्वतीच्या शिलेदारांना घडविण्यात रममाण झाले आहेत. एका विचाराने, एका दिलाने, एकजुटीने कर्मवीरांचे स्वप्न साकार करण्याचा प्रयत्न करीत आहेत. आमचे महाविद्यालय पन्नास वर्षांचे झाले आणि या काळातील असंख्य विद्यार्थी आज देशाच्या शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात चमकत आहेत, ते रयतेचा माणूस म्हणून स्वतःचा एक वेगळा ठसा समाजमनावर उमटवित आहेत. रयतेचा बुलंद आवाज चेअरमन मा.डॉ.एन्.डी.पाटील यांच्या निस्पृहतेचा आदर्श त्यांच्यासमोर आहे. अजुनही आम्ही कार्यक्षम आहोत. जाणतेपणा, कर्तव्यदक्षता, कार्यक्षमता आणि विवेकशीलता आचरणात आणून गरुडझेप घ्यावयाची आहे. आम्ही वाटचाल करीत आहोत :

जिद्दीनं । आत्मविश्वासानं ।। परिश्रमानं ।।।
इथे कणखरपणा आहे निश्चयाचा । हिरवळ आहे ओलाव्याची ।।
मायेची नि ममतेची ।।

असंख्य तरुणाईची मने या ओलाव्यावर फुलतात; सरस्वतीची वीणा इथे झंकारते. कर्मवीरांनी श्रमवीर गाडगेबाबांच्या, दानशूर मुकादम तात्यांच्या, कै.केशवराव दादांच्या, पुण्यातील फुले मंडईतील हमालांच्या, उद्यमनगरवासियांच्या आणि दानशूर जनता जनार्दनाच्या मदतीने ही ज्ञानाची गंगोत्री सुरु केली नसती तर बहुजन समाज शतकानुशतके अज्ञानात पिचत पडला असता. अण्णा नेहमी म्हणत, ''बुद्धी ही कोण्या एकाची मक्तेदारी नाही. बहुजन समाजाचा उद्धार हा माझा धर्म आहे आणि शिक्षण हे माझे प्रमुख कार्य आहे.''

या सुवर्णमहोत्सवी वर्षात अर्ध्या शतकापूर्वी लावलेल्या 'इवल्याशा रोपाचा वेलू गगनावरी' गेला आहे. अंधारातून प्रकाशाकडे, असत्याकडून सत्याकडे आणि 'सत्यम' कडून 'सुंदरते'कडे वाटचाल करीत 'युवाशक्ती'ची स्पंदने विकसित करण्याचा प्रयत्न सुरुच आहे. इथे कला, वाणिज्य, विज्ञान व संगणक यांचे पदवीपर्यंतचे, कलाशाखेत पदव्युत्तर स्तरावर मराठी, हिंदी, इंग्रजी, इतिहास, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र आणि समाजशास्त्र या विषयांचे आणि मराठी विषयाचे एम्.फिल.चे अध्यापन केले जाते तर अधिक दोन स्तरावर व्यवसायिक शिक्षणाची सुविधा आहे. नोकरी, व्यवसाय आणि गृहकर्तव्य सांभाळून शिक्षण घेणाऱ्यासाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे अभ्यासकेंद्र असणारे कराड शहरातील एकमेव महाविद्यालय आमचे आहे. इथे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, कर्मवीर विद्याप्रबोधिनी, कमवा व शिका योजना, वाङ्मय, वादविवाद मंडळ, कलामंडळ, सेल्फ फायनांन्सिंग कोर्सेस, विद्यार्थी दत्तक पालक योजना, भित्तीपत्रके, आजी-माजी विद्यार्थी-पालक मेळावे, एन्.एस्.एस्. व एन्.सी.सी. (मुले व मुली) इ.उपक्रम सातत्याने कार्यरत असतात.

"Education is the evolution of heart, head and hand" या मुलभूत तत्वावर आमची नितांत श्रद्धा आहे. गुणवत्तेची वाट हा गुलाबाचा गालिचा नसून खाचखळग्याने भरलेला एक खडतर मार्ग असतो. ''गुणवत्ता म्हणजे जिवंतपणा ! गुणवत्ता म्हणजे कार्यशक्ती !! गुणवत्ता म्हणजे एकमेकाविषयी असलेला आदर आणि गुणवत्ता म्हणजे माणसाचे घडणे !!!'' जयप्रकाश नारायण यांनी म्हटल्याप्रमाणे,

''जो सागरसे टकराता है, उसे कहते है तुफान।
और जो जिंदगीसे टकराता है, उसे कहते है नौजवान ॥''

असे नवजवान आभाळातून पडत नाहीत, तर ते महाविद्यालयातच घडतात. म्हणूनच या महाविद्यालयातील प्रत्येक प्राचार्य, प्राध्यापक, प्रशासकीय सेवक आणि विद्यार्थी 'हे माझे कॉलेज आहे' हे उरी बाळगून धडपडत होता, आहे व त्यापुढेही रहाणार आहे.

स.गा.म.च्या ज्ञानमंदीरात संस्कार केले जातात. फक्त पदवी घेऊन बाहेर पडणारे युवक नव्हे. अल्बर्ट आईनस्टाईन यांना विचारले, ''सारे ज्ञान पुस्तकात साठविले आहे आणि विद्यार्थ्यांना वाचता येत असेल तर महाविद्यालयाची गरज काय ?'' आईनस्टाईन उत्तरले, ''पुस्तकातून माहिती मिळते; परंतू महाविद्यालये विचार करावयास शिकवितात.'' याच तत्वाचे पालन करून रयत शिक्षण संस्था नि हे महाविद्यालय 'विचारी' माणूस घडविण्याचे काम करीत आहेत; याचे कारण म्हणजे आमची नाळ ही महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ. आंबेडकर व कर्मवीर अण्णांशी जोडली आहे.

या 'स.गा.म.' ने अनेक विकासाचे टप्पे गाठले आहेत, याचे श्रेय त्या काळातील प्राचार्यांना जाते. अनेक नामवंत, कुशल आणि कर्तव्यदक्ष प्राचार्यांच्या छत्राखाली वाढलेले हे कॉलेज. विशेषतः महाविद्यालयाचे पहिले प्राचार्य श्री. रा.कृ.कणबरकर, बॅरि.पी.जी.पाटील, सौ. सुमतिबाई पाटील आणि प्राचार्य आ.भा.मगदूम यांनी ही नौका अडचणीच्या काळात समर्थपणे पेलली यांची संस्थेच्या इतिहासात नोंद आहे .सर्व माजी प्राचार्यांच्या कार्याची माहिती इतरत्र दिली आहे. सध्याचे प्राचार्य अरूण बर्गे यांनी अल्पावधीत या महाविद्यालयाचा कायापालट केला आहे. ते नेहमी म्हणतात-

"To come together is the beginning,
To work together is the progress
And to keep together is success.'

या मंत्रामुळे झपाटलेला सेवकवर्गच नव्हे तर विद्यार्थीवर्गही कामाला लागला. ही किमया त्यांनी लोकशाहीच्या मार्गाने सर्वांना विश्वासात घेऊन केली.

प्राचार्य बर्गेसाहेबांनी गुणवत्तेबरोबरच अभ्यासेत्तर उपक्रमांची बाजू भक्कम केली. आज साडेसोळा एकरांचा परिसर नववधूप्रमाणे नटला आहे, याचे संपूर्ण श्रेय आमचे प्राचार्य बर्गेसाहेब यांच्या कल्पकतेला ! त्यांची जिद्द दांडगी आहे, वयाच्या साठाव्या वर्षीही, एवढेच नव्हे तर सेवानिवृत्तीच्या शेवटच्या महिन्यात देखील त्यांची चिकाटी व आत्मविश्वास सर्वांच्या प्रशंसेस पात्र आहे. त्यांनी ही किमया लोकशाहीच्या मार्गाने साधली, यातच त्यांच्या यशस्वितेचे गमक सामावले आहे.

सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या उद्घाटन सोहळ्याचे औचित्य साधून कराड नगरीत ५६ चित्ररथांची भव्यदिव्य मिरवणूक कॉलेजच्या इतिहासात पहिल्यांदाच काढली नि कराडवासियांचे डोळे दीपले. त्याचप्रमाणे एकाच दिवशी महाविद्यालयाच्या कार्यक्षेत्रात ४३ ठिकाणी आजी-माजी विद्यार्थी - पालक मेळावे आयोजित केले. १५ पथनाट्यांचे प्रयोग अनेक ठिकाणी सादर करून 'कॉलेज आपल्या दारात' याची प्रचिती दिली. त्यामुळे निधीसंकलन मोहिमेस प्रचंड प्रतिसाद मिळाला. रोहित चव्हाण सारखे कलाकार राज्यपातळीवर, तर विजय रैनाक आणि कु. शुभस्वा शिखरे सारखे एन.सी.सी. छात्र राष्ट्रीय पातळीवर चमकले. येथील रयत सेवक आणि विद्यार्थी असंख्य स्वप्ने उराशी बाळगून ध्येयपूर्तीच्या दिशेने वाटचाल करीत आहे. कारण आम्हाला ''जिथे साधनेची पराकाष्ठा होते, तेथे सिद्धी हात जोडून उभी असते'' असा कानमंत्र आमच्या प्राचार्यांनी दिला. म्हणूनच ''केल्याने होत आहे रे, आधी केलेचि पाहिजे'' ही आमची धारणा आहे.

"Made weak by time and fate but strong in will
To strive, to seek, to find and not to yield."

ही आमची उर्मी आहे. याचे कारण म्हणजे

The winner is he who gives himself
To his work body and soul यावर आमची अढळ श्रध्दा आहे.

आमच्या धडपडीमागे संस्थेचे चेअरमन डॉ.एन.डी.पाटील मा.सचिव प्रा.ए.एस.महादार, मा.सहसचिव प्राचार्य के.एस.मोहिते इतर पदाधिकारी आजी-माजी प्राचार्य नि विद्यार्थी आणि सर्व 'रयत' प्रेमी हितचिंतकांची तळमळ आहे. ॲड.रविंद्र पवार यांच्या समर्थ नेतृत्वाखाली माजी विद्यार्थी संघ कार्यरत आहे. मुलामुलींच्या वसतिगृहात सहजीवनाचे धडे दिले जातात. 'कमवा व शिका' योजनेद्वारे स्वावलंबनाचा कानमंत्र दिला जातो. ग्रामीण स्वच्छता तंत्रज्ञान पीक संरक्षण, एकात्मिक किड व्यवस्थापन, माती व पाणी परिक्षण, गांडूळ खत प्रकल्प, पंचायत राज्य ट्रेनिंग आणि शेतकरी ग्रंथालय इत्यादि विस्तारसेवा कार्यरत आहेत. नाम.डॉ.पंतगरावजी कदम यांच्या आशीर्वादाने 'कै.अभिजीत पंतगराव कदम क्रीडा संकुल' पूर्णत्वास न्यावयाचे आहे. महत्त्वाकांक्षी उपक्रमापैकी काही पूर्ण झाले तर कॉन्फरन्स हॉल व जलतरण तलाव यासारखे प्रकल्प हाती घ्यावयाचे आहेत. आमचे कॉलेज ग्रामीण भागाच्या शिक्षणाची व संस्कृती संवर्धनाची राजधानी म्हणून नावारूपास आणावयाची आहे. कर्मवीरांचे स्वप्न साकार करणारे ज्ञान मंदीर म्हणजेच 'स.गा.म.'! सौ.सुमतिबाई पांडुरंग पाटील या मुलींच्या वसतिगृहामुळे ग्रामीण भागातील असंख्य मुली उच्च शिक्षण घेऊ शकल्या. यावर्षी महाविद्यालयाने मुलींच्यासाठी सुध्दा 'कमवा व शिका' योजना सुरू केली. म.फुले व सावित्रीबाई फुले यांनी चालू केलेली स्त्री शिक्षणाची परंपरा इथे अखंडीतपणे सुरू आहे.

एकमेका सहाय्य करू । अवघे धरू सुपंथ ॥

या उक्तीप्रमाणे व 'अवघ्या अभाग्यांचे अश्रु' पुसण्यासाठी 'सुनामि लाटांच्या तडाख्यातील असंख्य आपद्ग्रस्तांच्या मदतीसाठी आमच्या कॉलेजचे प्राचार्य, प्राध्यापक, प्रशासकीय सेवक व विद्यार्थीजनांनी सढळ हाताने आर्थिक मदत केली. 'श्वास' या चित्रपटासाठी शहरातून उत्स्फुर्तपणे मदत फेरी काढून आमच्या गुणी विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकीचे भान ठेवून मदत गोळा करून पाठविली आहे. आमचा प्राध्यापक वर्ग नेहमी चर्चासत्रे, परिसंवाद आणि संशोधन कार्यात मग्न असतो. सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त रक्तदान शिबीरे, तज्ञांची व्याख्याने, माजी विद्यार्थी व पालक मेळावे आणि २७ सेल्फ फायनान्सिंग कोर्सेस यांची कार्यवाही केली. प्राचार्य अरूण बर्गे आणि प्रा.डी.एन.धर्मे यांच्या निधी संकलन समितीस सर्वांनी सहकार्य करून, अहोरात्र झटून निधी संकलनाचे उद्दिष्ट गाठण्याचा प्रयत्न करीत आहेत. जनता जनार्दनाने आणि 'रयत' वर प्रेम करणाऱ्या दानशुरांनी सढळ हाताने देणगी अथवा जाहिरात देऊन आम्हास उपकृत केले आहे. याबद्दल सर्वांचे आभार. विद्यार्थी संसद, विद्यार्थी, प्राध्यापक व सेवकांनी जीव ओतून काम केले आहे. असंख्य देणगीदारांनी रूपये २० व ५० देणगी दिली आहे, परंतु पृष्ठसंख्येची मर्यादा लक्षात घेता त्यांचा नामोल्लेख करू शकत नाही याची खंत वाटते. याबद्दल दिलगीरी व्यक्त करून सर्वांना सहकार्याबद्दल धन्यवाद देतो.

महाविद्यालयाला अनेकांच्या पदन्यासाने पुण्यश्रेय लाभते. अनेक विभूतींच्या चरण स्पर्शाने पुलकित झालेले वातावरण प्रसन्न बनते. विविध प्रासंगिक कारणांनी नामवंत, विचारवंत, साहित्यिक, समाजसेवक आणि पदाधिकारी यांनी महाविद्यालयाला भेटी दिल्या आहेत. या क्षेयनामावलीत डॉ.एन.डी.पाटील, नाम.पतंगरावजी कदम, ना.पृथ्वीराज चव्हाण, मा.खासदार, श्रीनिवास पाटील, आमदार बाळासाहेब पाटील, मा.सचिव प्रा.ए.एस.महादार, मान.सहसचिव प्राचार्य के.एस.मोहिते, प्राचार्य डॉ. बी.एल.पाटील अशा अनेक मान्यवरांनी भेटी दिल्या आहेत.

आजपर्यंत पन्नास वर्षातील वाटचालीचा घेतलेला मागोवा 'सद्गुरू सुवर्णस्मृती' च्या अंतरंगामध्ये सामावला आहे. अनेक मान्यवरांच्या लेखातील प्रासंगिक स्फुट लिखाण व आठवणी, अवतरणे, संदर्भ आणि विधाने महाविद्यालयाच्या इतिहासातील सोनेरी पाने आहेत. त्यांचे आपणाकडून स्वागत होईलच. विचारवंताचे प्रेरणादायी लेख व मुलाखती, 'मागे वळून पाहाताना' या सदरात माजी प्राचार्य आणि सेवकांचे मनोगत व आठवणी, महाविद्यालयांच्या जडणघडणीचा आलेख सादर करतात तर 'स्मृतींची चाळता पाने' यामध्ये महाविद्यालयातील १९५४ सालच्या आणि आजी-माजी विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाशी असलेले ऋणानुबंध स्पष्ट होतात. ही स्मरणिका ऐतिहासिक दस्तऐवज व्हावा म्हणून कराड शहराचा ऐतिहासिक वारसा, विचारधारा, पन्नास वर्षातील पाऊल खुणा आणि मान्यवरांच्या संस्मरणीय आठवणी यावर भर दिला आहे. महाविद्यालयाच्या स्थानिक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मान. नामदार डॉ.पंतगरावजी कदम, रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ. एन.डी.पाटील आणि संघटक मान.आप्पासाहेब पाटील यांनी आम्हाला त्यांचे लेख छापण्यास परवानगी दिली त्याबद्दल मन:पूर्वक आभार. मान.सचिव प्राचार्य ए.एस.महादार व मान.सहसचिव प्राचार्य के.एस.मोहिते व प्राचार्य आप्पासाहेब पानवळ यांनी मुलाखतीस वेळ दिला त्याबद्दल त्यांचेही मन:पूर्वक आभार. तसेच महाविद्यालयाचे माजी प्राचार्य व विद्यार्थी यांनीही आमच्या आवाहनास प्रतिसाद दिला त्या सर्वांचे मन:पूर्वक आभार. मा.प्राचार्य अरूण बर्गे यांनीही महाविद्यालयाच्या पाऊलखुणाची नोंद केली याबद्दल धन्यवाद. संस्थेचे पदाधिकारी, स्थानिक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सदस्य, महाविद्यालयाचे उपप्राचार्य, सहकारी प्राध्यापक, प्रशासकीय सेवक आणि विद्यार्थी वर्ग यांच्या सहकार्याबद्दल धन्यवाद.

सुवर्ण महोत्सवी वर्षात ''जातस्यहि ध्रुवो मृत्यु:।'' या नियतीच्या कालचक्रानुसार अनेक नामवंत व श्रेष्ठ व्यक्ती, साहित्यिक, समाजधुरिण, राजकारणी, आपल्यातून निघून गेले आहेत. सुनामि लाटांच्या तडाख्यात लाखो निष्पाप जीव मृत्यूमुखी पडले. त्याचप्रमाणे भारताचे माजी पंतप्रधान मा.पी.व्ही.नरसिंहराव, मा.आमदार अभयसिंहराजे भोसले, रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष बॅरि.पी.जी.पाटील, मा.दादासाहेब जगताप, मा.विठ्ठलराव तुपे, मा.जयकुमार पाटील आणि डॉ.द.शि.एरम कालवश झाले. या महाविद्यालयातील हरहुन्नरी व सदैव हसरे व्यक्तिमत्त्व, शिवाजी विद्यापीठाच्या विज्ञान शाखेचे डीन, सर्वांचे लाडके 'प्रकाश' उर्फ डॉ.प्रतापराव एस.माने, उपप्राचार्य प्रा.बी.टी.जाधव, प्रा.शिवाजीराव शेवाळे, श्री.एस.एन.येडगे आणि श्री.एम.डी.काकडे कालवश झाले. या सर्वांच्या आत्म्यांना चिरशांती लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना व हीच आमची मन:पूर्वक श्रध्दांजली. त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात 'सद्गुरू' परिवार सहभागी आहे.

'सद्गुरू सुवर्णस्मृती' संपादनाचे 'धनुष्य' पेलण्याची जबाबदारी आदरणीय गुरूवर्य प्राचार्य बर्गेसाहेबांनी माझ्यावर टाकली. संपूर्ण जबाबदारी पेलण्याची कुवत नसतानाही मी 'इथेच घडलो नि बहरलो' म्हणून सर्वांच्या सहकार्याने जबाबदारी पार पाडण्याचा दृढनिश्चय केला. मी स्वत: 'स.गा.म.' मध्येच वाढलो, प्रथम विद्यार्थी म्हणून आणि नंतर प्राध्यापक म्हणून. याच ज्ञानमंदिरातून मला माझा पीएच.डी.चा प्रबंध संस्थापकांना समर्पित करण्याची संधी मिळाली. या ऋणातून उतराई होण्याच्या भावनेने मी ही जबाबदारी चिवटपणे पार पाडली. आज या संपादनाच्या जबाबदारीतून मुक्त होताना धन्यता वाटते.

संपादनास सुरूवात करण्यापूर्वी सर्वप्रथम मी रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर विद्याप्रबोधिनीचे कार्यवाह आणि मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य मान.डॉ.अनिल पाटील यांची भेट घेतली. त्यांनी मला प्रत्येक लहान सहान गोष्टींचे बारकावे स्मरणिकेची रचना छपाई याबाबत इत्थंभूत सूचना दिल्या. त्यांच्या मौल्यवान मार्गदर्शनाबद्दल मी त्यांचा सदैव ऋणी राहीन. त्यांना शतश: धन्यवाद. मा.प्राचार्यांची रसिकता, पारदर्शकता, समता आणि कुशलता याबरोबरच वडीलकीचा प्रेमळ व मायेचा हात आमच्या पाठीशी असल्यामुळेच संपादनाचे काम पूर्ण करता आले. त्याचप्रमाणे सद्गुरू सुवर्णस्मृतींचे अमूर्त सौंदर्य समूर्त करण्याचे श्रेय आमच्या सर्व सहसंपादकांना व निमंत्रितांना आहे.' लाजवाब मुखपृष्ठ संकल्पना व जाहीरात रचना प्रा.राजेंद्र देशमुख आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी अथक परिश्रमाने साकार केली. मुद्रणदोष तपासण्याची जबाबदारी प्रा.एस.टी.जाधव, प्रा.सुमंत जगताप आणि प्रा. डी. डी. नलवडे यांनी तन्मयतेने पार पाडली, तर निवडक फोटोंची निवड व रचना प्रा.संजय पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी उत्तम प्रकारे केली. प्रा.व्ही.के.निकम, प्रा.एन.डी.पाटील, प्रा.राम जाधव, श्री.ए.आर.यादव आणि श्री विवेक भोज यांनी मान्यवरांच्या मुलाखती घेतल्या. उपप्राचार्य प्रा.एस.एम.जाधव, डॉ.आर.एन.पाटील, प्रा.डी.एन.धर्मे, प्रा.सौ.व श्री.रैनाक, प्रा.एम.एस.पोंधे, प्रा.जी.बी.कल्याणशेट्टी, प्रा.सौ.उर्मिला जगदाळे, प्रा.सौ.के.एस.भोसले, प्रा.सौ.एस.एस.मोहिते, प्रा.जे.के गुजर या सर्व सदस्यांनी आपापला खारीचा वाटा उचलल्यामुळेच मी हे सामुदायिक कार्य अल्पावधीत पूर्ण करू शकलो. सर्वांनी उत्तम सहकार्य दिले. त्याबद्दल ते साभार धन्यवादास पात्र आहेत. आभाराची भावना परकेपणाची ! कृतज्ञतेस माझे शब्द अपुरे !! आपणा सर्वांचे सहाय्य लाभले, आपलेपण वाटले.

स्मरणिका तयार होत असताना कळत न कळत अनेक सुहृदांचे सहकार्य लाभले आहे त्या सर्वांचे मन:पूर्वक आभार. 'प्रिंट ओम ऑफसेट' चे चालक नि मालक श्री.संदेश शहा, त्यांचे बंधु श्री जतीन शहा, व टाईप इनोव्हेटर्सचे प्रशांत गुजर आणि त्यांचे सहकारी यांनी अथक परिश्रम घेऊन अनुरूप मांडणी, सुबध्द बांधणी आणि उत्कृष्ट छपाई करून सहकार्य केल्याबद्दल हार्दिक आभार.

स्मरणिकेत काही उणीवा राहिल्या असतील, त्या मोठ्या मनाने व उदार अंत:करणाने गोड मानून घ्याव्यात. पृष्ठसंख्या मर्यादित असल्यामुळे अनेकांच्या लेखांना व छायाचित्रांना प्रसिध्दी देता आली नाही. असंख्य हितचिंतक, आश्रयदाते, समाजसेवक, लोकप्रतिनिधी, पत्रकार, यांचा जिव्हाळा, व आपलेपणाच्या बळावरच 'सद्गुरू सुवर्णस्मृती' आपण मायेच्या ममतेने स्वीकारावी, हीच अभिलाषा.

धन्यवाद !

जय कर्मवीर ! **जय महाराष्ट्र !!** **जय हिंद !!!**

प्रा.मानसिंग कदम
प्रमुख संपादक
सद्गुरू सुवर्णस्मृती.

रयत शिक्षण संस्थेचे शैक्षणिक व सामाजिक योगदान

मा.प्रा.डॉ.एन.डी.पाटील
चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा.

रयत शिक्षण संस्थेच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त रयत शिक्षण पत्रिकेसाठी संस्थेचे चेअरमन मा.प्राचार्य डॉ. एन.डी.पाटील यांची मुलाखत पुर्नमुद्रित करीत आहोत. - संपादक

- **अमृतमहोत्सव साजरा करण्यापाठीमागील आपली भूमिका विशद करा.**

रयत शिक्षण संस्था ही एक शिक्षण संस्था असली तरी महाराष्ट्रामध्ये ज्या अनेक शिक्षण संस्था आहेत त्यापैकी एक शिक्षण संस्था असे तिचे स्थान नाही. या संस्थेला महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनामध्ये, सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीमध्ये आणि पिढ्यान्पिढ्या शिक्षणाला वंचित झालेल्या बहुजन समाजाच्या आणि तळागाळातील मुला-मुलींच्या शिक्षणाच्या प्रयत्नांमध्ये एक आगळं, वेगळं असे स्थान प्राप्त झालेलं आहे. त्याची कारणेही तशीच आहेत. ज्या कालखंडामध्ये बहुजन समाजाच्या शिक्षणाचा विचार न करता, समाजाचे त्यावेळचे नेते मूठभरांच्या उच्च शिक्षणाची फारतर माध्यमिक शिक्षणाची विवंचना करीत होते, त्या कालखंडात बहुजन समाजाचे शिक्षण व्हावे म्हणून, रयत शिक्षण संस्थेनेच सर्वप्रथम या उपेक्षित वर्गासाठी त्यांच्या त्यांच्या परिसरामध्ये प्राथमिक शाळा काढण्याचा एक अभिनव उपक्रम केला. 'गोरगरिबांची मुले दूरवरच्या शाळेमध्ये येऊ शकत नसतील तर माझी शाळाच या मुलांच्या दाराशी जाईल' असा निर्धार करून कर्मवीर अण्णांनी या खेड्यापाड्यांतून प्राथमिक शिक्षणाच्या शाळांचं एक जाळं विणलं आणि बहुजन समाजातल्या आणि विशेषतः चंद्रमौळी झोपडीमध्ये जन्माला आलेल्या गोरगरीब पालकांच्या मुलांची गुणवत्ता या जाळ्यात खेचण्याचे काम त्या माध्यमातून कर्मवीर अण्णांनी साध्य केले. हा झाला गोरगरिबांना शिक्षण उपलब्ध करून देण्याचा एक भाग. परंतु, याहीपेक्षा आणखी एका महत्त्वाच्या सामाजिक परिवर्तनाच्या क्षेत्रात रयत शिक्षण संस्थेने फार मौलिक आणि म्हटलं तर अभूतपूर्व अशी कामगिरी केलेली आहे. ज्या कालखंडात ज्यांना अस्पृश्य मानले जात होते, अशा जातींच्या मुलांना शाळेच्या वर्ग खोलीमध्ये इतर सवर्ण हिंदू मुलांच्या बरोबरीने बसण्याची मुभा नव्हती. एकतर त्यांना शाळेची कवाडं बंद होती, किंवा अशा जातीतील एखादा मुलगा मोठ्या जिद्दीने प्राथमिक शाळेत आलाच तर त्याला वर्गामध्ये न बसविता वर्गाच्या बाहेर बसविले जात होते. अशा काळात कर्मवीरांनी अशाच एका दुर्दैवी मुलाला बरोबर घेऊन, रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली आणि आपल्या शैक्षणिक कार्याची मुहूर्तमेढ रोवली. आज हे सारंच चित्र पालटलेलं आपण पाहतोय. तथापि ज्या काळात रयत शिक्षण संस्थेने अठरा पगड जातींच्या मुलांना केवळ शाळेतच नव्हे तर वसतिगृहामध्ये एकत्र आणून, सख्या भावंडाप्रमाणे, एकाच छपराखाली एकाच चुलीवर स्वयंपाक करून एक नव्या प्रकारचे, सामाजिक जीवन जगण्याची संधी उपलब्ध करून दिली या गोष्टीचं महत्व हे निश्चितच अनन्य साधारण आहे. आणि म्हणून एका अर्थाने रयत शिक्षण संस्थेने जात, पात, पंथ, भेद विसरून समाजातल्या सर्व जातीधर्माच्या मुलांना एकत्र आणून, एकत्र शिकवून, एकत्र वाढवून, एक नवा माणूस निर्माण करण्याची, एक अभिनव मूस या रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून महाराष्ट्राला बहाल केलेली असल्यामुळे अशा संस्थेच्या अमृतमहोत्सवाच्या निमित्ताने सामाजिक परिवर्तनाच्या क्षेत्रात अद्यापि रेंगाळत राहिलेले प्रश्न धसाला लावावेत अशी आमची भूमिका आहे.

- **कर्मवीर अण्णांच्या या शैक्षणिक कार्याचे नेमके फलित काय ?**

कर्मवीर अण्णांनी त्या काळामध्ये एक महत्त्वाची गोष्ट केली. ज्या कालखंडात इंग्रजी राज्यकर्त्यांच्या प्रशासनामध्ये प्रवेश करण्यासाठी आवश्यक असलेल्या उच्चशिक्षणाचा प्रसार करण्यातच समाजातल्या पुढारलेल्या आणि शैक्षणिक दृष्ट्या आघाडीवर असलेल्या वर्गाची पावले पडत होती. त्या काळात महात्मा फुल्यांचा एक मान्यवर असा अपवाद वगळता, समाजाला उच्च शिक्षण देण्याच्या ऐवजी, सरकारी

खजिन्यातील पैसा मूठभराच्या उच्च शिक्षणावर खर्च करण्यापेक्षा, तो प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकरणावर खर्च व्हावा अशी भूमिका घेतली जात नव्हती. १८८२ साली हंटर कमिशनपुढे म.फुल्यांनी या देशातल्या प्राथमिक शिक्षणाला देखील वंचित झालेल्या करोडो लोकांची कैफियत अतिशय प्रभावी रीतीने मांडली. तरी देखील त्यानंतरच्या काळात राज्यकर्त्यांच्या धोरणात, अगर शैक्षणिक क्षेत्रात आघाडीवर असणाऱ्या वर्गाच्या धोरणात फारसा फरक पडला नव्हता. १८५८ च्या राणीच्या जाहीरनाम्यानंतर, देशाच्या प्रशासनामध्ये हिंदी माणसांची मोठ्या संख्येने भरती करण्याचे धोरण घोषित करण्यात आले. या देशातल्या पदवीधरांच्यासाठी एक नवं दालन या निमित्तानं सुरु झालं. आणि साहजिकच या दालनात प्रवेश करण्यासाठी आसुसलेला जो मूठभर वर्ग होता, त्यांच्या उच्च शिक्षणासाठी ठिकठिकाणी महाविद्यालये उभारण्यात आली. सरकारी महाविद्यालयांच्या बरोबर काही खाजगी शिक्षणसंस्थांनीही अशी महाविद्यालये उभी केली. १८८५ सालामध्ये पुण्यात फर्ग्युसन कॉलेजच्या स्थापनेनंतर दोन वर्षांनी कर्मवीर अण्णांचा जन्म झाला आणि अण्णा त्यानंतर वीस एक वर्षानंतर या शैक्षणिक क्षेत्रात उतरले. आणि त्यांनी मात्र आपल्या शैक्षणिक कार्याची सुरूवात साताऱ्यासारख्या ठिकाणी महाविद्यालये उघडून केली नाही तर त्यांनी आपल्या शैक्षणिक कार्याची मुहूर्तमेढ अठरापगड जातींच्या मुलांच्यासाठी एकच वसतिगृह आणि खेड्यापाड्यांतल्या मुलांच्यासाठी प्राथमिक शाळा-अशा दुहेरी प्रयत्नांनी केली. यावरून अण्णांच्या शैक्षणिक कार्याचे फलित आपल्या लक्षात येईल. टिळक, आगरकर आणि कर्मवीर अण्णा यांच्यासमोर, समाजाच्या कोणत्या वर्गाचं शिक्षण करायचं आहे यासंबंधीच्या कल्पना अतिशय सुस्पष्ट होत्या, असं मला वाटतं. टिळक, आगरकरांच्या समोर असाच एक वर्ग होता की ज्या वर्गाचं प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण मोठ्या प्रमाणात सरकारी खर्चाने होत होतं. आणि सरकारी नोकरीमध्ये शिरण्यासाठी त्याला ज्या पदवीपर्यंतच्या उच्च शिक्षणाची गरज होती, ती गरज भागविणे हे त्यांचे उद्दिष्ट होते. याउलट कर्मवीर अण्णांच्या समोर असा वर्ग होता की ज्या वर्गाच्या माध्यमिक आणि उच्च शिक्षणाची चिंता ते करूच शकत नव्हते. या वर्गाच्या प्राथमिक शिक्षणाचा जिथे पत्ता नव्हता तिथे त्यांच्यासाठी त्याकाळात माध्यमिक विद्यालये आणि महाविद्यालये काढण्यामध्ये अण्णांना यत्किंचितही स्वारस्य नव्हते आणि म्हणून अण्णांनी या विभागाचे शिक्षण करण्यासाठी, प्राथमिक शाळेपासूनच श्री गणेशा केला पाहिजे, हे ओळखून त्यांनी खेड्यापाड्यांतली, एरव्ही शिक्षणाला मुकणारी मुलं त्यांनी केवळ प्राथमिक शाळेतच आणली असे नव्हे, तर प्राथमिक शिक्षणानंतरही पुढील माध्यमिक आणि महाविद्यालयीन शिक्षण करण्यासाठी देखील, वसतिगृहांच्या माध्यमातून त्यांनी त्यांच्या शिक्षणाचा मार्ग खुला केला आणि नेमकं फलित म्हणजे आज महाराष्ट्राच्या असंख्य खेड्यापाड्यांतील बहुजन समाजाची मुलं, बाराबलुतेदारांची मुलं, केवळ प्राथमिक शिक्षण घेऊनच नव्हे तर उच्चशिक्षण घेऊनही आपआपल्या परीने पुढे आली आहेत आणि महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनामध्ये ती आपापले योगदान करीत आहेत. कर्मवीर अण्णांनी हे कार्य त्या काळात केलं नसतं तर आज सार्वजनिक जीवनामध्ये ही वेगवेगळ्या स्तरांवर आणि वेगवेगळ्या पदांवर काम करणारी अनेक माणसं गुरं राखताना अगर शेतात औत धरताना दिसली असती.

- **कर्मवीर अण्णांच्या शैक्षणिक कार्याच्या सामाजिक बाजूची दखल संस्था आज घेते आहे का ?**

एक तर, रयत शिक्षण संस्थेची सामाजिक परिवर्तनाच्या क्षेत्रातली कामगिरी ही आज फक्त शैक्षणिक प्रश्नापुरतीच मर्यादित आहे की काय ? असा प्रश्न विचारण्याचा यामध्ये उद्देश असावा असं मला वाटतं. एक काळ असा होता की, रयत शिक्षण संस्थेनं शैक्षणिक कार्याबरोबरच जात, पात, पंथ भेद मोडून एक नवा समाज निर्माण करण्याची उर्मी समाजामध्ये निर्माण केली आणि जोपासली होती. त्याचं मुख्य हत्यार ही अठरापगड जातीची वसतिगृहं ही होती. तो काळच असा होता की ही वसतिगृहं स्थापन झाली नसती तर या मुलांचं शिक्षणच झालं नसतं. त्यामुळे 'रयत शिक्षण संस्था म्हणजे वसतिगृहयुक्त शिक्षण' असचं समीकरण अनेक वर्षं मांडलं जात होतं आणि या वसतिगृहयुक्त शिक्षणाचे संस्कार हे सामाजिक परिवर्तनाच्या क्षेत्रात अतिशय महत्वाचे होते. आज रयत शिक्षण संस्थेच्या कार्याचा पसारा माध्यमिक शाळांच्या स्वरूपात आणि महाविद्यालयांच्या स्वरूपात खूपच वाढला असला तरी या विद्यार्थ्यांची संख्या ही निश्चितच नगण्य ठरत आलेली आहे. आपल्या गावातच किंवा गावाच्या शेजारच्या माध्यमिक विद्यालयात आणि महाविद्यालयात शिकणारी मुलं वसतिगृहात राहण्याच्या ऐवजी जाऊन येऊन शिक्षण घेतात हे लक्षात घेतलं पाहिजे. जात, पात, पंथ, भेद यांना मूठमाती देणारं वसतिगृह हे रयत शिक्षण संस्थेचं त्याकाळात एक खास वैशिष्ट्य होतं. ते वैशिष्ट्य आज त्या प्रमाणे चालू ठेवता आलेलं नाही, या गोष्टीच्या संदर्भात हा प्रश्न विचारला गेला असावा असं मला वाटतं. तथापि त्या प्रश्नांच्या पाठीमागची ही जी

एक व्यावहारिक अडचण आहे ती लक्षात घेतली पाहिजे. पण मग या प्रश्नाचं उत्तर मी एका वेगळ्या शब्दात देईन. आज रयत शिक्षण संस्था पूर्वीच्या छत्रपती शाहू बोर्डिंगच्या धर्तीची किती वसतिगृहं चालविते आणि त्यामध्ये संस्थेचे किती टक्के विद्यार्थी हे वसतिगृहयुक्त शिक्षण घेतात, या कसोटीवर जरूर संस्थेचं हे काम तितकेसे समाधानकारक वाटणार नाही. तथापि रयत शिक्षण संस्थेचा जो मूळ गाभा समाजातल्या सर्व उपेक्षित आणि पिढ्यानपिढ्या शिक्षणाला वंचित अशा विभागांना बरोबर घेऊन त्यांना शिक्षणाची संधी देऊन समाजाच्या मूळ प्रवाहामध्ये त्यांना सहभागी होण्याची संधी देणं, या कामामध्ये आम्ही निश्चितपणे असा दावा करू शकतो की रयत शिक्षण संस्थेनं या सामाजिक बाजूची दखल अतिशय समर्थपणे आणि अभिमान वाटावा अशा रीतीने घेतली आहे. आज संस्थेच्या सेवेमध्ये जे सेवक आहेत या सेवकांमध्ये, शैक्षणिक कार्य करण्याऱ्या सेवकामध्ये, महाराष्ट्रातल्या १५१ जातींचे लोक सहभागी झालेले आहेत. अशा अनेक संस्था आहेत की त्यांना हा दावा करता येणार नाही. कारण उघडच आहे की काही शिक्षण संस्था विशिष्ट जातींच्याच टोळक्यांच्या हातात आहेत.

- **राष्ट्रीय एकात्मते संदर्भात संस्थेचे नेमके योगदान काय ?**

मला असं वाटतं की या प्रश्नांचं उत्तर वर येऊन गेलेलं आहे. आज जेव्हा राष्ट्रीय एकात्मतेला आणि भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यामध्ये अंतर्भूत असलेल्या धर्मनिरपेक्षतेला आव्हान देणाऱ्या शक्ती आपली ओंगळ डोकी वर काढीत आहेत; अशा कालखंडात विद्यार्थ्यांच्यामध्ये आपण वेगवेगळ्या जातीधर्माचे आहोत अशी भावना वाढीला न लावता आपण प्रथम भारतीय आहोत, ही भावना वाढीला लावण्यासाठी रयत शिक्षण संस्थेने आपल्या सर्व शाखांमधून जात, पात, पंथ, भेद विरहित समाज निर्माण करण्याचा जो प्रयोग चालू ठेवलेला आहे तो या राष्ट्रीय एकात्मतेच्या संदर्भात महत्त्वाचा आहे. हीच भूमिका देशातल्या सर्व शिक्षण संस्थांनी उचलून धरली तर राष्ट्रीय एकात्मतेला जे आव्हान दिले जात आहे ते तसे राहणार नाही. म.फुल्यांनी एके ठिकाणी आपली भूमिका स्पष्ट केलेली आहे, ''ख्रिस्त, महंमद, मांग ब्राह्मणाशी ! धरावे पोटाशी बंधुपरी'' हा विचार म. फुल्यांनी समाजाला दिला आणि तो विचार कृतीत आणण्याचं काम रयत शिक्षण संस्थेनं केलं आहे.

- **बदलत्या काळानुसार संस्थेचे शैक्षणिक धोरण बदलणे आपणास आवश्यक वाटते का ? तसे वाटत असल्यास ते बदलते स्वरूप काय असावे ?**

काळानुरूप प्रत्येक व्यवस्थेमध्ये बदल अपरिहार्य असतात. शिक्षण क्षेत्रामध्येही हे बदल करावेचं लागतील. शिक्षण व्यवस्था ही पद्धती ही काही अलग आणि अलिप्त अशी बाब नाही. बाहेरच्या समाज व्यवस्थेचे शिक्षणपद्धती हे एक अंग असतं. किंबहुना जशी समाज व्यवस्था तशी शिक्षण पद्धती असं ठरून गेलेलं आहे. समाज व्यवस्थेला अनुरूप अशा तऱ्हेची शिक्षण पद्धती समाज व्यवस्था निर्माण करते हा अनुभव लक्षात घेतला तर प्रारंभीच्या काळात शिक्षण देण्यात आले ते निश्चितच कालबाह्य झालेलं आहे. भारत सरकारनं वेगवेगळी जी कमिशन्स नेमली किंवा वेगवेगळे आयोग नेमले त्या सर्वांनीच या शिक्षण व्यवस्थेमध्ये बदल करण्याचे सूचित केलेले आहे. मात्र या साऱ्या शिफारशी फक्त कागदावर राहिल्या. त्यांची अमंलबजावणी झाली नाही. उदाहरणच द्यायचे झाले तर, कोठारी कमिशनने १९६६ साली आपल्या अहवालामध्ये एस.एस.सी परीक्षा पास झालेल्या विद्यार्थ्यांपैकी किमान ५० टक्के विद्यार्थी हे महाविद्यालयीन शिक्षणाकडे न वळता त्यांना व्यावसायिक शिक्षणाकडे वळविण्यात यावे आणि त्यांना १० वी नंतर १२ चे शिक्षण हे अशा पद्धतीने द्यावे की त्या शिक्षणाच्या आधारावर ते स्वतःच्या पायावर उभे राहू शकतील. एक तर तो नोकरीसाठी पात्र ठरावा, अगर स्वयं उद्योगधंदा करण्यासाठी तो पुढे यावा अशी अपेक्षा होती. परंतु हे घडले नाही. याचे एकमेव कारण, यासाठी जो पैसा उपलब्ध करण्याची गरज होती तो पैसा उपलब्ध केला नाही. यामध्ये मी राज्य सरकार आणि केंद्र सरकार या दोघांनाही दोषी ठरवतो. आजही तांत्रिक शिक्षणावर अधिक भर देण्याची गरज असताना गेल्या काही वर्षात सरकारचा तांत्रिक शिक्षणावरचा खर्च हा कमी कमी होत आलेला आहे. टक्केवारीच्या प्रमाणात एक गोष्ट जाताजाता सांगावी लागेल की महाविद्यालयीन शिक्षण क्षेत्रामध्ये सरकार आर्टस्, कॉमर्स, सायन्स या विद्याशाखांमध्ये विनाअनुदान महाविद्यालये मंजूर करीत असते. त्यांना सुरूवातीला काही वर्षे जरी अनुदान देण्यात येत नसले तरी नंतर ही महाविद्यालये टप्याटप्याने अनुदानास पात्र ठरतात. या उलट खाजगी शिक्षण संस्थांनी इंजिनिअरिंग कॉलेजीस आणि आय.टी.आय सुरू केली असली तर त्यांना मात्र कधीही अनुदान मिळणार नाही अशा अटीवर परवानगी दिली जाते यामध्ये जी विसंगती आहे ती पुरेशी बोलकी आहे. आजच्या शिक्षणपद्धतीमध्ये महत्वाचा दोष हा आहे की, शिक्षणावर होणारा खर्च हा प्राथमिक शिक्षणावर जेथे फार मोठ्या संख्येचा प्रश्न आहे तेथे अधिक खर्च होण्याऐवजी उच्चशिक्षणावर व काही लोकांना मोठ्या प्रमाणात प्रचंड सबसिडी देण्यावर होतो. त्याचे एक उदाहरण सांगावयाचे झाले तर पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्ये शिक्षणावर जो एकूण खर्च झाला त्यापैकी ५६ टक्के खर्च

प्राथमिक शिक्षणावर करण्यात आला. पण त्यानंतरच्या काळात प्राथमिक शिक्षणावरील खर्चाचे प्रमाण कमी कमी होत आले. सातव्या पंचवार्षिक योजनेमध्ये ते २९ टक्के पर्यंत ढासळलेले दिसून येते. त्याचा साहजिकच परिणाम प्राथमिक शिक्षणात गळती, नापासीही वाढण्यात झाला. प्राथमिक शाळांना पुरेशा वर्ग खोल्या कधीच उपलब्ध झाल्या नाहीत. आजही महाराष्ट्र राज्यात थोड्याथोडक्या नव्हे तर ७२००० वर्ग खोल्यांची गरज आहे. आपण शिक्षणामध्ये शाळेच्या भिंती बोलक्या कराव्यात ही जरूर अपेक्षा करावी पण जेथे भिंतीच नाहीत त्या बोलक्या करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. आजच्या शाळा पुरेशा निधी अभावी अनाकर्षक ठरतात. मुलांनी घरामध्ये न थांबता शाळेत धाव घ्यावी असे वातावरण आढळून येत नाही. अनेक शाळा काल परवापर्यंत एक शिक्षकी होत्या. एका बाजूला वर्गवार शिक्षक असलेल्या शाळा, विषयवार शिक्षक असलेल्या शाळा आणि दुसऱ्या बाजूला शाळावार एक शिक्षक असे विदारक चित्र दिसून येते. त्याचाच परिणाम ग्रामीण भागातील मुलांच्या गुणवत्तेवर दिसून येतो. ही मुले निकृष्ट प्रतीच्या प्राथमिक शाळांतून बाहेर पडतात. त्यांना उपलब्ध असणाऱ्या माध्यमिक शाळाही अशाच असतात. अशा मुलांना कोणत्याही तांत्रिक शिक्षणाची, औद्योगिक शिक्षणाची सुविधा या आजच्या व्यवस्थेमध्ये अभावानेच आढळून येते. त्यामुळेच आजच्या शिक्षण व्यवस्थेतून बाहेर पडणारी पिढी केवळ **unempolyed** आहे असे नव्हे तर **unemployable** अशी दिसून येते. ही सारी परिस्थिती बदलण्याची गरज आहे. त्यासाठी प्राथमिक शिक्षण अग्रहक्क म्हणून मान्य करण्यात आले पाहिजे, दुर्दैवाने हे अद्यापी घडले नाही. त्याचाच परिणाम म्हणून ४८ वर्षाच्या स्वातंत्र्यानंतरही ४८ % लोक निरक्षर आहेत. भगिनी वर्गाच्या निरक्षरतेचे प्रमाण तर भयानक आहे. हे ४८ % निरक्षर केवळ निरक्षरच नाहीत तर दरिद्रीही आहेत व जे दरिद्री आहेत ते हमखास निरक्षर आहेत. हे दुष्ट वर्तुळ भेदले जात नाही ही आज देशाच्या दृष्टीने एक खेदजनक समस्या आहे. यावर उत्तर आहे आणि ते उत्तर स्पष्ट आहे, सरकारने, राज्यकर्त्यांनी, कोठारी कमिशनने सूचित केल्याप्रमाणे राष्ट्रीय उत्पन्नाचा किमान ६ टक्के हिस्सा शिक्षणासाठी राखून ठेवण्याची गरज आहे. कोठारी कमिशनची ही शिफारस केवळ शिफारस म्हणून राहिलेली नाही. १९६६ साली जे नवीन शैक्षणिक धोरण स्वीकारण्यात आले त्यामध्ये सूत्र मान्य करण्यात आले. १९८५ - ८६ साली जे नवीन शैक्षणिक धोरण स्वीकारण्यात आले त्यामध्येही या सूत्राचा स्वीकार अधिकृतरीत्या भारत सरकारने केला आहे. आणि एवढे होऊनही शिक्षणावर केला जाणारा खर्च राष्ट्रीय उत्पन्नाच्या ४ टक्के पेक्षाही कमी आहे हे खेदाने नमूद करणे भाग पडते. उद्या कदाचित हे प्रमाण काहीसे वाढले तरी देखील प्राथमिक शिक्षणाची आजची जी ससेहोलपट चालू आहे ती अशीच चालू राहण्याचा धोका आहे. यासाठी प्राथमिक शिक्षणावर करावा लागणारा खर्च हा सरकारच्या घटनात्मक जबाबदारीचा (constitutional obligation) म्हणून स्वीकारण्यात आला पाहिजे. भारतीय राज्यघटनेच्या ४५ व्या कलमामध्ये निःसंदिग्ध शब्दामध्ये जे आश्वासन देण्यात आलेले आहे त्याची सातत्याने पायमल्ली होत आलेली आहे. ती तत्काळ थांबविण्याची गरज आहे. समाजामधल्या उपेक्षित वर्गाचे शिक्षण करावयाचे असेल तर त्यासाठी ग्रामीण भागामध्ये आणि मोठ्यामोठ्या शहरांच्या दुर्लक्षित भागामध्ये (कामगार, झोपडपट्या वस्तीमध्ये) काम करणाऱ्या शिक्षण संस्थांना झुकत्या प्रमाणात अनुदान देण्याची गरज आहे 'सब घोडे बारा टक्के' ही भूमिका बदलली पाहिजे, सामाजिक क्षेत्रामध्ये आपण ज्या प्रमाणे तळागाळातल्या जातींच्यासाठी नोकऱ्यांच्या क्षेत्रात राखीव जागा ठेवण्याचे धोरण स्वीकारले त्याचीच एक पुढची पायरी म्हणून समाजाच्या उपेक्षित भागामध्ये शैक्षणिक कामे करणाऱ्या शिक्षण संस्थांना जाणीवपूर्वक झुकते माप अनुदान स्वरूपात देणे ही काळाची गरज म्हणून मान्य केली पाहिजे.

- **अमृत महोत्सवाच्या निमित्ताने संस्थेच्या भविष्यकालीन वाटचाली संदर्भात आपणास विशेषत्वाने काय सांगावेसे वाटते का ?**

यामध्ये जे वर सांगितले आहे ते एकंदर आमच्या कार्याचे स्वरूप आहे. कर्मवीर अण्णांनी दिलेल्या उपेक्षितांच्या शिक्षणाचा जो वसा तो वसा हा आमचा एक विशेष आहे. अशा तऱ्हेचा ठेवा आहे आणि हा उपेक्षितांच्या शिक्षणावरचा आमच्या संस्थेचा भर हा येथून पुढील काळामध्येही दीपस्तंभासारखा तो सातत्याने मार्गदर्शन करत राहील. मूठभर प्रतिष्ठितांच्यासाठी शिक्षण की उपेक्षितांसाठी शिक्षण यामध्ये आम्ही या उपेक्षितांच्या शिक्षणाचा सातत्याने पाठपुरावा करीत राहू. आज या क्षेत्रात काही प्रश्न विनाकारणच उभे केले जात आहेत ''क्वालिटी'' की ''क्वॉन्टिटी'' गुणवत्ता की विस्तार, अशा स्वरूपात हे प्रश्न उपस्थित केले जातात. काहींना असं वाटतं की आता शिक्षणाचा प्रसार खूप झालेला आहे. आता जे शिक्षण दिले जाते ते अधिक गुणवत्ता निर्माण करणारे असावे आणि त्यावर भर देण्यात यावा, असा आग्रह धरणारी काही मंडळी आहेत. तथापि ही मंडळी एक गोष्ट विसरतात. आजही या समाजामध्ये ज्या देशात ४८ टक्के लोक निरक्षर आहेत, जवळ जवळ ७० टक्के विद्यार्थी प्राथमिक शिक्षणाच्या पातळीवरच

गळतात आणि पुढे निरक्षर प्रौढ म्हणून आपलं जीवन कंठतात. अशा देशामध्ये गुणवत्ता की विस्तार हे प्रश्न गैरलागू ठरतात. अशा या समाजव्यवस्थेमध्ये शिक्षणाच्या विस्ताराचा प्रश्न हा कदापि दुर्लक्षित करता येत नाही अगर तो दुय्यम स्वरूपाचाही ठरविता येत नाही. आम्हाला आज शिक्षणाचा विस्तारही करावयाचा आहे. आणि जे शिक्षण आज आम्ही देत आहोत त्याची गुणवत्ताही जरूर वाढवायची आहे. परंतु केवळ गुणवत्ता वाढीच्या वेदीवर, विस्ताराचा बळी देण्याची कल्पना ही बहुजन समाजावर आणि आजपर्यंत शिक्षणाला वंचित झालेल्या विभागावर अन्याय करणारी ठरेल. आणि म्हणून शिक्षण क्षेत्रामध्ये विस्तार आणि गुणवत्ता असे क्रम लावून आम्ही या प्रश्नाकडे पाहतो आहोत. या दोन्हीवर आम्ही तितकाच भर (सारखाच भर) देत आहोत. हे सर्व करीत असताना एका गोष्टीचे आम्हाला भान ठेवावे लागेल. जागतिक बँकेने आपल्या अहवालामध्ये एका गोष्टीकडे आपले लक्ष वेधले आहे की हे विसावे शतक संपून एकविसाव्या शतकामध्ये 'भारत देश' पदार्पण करील त्या दिवशी जगाच्या पाठीवर जे एकूण निरक्षर असतील त्यापैकी ५४.८ टक्के निरक्षर एकट्या भारतात असणार आहेत. आणि ही संख्या थोडी थोडकी नसून ५० कोटीच्या घरात असणार आहे. हे भयानक वास्तव लक्षात घेता केवळ गुणवत्ता वाढीवर भर देणं आणि विस्ताराचा प्रश्न (प्रसाराचा प्रश्न) दुर्लक्षित करणं हे आत्मघातकी आणि स्वतःच्या पायावर कुऱ्हाड मारून घेण्यासारखे ठरेल आणि राष्ट्र म्हणून जगाच्या पाठीवर आपण अपात्र ठरू. या गोष्टीचं भान येथून पुढच्या काळातदेखील शिक्षण क्षेत्रात प्रत्येक पाऊल टाकताना आम्हाला असेल. एवढीच आम्ही या निमित्ताने भूमिका स्पष्ट करतो.

✦ ✦ ✦ ✦

अभिजीत पतंगराव कदम क्रीडा संकुल

खास वैशिष्ट्ये

- जिल्ह्यातील अत्याधुनिक एकमेवाद्वितीय क्रीडासंकुल.
- हवा व प्रकाशाच्या दृष्टिने संकुलाची वैशिष्ट्यपूर्ण रचना.
- ९२ फूट लांब व ५० फूट रुंद वूडन फ्लोअरींग
- एकूण खर्च अंदाजे ८० लाख रुपये.
- १००० प्रेक्षक क्षमतेची अंतर्गत गॅलरी.
- संकुलात खालील क्रीडा प्रकारांची सोय.
- संकुलाची एकूण लांबी १२१ फूट, रुंदी ११४ फूट तर उंची ५५ फूट.

श्री. उत्तमराव आनंदराव कणसे

माजी विद्यार्थी एम.ए.(राज्यशास्त्र)

१९९३ मध्ये विद्यापीठ प्रतिनिधी (UR) म्हणून अभिनंदनीय निवड. प्रगतशील शेतकरी व व्यवसायिक. राजकारण, समाजकारण, आणि सार्वजनिक कार्यात हिरीरीने सहभाग. धडाडीचे सामाजिक कार्यकर्ते.



With best compliments from

Soma Enterprise Limited

An ISO 9001 : 2000 Company



Specialists in construction of

Concrete / masonry dams, rock fill / earth fill dams, barrages, aqueducts, highways / hydraulic tunnels, expressways, major highways, bridge works, power projects etc.

PB-11/7, Koyananagar, (Tq) Patan,
(Dist) Satara, Maharashtra - 415207
Tel : 91-2372-284626 Fax : 91-2372-284627

कर्मवीर अण्णांच्या कार्याची फलश्रुती

आप्पासाहेब भाऊराव पाटील,
संघटक, रयत शिक्षण संस्था, सातारा.

माझे पिताजी परमपूज्य कर्मवीर अण्णा हे प्रथम ओगले आणि नंतर किर्लोस्कर यांचेकडे सेल्स ऑर्गनायझर म्हणून १९१५ साली काम करू लागले. त्यावेळी त्यांचा दरमहाचा पगार रू. ४० होता. त्या काळच्या मानाने हा पगार अत्यंत समाधानकारक होता. तथापि इतरांप्रमाणे नेटका प्रपंच करून सुखात दिवस घालविण्याचा त्यांचा पिंड नव्हता. ते समाजसुधारक होते. गोरगरीब व अस्पृश्य लोकांच्या विषयी त्यांना कणव होती. बहुजनसमाज शिकला पाहिजे, त्यांच्यामधील अंधश्रद्धा गेली पाहिजे, त्या शिवाय या समाजाचा सर्वांगीण विकास होणार नाही. हे जाणून ते किर्लोस्कर यांना विनंती करू लागले की, ''कामगारांच्या मुलांचे शिक्षणाकरिता कारखान्याने काहीतरी केले पाहिजे. शिवाय कारखाना नांगर तयार करतोय, त्याचा खर्च आणि विक्रीची किंमत यामध्ये फार अंतर आहे. तेव्हा विक्रीची किंमत कमी करावी म्हणजे शेतकऱ्यांना नांगर घेणे परवडेल.' परंतु किर्लोस्कर यांनी याकडे कानाडोळा केल्याने नाईलाजाने कर्मवीर अण्णांनी किर्लोस्कर कारखाना सोडला.

पुढे सर धनजीशा कूपर यांच्या मदतीने व किर्लोस्कर कारखान्यातील काही तज्ज्ञ मजूर आणून सातारारोड येथे कर्मवीरांनी लोखंडी कारखाना उभा केला. यावेळी कर्मवीर अण्णांनी यापूर्वीचा अनुभव लक्षात घेऊन, कूपर पुढे कामगारांच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न ठेऊन त्याबाबत भरीव कामगिरी करण्याचे आश्वासन घेतले होते. शिवाय कारखान्याच्या भागीदारीमध्ये काही हिस्सा ठरला होता. हे कूपर यांनी मान्य करूनही उत्पादन सुरू झाल्यावर कूपरनी शब्द फिरविला. त्यामुळे कर्मवीर अण्णांचे व कूपर यांचे भांडण झाले. त्यावेळी अण्णांचे स्नेही प्रबोधनकार के.सी.ठाकरे यांनी भांडण सोडविले आणि ते अण्णांना म्हणाले, 'तुम्हाला बहुजनसमाजाचे शिक्षणाचे कार्य करण्यास कोणीही धनिक मदत करणार नाही. ते कार्य कष्टाचे आणि सेवाभावीवृत्तीचे असते. ते तुम्हाला एकट्याला करावे लागेल. तेव्हा तुम्ही आता एकट्यानेच यातून मार्ग काढावा.''

नंतर कर्मवीर अण्णांनी सातारा येथे आपल्या घरी एक हरिजन विद्यार्थी घेऊन शिक्षणाचे पवित्र कार्य सुरू केले. पुढे विद्यार्थी संख्या वाढू लागल्यानंतर सातारचे छत्रपती शाहू महाराज यांची धनिणीची बाग खंडाने घेतली आणि त्यामध्ये वसतिगृह हलविले. या बागेत विद्यार्थी शेतीची सर्व कामे करू लागले, स्वतः स्वयंपाक करू लागले. कर्मवीर अण्णांचे प्रेरणास्थान कोल्हापूरचे छत्रपती राजर्षी शाहू होते म्हणून महात्मा गांधी यांच्या हस्ते या वसतिगृहास ''श्री छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊस'' असे दिले. या वसतिगृहात जात व धर्म न मानता सर्व जण एकाच भूमातेची लेकरे आहोत अशी विद्यार्थ्यांना शिकवण दिली व त्याप्रमाणे विद्यार्थी या वसतिगृहात गुण्यागोविंदाने राहू लागले. कॉलेजच्या शिक्षणाचा प्रश्न पुढे आल्यावर पुणे येथे युनियन बोर्डिंग स्थापन केले. तेथे काही विद्यार्थी ठेवले आणि विद्यार्थ्यांना कॉलेजचे शिक्षण देण्याची संधी मिळवून दिली. त्यावेळी पुणे, मुंबई, बडोदा व कोल्हापूर येथेच उच्च शिक्षण देणारी कॉलेजीस होती. प्राथमिक शिक्षण विद्यार्थ्यांना अधिक कसदार मिळावे या हेतूने, कर्मवीर अण्णांनी सन १९३५ मध्ये संस्था रजिस्टर केली व संस्थेतर्फे प्राथमिक शिक्षक ट्रेंड करण्यासाठी ट्रेनिंग कॉलेज सुरू केले. संस्थेचे पहिले अध्यक्ष, त्यावेळचे सातारा जिल्ह्याचे कलेक्टर हमीद ए. अली, (आय.सी.एस.) हे होते. त्यांनी कर्मवीर अण्णांना चारभिंती सातारा येथील दहा एकर सरकारी जागा देऊन कार्यास फारच मोलाची मदत केली.

१९३७ साली ब्रिटीश आमदानीत मुंबई इलाख्यात काँग्रेसचे बाळासाहेब खेर मंत्रिमंडळ स्थापन झाले. त्यामध्ये अण्णासाहेब लट्ठे हे अर्थमंत्री होते. ते पूर्वीचे कर्मवीर अण्णांचे गुरू होते. कर्मवीर अण्णांनी या मंत्रिमंडळापुढे बहुजनसमाजाच्या मुलांना प्राथमिक शिक्षण देण्यासाठी व्हॉलंटरी मराठी शाळांची योजना ठेवली. ही कल्पना मंत्रिमंडळास पसंत पडली. अर्थमंत्री लट्ठे यांनी यासाठी हवी ती मदत देण्याचे मान्य केले.

नंतर संस्थेने जेथे लोकल बोर्डाच्या शाळा नाहीत अशा खेड्यात व वाडी वस्त्यांवर व्हालंटरी शाळा सुरू करण्याचा सपाटा

सुरू केला. या कार्यासाठी मराठी सातवी झालेले अनेक तरूण पुढे आले. हे नवीन तरूण शिक्षक अनेक अडचणींच्या गावी, दुष्काळी भागात, कोकण भागात जाऊन मिशनरीवृत्तीने काम करू लागले. खेड्यात राहण्याची, जेवण्याची अडचण असायची. शिवाय शाळा कोठे भरवायची असा प्रश्न उभा राही. परंतु अशा अनेक अडचणी सोडवून शाळा त्यांनी गावाच्या मंदिरात भरविण्यास सुरूवात केली आणि प्रत्येक घरी आळीपाळीने जेवणाची व्यवस्था शिक्षकांनी करून घेतली. विद्यादानाचे पवित्र कार्य पाहून या शिक्षकांना ग्रामस्थ सर्वतोपरी मदत करू लागले. संस्थेतर्फे अशा ५७८ शाळा सुरू झाल्या. या सर्व शाळा व्यवस्थित व ग्रामस्थांची मर्जी सांभाळून चालविण्याचे हे कार्य या शाळांवर काम करणाऱ्या शेकडो प्राथमिक शिक्षकांनी केले. या शिक्षकांनी अनंत अडचणी सोसून, गावकऱ्यांना विद्येचे महत्त्व पटवून देऊन या शाळा चालविल्या. पुढे अनेक शाळा मराठी ७ वी पर्यंत शिक्षण देणाऱ्या झाल्या आणि काही शाळांना इमारती देखील ग्रामस्थांनी बांधून दिल्या. संस्थेच्या इतिहासात या शाळांच्या कार्याला व त्यावर काम करणाऱ्या शिक्षकांच्या त्यागाला अत्यंत महत्त्व आहे. कर्मवीर अण्णा तर म्हणत, 'व्हालंटरी शाळा व त्यावरील शिक्षकांचे सेवाभावी कार्य हा रयत शिक्षण संस्थेचा खंबीर पाया आहे आणि या पायावरच रयत शिक्षण संस्था उभी आहे!' या शाळांवरील अनेक शिक्षक ट्रेंड होऊन लोकल बोर्डाच्या नोकरीत गेले व काही संस्थेच्या शाळांवरच काम करू लागले. पुढे या शाळा शासनाने आपल्या ताब्यात घेऊन चालविल्या. यानंतर कर्मवीर अण्णांनी आपल्या संस्थेतर्फे हायस्कूल्स सुरू करण्याचे ठरवून १९४० साली सातारा येथे महाराजा सयाजीराव हायस्कूल हे पहिले हायस्कूल सुरू केले. हे हायस्कूल इतर हायस्कूल प्रमाणे न चालविता ते पूर्णपणे मोफत व निवासी चालविले. प्रत्येक मुलाने आईबापाचा पैसा न आणता कष्ट करून आपले शिक्षण पूर्ण केले पाहिजे असे अण्णांचे ध्येय व तत्व होते. या विचाराप्रमाणे हे हायस्कूल चालू केले. रोज विद्यार्थ्यांने काही तास काम केलेच पाहिजे. यावरील शिक्षकवर्ग देखील विद्यार्थ्यांच्यावर २४ तास देखरेख ठेवीत असे. हे हायस्कूल प्रथम 'फलटण लॉज' या मिळकतीत सुरू केले. फलटण लॉज हा बंगला व भोवतीची १० एकर जागा ही फलटणचे राजे मालोजीराजे निंबाळकर यांच्या मालकीची होती व ती मिळकत कर्मवीर अण्णांचे बहुमोल कार्य लक्षात घेऊन त्यांनी संस्थेस देणगी दिली.

यांनतर संस्थेने लोणंद, जि. सातारा येथे हायस्कूल सुरु केले व या हायस्कूलला देणगीदार मालोजीराजे यांचे नाव दिले. अशारीतीने अनेक गावी संस्थेतर्फे हायस्कूल्स सुरु करण्यात येऊ लागली. महात्मा गांधींच्या निधनानंतर कर्मवीर अण्णांनी महात्मा गांधी यांच्या स्मरणार्थ १०१ हायस्कूल्स काढण्याची घोषणा केली व ही घोषणा त्यांनी आपल्या हयातीत पूर्ण केली. जेथे जमीन मिळेल तेथे विद्यार्थ्यांना श्रम करावयास लावले.

मि. हमीद ए अली आणि त्यांच्या पत्नी मिसेस शरीफा बेगम हे १९४२ साली संस्था पाहण्यास आले. संस्थेचा वाढलेला पसारा पाहून ते खूप आनंदित झाले. तथापि मिसेस शरीफा बेगम अण्णांना म्हणाल्या, ''तुम्ही पुरुष स्वार्थी आहात. तुम्ही विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रश्न सोडवीत चालला आहात. परंतु आमच्या भगिनींचे काय ? तेव्हा तुम्ही मुलींचे शिक्षणाचे काम हाती घ्या. अन्यथा मी तुमचे तोंड पाहणार नाही.'' भगिनीची ही आग्रहाची विनंती अण्णांनी मान्य केली व १९४२ मध्येच सातारा येथे महिलांच्यासाठी जिजामाता अध्यापिका विद्यालय व मुलींचे लक्ष्मीबाई पाटील वसतिगृह सुरु केले.

संस्थेच्या अनेक हायस्कूल्स मधून एस.एस.सी. झालेल्या विद्यार्थ्यांना मोठ्या शहरी जाऊन उच्च शिक्षण घेणे आर्थिक परिस्थितीमुळे अवघड होऊ लागले, म्हणून आपले संस्थेचे कॉलेज पाहिजे, असे कर्मवीर अण्णांना वाटू लागले आणि त्या दृष्टीने त्यांचे प्रयत्न सुरु झाले. नंतर सातारा येथे कॉलेज काढण्याची घोषणा अण्णांनी केली, ही घोषणा काहींना अशक्य वाटू लागली. कॉलेजसाठी योग्य इमारत, पुरेसा फंड आणि स्टाफ याची जुळवाजुळव करणे अवघड होते. हे जमणार नाही, असा सल्ला कर्मवीरांना अनेक जण देऊ लागले. परंतु कर्मवीरांना काहीच अशक्य नसे. ते म्हणतील ते ते करुन दाखवीत. त्यांनी महाराष्ट्राचा दौरा करुन या कॉलेजसाठी पुरेशी देणगी जमा केली. सुरुवातीस कॉलेजच्या खर्चासाठी नागझरीचे शेठ धोंडजी पाटलोजी भोसले यांनी खूप आर्थिक मदत केली. या कॉलेजला छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव देण्याचे अण्णांनी जाहीर केले होते. त्यावेळी खानदेश मधील एका मारवाडी व्यापाऱ्याने कर्मवीरांना कळविले की, ''या कॉलेजसाठी मी पाहिजे ती देणगी देतो, या कॉलेजला माझे नाव द्यावे.'' परंतु ही विनंती अण्णांनी फेटाळून लावली. ते म्हणाले, ''एक वेळ मी माझ्या बापाचे नाव बदलेन परंतु कॉलेजला छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव देण्याचा मी घेतलेला निर्णय कधीही बदलणार नाही.''

फलटण लॉज मधील मिळकतीत योग्य त्या दुरुस्त्या करुन कॉलेजसाठी इमारत पूर्ण केली. स्टाफची जमवाजमव केली. आणि विद्यापीठाच्या अटीनुसार फंडाची रक्कम नियमानुसार ठेवली. परंतु विशेष आश्चर्याची बाब अशी की, हे कॉलेज इतर कॉलेजप्रमाणे न चालविता ते मोफत व निवासी केले. हे पाहून शिक्षणतज्ज्ञ देखील चकीत झाले. या कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी रोज काही तास काम केले पाहिजे आणि वसतिगृहातच राहिले पाहिजे. यामुळे विद्यार्थ्यांची संख्या कमी झाली आणि दरवर्षी तूट फार येऊ लागली. ही येणारी तूट, कर्मवीर देणगी मिळवून भरुन काढीत. अशारीतीने चार वर्षे हे कॉलेज चालविले.

तथापि या कॉलेजमध्ये बाहेरच्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावा असे संस्थेचे अध्यक्ष श्री. बा. ना. नलवडे व कॉलेजचे प्राचार्य डॉ. ए. व्ही. मॅथ्यू यांना वाटू लागले. त्यांनी अण्णांना पटवून दिले की दरवर्षी फार तूट येते. शिवाय सातारवासियांचे म्हणणे आहे की, आमची मुले कॉलेजसाठी परगावी पाठवू परंतु मुलींना आम्ही परगावी कसे पाठविणार ? तरी याचा सहानुभूतीपूर्वक विचार करा. शेवटी नाईलाजाने कर्मवीर अण्णांनी बाहेरचे विद्यार्थी घेण्यास परवानगी दिली. सुरुवातीस या कॉलेजमध्ये आर्टस् ही फॅकल्टी सुरु केली. या कॉलेजमध्ये गोरगरीब विद्यार्थ्यांसाठी 'कमवा व शिका' ही योजना राबविण्यात येऊ लागली. या योजनेतून आजपर्यंत हजारो विद्यार्थी आपला शिक्षणक्रम पुरा करुन बाहेर पडले आहेत. ''कमवा व शिका'' ही योजना म्हणजे कर्मवीरांच्या शिकवणुकीचा प्राण आहे. ते म्हणत, ''येथे आम्ही विद्यार्थ्यांना स्वाभिमानी होण्यास शिकवितो, आम्ही याचना करीत नाही व विद्यार्थ्यांना याचना करण्यास शिकवीत नाही. दान देण्यात हात वर ठेवा पण ते घेण्यास हात पसरु नका असे शिकवितो. या संस्थेतून बाहेर पडणारे विद्यार्थी हे स्वाभिमानी, कार्यक्षम व उदारमतवादी नागरीक बनून बाहेर पडतील असे आम्ही ध्येय ठेवले आहे.''

नंतर सायन्स फॅकल्टी सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला. यासाठी संस्थेचे माजी विद्यार्थी डॉ. भास्कर पाटील, बी.एस्सी., पीएच.डी. यांना औरंगाबादहून बोलविण्यात आले आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली सायन्स विभाग सुरु केला. त्यांनी उत्तमप्रकारे काम केले.

पुढे या कॉलेजची तीन कॉलेजीस म्हणजे आर्टस्, कॉमर्स आणि सायन्स अशी वेगळी झाली. पुढे कॉमर्स कॉलेजला संस्थेचे थोर आश्रयदाते, कर्मवीर अण्णांना थोरल्या बंधुप्रमाणे मानणारे भारतातील थोर अर्थतज्ज्ञ डॉ. धनंजयराव गाडगीळ यांचे व सायन्स कॉलेजला संस्थेचे अध्यक्ष, भारताचे थोर सुपुत्र ना. यशवंतराव चव्हाण यांचे नाव दिले.

✦ ✦

संस्थेच्या उभारणीत माझ्या मातोश्री सौ. लक्ष्मीबाई तथा सौ. वहिनी यांचा हिस्सा मोठा आहे. त्यांनी सुरुवातीच्या काळी अण्णांना खूप मदत केली. अंगावरील मणीमंगळसूत्रासह सर्व दागिने खर्च केले. आईबापांचा, नातेवाईकांचा व समाजाचा रोष पत्करुन त्यांनी आपली सेवा संस्थेच्या चरणी रुजू केली. माझ्या मातेचे ऋण संस्थेस कधीच फेडता येणार नाही एवढा तिचा त्याग मोठा आहे. कर्मवीर अण्णांनी संस्थेचे कार्य चालविण्यासाठी आपल्या शिकवणुकीने नवीन पिढीच निर्माण केली, ती म्हणजे संस्थेचे आजीव सभासद मंडळ. यांचे देखील संस्था उभारणीत योगदान मोठे आहे.

संस्थेचे माजी विद्यार्थी संस्थेने केलेले उपकार विसरत नाहीत. याचे एक उत्कृष्ट उदाहरण म्हणजे श्री. चंद्रकांत बाबूराव जाधव, रा. करंडी, ता. व जि. सातारा यांनी आपल्या मृत्यूनंतर सर्व मिळकत संस्थेस मृत्यूपत्राने दान केली आहे. आजपावेतो यातून पाच लाख रुपये मिळालेले आहेत. अशारीतीने कर्मवीर अण्णांनी विद्यार्थ्यांना जी शिकवण दिली याचे एक उदाहरण येथे वानगीदाखल दिले आहे.

अण्णांच्या कार्यामुळे पश्चिम महाराष्ट्रात शिक्षणाचे जाळे पसरले आहे. बहुसंख्य जनता साक्षर झाली आहे. त्यामुळे हा भाग सर्वदृष्टीने प्रगत आहे. तसे म्हटले तर, आधुनिक महाराष्ट्र घडविण्यामध्ये कर्मवीर अण्णांचा मोठा हिस्सा आहे. आधुनिक महाराष्ट्र घडविणारे जे शिल्पकार मानले जातात त्यामध्ये कर्मवीर अण्णांचा क्रम फार वरचा आहे.

गोरगरीब, पद्दलित यांच्या उद्धारासाठी संस्थेने कार्य केले आहे. त्याची दाखल भारत सरकारने घेऊन, संस्थेस राष्ट्रीय पातळीवरचा ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार'' देऊन संस्थेचा गौरव केला आहे. अशारीतीने कर्मवीर अण्णांचे कार्य हे जनतेपुढे दीपस्तंभाप्रमाणे आहे. ते पिढ्यानपिढ्या जनतेला मार्गदर्शन करीत राहील यात मुळीच संदेह नाही.

✦ ✦

श्री. एन.जी. सुगंधी

सुदर्शन व इतर शालेय स्टेशनरी साहित्याचे व्यापारी

रविवार पेठ, वज्रदेही चौक, पुणे

श्री. गणपती मंगल कार्यालय

गजानन हौ. सोसायटी, कराड ओगलेवाडी रोड,

फोन : २७३६०० (०२१६४) निवास : २२१८८५, २७७०७०, २७७१८३

प्रोप्रा : पाटील बंधू (टेंभू) उपलब्ध सुविधा व वैशिष्ट्ये

• लग्न समारंभासाठी बाल्कनी सह. प्रशस्त हॉल • भव्य स्वागत कक्ष व स्टेज • स्वतंत्र डायनिंग व किचन रूम • मुबलक पाणी व स्वच्छ नैसर्गिक वातावरणात • गरम पाण्याची खास सोय • लग्न समारंभ, साखरपुडा, डोहाळे जेवण, बारसे, मुंज, वाढदिवस, धार्मिक कार्यक्रम, मेळावा, स्वागत समारंभ, प्रवचन, व्याख्यान, स्नेहभोजन, प्रदर्शन यासाठी सर्व सोईनीयुक्त बहुउद्देशीय

श्री गणपती मंगल कार्यालय सदैव आपल्या सेवेस तत्पर...

With best compliments from

PRESSMATIC ELECTRO STAMPINGS PVT. LTD.

PRESSMATIC

MEETS YOUR REQUIRMENT FOR STAMPINGS, STACKS, DIE CAST ROTORS, PRESS TOOLS AND STATOR & ROTORS.

FACILITIES

- Slitting line
- Contineous Heat Treatment
- Proegressive Tools
- Punching Line
- Pressure die Casting
- Quality System

SPECIALISED IN STAMPINGS

- Hermatic Motors For Compressor
- Domestic Pumps & Motors
- Home Appliances
- Auto Electric Components
- Power Tools
- Lighting Industry

KCL Industrial Estate,

AN ISO 9001 : 2000 company

KARAD-415110 Maharashtra (INDIA)

Phone : 91-2164-242003.Fax : 91-2164-241642

Website : www.pressmaticindia.com

E-mail : pressmatic vsnl.net/pressmatic sancharnet.in

मी असा घडलो..... !

ना.डॉ.पतंगराव कदम
सहकार,पुनर्वसन व मदतकार्य मंत्री, महाराष्ट्र राज्य

सोनसळ हे माझं गाव. सातारा आणि सांगली जिल्ह्याच्या सीमारेषेवरचं ! तेव्हाचा तालुका खानापूर, कराडपासून १०/१५ कि.मी.वर असलेलं ! सोनहिरा खोऱ्यातलं हे माझं गाव. सोनसळ, सोनकिरे, अंबक, चिंचणी, शिरसगाव, पाडळी, देवराष्ट्रे, वडगाव हा जो बारा तेरा खेड्यांचा परिसर त्यालाच सोनहिरा खोरे म्हणून ओळखले जाते. सोनसळपासून चौरंगनाथाच्या डोंगरापासून ओढा जातो आणि पुढे तो येरळा नदीला जाऊन मिळतो. महाराष्ट्राचे थोर नेते, देशाचे माजी उपपंतप्रधान कै. मा. यशवंतरावजी चव्हाण यांचे जन्मगाव देवराष्ट्रे. हे माझ्या गावापासून सहा कि.मी. वरच आहे. आमच्या साऱ्या परिसरामध्ये स्वातंत्र्याचे तुषार कधी पडलेच नाहीत. देशाला स्वातंत्र्य मिळाले पण आमचे गाव मात्र सर्व सुखसोयी, सुविधांपासून वंचित राहिले. वीज नाही, रस्ते नाहीत, वहातुकीची सोय नाही. दळणवळणाची कोणतीही साधने उपलब्ध नाहीत असा हा परिसर. पाऊस पडला तर भरपूर पडायचा आणि ओला दुष्काळ पडायचा. शेतीशिवाय या परिसरातील लोकांना कोणतेही उत्पन्नाचे साधन नव्हते. माझ्या गावातली काही माणसे त्यावेळी मुंबईला गिरणीत कामाला होती. त्याशिवाय इतर नोकरी ही त्या परिसराला माहितही नव्हती. सगळा जीवनाचा, जगण्याचा एकच उद्योग माहित होता तो म्हणजे शेती. त्यामुळे शेतीत काबाडकष्ट करण्याशिवाय गत्यंतरच नव्हते. उपजीविकेला अन्य साधन नसल्याने, नोकरीची सुतराम शक्यता नसल्याने,आडवळणाचा भाग असल्याने आणि शिक्षणाचा अजिबात गंध नसल्यामुळे शेती करणे, गुरेढोरे पाळणे हाच इथल्या लोकांचा व्यवसाय होता. सगळा गाव खरे तर कुसळांचाच ! त्यामुळे गावात अठरा विश्वे दारिद्रय होते. शेतीचे उत्पन्न केवळ पावसावर अवलंबून ! पर्जन्य हा जणू या भागातील लोकांचा परमेश्वरच होता. चौरंगनाथाचा आशीर्वाद लाभला तरच पाऊस !

शिक्षणाची परिस्थितीही बिकट होती. गावाला फक्त चौथी पर्यंत शाळा होती. तीही एक शिक्षकी शाळा होती. त्यावेळी आमच्याच गावचे फाटक गुरूजी शिकवायला होते. नंतर ते रिटायर झाल्यावर ढवळीचे एक शिक्षक तेथे शिकवायला आले. आमच्या गावापासून जवळच शिरसगाव ! तेथे पाचवी ते सातवी माझे शिक्षण झाले. माझी सगळीच भावंडे पाचवी ते सातवी शिरसगावातच शिकली. पूर्वी अशी पद्धत होती की सातवीची मुले रात्री अभ्यासाला शाळेत जायची. आम्हीही जात असू. आमच्या दोन गावांच्यामध्ये एक ओढा होता. या ओढ्याच्या काठी काही काही वेळा प्रेत जळत असे. रात्रीच्या वेळी आम्ही जेव्हा तेथून जायचो तेव्हा खूप भीती वाटायची. अशा पद्धतीने प्रतिकूल परिस्थितीत आमचे शिक्षण झाले. मानवाची निर्मिती झाल्यापासून आमच्या गावातला मॅट्रिक पास झालेला मीच पहिला तरूण. माझे वडील चौथीपर्यंत शिकलेले होते व आई अजिबात शिकलेली नव्हती. पण आम्हा मुलांच्या शिक्षणासाठी मात्र ते दोघेही जागरूक होते.

आमची जमीन फारशी नव्हती. शिवाय दुष्काळाचे सावट नेहमीच असायचे. काही काही वेळा अशी परिस्थिती होती की चार दोन घरे वगळता चार-चार दिवस गावातल्या चुली पेटत नसत. पण आमची आई मात्र अशावेळी मदतीसाठी सर्वांच्या पुढे असायची. आपल्याजवळ जे काही असेल त्यातून ती इतरांना मदत करायची. तिला फार काही देता यायचे नाही पण जे होते ते थोडे थोडे सगळ्यांना ती द्यायची ! आपल्या घासातला घास वेळप्रसंगी दुसऱ्याला द्यावा म्हणजे तो गोड होतो अशी तिची धारणा होती. गरिबांबद्दल तिला फार कळवळा होता. परोपकार हा तिचा स्थायीभाव होता. ध्येयवादाची, त्यागाची, दुसऱ्याला परोपरीने मदत करण्याची तिची वृत्ती होती. आणि आम्हा सर्व भावंडावर तिच्या संस्काराचा जबरदस्त प्रभाव पडलेला आहे. माझी आईच केवळ नव्हे तर माझी आजी जिजाबाई ही सुद्धा माझ्या आईसारखीच त्यागी, परोपकारी होती. सामाजिक प्रगतीची चाड असणारी होती. मी माझ्या आईइतकाच माझ्या आजीचाही खूप लाडका होतो. मी शाळेत कुंडलला असतांना ती वारली. एक दिवस मला कुंडलच्या वसतीगृहात खूप अस्वस्थ वाटू लागले म्हणून दुसऱ्या दिवशी सकाळी मी कुंडलहून चालत सोनसळला आलो. तेव्हा मला समजले की कालच माझी आजी वारली होती. ती अस्वस्थता त्यामुळेच तर माझ्या मनात निर्माण झाली नसेल ना ? असे.आता वाटू लागते. अंतःकरणातील जिव्हाळा, ओढ प्रसंगी माणसाला कदाचित खेचून आणत असावी. आजीच्या निधनानंतर आम्हा मुलांची, घरादारांची, शेतीतील कामाची सर्व जबाबदारी माझ्या आईवर एकटीवर पडली. पण माझी आई मुळातच खूप

काटक व कष्टाळू होती. त्यामुळे एवढा संसाराचा गाडा तिने आपल्या कष्टाच्या जोरावर तारून नेला. आम्हा मुलांना भरभरून प्रेम दिले. आमच्यावर उत्तम संस्कार होतील याची खबरदारी तिने घेतली. आम्हावर श्रमाच्या प्रतिष्ठेचे महत्त्व बिंबवले. सतत उद्योग करण्याचे व्रत आम्ही जे चालविले आहे त्याची गंगोत्री आमची आई आहे. ती नेहमी म्हणायची, ''उद्योगाचे घरी लक्ष्मी राहते.'' हा वस्तुपाठ तिने आम्हाला दिला होता. तिच्या या बीजमंत्राचे विस्मरण आम्ही कधीही होऊ दिले नाही. आता महाराष्ट्राचा सहकार मंत्री असतांनाही सततोद्योगाचा जो परिपाठ मी ठेवला आहे त्याचे श्रेय निर्विवाद आईलाच दिले पाहिजे. आम्ही सर्व भावंडांनी शिकून मोठे व्हावे, दिगंतात कीर्ती मिळवावी व कर्तबगारीने जीवन उजळून टाकावे असे तिचे स्वप्न होते. उत्तुंग स्वप्ने पाहण्याचा माझा स्वभाव कदाचित तिच्या रक्तातूनच माझ्याकडे संक्रमित झाला असणे शक्य आहे. स्वप्नाला सत्यात उतरविण्यासाठी काबाडकष्ट करण्याची प्रेरणा व आशीर्वाद माझ्या आईचेच आहेत. आमच्या कष्टाळूपणाला, जिद्दीला, धडपडीला आणि उत्तुंग ध्येयासक्तीवर आमच्या आईच्या संस्काराचाच पगडा आहे. तीच आमची बोधजननी आहे. तीच आमची प्रबोधजननी आहे. तिने सारे सोसले ते आमच्या प्रगतीसाठी. तिने ज्या खस्ता खाल्ल्या त्या आमच्या शिक्षणासाठी. तिने जे संस्कार केले ते आमच्या कर्तबगारीसाठी. तिने दिलेली चित्कला ही आमच्या आयुष्याच्या कला कौशल्याला जीवनाधार ठरलेली आहे.

मी जेव्हा कुंडलला वसतीगृहात होतो तेव्हा आमच्या घरची परिस्थिती बेताचीच होती. घरात दिवासुद्धा एकच असे. पैशाची वाण असायची. दर शनिवार रविवार चालत घरी सोनसळला यायचो. पैसा खर्च करण्याची क्षमताही त्यावेळी नव्हती. पण तशा अवस्थेत मोठे होण्याची स्वप्ने मी पहात होतो. आमच्या हायस्कूल पासून जवळच्या अंतरावरून रेल्वे जायची. त्या रेल्वेकडे मी नेहमी पहात असे. वाटायचे आपणही रेल्वेत बसून खूप दूर जावे. प्रगतीची क्षितिजे पादाक्रांत करावीत. पण परिस्थिती तशी नव्हती. पण मी जेव्हा बाहेर पडायचे ठरविले तेव्हा माझ्या आईने स्वतःचे डोरले गहाण टाकून माझ्यासाठी पैसा उभा केला. प्रसंगी हरभरे, धान्य, अंडी विकून तिने मला शिक्षणासाठी पैसा पुरवला. मला पंख पसरण्यासाठी आकाश मोकळे करून दिले. माझे कर्तृत्वही मी गावातून बाहेर पडल्यानंतर खऱ्या अर्थाने बहरले. पण बाहेर पडल्यानंतर माझ्या पंखात बळ होते ते आईच्या संस्काराचे, प्रेमाचे, जिद्दीचे ! त्याच बळावर मी गरूडझेप घेऊ शकलो. समाजात मानाचे स्थान मिळवू शकलो.

मी भारती विद्यापीठाची स्थापना केली. अनेक संलग्न संस्था उभ्या केल्या. त्याच्या माध्यमातून अनेकांचे संसार उभे करू शकलो. याचा तिला फार मोठा अभिमान होता. 'माझ्या मुलाने जगभर झेंडा फडकविला' असे म्हणून तिचा ऊर भरून येई. गावाच्या परिसराचा कायापालट करण्यातला माझा सहभाग तिला खूप आनंद देऊन गेला. लोकांनी मला भरभरून दिलेले प्रेम पाहिले की तिचे डोळे पाणवायचे व ती भारावून जायची. मी महाराष्ट्राचा आमदार झालो, शिक्षण मंत्री झालो, उद्योगमंत्री झालो. माझ्या भरभराटीबरोबर सारा परिसर, माझे कुटूंब या साऱ्यांचाच कायापालट झाला याचे तिला केवढे कौतूक वाटायचे. माझ्या बुद्धीची, कर्तृत्वाची ही झेप पाहून ती मला नेहमी ''माझं बुद्धीचं कोटं आहे हे'' असे कौतुकाने म्हणायची. मी भारती विद्यापीठाची स्थापना केली. त्याचे स्वतंत्र विद्यापीठ झाले. त्याचा मी तहहयात कुलपती झालो यातले तिला नेमके काय समजले मला माहीत नाही. पण माझा मुलगा खूप मोठा झाला याचे समाधान मात्र तिला अखेरपर्यंत लाभले. तिच्या डोळ्यादेखत आम्ही सातही भाऊ आपापल्या पायावर उभे राहिलो. आपापल्या क्षेत्रात मोठे झालो. कर्तबगार झालो. तिच्या संस्काराने आम्ही घडलो. तसेच रयत शिक्षण संस्थेचा मी माजी विद्यार्थी, सेवक आणि आजच्या प्रशासनातील पदाधिकारी म्हणून मला स.गा.म.कॉलेजचे उच्च शिक्षणातील योगदान मोलाचे वाटते. रयत शिक्षण संस्थेच्या आणि कर्मवीर अण्णांच्या आशीर्वादानेही मी शैक्षणिक क्षेत्रात यशस्वी झालो आहे. कर्मवीर अण्णांच्या तत्त्वज्ञानाच्या प्रेरणेतून माझ्या कार्याची वाटचाल चालू आहे. सद्गुरू गाडगे महाराज कॉलेजच्या सर्वांगीण प्रगतीसाठी कॉलेजच्या स्थानिक व्यवस्थापन समितीचा अध्यक्ष या नात्याने कॉलेजच्या चौफेर प्रगतीकडे माझे बारकाईने लक्ष आहे. माझे सदैव मार्गदर्शन आहे. या महाविद्यालयाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त मी आपल्या प्रगतीला शुभेच्छा देतो.

स.गा.म. महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त आमच्या हार्दिक शुभेच्छा !

Societies Reg.Act1860/MAH/5866/Pune.Dt.11.6.91

॥ विद्वान सर्वत्र पुज्यते ॥

नंदिकेश्वर एज्युकेशन सोसायटी, निरवांगी

ता. इंदापूर जि. पुणे-४१३११४ फोन : ०२१११-२८४१३४

पदाधिकारी श्री. उत्तम नंदू पोळ अध्यक्ष
प्रा.हणमंतराव संपतराव पोळ M.Com.M.Phil संस्थापक, सचिव
श्री. दत्तात्रय रंगनाथ जाधव उपाध्यक्ष
श्री. प्रेमसिंग जमादार माने खजिनदार

विश्वस्त मंडळ
श्री भागवत लक्ष्मण शेलार M.A.M.Ed.
श्री छगन जगन्नाथ पोळपाटील श्री. पांडुरंग भानुदास पोळपाटील M.A.B.Ed. श्री. विठ्ठल कृष्णाजी पवार B.A.B.Ed.
श्री. विठ्ठल भुजाबा पवार, सौ. चारूशीला हणमंतराव पोळ M.A.D.Ed
श्री.शिवाजीराव संपतराव पोळ
सौ. केशरबाई चंद्रकांत जाधव B.A.LL.B.

बहुजन समाजाचे शिक्षण : एक चिंतन

मा.प्रा.रा. कृ. कणबरकर
माजी कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

एखाद्या राष्ट्राचा, समाजाचा विविधांगी विकास हा त्या राष्ट्राने, समाजाने स्वीकारलेल्या शिक्षण व्यवस्थेवर अवलंबून असतो. शिक्षण व्यवस्था राष्ट्राच्या प्रवृत्तीचा आरसा असते. राष्ट्राच्या विकासाचे अगर विकाराचे कारण शिक्षणात शोधवयाचे असते. शिक्षणाचे हे पायाभूत महत्व जाणणारी राष्ट्रेच आज प्रगतीपथावर सर्वात पुढे आहेत.

म्हणून राष्ट्र विकासाला, समाजाच्या प्रगतीला अत्यावश्यक असलेल्या या संजीवनीच्या नियोजनाला तिच्या निर्माणाला व वितरणाला अनन्यसाधारण महत्व आहे. राष्ट्र घडवू इच्छिणाऱ्यांना या बाबीकडे डोळ्यात तेल घालून लक्ष द्यावयाला हवे. भारतात मात्र शिक्षणाकडे स्वातंत्र्यानंतरच्या ५५ वर्षात सातत्याने, अक्षम्य असे दुर्लक्ष झालेले आहे.

आपल्या शिक्षणाच्या असंख्य दुखण्यापैकी बहुजन समाजाच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष ही राष्ट्रहिताला सर्वात हानीकारक ठरते. भारतासारख्या सामाजिक विषमतेचा परंपरागत वारसा असलेल्या गरीब देशात बहुजन समाजाची समस्या ही राष्ट्रीय समस्या असते. हा समाज अनेक प्रकारच्या अडचणींनी ग्रस्त, डिसअडव्हान्टेज्ड असतो. भारतात हा बहुसंख्यांक आहे. सर्व सोयी सवलती या मूठभराना राखीव असतात. भारतात मनूच्या काळी स्त्रिया व दलित यांना सुखसोयीपासून वंचित ठेवण्यात आले होते. त्यांना शिकण्याचा, संपत्ती संपादण्याचा, सत्ता ग्रहण करण्याचा हक्क नव्हता.

आज ही परंपरेची बंधने नाहीत. शिक्षण मुक्त झाले आहे. शिकण्याचा हक्क मान्य झालेला आहे. पण तरीसुद्धा बहुजन समाज आज शिक्षणापासून वंचित आहे. कारण परिस्थितीची बंधने परंपरेच्या बंधना इतकीच आजही घट्ट आहेत. ब्रिटीशकाळात मेकॉलेचा उद्देश, मनु प्रमाणेच मूठभर उच्च वर्णीयांना शिकवून ब्रिटीश शासनाला मदत करणारी नोकरांची फलटण निर्माण करावयाची होती. मेकॉलेला राष्ट्रोन्नती अगर समाजोन्नती साधायची नव्हती. स्वातंत्र्यपूर्व काळात शिक्षणाचे व्यक्तीविकासात व राष्ट्र विकासात महत्त्वाचे स्थान जाणून काही राष्ट्रप्रेमी मंडळीनी खाजगी शिक्षण संस्थांच्या माध्यमातून बहुजन समाजाच्या शिक्षणाकडे जाणीवपूर्वक लक्ष देण्यास सुरूवात केली. म.फुले, राजर्षी शाहू महाराज, पंजाबराव देशमुख, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बापुजी साळुंखे, मामासाहेब जगदाळे व इतर अनेकांचा प्रामुख्याने उल्लेख करावयास हवा. खरे तर भारतात शिक्षण प्रसाराच्या बाबतीत महाराष्ट्र आज जो अग्रभागी आहे त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे ध्येयवादी खाजगी शिक्षण संस्थांची महाराष्ट्राला लाभलेली ही परंपरा. हा महाराष्ट्राचा वैभवशाली वारसा आहे.

आज मागे वळून पाहताना हा प्रेरणादायी वारसा क्षीण तर होत नाही ना ? ध्येयवादाचे रूपांतर धंदेवाईकपणात तर होत नाही ना ? अशी शंका घेण्यासारखे स्वरूप आज महाराष्ट्रातील खाजगी शिक्षण संस्थाना येत आहे. डोळे दिपून जावे असा व्याप व दिमाख आज या खाजगी शिक्षण संस्थांचा दिसून येतो. पण कर्मवीर अण्णा, राजर्षी शाहू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची, पिढ्यानपिढ्या शिक्षणापासून वंचित राहिलेल्या बहुजन समाजाचे शिक्षण प्रथम झाले पाहिजे, बहुजन समाज शिक्षणाच्या वाघीणीच्या दुधाने बलशाली झाला तर राष्ट्र बलशाली होईल, ही दृष्टी आजच्या शिक्षण संस्थांच्या चालकात दिसून येते का ? जहागीरदार समितीच्या अहवालाप्रमाणे व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या बहुसंख्य शिक्षण संस्थात कमीतकमी सुविधा पुरवून या ना त्या कारणावरून, जास्तीत जास्त फी घेण्याकडे प्रवृत्ती दिसून येते.

आज शासनाचे, न्यायालयाचे लक्ष या मूठभर श्रीमंताच्या शिक्षणाच्या संस्था, त्यांचे प्रवेश, फी चे दर सोडविण्यातच गुंतलेले आहे. बहुजन समाजाच्या शिक्षणाच्या समस्या या राष्ट्रीय समस्या आहेत. याकडे त्यांना लक्ष द्यावयास सवड नाही. आजही प्राथमिक

शिक्षणाची आबाळ पुर्वीप्रमाणेच चालू आहे. स्वातंत्र्यानंतरच्या ५५ वर्षातही आम्ही ६ ते १४ वयापर्यंतच्या सर्व मुलांना सक्तीचे मोफत शिक्षण देऊ शकलो नाही. शाळेत जावयाच्या एकूण मुलांपैकी १/३ मुले आजही शाळेबाहेर आहेत. जी शाळेत येतात त्यापैकी केवळ २५ % मुलेच १४ वयापर्यंतचे शिक्षण घेऊ शकतात. आम्ही शिक्षण हे मूलभूत मानवी हक्क म्हणून मानले, त्यासाठी शिक्षणाचा कायदा केला. तरीसुद्धा आज जगातील निम्म्याहून अधिक निरक्षर भारतात आहेत.

बहुजन समाजाच्या शिक्षणाकडे सातत्याने होत असलेल्या या दुर्लक्षाचे दूरगामी परिणाम भारताच्या विकासावर, औद्योगिक प्रगतीवर, सार्वजनिक आरोग्यावर, सामाजिक स्वास्थ्यावर, राज्य व्यवस्थेवर दिसून येतात. 'फ्रिडम ॲट मिडनाईट' चे फ्रेंच लेखक डॉमिनिक लेपिअर यांच्या शब्दात ''भारतातील सर्व समस्यांवर एकच इलाज शिक्षण'' अमेरिकन विचारवंत गॉलब्रेथ म्हणतात, 'जो देश जास्तीतजास्त अशिक्षित असतो तो हमखास गरीब असतो. जो देश सुशिक्षित असतो तो क्वचितच गरीब असतो.' भारतासारख्या कृषिप्रधान देशात, राष्ट्रीय उत्पन्नात शेतीपासूनचे उत्पन्न ३० टक्के पेक्षा जास्त नसते. भारतात ७० टक्के लोक शेती व्यवसायाशी संबंधित असतात. औद्योगिक आघाडीवर साठ ते सत्तर टक्के कामगार अशिक्षित असल्याने आपले उद्योग जागतिक स्पर्धेत टिकू शकत नाहीत. जागतिक व्यापारात आपला वाटा केवळ अर्धा टक्केच आहे. त्याला शासनाचे संरक्षण लागते. संरक्षण, विशेषतः सातत्याचे संरक्षण, प्रगतीला, गुणवत्तेला मारक ठरते. आपले उद्योग पांगळे व्हावयाला अति संरक्षण जबाबदार आहे. आपली लोकशाहीसुद्धा अडाण्याची लोकशाही झाली आहे. जाणीवपूर्वक मतदान फार थोड्या ठिकाणी होते. एक गठ्ठा मतदानाचे प्रकार, मतांचे मक्तेदार, निरक्षर देशातच अधिक होतात. आपली लोकशाही धनशक्तीने, बलशक्तीने काबीज केली आहे. तिचे अधःपतन कांही राज्यात झुंडशाहीत झाले आहे. याचे कारण बहुजन समाजाची निरक्षरता. लोकशिक्षणाशिवाय लोकशाही यशस्वी होत नाही. विल ड्यूरँड या विचारवंताच्या मते "Democracy without education is hypocrisy without limits..the last resort of gangmanship"!

शिक्षणाशिवाय लोकशाही हे अमर्याद ढोंग आहे. ते झुंडशाहीला आमंत्रण आहे. आपल्या वाढत्या लोकसंख्येलासुद्धा बहुसंख्यांकांची निरक्षरता जबाबदार आहे. जागतिक आरोग्यात आपल्या देशाचा ११२ वा नंबर लागतो. बाल मृत्यू, कुपोषण, बाळंतपणात दर तीन मिनीटाला एक मृत्यू, पाण्यापासून होणाऱ्या रोगामुळे दरवर्षी ५ लाख मृत्यू होतात. सार्वजनिक आरोग्याची ही भयंकर स्थिती केवळ बहुजनातील शिक्षण प्रसारानेच बदलू शकते.

हे चित्र बदलावयाचे असल्यास आपल्यास शिक्षणाकडे इतर प्रगत देशाप्रमाणे अधिक लक्ष द्यावे लागेल, विशेषतः बहुजन समाजाच्या शिक्षणाकडे. फ्रान्ससारख्या देशात शिक्षणमंत्र्यास मंत्रीमंडळात नंबर दोनचे स्थान असते. अमेरिकेत शिक्षणाला संरक्षणाइतकेच महत्व दिले जाते. सिंगापूरसारख्या लहान देशाच्या प्रगतीचे इंगीत 'शिक्षण' असे त्यांचे पंतप्रधान सांगतात. तेथे राष्ट्रीय उत्पन्नाच्या २० टक्के शिक्षणावर खर्च करतात. चीनच्या माओनी बहुजन समाजाच्या शिक्षण व आरोग्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या कार्यकर्त्यांना पक्षातून ताबडतोब हाकलून लावले होते. आपल्या देशातही म.फुले, ना. गोखले, आंबेडकर, म.गांधी, यांनी व नोबेल पारितोषिक विजेते अमर्त्य सेन यांनी, शासनकर्त्यांना बहुजन समाजाच्या शिक्षणाकडे होत असलेल्या दुर्लक्षाबद्दल जाब विचारला आहे.

आपल्या देशात स्वातंत्र्यानंतरच्या काळात शिक्षणाचा व्याप खूप वाढला आहे. जगात आपली व्यवस्था नंबर २ ची आहे. एका सर्व्हेक्षणानुसार १९५० मध्ये ७५० महाविद्यालये, ३८ विद्यापीठे, २ लक्ष ६० हजार विद्यार्थी असलेल्या देशात आज ७ हजार महाविद्यालये, २५० विद्यापीठे, ७ लाख विद्यार्थी आहेत. म्हणजे उच्च शिक्षण १० पटीने वाढले. पण त्या प्रमाणात प्राथमिक शिक्षण वाढले नाही. ते ३ पटीनेच वाढले. लोकसंख्या मात्र भरमसाठ वाढली व निरक्षरांची संख्या वाढली.

जगात शास्त्रज्ञांचे बाबतीत भारत पहिल्या दहा देशातील एक देश आहे. आम्ही अणुस्फोट केले. स्वतःच्या हिमतीवर अंतराळात उपग्रह सोडू शकलो. उच्च शिक्षण, विशेषतः तांत्रिक शिक्षणात खूप प्रगती केली आहे. पण हा विकास असमतोल आहे. उलट्या पिरॅमिडसारखा आहे. त्याचा पाया जो बहुजन समाज तो शिक्षणाच्या बाबतीत कच्चा आहे. आम्ही पायाकडे दुर्लक्ष करून झाडांच्या शेंड्याला खत घालीत आहोत. त्यामुळे भारतातील सुशिक्षितांचा, तंत्रज्ञाचा ओढा परदेशात जावून स्थायिक होण्याकडे अधिक आहे. आज शिक्षण अमेरिकेच्या सिलिकॉन व्हॅलीची शोभा वाढवीत आहे. भारत मात्र, दरिद्रीच राहिला. एके काळी नालंदा, तक्षशीला या विद्यापीठात परदेशातून विद्यार्थी शिकावयास येत असत. आज परदेशात शिकायला जाणाऱ्यांची संख्या वाढते आहे. दरवर्षी ५० कोटी अमेरिकन डॉलर्स फीच्या रूपाने परदेशात जातात. एकेकाळी आम्ही शिक्षण निर्यात करीत होती. आज एकविसाव्या शतकात शिक्षण आयात करीत आहोत. शिक्षणक्षेत्रात आज एक प्रकारची जीवघेणी स्पर्धा निर्माण झाली

आहे. त्यात एक प्रकारचा 'डॉर्विनिझम' शिरला आहे. शिक्षण मूठभर धनदांडग्यांची मक्तेदारी झाली आहे. त्याच्या जोडीला गुणवत्तेचा प्रश्न उभा करून शिक्षणाचे मुक्तद्वार बंद करून दिंडी दरवाजे उघडले जात आहेत. वैद्यकीय, इंजिनियरिंग वगैरे व्यावसायिक शिक्षण धनिकांची मक्तेदारी बनत आहे. स्पर्धेत पहिला बळी बहूजन समाजाचा पडत आहे.

या सर्व परिस्थितीवर उपाय योजावयाचे असतील तर बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी आपले सर्वस्व वाहणाऱ्या बहुजन समाजाच्या तीन उद्धारकांची वाट पुसत आपणास जावे लागेल. हे तीन दिपस्तंभ म्हणजे राजर्षी शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील व डॉ. बाबासाहेब आंबेडकर. या त्रयीने अनेकांना बहुजन समाजाच्या शिक्षणाला वाहून घेण्याची प्रेरणा दिली आहे. या तिघांचा शिक्षणविषयक दृष्टीकोन प्रथम समजून घेतला पाहिजे. भारतासारख्या लोकसंख्येने मोठ्या व गरीब देशात शिक्षणक्षेत्रात काम करणाऱ्यांना प्रथम या तीन प्रश्नांची उत्तरे शोधली पाहिजेत. १) शिक्षण कोणासाठी ? २) शिक्षण कशाचे ? व ३) शिक्षण कसे घ्यावयाचे ? राजर्षी शाहू, कर्मवीर भाऊराव पाटील व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना या तीन प्रश्नांची अचूक उत्तरे सापडलेली दिसतात. त्यांच्या उत्तरात बरीच समानता आहे. त्याचे कारण या तिघांचेही गुरू, प्रेरणास्थान आद्य क्रांतीकारक महात्मा जोतिबा फुले होते.

राजर्षी शाहू महाराजांनी शिक्षणाशिवाय बहुजन समाजाची उन्नती होणार नाही हे जाणून आपली सत्ता, संपत्तीसह सर्वकाही यासाठी पणास लावले. इच्छाशक्ती, राजकीय निर्धार असेल तर सर्वांसाठी शिक्षण कसे साध्य करता येते याचा जणू काही एक वस्तुपाठच आजच्या राज्यकर्त्यांसाठी राजर्षी शाहूंनी घालून दिला आहे.

या राजाने जवळजवळ १०० वर्षापुर्वी प्रत्येक खेड्यात प्राथमिक शाळा स्थापन करण्याचा निर्णय घेतला. शिक्षक खेड्यातील नेमले. चावडीत, धर्मशाळेत शाळा सुरू केल्या. प्रत्येक देवळात शाळेच्या वर्गाकरिता जागा राखून ठेवण्याचा हुकूम काढला. देवस्थानच्या उत्पन्नातून प्राथमिक शाळेवर खर्च केला. गांवकामगाराने चावडीप्रमाणे शाळाही झाडली पाहिजे. सर्व मुले शाळेत आलीच पाहिजेत. असे फर्मान काढले व त्याची जबाबदारी तहसीलदारावर सोपविली. शाळेत मुले न पाठविणाऱ्या पालकांकडून दंड वसूल केला. शिक्षण कराचा कायदा १९१८ सालीच केला. रूपये १०० चे वर पगार असणाऱ्या पगारदारावर कर बसविला. घरटी आठ आणे ते एक रूपया शिक्षणकर बसविला. शिक्षणाचा दर्जा राखण्यासाठी शिक्षक निवडीच्या कसोट्या ठरविल्या. या सर्व योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी स्वतंत्र समिती नेमली व महाराज जातीने या समितीच्या कामकाजावर लक्ष ठेवीत.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शहरात राहून शिकता यावे म्हणून सर्व जातीच्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वसतिगृहांची निर्मिती केली. समाजातील प्रतिकूल परिस्थितीतील घटकासाठी विशेष शैक्षणिक सोयी निर्माण केल्या. शिकून तयार झालेल्यांना नोकऱ्यात राखीव जागा ठेवल्या. त्यामुळे त्यांचा शिक्षणावरचा विश्वास टिकून राहिला. आजच्या शासनकर्त्यांनी बहुजन समाजात शिक्षण प्रसार करावयाचा असेल तर कसे योजनाबद्ध कार्य करावयाचे असते व त्यात कसे जातीने लक्ष घालावयाचे असते हे राजर्षी शाहू महाराजांपासून शिकावे.

शिक्षण प्रसाराचे काम केवळ शासनावर अवलंबून राहून होणार नाही. त्यासाठी भारतासारख्या विशाल देशात खाजगी शिक्षण संस्था (प्रायव्हेट एंटरप्राईज) अटळ ठरतात. शिक्षणाचे खाजगीकरण आज अटळ ठरले आहे. सर्व प्रकारचे शिक्षण सर्वांसाठी शासन उपलब्ध करून देवू शकत नाही. महाराष्ट्रात एकेकाळी ध्येयवादी शिक्षण संस्थांची मोठी परंपरा होती. या संस्था म्हणजे समाजाला जगविणारा प्राणवायू, पुरवणाऱ्या हिरवळी होत्या, ध्येयवादाची प्रक्षेपण केंद्रे होती. समाज जाणीवपुर्वक त्यांची जोपासना करत होता. ती समाज परिवर्तनाच्या समाजोन्नतीच्या मार्गावरील तीर्थक्षेत्रे होती. आज बहुतेक खाजगी संस्था ही ओळख हरवून बसल्या आहेत. आज ध्येयवादाची जागा धंद्याने घेतली आहे. या संस्था म्हणजे शिक्षणाची दुकाने झाली आहेत. या बदलाचा परिणाम मुख्यत्वेकरून बहुजन समाजाला शिक्षणापासून पुन्हा एकदा वंचित ठेवण्यात झाला आहे. आज शिक्षण प्रसारात अटळ ठरलेल्या खाजगी शिक्षण सम्राटांना कर्मवीर अण्णांनी बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची गंगा पोहोचविण्यासाठी जे शैक्षणिक प्रयोग केले त्याची थोडीतरी नोंद घेण्याची आवश्यकता आहे. बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी सर्वस्व वेचणारे राजर्षी शाहूनंतर कर्मवीरअण्णा हे दुसरे दीपस्तंभ आहेत. कर्मवीर अण्णाजवळ शाहू महाराजांप्रमाणे सत्ता व संपत्ती नव्हती. राजर्षी शाहू महाराजांनी वसतिगृहांना खर्चासाठी वेतन दिले. पण कर्मवीरांनी एका नवीन निरंतर वेतनाचा शोध लावला. तो शोध म्हणजे स्वावलंबी शिक्षण योजनेत शिकणारा विद्यार्थी शिकताना कमवूही शकतो. ''कमवा व शिका'' या क्रांतीकारक मंत्राचा उपयोग करून. आज महागडे बनलेले, धनदांडग्यांची मक्तेदारी असलेले, सर्व प्रकारचे शिक्षण बहुजन समाजापर्यंत पोहोचविता येणार नाही का ? नामदार तपासे

यांना लिहिलेल्या एका पत्रात कर्मवीरअण्णा म्हणतात, ''हरिजन व बहुजन समाजाच्या मुलांना कोणावरही विसंबून न राहता श्रम करण्याची अंगात धमक असेल तर गरीबी त्यास आड न येता कोणतेही शिक्षण मिळविता येईल, यासाठी मी माझे पुढील आयुष्य खर्च करण्याचे ठरविले आहे.'' आज अण्णा नाहीत. पण बहुसंख्य शिक्षणसंस्था बहुजन समाजाच्या आहेत. बहुसंख्य शिक्षकही बहुजन समाजाचे आहेत. विद्यार्थीही बहुजन समाजाचे आहेत. मग आज बहुजन समाजाच्या शिक्षणाची जी शोकांतिका होत आहे ती का ? कारण आज आम्ही अण्णांना विसरलो आहोत. स्वावलंबी, कमवा व शिका ही योजनाच बहुजन समाजाचे शिक्षण वाचवू शकेल.

बहुजन समाजाच्या शिक्षण प्रसाराला दिशा दाखविण्याचे काम करू शकणारे तिसरे दीपस्तंभ म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर. प्रकांड पांडित्य व विद्वत्तेच्या क्षेत्रातील एक आधुनिक आश्चर्य असलेल्या बाबासाहेबांना आपले पांडित्य, आपली विद्वत्ता केवळ आपली, आपल्यासाठीच आहे असे कधीच वाटले नाही. आपल्या विद्वत्तेवर, आपल्या संपत्तीवर जसा आपला अधिकार आहे तसा समाजाचाही आहे. ही जाणीव आजच्या फार थोड्या विद्वानात दिसून येते. आपला समाज हा विद्वानांच्या बेटांचा समूह झाला आहे. आजच्या विद्वानांना, सुशिक्षितांना, आपल्या अवती भोवती अडाणीपणाचे, निरक्षरतेचे वाळवंट पसरले आहे, ते सारखे वाढते आहे, याची क्वचितच जाणीव होते. निरक्षरतेच्या वाळवंटात विद्वत्तेची बेटे फार जवळ सुरक्षित राहू शकणार नाहीत. याची जाणीव बाबासाहेबांना होती. म्हणून त्यांनी त्यांच्या समाजाला ''शिका, संघटित व्हा व संघर्ष करा'' असा संदेश दिला. त्यांनी त्यांची सारी विद्वत्ता, सारे पांडित्य, आपल्या समाजाचे दैन्य व दारिद्र्य घालविण्यासाठी खर्च केले. आज शिक्षण क्षेत्रातील बहुसंख्य विद्वान बहुजन समाजातील आहेत. तरीसुद्धा निम्मा बहुजन समाज आज निरक्षरतेच्या गर्तेत पडून आहे. एकटे बाबासाहेब आंबेडकर आपल्या असंख्य बांधवांचा उद्धार करू शकतात तर बहुजन समाजातील असंख्य विद्वान, शिक्षक, बहुजन समाजाला कां वाचवू शकत नाहीत ? आपल्या बहुजन समाजातील सुशिक्षितांना आपल्या अवतीभोवती आपले असंख्य बांधव अशिक्षित आहेत याचे काहीच वाटत नाही. स्वामी विवेकानंदानी त्यांना भेटावयास आलेल्या नव पदवीधारकांना प्रश्न केला, ''तुम्ही पदवीधर झालात हे चांगले झाले. तुमच्या पदवीचा तुम्हास अभिमान वाटतो. पण तुमच्या अवती भोवती असंख्य अशिक्षित आहेत याचे तुम्हास काहीच वाटत नसेल तर तुमच्या शिक्षणाचा काय उपयोग ? केवळ उदर भरण्यासाठी ? ज्या सुशिक्षितांना समाजात पसरलेल्या अशिक्षितांची लाज वाटत नाही त्यांना सुशिक्षित मानावयाला मी तयार नाही.'' अशिक्षित मनुष्य शेवटी समाजावर भार ठरत असतो. सर्व समाज शिकता झाला पाहिजे.

बहुजन समाजाचे शिक्षण जर वाचवायचे असेल तर आम्हास राजर्षी शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचीच वाट पुसत पुढे जावे लागेल.

✦ ✦ ✦ ✦

यशाची गुरुकिल्ली

मा.मधुकरराव सावंत
यशस्वी उद्योजक, कराड

प्रत्येक माणसाला आपण जीवनामध्ये यशस्वी व्हावे असे वाटते, पण फार थोड्या व्यक्तींना ते जमते. बाकी ९७% लोकांना का जमत नाही ? ते गरीबच का राहतात ? या प्रश्नांची उत्तरे त्या व्यक्तीच्या स्वभावातच दडलेली असतात. त्या व्यक्तीचे असणे महत्त्वाचे असते. काही माणसे जन्मापासूनच तशी असतात. त्यांना मोठं व्हावसंच वाटत नाही. लहानपणापासून त्यांच्या मनावर अशक्य गोष्टींचाच जास्त प्रभाव असतो. खरं म्हणजे परमेश्वराने सर्वांना सारख्याच मेंदूची देणगी दिलेली असते. पण आपण त्याचा उपयोग जेवढ्या चांगल्या प्रमाणात करू त्याप्रमाणे तो माणूस घडत असतो. ब्रम्हांडाला काहीही कमी नाही. ते फारच श्रीमंत आहे व आपण जे मागू ते ते तुम्हांला द्यायला ते तयार असते. पण आपण काही मागतच नाही. जर आपण मागतच नाही तर आपणाला मिळणार कसे ? खरे म्हणजे यशस्वी व श्रीमंत होणे हे फार सोपे आहे बस्स ! आपण काही सोप्या गोष्टी करणे महत्त्वाचं आहे. प्रथम आपण आपणाजवळ आहे ते द्यावयास शिकले पाहिजे. आपणाला जर जास्त हवे असेल तर आपण थोडे तरी जगाला दिले पाहिजे. पण काही माणसं द्यायचे नाव काढत नाहीत. फक्त त्यांना हवं असते. त्यांना निसर्ग काहीही देत नाही. आणि सर्वजण नशिबाला दोष देतात. मनुष्य प्राणी जेव्हा दैववादातून प्रयत्न वादात येईल व प्रयत्नवादातून वास्तववादात येईल तेव्हाच त्याचा विकास चालू होईल. आज आपण आपल्या भोवताली श्रीमंत राष्ट्रे पहातो, त्यांनी केलेली नेत्रदिपक प्रगती पहातो व अवाक होतो. पृथ्वीच्या एका भागात जे शक्य आहे ते दुसऱ्या भागात का नाही ? त्याला कारण त्या भागातील राहाणाऱ्या मानव जातीवर अवलंबून आहे. या पृथ्वीवर जे जे निर्माण झालेले आहे, ते ते मानवाच्या विचारातून निर्माण झालेलं आहे. आपले विचार भव्य दिव्य असावयास पाहिजेत. विचाराने पृथ्वी नियंत्रीत होते. मग विकास ही तर साधी गोष्ट आहे. जोपर्यंत दारिद्रयाची चीड येत नाही. तो पर्यंत माणूस काहीही करू शकत नाही. यशस्वी व श्रीमंत होण्याच्या ध्येयाने तो पेटून उठला पाहिजे.

मग पहा दारिद्रय हे नावालाही राहणांर नाही. आपला देश जगाच्या पुढे जाईल. पण आपल्या प्रत्येक कृतीत प्रामाणिकपणा असला पाहिजे. आपण रोज जे काम करतो ते स्वत:साठी नसून समाजासाठी, देशासाठी असले पाहिजे. आपण जेवढं निरपेक्ष असू, तेवढा आपला आत्मिक विकास जास्त होत राहील व खरं समृध्द जीवन कशाला म्हणावयाचं ते समजेल. कोणतीही गोष्ट अज्ञानात करण्यापेक्षा समजून केली तर खूपच सोपी जाते. म्हणून प्रत्येक मानवाने दररोज समाधी अभ्यास, प्राणायाम करणे गरजेचं आहे. ते आपल्या दैनंदिन जीवनाचे एक अंगच झालं पाहिजे. खरं म्हणजे हे ज्ञान मुलांना लहान वयातच देणेची गरज असते. त्यावरच त्याचे भावी आयुष्य अवलंबून असते. मी तरी असं म्हणतो की शाळा, कॉलेजातील कोणताही पहिला तास सुरू करणे अगोदर शिक्षक, प्राध्यापक व विद्यार्थी यांनी पंधरा मिनिटं ध्यान धारणा व चिंतन करावे व दिवसाच्या कामाला सुरूवात करावी. पहा दिवस कसा आनंदात व यशस्वी जातो ते. या वरील गोष्टी बरोबरच जीवनामध्ये यशस्वी व श्रीमंत व्हायचे असेल तर आणखी काही गुण आपण अंगी बाळगले पाहिजेत. प्राचार्यांनी यशस्वी व श्रीमंत उद्योजक तयार करण्याचा कारखाना म्हणूनच आपले कॉलेज ओळखले पाहिजे, अशी माझी धारणा आहे. व्यवहार ज्ञानाला महत्त्व द्यावं तीच खरी काळाची गरज आहे. माझ्या मते यशस्वी व श्रीमंत व्यवसायिक तयार करावयाचा असेल तर खालील गुणधर्माचे पालन केलं पाहिजे.

ध्येय -

आपणाला कोण व्हायचं आहे. आपलं ध्येय काय आहे. ते प्रथम ठरवलं पाहिजे. आपलं ध्येय मोठे असले पाहिजे. कोणत्या प्रकारचा उद्योजक व्हायचे आहे. ते अगोदरच ठरवले पाहिजे. मराठीमध्ये म्हण आहे ''वाघाची शिकार करावयास गेले तर ससा तरी सापडेल.'' म्हणजे ध्येय फार मोठे असले पाहिजे. त्यामध्ये सातत्य असले पाहिजे. इथं कुठे पैशाचा प्रश्न येते नाही मोठा विचार केला पाहिजे तसेच जे करणार आहात ते स्वत:च्या हाताने लिहून ठेवले पाहिजे. तसेच त्याची अमंलबजावणी नेटाने

केली पाहिजे. आपल्या ध्येयापर्यंत जाण्यासाठी जेवढा कालावधी लागणार आहे तेवढा लागणारच. पण ते पूर्ण होईपर्यंत त्याचा पाठलाग केला पाहिजे. यश तुमचचं आहे. ठरवलेले ध्येय गाठावयाचे असल्यास खालील एका एका शिडीच्या पायरीचा उपयोग केला पाहिजे. जेवढी तुमची शिडी मजबूत व सर्व पायऱ्यांची असेल व प्रत्येक पायरीवरून आपण नेटाने जाल तर शिखर नक्की सापडेल. त्यातील पहिली पायरी म्हणजे.

१) व्यवसायिक वृत्ती :-

ज्यांना व्यवसायिक व्हायचं आहे. त्यानं आपल्या अंगी व्यापारी वृत्तीची जपणूक केली पाहिजे. प्रत्येक कृतीत फायदा तोटा मोजण्याची सवय लागली पाहिजे. आपला वेळ सुध्दा तसाच मोजला पाहिजे. कोणत्या गोष्टीला किती वेळ देणं आवश्यक आहे तेवढाच द्यावा. वेळेचा अपव्यय करू नये. प्रत्येक मिनिट महत्त्वाचा असतो. ज्यांना मोठं व्हायचं आहे; व्यवसाय यशस्वी करावयाचा आहे, त्या व्यक्तीने स्वत:ला बदलून घेतलं पाहिजे. कारण वेळ व समुद्राच्या लाटा कोणासाठी थांबत नाहीत. आपणासाठी दिवसरात्र लहानमोठी होत नाही. आपण त्यांच्या बरोबर किंवा त्याच्यापुढे जाण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

वेळेचा व्यवसायासाठी परिपूर्ण वापर करावयाचं ठरवलं तर भरपूर वेळ आपणास शिल्लक राहिल. समाजातील परंपरा, सण, समारंभ, यामध्ये गुंतला म्हणजे तो व्यवसायिक होत नाही. त्याच एकच ध्येय असलं पाहिजे व ते म्हणजे माझा व्यवसाय व मी. आपण व्यवसायावर आपल्या आवडत्या व्यक्तीपेक्षा जास्त प्रेम करावे. फायदा तोटा याची रोजच्या रोज मोजदाद करणं अंत्यत आवश्यक आहे. तसे केल्याने तुम्हाला ताबडतोब उपाय योजना करता येईल आपण जे दिवसभर करतो ते संध्याकाळी लिहून काढावे त्यामुळे ताबडतोब सुधारणा होईल.

२) सातत्य :-

व्यवसायाच्या दृष्टीने जी कृती आपण करतो त्यामध्ये सातत्य असले पाहिजे. धरसोड वृत्ती नसावी. जगामध्ये असा कोणताही व्यवसाय नाही की त्यात तोठा होतो. प्रत्येक धंद्यात फायदा आहे. तो किती मिळवावयाचा ते आपण ठरवावयाचे असते. एकदा ध्येय ठरवले की त्यात कधीही बदल करू नये. अनंत वेळा तीच तीच गोष्ट केल्याने सातत्य वाढते. समाजामध्ये याच गोष्टीचा अभाव असतो. माणसाचा स्वभाव लहरी असतो आणि तो दुसऱ्याच्या विचाराने सहज प्रभावित होतो. ज्यांना स्वत:चा विचार आहे तो तसं त्या गोष्टीकडे लक्ष देत नाही व सातत्य ठेऊन नेटाने पुढे जात असतो. यशस्वी जीवनात 'सातत्याची पायरी' ही सर्व पायऱ्यामध्ये महत्वाची आहे. सातत्य हा आपला स्वभाव झाला पाहिजे.

३) आत्मविश्वास

प्रत्येक व्यवसायिकामध्ये आत्मविश्वास असला पाहिजे. अमूक एक गोष्ट मी करणारच, एवढा धंदा करणार, एवढा फायदा मिळवणार, एवढे दान करणार, हे सर्व ठरवूनच केल तर व्यवसायिकाच्या मनात भीतीच राहत नाही व तो अत्यंत निर्भय होऊन आणखी काम करतो. त्यामुळे त्याचा आत्मा प्रसरण पावतो व मग आत्म्याला व्यवसाय करावयास लावतो.

व्यवसायिकाचा आत्मा मग प्रचंड उत्साहानं काम करत असतो. त्याला फक्त धंद्यातील चांगल्या गोष्टी दिसतात व त्याचा विकासाचा वेग वाढतो. आत्मविश्वास विकत मिळत नाही. तर तो काम करत असतांना कमवावयाचा असतो. जसं त्याचं संवर्धन कराल तसा तो वाढत जातो व आपला व्यवसाय फुलत जातो व हे करण्यासाठी कोणत्याही ज्योतिष्याची गरज पडणार नाही. मन, शरीर, आत्मा यांनी केलेला कोणताही व्यवसाय यशस्वी झालाच पाहिजे.

४) धाडसीपणा :-

व्यवसायिक हा धाडसी असला पाहिजे. कच खाऊ धोरण उपयोगी पडत नाही. कारण ते आपणाला आपल्या ध्येयापासून पाठीमागे खेचत असते. कायम फायद्याचा विचार करावा. तोट्याचा शब्दही कधी उच्चारू नये. धाडसीपणामुळे व्यवसायिक क्षणाक्षणाला वाढत जातो. यशस्वी व श्रीमंत होणे हे आपले ध्येय असेल तर त्यासाठी आपण धाडस करायला काय हरकत आहे. निसर्ग नियमाप्रमाणे जो धाडस दाखवतो तोच जिंकतो. विचारपूर्वक धंद्याची वाढ करत असताना पाठीमागे वळून पाहू नये. आपल्या समाजात नवीन व्यवसायिकाला प्रोत्साहन देण्याऐवजी अयशस्वी व्यवसायिकांची उदाहरणे दिली जातात. ज्यांनी धाडस दाखवून असाध्य गोष्ट साध्य केली त्याचा आदर्श घेऊन धाडस दाखवावे. तुम्ही धंद्यात शंभरटक्के यशस्वी व श्रीमंत झालाच म्हणून समजावे.

५) जबाबदारी घेणे :-

समाजामध्ये आपली जबाबदारी सहज दुसऱ्यावर टाकून लोक मोकळे होतात. व्यवसायिकाने सर्व जगाची जबाबदारी घेणे पसंत केलं पाहिजे, म्हणजे तो स्वत:च्या व्यवसायाची जबाबदारी सहज घेईल. आपल्या व्यवसायात जे जे घडत असते त्या प्रत्येक गोष्टीला मीच जबाबदार आहे अशी भावना व कृती आपली असली पाहिजे. हे गुण विशेष महत्त्वाचे आहेत. ज्यावेळी तुम्ही जबाबदारी घेता त्यावेळी ती पेलण्याची ताकद परमेश्वर तुम्हाला देतो. पण आपण घेतलेली जबाबदारी पवित्र असली पाहिजे. समाजात घडणाऱ्या प्रत्येक बऱ्या वाईट गोष्टीला मीच जबाबदार आहे अशी

आपली भावना ज्यावेळी होईल. तेव्हाच त्या व्यवसायिकाचा आत्मविकास होईल व मग प्रचंड वेगाने तो व्यवसाय करील व श्रीमंत होईल.

६) लक्ष केंद्रीत करणे :-

व्यवसायात यशस्वी व्हायचं असेल तर आपले पूर्ण लक्ष आपल्या धंद्यावर असले पाहिजे. काही समाजच आज व्यवसायात पुढे आहे, त्याचे कारण म्हणजे ते आपले पूर्ण लक्ष व्यवसायावर देतात. आपणाला घरात, समाजात हेच ऐकायला मिळते की, ''आम्ही खाऊन पिऊन सुखी आहोत'' तसेच ती व्यक्ती वागायला लागते. मोठे ध्येय त्याला कोण सांगतच नाही. आपली शेती असेल, आणखी राजकारणांचे व्याप असतील, या सर्वांवर पाणी सोडून जो आपले पूर्ण लक्ष आपल्या व्यवसायावर केंद्रीत करील तर यश तुमचेच आहे. व्यवसाय कोणताही निवडा पण पूर्ण क्षमतेने करा. व्यवसायातील तपश्चर्या एकलव्यासारखी असली पाहिजे. मग तो सर्वश्रेष्ठ व्यवसायिक झालाच म्हणून समजा. ज्यांना खरंच श्रीमंत व यशस्वी व्हायचं आहे. त्यांनी व्यवयासाच फार मोठा निवडला पाहिजे. मला मुद्दाम इथे नमुद करावसं वाटतं की इथे पैशाचा प्रश्न गौण आहे. पैसा हे साधन आहे.तुमचे मोठ्या धंद्याचे गुण विशेषच तुम्हाला तुमच्या ध्येयाकडे नेत असतात. परमेश्वर तुम्हांला पैशाची व्यवस्था करत असतो. त्याची चिंता आपण करायची नाही.

७) नेतृत्त्व गुण :-

मोठा व्यवसायिक व्हायचं असेल तर आपल्यामध्ये नेतृत्त्व गुण असला पाहिजे. आपल्या जवळ व्यवसायाच्या निमित्ताने अनेक कर्मचारी आलेले असतात. त्यांच्यावर आपल्या वागण्याचा बोलण्याचा प्रभाव पडला पाहिजे. सर्वांनी आपणांला मान्यता दिली पाहिजे. आपण सर्वांना हवं हवंस वाटलं पाहिजे. कोणतीही संघटना मग ती सामाजिक, राजकीय, अथवा व्यापारी असो, ती चालत असते, वाढत असते ती त्यामध्ये नेतृत्त्व करणांऱ्या व्यक्तीवर. असा गुणविशेष व्यवसायिकाजवळ असला पाहिजे. आपल्या बरोबर काम करणांऱ्या सहकाऱ्याच्या अडीअडचणी आपण मालक या नात्याने दूर केल्या पाहिजेत. म्हणजे तो आपल्यासाठी काम करेल. तुम्ही त्यांची काळजी घ्याल तर ते तुमच्या धंद्याची काळजी घेतील. त्यामध्ये मानवता जोपासली पाहिजे. निसर्ग नियमाप्रमाणे आपण आपल्या व्यवसायाचा केंद्रबिंदू झालं पाहिजे व ते सर्व कर्मचारी आपल्या भोवती फिरत राहिले पाहिजे. असा नेतृत्त्व गुणविशेष आपणाला नक्कीच यशस्वी श्रीमंत बनवेल.

वरील सर्व गुणविशेषाचं पालन करून व आपलं चित्त श्रीमंत ठेऊन व्यवसाय केला, व्यवसायच काय पण आपल्या जीवनातील कोणती कृती केली तर अपयशाचे तोंड कधीही पाहावे लागणार नाही. समाजातील प्रत्येक माणूस आज पैसे कमवतो आहे. पण बऱ्याच लोकांना पैसा कसा वापरावा हेच समजत नाही. हे ज्ञान पालकांनी आपल्या पाल्याला व शिक्षकांनी आपल्या विद्यार्थ्यांना दिलं पाहिजे. पैशाचा वापर कसा करावयाचा हे जर समजले तर सर्वसामान्य माणूस सुध्दा कोट्याधिश होऊ शकतो. म्हणून मला शेवटी असं सांगावसं वाटत की पैसे मिळवण्याबरोबर पैसे योग्य पध्दतीने वापरावयाचे समजल्यास जीवनामध्ये यशस्वी व श्रीमंत होणे अगदी सोपे आहे.

✦ ✦ ✦ ✦

ADMISSION ! ADMISSION !! (NO DONATION)

We undertake arrangments of Admission in Karanataka, Andra Pradesh, Chennai, Maharashtra.

COURSE	M.B.B.S.	B.D.S.	B.A.M.S.	B.H.M.S.	B.Pharma.
FEES YEARLY	....	....	65,000/-	50,000/-Yr.	50,000/-Yr
DONATION	....	....	NO	NO	NO
DURATION	4&Half+1yr	4Yr.	4&Half+1Yr.	4&Half+1Yr.	4Yr.

QUALIFICATION :12TH SCI.PASS WITH 50% IN PCB GROUP,B.SC.FIRST

MORE THAN 300 STUDENTHS SENT BY OUR INSTITUTION ARE SUCCESSFULLY COMPLETING THEIR COURSES WITHIN LAST 4 YEARS

COURSE	B.E.	D.E.	B.P.T.	B.Sc.Nurs.	D.Pharma.
FEES YEARLY	45,000/-	18,000/-	50,000/-Yr.	50,000/-Yr.	25,000/-Yr.
DONATION	NO	NO	NO(45%)	NO(45%)	NO
DURATION	4year	3year	4year	4year	2years.

QUALIFICATION : 12TH SC. PASS IN PCB OR PCM GROUP, B.SC.FIRST

CONTACT: OMKAR ADMISSION GUIDANCE CENTER, JIVHALA SOCIETY, SHOP NO-1,
BEHIND BOMBAY RESTAUTANT, NEAR SIDDIVINAYAK MEDICAL, OLD M.I.D.C.ROAD, SATARA.
PHONE NO.-02162-245799, M-9822394934, 9880302593,RESI.-245693.

DIAMOND BOOK CENTRE

BOOK SUPPLIERS

Orchid Complex, Shop No. 109-110,
1st Floor, 1367, Sadashiv Peth, Pune-411030.

K.D.PASHTE

E-MAIL : diamond-books hotmail.com
Tele/Fax : 24486093 Phone : 4020281



STAR BOOK SERVICE

ORCHID COMPLEX, SHOP NO.110, 1ST FLOOR, 1367,
SADASHIV PETH, NEAR RAJA KELKAR MUSEUM CHOWK,
BEHIND NATUBAUG GANPATI MANDAL, PUNE - 411030.
TELE/FAX : 4486093 , 4020281



गोपाला । गोपाला ।

प्रा.सुमंत जगताप
इंग्रजी विभागप्रमुख, स.गा.म. कॉलेज, कराड.

''सिंहाला पाहावे वनात, हत्तीला पाहावे रानात, तसे गाडगे बाबांना पाहावे कीर्तनात. हजारो माणसांच्या प्रचंड समुदायामध्ये बाबा एकदा उभे राहिले, म्हणजे पावसाळ्यातल्या मेघासारखे आभाळभर गडगडू लागतात आणि डोक्यावर साहित्याचा, सद्भावनेचा आणि सद्विचारांचा असा काही जबरदस्त मारा सुरू होतो की श्रोते अक्षरशः त्या कीर्तनाच्या सरोवरात देहभान विसरून तासन् तास डुंबत राहतात.''

कै. प्र.के.अत्रे.

अंगावर विविधरंगी चिंध्यांनी शिवलेले वस्त्र, डोक्यावर खापराची कटोरी, एका कानात लोंबती कवडी, तर दुसऱ्या कानात डुलती बांगडी. हातात काठी घेऊन अनवाणी चालणारा हा महापुरूष देशाच्या दारिद्र्याचे मूर्तिमंत प्रतिक.

कोणत्याही गावात पाऊल टाकलं की पहिल्यांदा हातात झाडू घेऊन गावातली घाण साफ करायला सुरूवात करायचे. त्यांना पाहून मग गावातले लोक जागे व्हायचे. खराटे घेवून धावायचे. सकाळी रस्त्यावरची घाण साफ करायची, अन् संध्याकाळी लोकांच्या डोक्यातली घाण आपल्या कीर्तनाने साफ करायचे. कीर्तनाखेरीज त्यांच्याजवळ जनतेला देण्यासारखे दुसरे काही नव्हते.

स्वतःच्या संसारावर तुळशीपत्र वाहून समाजाच्या संसाराची काळजी वाहणारे ते खरे-खुरे संत होते. आपल्या समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, भोळ्या समजुती, अनिष्ट रूढी-परंपरा इत्यादी दोषांवर कोरडे ओढून, ते दोष दूर करण्यासाठी त्यांनी आपले आयुष्य वेचले. ते खऱ्या अर्थाने समाजसुधारक होते. बहुजन समाजातील भोळ्या-भाबड्या अडाणी जनतेला शहाणे करून, तिला योग्य मार्ग दाखविण्याचा त्यांनी ध्यास घेतला होता.

आपले हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी त्यांनी गावोगावी फिरून आपल्या कीर्तनाद्वारे लोकजागृती करण्याचा मार्ग अवलंबला. महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक व आंध्र प्रदेशातील अनेक गावातून त्यांनी संचार केला. खेड्यापाड्यातील अशिक्षित, देवभोळ्या जनतेला भजन-कीर्तनासारख्या गोष्टींचे विशेष आकर्षण वाटत असे; त्यामुळे या जनतेपर्यंत पोहोचण्याचा तोच सर्वात प्रभावी मार्ग होय, असा विचार त्यांनी केला.

गाडगे बाबांचे कीर्तन हा एक विलक्षण अनुभव असे. त्यांचे कीर्तन म्हणजे समोरील श्रोत्यांशी चाललेला एक प्रकारचा संवादच. ते आपल्या कीर्तनातून श्रोत्यांनाच दैनंदिन जीवनातील नित्याच्या व्यवहारासंबंधी निरनिराळे प्रश्न विचारीत असत. त्या प्रश्नांची उत्तरे श्रोत्यांकडूनच वदवून घेत व चिरंतन सत्याची जाणीव करून देत. जणू सॉक्रेटिस व प्लेटोचे तंत्र या अशिक्षित विद्वानाने अवलंबिले होते. गाडगे महाराजांची भाषा अतिशय साधी, सुबोध, रसाळ व श्रोत्यांच्या अंतःकरणाला थेट जावून भिडणारी अशी होती; त्यामुळे त्यांच्या कीर्तनाने सर्वसामान्य लोक अतिशय प्रभावित होत असत.

बाबांच्या सबंध कीर्तनात 'गोपाला ! गोपाला ! देवकीनंदन गोपाला ।' एवढाच परमेश्वराच्या नावाचा उल्लेख येत असे. पण त्याचाही उपयोग श्रोत्यांची भाविकता वाढविण्यापेक्षा आपला उपदेश त्यांच्या मनावर ठसावा यासाठी ते करत असत.

'प्राणीमात्रांवर दया करा' असा उपदेश करताना कबीरांचे वचन त्यांच्या तोंडी हमखास यायचे-

''तीरथ जाव, काशी जाव, चाहे जाव गया ।
कबीर कहे कमालको, सबसे बडी दया ।।''

आणि मग श्रोत्यांशी सवालजबाब झडत असत.

'मराठे मंडळी, जेजुरीला जाता का नाही ?'

-होऽय.

'बकरा नेता का नाही ?'

-होऽय

'मानेचा तुकडा कापता की नाही ?'

-होऽय !

मसाला लावून शिजवून खाता की नाही ?

-होऽय !

तुमच्या पिढ्यान् पिढ्या मरतील - तुमच्या जेजुरीला जाणाऱ्यांच्या - तुमचं कंधी बरं होणार नाही !

गोपाला । गोपाला । देवकीनंदन गोपाला ।।

तुम्ही मराठे, तुकोबाराय मराठे. तुम्हाले ते एक पुरावा सांगतात-

''जन्मभरी पोसे लेकुराच्या परी । हाती घेऊनी सुरी उभा राहे ।
असा, कसा तुमचा देव । घेतो दुसऱ्याचा जीव ।।''

बकऱ्याला चारा टाकता की नाही ?

होय !

बकऱ्याला पाणी पाजता की नाही ?

होय !

हरवला बकरा शोधून आणता की नाही !

होय !

पाऊस आला, बकऱ्याला घरात बांधता की नाही !

होय !

पोटच्या मुलासारखं वागवता बापा, अन् त्याले मसाला लावून कापून खाता, कापून ! मानसं नाहीत तुम्ही, यानले रानडुक्कर म्हनलं तरीऽ-चालेऽल !

गोपाला । गोपाला । देवकीनंदन गोपाला ।।

अरे, एकाच्या डोळ्यातून पान्याचा थेंब नाही येत, की साले हे पाप आहे ! आपन वाईट करतो, सोडून देऊ ! एकाच्या तरी तोंडून निघते का ! मसाले लावून शिजवून खाता. अन् एवढं एक पोर मेलं घरात, तर सारं घर तोंड बडवते. अरे बापा ! आता कसं करू ? फार वाईट झालं ! मोठं नुकसान झालं ! म्हातारा म्हनते, हत्ती गेला बाप्पा ! मी वाचून काय करू बाप्पा ! मले विहीर दाखवा बाप्पा ! काय म्हनते ?

-विहीर दाखवा !

तो म्हातारा त्याच गावातला, होय की नाही ?

'होय !'

त्याला विहीर मालूम आहे की नाही ?

होऽय !

तो साला सोंग कशाला दाखवते ? ऊठ अन् टाक उडी ! रडत नाही. तो सोंग दाखोते. आपल्या वक्ती बोंबलता न् दुसऱ्याले खाता शिजवून ! हे काय मानसाचं लक्षन आहे ?

''तीरथ जाव, काशी जाव, चाहे जाव गया ।
कबीर कहे कमालकू सबसे बडी दया ।।''

दया ही मोठी गोष्ट आहे. क्रूर होऊन मुक्या जनावरांच्या मानेवरून सुरी फिरवू नका. जसा आपला जीव आहे, तसाच दुसऱ्यांचाही जीव आहे. हे 'बकरू' व आपलं 'लेकरू' सारखेच आहेत. मुक्या प्राण्यास कापून देवास कसा आनंद होईल ? मुक्या प्राण्यांचा जीव घेणे पाप आहे.

खरे तर गाडगे महाराजांना शिक्षणाचा गंधही नव्हता. त्यांचे बालपण अतिशय खडतर परिस्थितीत व्यतीत झाले होते. आपल्या उभ्या आयुष्यात त्यांनी शाळेचे तोंडही कधी पाहिले नव्हते, परंतु त्यांनी व्यावहारिक जगाचा उघड्या डोळ्यांनी अनुभव घेतला होता. त्यांच्याकडे सूक्ष्म निरीक्षणशक्ती होती. तिच्या जोरावर त्यांनी आपल्या आजूबाजूच्या समाजातील निरनिराळे दोष व दुर्गुण यांचा अचूक वेध घेतला. आपल्या कीर्तनातून ते समाजजीवनातील हे दोष व दुर्गुण यांच्यावर जोरदार प्रहार करीत असत.

त्यांचा उपदेशही अतिशय साधा व सोपा असे. 'चोरी करू नका. कर्ज काढून सावकाराच्या पाशात आपली मान अडकवू नका, जातीभेद व अस्पृश्यता पाळू नका, व्यसनाधीन होऊ नका, देव व धर्म यांच्या नावाखाली प्राण्यांची हत्या करू नका. एकमेकांशी प्रेमाने व बंधुभावाने वागा, अडल्या-नडलेल्यांची, रंजल्या-गांजलेल्यांची सेवा करा, ऋण काढून सण करू नका, दारू पिऊन बायकापोरांना मारू नका. दोन घास कमी खा, पण आपल्या मुलांना शाळा शिकवा.'

''शिक्षणाशिवाय माणूस म्हणजे नुसता दगड. शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही. ज्याला शिक्षण नाही, तो खटाऱ्याचा बैल आहे. विद्या हे मोठे धन आहे. चौऱ्याऐंशी रोगावर शिक्षण हा एकच उपाय आहे. म्हणून आपल्या मुलांना शाळेत घातल्याशिवाय राहू नका. तुम्ही तुमच्या अडाणीपणाची फळे भोगीत आहात. तुमच्यावर आलेली पाळी तुमच्या मुलाबाळांवर आणू नका. त्यांचे जीवन बरबाद करू नका. तुमच्या अज्ञानाचा फायदा घेवून सावकाराने तुम्हाला लुबाडले, कर्जबाजारी केले. देशोधडीला लावले. म्हणून आता तरी सावध व्हा. इव्हायाले पाहुणचार करू नका, बायकोला लुगडे घेऊ नका, पण मुलाला शाळेत घातल्याबिगर राहू नका. मायबापहो, एक सांज उपाशी रहा, एका लुगड्याची दोन लुगडी करून नेसा, फाटके लुगडे आणि धोतर वापरा. एखादा सणवार कमी करा, पण आपल्या पोराला शिकवा.''

बाबांनी नुसता उपदेश केला नाही तर शिक्षणाची लाट खेडोपाडी पोहोचविण्यास सरकारला व स्वयंसेवी संस्थांना मोठा हातभार लावला. कर्मवीर भाऊरावांच्या शिक्षणक्षेत्रातील योगदानाबद्दल गाडगे बाबांच्या मनात नितांत आदर होता.

३ डिसेंबर, १९३९ रोजी सातारा येथील महाराजा सयाजीराव हायस्कूलचा कोनशिला समारंभ संपन्न झाला. त्या रात्री त्याच ठिकाणी गाडगे बाबांचे कीर्तन झाले. गाडगे बाबांनी त्यावेळी अण्णांचा उल्लेख 'कर्मवीर' असा केला. तेव्हापासून सारेजण अण्णांना कर्मवीर म्हणून संबोधू लागले. या कीर्तनात शिक्षणाचे महत्त्व विशद करून ''भाऊरावांच्या संस्थेत मुले पाठवा आणि त्यांना मदत करा'' असा त्यांनी जनतेस कळकळीने उपदेश केला. संत गाडगे बाबा व कर्मवीर अण्णा हे दोघेही आपापल्या क्षेत्रात निर्लोभीवृत्तीने व त्यागाने समाजोन्नतीचे कार्य करत होते. या दोघांचा स्नेह दिसामासी वाढतच गेला. कर्मवीर अण्णांनी रयत शिक्षण संस्था स्थापन करून शिक्षण क्षेत्रात केलेल्या भरीव कार्याबद्दल सातारा जिल्हा विद्यार्थी संघाने २७ नोव्हेंबर १९४८ रोजी एक लाख रूपयांची थैली त्यांना गाडगेबाबा यांचे शुभहस्ते अर्पण केली. बाबांनी सदर प्रसंगी बोलताना कर्मवीरांच्या कार्याचा गौरव केला व 'भाऊरावांच्या कार्यावर पैशाचा पाऊस पाडा'' अशी जनतेला विनंती केली. महाराष्ट्रभर वणवण फिरताना आपल्या कीर्तनातून ते कर्मवीरांच्या कार्याचे कौतुक करीत राहिले.

कुसूरचे कै. बंडो गोपाळा मुकादम यांनी बाबांना साक्षात गुरू मानले होते. गाडगे बाबांच्या पदस्पर्शाने आपण 'वाल्या'चा 'वाल्मिकी' झालो असे ते म्हणत. १९५३ च्या स्वातंत्र्यदिनी पुढील वर्षी कराडला गाडगे महाराज कॉलेज काढण्याची घोषणा कर्मवीर अण्णांनी धनिणीच्या बागेत केली. तालुक्याच्या ठिकाणी कॉलेज काढण्याचा हा देशातला पहिलाच प्रयत्न होता. निर्णय मोठ्या धाडसाचा होता. त्यावेळी पुणे विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे कॉलेज काढायचे झाल्यास एक लाख रूपयांचे डिपॉझिट ठेवावे लागत असे. प्रश्न मोठा बिकट होता. पण गाडगेबाबांचा आशीर्वादच कामी आला. मुकादम तात्या हे बाबांचे शिष्य पुढे आले. ते म्हणाले, ''तुम्ही कॉलेजला माझ्या गुरूचे नाव देता आहात, म्हणून मी स्वतः लोकांकडून एक लाख रूपये जमा करून देण्याची हमी देतो.'' तसे लेखी पत्रही त्यांनी दिले. ते पत्र पुणे विद्यापीठाच्या स्थानिक चौकशी समितीला सादर करण्यात आले आणि जून १९५४ पासून कराडात 'सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज' सुरू झाले. गोरगरीब, दुःखित, पीडीत, शेतकरी, शेतमजूर व कामकरी वर्गातील मुलांसमोर जणु सरस्वती अवतरली. मराठा, माळी, तेली, न्हावी, धोबी, धनगर, चांभार, कुंभार, कोळी, कोष्टी, वडार, लोहार, बेलदार, गोंड, गवारी, मांग आणि महार समाजाला जणू गाडगेबाबांचा प्रसादच मिळाला. श्रीमंताच्या नावे कॉलेजेस निघत होती. निघाली होती. पण एका संताच्या नावाचं हे कॉलेज ! अण्णांचा गाडगेबाबांच्या विषयीचा आदरभाव आणि मुकादम तात्यांची श्रद्धा ही या निमित्ताने वास्तुरूप घेऊन उभी राहिली.

आज समाजाच्या सर्व स्तरांतील सुमारे ५००० मुलेमुली अकरावीपासून पदव्युत्तर वर्गापर्यंतचे शिक्षण जणू गाडगेबाबांच्या अंगाखांद्यावर बसून घेताहेत. एका सुभाषितकाराने म्हटले आहे-

''मूलं भुजंगैः शिखरं प्लवंगैः शाखा विहंगैः कुसुमंच भृंगैः ।
श्रितं सदा चंदनपादपस्य, परोपकाराय सतां विभूतयः ।।''

'चंदनाच्या झाडाच्या मुळाशी सर्प, शेंड्यावर वानरे, फांद्यावर पक्षी व फुलांवर भुंगे सदैव आश्रय घेतात. संतांच्या विभूती केवळ परोपकारासाठीच असतात.' समाजाच्या सुखासाठी आपल्या सर्वस्वाचा होम करून केवळ 'परोपकारासाठी' जगलेल्या संत गाडगे बाबांना कॉलेजच्या सुवर्ण महोत्सवाच्या निमित्ताने ही विनम्र आदरांजली !

✦ ✦ ✦ ✦

मे.आर.सी.गुजर ॲन्ड सन्स

'सॅनेटरी वेअर', फर्शी, कडाप्पा, चायना पाईप सिमेंट पाईप, इ. योग्य दरात मिळतील.

३२९, यादोगोपाळ पेठ, सातारा

लक्ष्मणदास गोकुळदास सुंगधी

'सितारा', महालक्ष्मी अगरबत्तीचे व्यापारी

बाळासाहेब गांधी

४४५ रविवार पेठ, पुणे.

॥ विद्या विनयेन शोभते ॥

JANARDAN BHAGAT SHIKSHAN PRASARAK SANSTHA (REGD.)

(Regd.No.45/92, Maharashtra State)

PANVEL - RAIGAD.

PH : 27462579

Plot No.8, Janardan A. Bhagat Marg, Sector-14,
CIDCO Colony, Opp. Railway Station,
New Panvel (E)-410206, Dist.Raigad.

स्यत शिक्षण संस्थेचे सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज
कराड सुवर्ण महोत्सवानिमित्त हार्दिक शुभेच्छा

मा. श्री. रामशेठ ठाकूर
माजी खासदार
चेअरमन, ज.भ.शि.प्र. संस्था पनवेल

बॅरि.पी.जी.पाटील : एक ज्ञानज्योत

प्रा.मानसिंग कदम

रयत शिक्षण संस्थेचे एक आधारवड अन् काही काळ सत्ता आणि सेवा यांचा मिलाप साधणारे शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे सन्माननीय माजी सदस्य बॅरि.पी.जी. पाटील यांच्याविषयी स्फुट लेख.

महाराष्ट्राच्या शिक्षणक्षेत्रात ज्या नामवंत शिक्षणसंस्था आहेत त्यामध्ये रयत शिक्षण संस्थेचे नांव अग्रभागी आहे. रयत शिक्षण संस्थेने लोकोत्तर कार्याला वाहून घेतले आहे. या संस्थेमध्ये बॅरि.पी.जी.पाटील साहेबांचे योगदान महत्त्वाचे आहे. त्यांनी संस्थेमध्ये ध्येयवादी, कुशल आणि ख्यातनाम इंग्रजीचे प्राध्यापक, प्राचार्य, उपाध्यक्ष, सचिव अशा अनेक भूमिका कर्तव्यदक्षतेने आणि जबाबदारीने समर्थपणे पेलल्या आहेत. खेड्या-पाड्यातून उच्च शिक्षणासाठी आलेल्या विद्यार्थ्यांच्या मनावर शाश्वत मूल्यांचे संस्कार करीत त्यांना घडविणारा मार्गदर्शक म्हणून त्यांची कामगिरी हिमालयाइतकी उत्तुंग आहे.

कर्मवीर अण्णांनी ज्यावेळी त्यांना बॅरिस्टरची पदवी संपादन करण्यासाठी लंडनला पाठविले, त्यावेळी त्यांनी इंग्रजीचा अचूक नि डौलदार वापर, नेमका अविष्कार दाखवून आंग्ल भाषेवरील आपले प्रभुत्व सिध्द केले. एवढेच नव्हे तर वाचनाची आणि श्रवणाची बालपणापासूनची संवय देखील अबाधित राखून सरस्वतीची उपासना सुरूच ठेवली.

इ.स.१९५१ ला बॅरिस्टरची पदवी संपादन करून भारतात परत आल्यानंतर बॅरि. पी.जी.पाटील यांनी छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा येथे इंग्रजीचे ट्युटर म्हणून कामास प्रारंभ केला. सरांना अनेक मानाच्या आणि मोठ्या पगाराच्या नोकऱ्या मिळाल्या असत्या, पण त्यांनी कर्मवीरांवरील आणि 'रयत' शिक्षण संस्थेवरील निष्ठा तसूभरही ढळू न देता, स्वार्थाचा कसलाही विचार न करता निरपेक्ष वृत्तीने रयत शिक्षण संस्थेची सेवा केली. हजारो विद्यार्थ्यांचे भाग्य उजळले. आज संपूर्ण महाराष्ट्राला नव्हे तर देशाला जे इंग्रजीचे शिक्षक मिळाले त्यातील निम्म्याहून अधिक शिक्षक सरांचे विद्यार्थी असतील असे म्हटल्यास मुळीच अतिशयोक्ती ठरणार नाही.

१९४६ साली त्यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची भेट घेतली. त्यावेळी गांधीजी म्हणाले, ''पैशाला पासरी बॅरिस्टर इथे मिळतात, तू कशाला परदेशी जाऊन भाऊरावांचा पैसा खर्च करतोस ?'' परंतू कर्मवीरांच्या अट्टाहासासाठी सर लंडनला गेले. म्हणूनच त्यांनी 'संस्था देईल ते काम करायचे, देईल तो पगार घ्यायचा आणि जिथे पाठवतील तिथे नोकरी करायची' हे तत्त्व आयुष्यभर पाळले. त्यांनी कराड, कोल्हापूर, आणि सातारा येथे प्राचार्य म्हणून यशस्वीपणे काम करून तिन्ही कॉलेजची घडी नीट बसविली. इंग्रजी विषय घेतलेले विद्यार्थी जिथे साहेब आणि प्राचार्या सुमतिबाई पांडुरंग पाटील असतील त्या ठिकाणी जाऊन त्यांचे इंग्रजी आत्मसात करीत. इतर महाविद्यालयातील आणि शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी त्यांच्या व्याख्यानाचा आस्वाद घेत असत.कालांतराने ते संस्थेचे सचिव,शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे सदस्य झाले.

इंग्रजीचे व्यासंगी प्राध्यापक आणि गाढे अभ्यासक म्हणून शेक्सपिअरच्या नाटकातील संभाषणे, मिल्टनचे काव्य, शेले बायरन, कीटस् यांच्या कविता किंवा योगी अरविंदांची 'सावित्री' असो, त्यातील ओळीच्या ओळी सरांच्या पाठ असायच्या. चरित्रे-आत्मचरित्रे, इंग्रजीतील मौलिक साहित्य, इतिहास, समाजशास्त्र आणि तत्वज्ञान या विषयातील पुस्तके त्यांना आवडायची आणि आपल्या विद्यार्थ्यांनाही ती वाचावयास द्यायचे. मराठीतील ललित साहित्य त्यांना फार आवडे. वक्तृत्वात त्यांचा हात कोणीही धरू शकत नव्हते. पुढचे श्रोते तास न तास मंत्रमुग्ध नि तल्लीन होऊन त्यांची भाषणे ऐकत. अधूनमधून विनोदी चुटके आणि चिमटे ऐकणारांना भुरळ पाडीत असत.

बॅरि.पी.जी.सरही एक व्यक्ती नसून एक विचार होते. विशुध्द चारित्र्य आणि त्यागाचे ते एक मूर्तीमंत प्रतीक होते. गुरु, कर्मवीर, महात्मा गांधी आणि ग्रंथ ही त्यांच्या जीवनातील

दैवते होती. प्राचार्य गोकाक आणि कर्मवीरांना शेवटच्या क्षणापर्यंत ते विसरले नाहीत. तत्त्वनिष्ठा, ज्ञाननिष्ठा आणि समाजनिष्ठा यांचा त्रिवेणी संगम त्याच्या व्यक्तिमत्वात आढळतो. त्यांनी संस्कारक्षम शिक्षणाचा पुरस्कार हयातभर केला. पी.जी.सर हे हजारो विद्यार्थ्यांचे पवित्र दैवत आहेत. पी.जी.सरांचे शैक्षणिक आणि सामाजिक कार्य विचारात घेऊन 'औत' आणि 'दौत' यातील अंतर कमी करण्याची सामाजिक दूरदृष्टी विचारात घेऊन 'चतुरंग' तर्फे त्यांना प्रसिध्द शास्त्रज्ञ डॉ.रघुनाथ माशेलकर यांच्या हस्ते 'जीवनगौरव' पुरस्कार देऊन २००१ मध्ये गौरविण्यात आले. दोघेही विचारवंत, दोघांच्याही विचारात सार्वजनिक शिक्षणाविषयीची तळमळ. बॅरि.पी.जी.सरांनी आयुष्यभर शिक्षणाचा विचार केला. मन, मेंदू व मनगट यांचा विकास शिक्षण प्रक्रियेत झाला पाहिजे, ही त्यांची धारणा. दारिद्रय शिक्षणाच्या आड येऊन नये म्हणूनच त्यांनी संपूर्ण आयुष्य रयत शिक्षण संस्थेची सेवा करण्यासाठी व्यतित केले. परंतु अशा या शिक्षणप्रेमी, रयतप्रेमी रयत सेवकांची ज्ञानज्योत मालवल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्र शोकाकूल झाला. 'रयते' ची, महाराष्ट्राची आणि पर्यायाने देशाची प्रचंड हानी झाली.

साहेबांच्या जीवनातील फक्त दोनच आठवणी इथे नमुद करतो. १९५५ साली शिवाजी कॉलेजच्या स्नेहसंमेलनासाठी प्राचार्य गोकाक हे प्रमुख पाहुणे आपल्या भाषणात म्हणाले,

"Your institution imparts education to all and sundry, with the promise of self-help, self-culture, self-knowledge- irrespective of Caste, Creed, Colour or Community. It is this Secular aspect of your institution that is derived from the Father of the Nation who christened the first boarding house as the Chhatrapati Shahu Boarding house in Feb. 1927."

१४ डिसेंबर १९६० रोजी भारताचे राष्ट्रपती डॉ.राजेंद्रप्रसाद आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा.यशवंतराव चव्हाण सायन्स इमारतीच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून आले असताना सर त्यांच्या प्रास्ताविकात म्हणाले, ''Sir our founder Karmveer Bhaurao Patil has joined the bosom of divinity last year; and we, his spiritual childern are trying our best to carry on his heavenly ministry." खरोखर शेवटच्या क्षणापर्यंत साहेब 'heavenly ministry' चे काम करीत 'divinity' मध्ये विलीन झाले.

जाधव फीडस्

मिलिंद चेंबर्स, विटा, जि.सांगली

-: फोन :-

(०२३४७) २७२४१६/२७४०४७

मोबाईल नं. ९८२२४५८४१६

● उत्पादक ●

पोल्ट्री फीडस् व
पोल्ट्री कॉन्संट्रेट

छत्रपती संभाजी महाराज
सह.पतसंस्था मर्या.पिंपोडे बु।।

ता.कोरेगांव, जि.सातारा

- १८ शाखा व ६ विस्तारीत शाखा
- कार्यक्षेत्र : पश्चिम महाराष्ट्र, मुंबई, नवीमुंबई, ठाणे, रत्नागिरी, रायगड.
- सांपत्तीक स्थिती : ठेवी-१८ कोटी, येणे कर्ज-१५ कोटी, भागभांडवल-८० लाख, वसूलीची टक्केवारी-९०%
- सतत ऑडीट वर्ग 'अ'
- विनम्र व तत्पर सेवा
- स्वत:च्या मालकीची मुख्यालयाची सुसज्ज इमारत
- पश्चिम महाराष्ट्रातील एक अग्रगण्य पतसंस्था
- लॉकर सुविधा उपलब्ध, आदर्श कामकाजाबद्दल मा.सहकार आयुक्त यांचेकडून गौरव प्राप्त.

संस्थापक
श्री.रामभाऊ लेंभे
माजी चेअरमन
अशोकराव लेंभे

चेअरमन
सुरेशराव साळुंखे
व्हा.चेअरमन
हणमंतराव निकम

संचालक मंडळ व सर्व सेवक वर्ग

सुवर्ण महोत्सवातील 'सुवर्ण क्षण'



सुवर्ण महोत्सव उद्घाटन, प्रसंगी
मा. चेअरमन डॉ. एन.डी. पाटील, ना. डॉ. पतंगरावजी कदम,महाविद्यालयाचे पहिले प्राचार्य आर. के. कणबरकर

सुवर्ण महोत्सव उद्घाटन प्रसंगी प्राचार्य अरूण बर्गे

सुवर्ण महोत्सव उद्घाटन प्रसंगी प्रचंड जनसमूदाय

सुवर्ण महोत्सव वर्ष उद्घाटन प्रसंगी महाविद्यालय
प्रांगणातील भव्य रंगावली

सुवर्ण महोत्सवातील 'सुवर्ण क्षण'

'नॅक' पिअर समिती समवेत सिनियर कॉलेज प्राध्यापक



'तपासणी' पथका सोबत ज्युनिअर कॉलेज प्राध्यापक

'नॅक' पिअर समिती समवेत प्रशासकीय सेवक

'सुवर्ण क्षण'

मा. मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या हस्ते कै. अभिजीत पतंगराव कदम क्रिडासंकूल कोनशिला समारंभ

शिवाजी विद्यापीठ व स.गा.म. कॉलेज कराड यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील व्याख्यानमाला प्रसंगी शिवाजी विद्यापीठ बी.सी.यु.डी. चे संचालक डॉ. बी.एल्. पाटील

'नॅक' पिअर समिती समवेत माजी विद्यार्थी

महाविद्यालय उभारणी मधील संस्मरणीय क्षणचित्रे

पुणे विद्यापीठाच्या कमिशन समोर बोलताना
बॅ. धनंजयराव गाडगीळ

पुणे विद्यापीठ कमिशन समवेत कर्मवीर अण्णा व मुकादम तात्या

कमिशन समोर बोलताना
मा.ना. बाळासाहेब देसाई

महाविद्यालय परिसरात गाडगे महाराजांचे
किर्तन

सौ. सुमतीबाई पाटील विद्यार्थीनी वसतीगृह उद्घाटन सोहळा –
विशेष उपस्थिती:– मा.ना. यशवंतरावजी चव्हाण,
सौ. वेणूताई चव्हाण,मा. आप्पासाहेब पाटील,
मा. मुकादम तात्या, मा. नलावडे, मा.ए.डी. साळुंखे

मा. मुकादम तात्या, बॅ. पी.जी. पाटील व
उपप्राचार्य सुभेदार ' सायन्स बिल्डींग' भूमीपूजन प्रसंगी

अर्धशतकातील पाऊलखुणा

प्राचार्य अरुण बर्गे

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक, थोर समाजसेवक व शिक्षण महर्षी, पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी १९५४ साली स्थापन केलेल्या या महाविद्यालयाचा आसमंत अजुनही जुनी पुराणी कहाणी अत्यंत तत्परतेने सांगतो. गतकाळाच्या अनंत साक्षींनी मन भारावते. शिक्षणामुळे माणसाच्या मनाची, बुद्धीची व कार्यशक्तीची वाढ होते हे शैक्षणिक तत्वज्ञान वरवर 'अज्ञ' वाटणाऱ्या पण खऱ्या अर्थाने 'तज्ञ' असणाऱ्या अण्णांच्या रोमारोमात भिनले होते. साऱ्या समाजाच्या उद्धाराची घोषणा अनेकांनी केली पण ज्ञानाशिवाय उद्धार नाही हे सत्य जाणून हे ज्ञानदानाचे पवित्र कार्य अण्णांनी आपल्या मनाशी ठरवून या क्षेत्रात पहिली पाऊलवाट निर्माण केली. आज तिचे रुपान्तर हमरस्त्यात झाले आहे. तालुक्याच्या ठिकाणी असलेले हे कॉलेज सुवर्ण महोत्सव साजरा करणारे संपूर्ण भारतातील पहिले कॉलेज आहे, हे नमूद करावयास सानंद अभिमान वाटतो.

१९५३ चा स्वातंत्रदिन समारोह. स्थळ सातारा येथील धनिनीची बाग. रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांनी या प्रसंगी घोषणा केली. ''कराड येथे पुढल्या वर्षापासून कॉलेज सुरू करणार'' हा निर्धार कर्मवीर अण्णांचा होता. ''बोले तैसा चाले'' हे त्यांचे व्रत होते. 'निश्चयाचा महामेरू', असणाऱ्या कर्मवीरांनी अनेक संकल्प केले व ते सर्व 'याच देही याच डोळा' पाहण्याचे भाग्य त्यांना लाभले.

संकल्पसिध्दीसाठी कर्मवीरांनी नियोजनबध्द वाटचाल केली. पुणे विद्यापीठाकडे ५०,०००रू. अनामत रक्कम भरण्याचा पहिला प्रश्न समोर होता. पण, न डगमगता नियोजन बध्द वाटचाल केली. पुण्याचे महापौर बाबूराव सणस, मा. शंकरराव उरसळ यांच्या मदतीने देणगीचे काम सुरू केले. पुण्याच्या महात्मा फुले मंडईतील व्यापारी, हमाल, भाजी विक्रेते यांनी स्वंयस्फूर्तीने एक दिवसाची 'कमाई' अण्णांना दिली. वास्तव कल्पनेपेक्षाही किती अद्‌भूतरम्य असते हे सत्य या घटनेने जाणवले. कॉलेज स्थापनेची घोषणा केली सातारला, देणगी गोळा केली पुण्याला, तर कॉलेज स्थापन झाले कराडला. या महाविद्यालयाच्या उभारणीमध्ये मा.दानशूर बंडो गोपाळा मुकादम, व मा.ॲड.केशवराव पवार (दादा) यांचा सिंहाचा वाटा आहे. मा.ॲड.पी.डी.पाटील व इतर संस्था हितचिंतकांनी कर्मवीर अण्णांचे सोबत देणगी मिळविण्यासाठी बहुमोल सहकार्य केले.

जून १९५४ मध्ये ५४ च विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला हा मणिकांचन योगच म्हणावा लागेल. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू भूषविणारे प्राचार्य रा.कृ.कणबरकर हे या महाविद्यालयाचे पाहिले प्राचार्य ! महाविद्यालयाचा उद्‌घाटन सोहळा १७ जुलै १९५४ रोजी संपन्न झाला तो मा.धनंजयराव गाडगीळ यांच्या शुभ हस्ते. या सोहळ्याला उपस्थित होते पुण्याच्या फुले मंडईतील हमाल व भाजी विक्रेते ! कथा कादंबरीलाही लाजवतील अशा या घटना ! उद्‌घाटन प्रसंगी धनंजयराव गाडगीळ म्हणाले - ''कराडला आल्यावर प्रत्येकाला कृष्णा-कोयनेच्या प्रीतिसंगमाची आठवण येणे रास्त आहे. पण मात्र आज येथे वेगळाच संगम दिसतो. आम्ही पुणे विद्यापीठातील पुस्तकपंडीत व मंडई विद्यापीठातील कृषिपंडीत या दोघांचा मनोहर संगम कर्मवीर अण्णांनी अत्यंत शिताफीने व बहारदारपणे घडवून आणला हे समारंभाचे खास वैशिष्ट्य होय.''

सद्‌गुरू गाडगे महाराजांनी १९५५ मध्ये या कॉलेजला भेट देऊन प्रांगणाची साफसफाई केली. अलीकडे शासनाने त्यांच्या नावाने ''ग्रामस्वच्छता अभियान'' सुरू केले आहे. अण्णांनी दूरदृष्टीने अर्ध्या शतकापूर्वीच त्यांचे नाव चिरंतन केले.

सद्‌गुरू सुवर्णस्मृती अगणित आहेत. सर्व स्मृतींची सुवर्णपाने संग्रहीत करावयाची म्हटली तरी एक ग्रंथच तयार होईल. वानगीदाखल त्यातील काही स्मृती.

★ काँग्रेस अध्यक्षा श्रीमती इंदिरा गांधी यांच्या शुभहस्ते १९५९ मध्ये प्रेक्षागृहाच्या उद्‌घाटनाचा सोहळा संपन्न झाला.

★ कॉलेजच्या प्रांगणात कर्मवीरांचा अर्धपुतळा उभारण्यात आला. या पुतळ्याचा अनावरण समारंभ तत्कालीन महसूल मंत्री ना.बाळासाहेब देसाई यांच्या हस्ते झाला.

★ महाविद्यालयाच्या कल्पक, विद्वान, कार्यतत्पर सेवाभावी प्राचार्या सौ.सुमतीबाई पांडूरंग पाटील यांच्या नावे विद्यार्थिनी

वसतिगृहाची स्थापना व भव्य इमारतीचे उद्घाटन सौ.वेणुताई व ना.यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते.

★ दानशूर बंडो गोपाळा कदम उर्फ मुकादम तात्या यांचा पुतळा व वास्तू.

★ महाविद्यालयाचा १६ एकराचा परिसर.

★ विद्यार्थिनींसाठी राष्ट्रीय छात्र सेनेची सोय असणारे जिल्ह्यातील एकमेव महाविद्यालय.

★ कमवा व शिका योजना, प्रौढ व निरंतर शिक्षण योजना, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, विज्ञान मंच, पंतप्रधान रोजगार योजना इ. नाविण्यपूर्ण प्रकल्प व योजनांची अंमलबजावणी करणारे महाविद्यालय.

★ १९६७ चा भूकंप व १९७२ चा दुष्काळ या नैसर्गिक आपत्तीवेळी महाविद्यालयाने दिलेले योगदान.

★ शेतकरी ग्रंथालयाची अभिनव संकल्पना व कार्यतत्परता.

★ ५२ चित्ररथांची अविस्मरणीय भव्य मिरवणूक.

★ देशापुढील ज्वलंत प्रश्नाचे राक्षसी रूप जनते समोर मांडण्यासाठी १५ विविध पथनाट्याचे परिसरातील विविध ४३ गावात १२५ प्रयोग १५ सप्टेंबर रोजी.

★ विविध विषयाचे २७ सेल्फ फायनानसिंग व कॅप्सूल कोर्सेस.

★ सुसज्ज असे ''मिडिया सेंटर''

★ 'कै.अभिजीत पतंगराव कदम' क्रीडा संकुल.

★ कॉलेज अंतर्गत रस्त्याचे संपूर्ण डांबरीकरण.

★ माजी विद्यार्थ्यांचे व पालकांचे एकाच दिवशी ४३ स्नेहमेळावे.

सेवाभावी कुशल प्राचार्य

१) प्राचार्य आर.के.कणबरकर ..... १-५-१९५४ ते ९-५-१९५७
कुलगुरू शिवाजी विद्यापीठ

२) प्राचार्य बी.ए.चौगुले ..... १०-५-१९५७ ते २३-४-१९६०

३) प्राचार्य एस्.आर्.शिंदे ..... २४-४-१९६० ते २३-५-१९६१

४) प्राचार्य ए.डी.अत्तार ..... २०-६-१९६१ ते ३०-५-१९६४

५) प्राचार्य बॅ.पी.जी.पाटील ..... १-६-१९६४ ते ५-६-१९६७
कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर ..... ३०-८-१९६९ ते ३१-५-१९७२
सदस्य - लोकसेवा आयोग, सचिव व उपाध्यक्ष रयत शिक्षण संस्था. चतुरंग पुरस्कार, रंगभूषण मुंबई

६) प्राचार्या सौ.एस.पी.पाटील ..... ६-६-१९६७ ते २-८-१९६९
चेअरमन-लोकसेवा आयोग.

७) प्राचार्य ए.बी.मगदूम ..... १-६-१९७२ ते ३१-५-१९७८
सचिव, रयत शिक्षण संस्था ..... १०-५-१९८१ ते १५-४-१९८३

८) प्राचार्य डॉ.एस.आर.सुर्यवंशी ..... १-८-१९७८ ते ९-५-१९८१
सहसचिव, रयत शिक्षण संस्था

९) प्राचार्य डॉ.डी.बी.पठाण ..... १६-५-१९८३ ते ७-८-१९८३

१०) प्राचार्य एन्.एन्.भगरे ..... ८-८-१९८३ ते ३०-४-१९८४

११) प्राचार्य एस्.एन्.यादव ..... १-५-१९८४ ते ३१-७-१९८४

१२) प्राचार्य डॉ.एस्.व्ही.तिरोडकर ..... १-८-१९८४ ते ३१-७-१९८४

१३) प्राचार्य डी.के.खोत ..... १६-५-१९८५ ते ९-५-१९८७

१४) प्राचार्य एम्.ए.शेख ..... १-६-१९८८ ते १३-६-१९८९

१५) प्राचार्य एम्.एम्.स्वामी ..... १-७-१९८९ ते १४-६-१९९०
सचिव, रयत शिक्षण संस्था

१६) प्राचार्य डॉ.व्ही.के.घाटे ..... १५-६-१९९० ते ३१-५-१९९१
प्र.कुलगुरू शिवाजी विद्यापीठ
सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा.

१७) प्राचार्य पी.ए.पानवळ ..... १-६-१९९१ ते ३१-७-१९९३
आदर्श शिक्षक पुरस्कार, महाराष्ट्र राज्य व वृक्षमित्र पुरस्कार.

१८) प्राचार्य ई.जी.निकम ..... १-८-१९९३ ते १३-९-१९९८

१९) प्राचार्य डॉ.के.बी.कुंदप ..... १४-९-१९९८ ते ३१-७-१९९९
गुणवंत शिक्षक शिवाजी विद्यापीठ, महानुभाव साहित्य भूषण पुरस्कार, कराड गौरव पुरस्कार.

२०) प्राचार्य डॉ.एस्.डी.जाधव ..... १-८-१९९९ ते ३१-५-२००३.

२१) प्राचार्य ए.ई.बर्गे ..... १-६-२००३ ते ३१-१-२००५.

शैक्षणिक सोईंचा प्रारंभ

जून १९५४ कॉलेज स्थापना, इंग्रजी, मराठी, हिंदी, संस्कृत, अर्धमागधी, अर्थशास्त्र, शिक्षणशास्त्र, इतिहास, भूगोल, राज्यशास्त्र, समाजशास्त्र या विषयाची सोय. विद्यार्थी संख्या ५२+२=५४.
कमवा व शिका योजना प्रारंभ.
कर्मवीर वसतिगृह प्रारंभ.

जून १९६० कॉमर्स विभाग सुरू

जून १९६४ एम्.ए.इंगजी

जून १९६५ सायन्स, विभागांतर्गत वनस्पतीशास्त्र व पीक संरक्षण, रसायनशास्त्र, पदार्थविज्ञान, संख्याशास्त्र, प्राणीशास्त्र, या विषयांची सोय.

जून १९६६ तत्वज्ञान विषय नव्याने सुरू.

जून १९६७ सायन्स विभागासाठी गणित विषयाची सोय.

जून १९६९ स्पेशल हिंदी विषय पदवी वर्गासाठी सुरू.

जून १९७२ सौ.सुमतिबाई पांडूरंग पाटील वसतिगृह सुरू.

जून १९७३ एम्.ए.वर्गासाठी मराठी, हिंदी

जून १९७४ एम्.फील मराठी वर्ग.

जून १९७६ एम्.ए.इतिहास

जून १९७८ बी.एस्सी.तृतीय वर्षासाठी सुक्ष्मजीवशास्त्र

जून १९८२ एम्.ए.राज्यशास्त्र.

जून १९८४ बी.एस्सी.साठी इलेक्ट्रॉनिक्स.

जून १९८६ एम्.ए.साठी समाजशास्त्र व अर्थशास्त्र या विषयाची सोय.

जून १९९० यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे वर्ग सुरू.

जून २००१ बॅचलर इन कॉम्प्युटर सायन्स प्रारंभ.

कॉलेजच्या भौतिक प्रगतीची वाटचाल

१) १९५४ च्या खरेदीपत्राबरोबर - पद्व्युत्तर विभागाची इमारत व लेडिज कॉमन रुम (जूनी जिमखाना इमारत) बांधकाम

२) १९५७-५८ प्राचार्य व उपप्राचार्य यांच्या निवासस्थानाच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण.

३) १९५८ राष्ट्रीय छात्र सेना-कार्यालय व एन्.सी.सी.गार्ड रुम.

४) १९६० लेक्चर हॉल नंबर- ३० ते ३४ जूनी कॉलेज इमारत

५) १९५९ 'प्रेक्षागृह' बांधकाम पूर्ण व काँग्रेस अध्यक्षा श्रीमती इंदिरा गांधी यांच्या शुभहस्ते उद्घाटन.

६) १९६३ कर्मवीर वसतीगृह इमारत.

७) १९६३ ऑफिस इमारत

८) १९६३ कर्मवीर वसतिगृह व मेस हॉल

९) १९६८ डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांचा पुतळा बांधकाम पूर्ण.

१०) १९६९ ते ७३ मुख्य इमारत - बांधकाम

११) १९७२ ते ७६ विज्ञान प्रयोगशाळा इमारत

१२) १९७२-७३ दा.बं.गो.मुकादम तात्यांचे निवासस्थानाचे बांधकाम पूर्ण

१३) १९७६ विद्यापिठ अनुदान आयोगाच्या सहकार्याने प्राध्यापक निवास पूर्ण

१४) १९८० पूर्ण दिशेकडील नॉन-टिचींग स्टाफ क्वार्टरचे बांधकाम

१५) १९८० लेडिज वसतीगृह बांधकाम

१६) १९८२ उत्तर दिशेकडील शिक्षकेत्तर सेवकांचे निवासस्थान बांधकाम पूर्ण

१७) १९८४ वॉचमन रूम

१८) १९८५ ग्रंथालय

१९) १९८८ रसायनशास्त्र प्रयोगशाळा स्टोअर रूम व गॅस प्लॅन्ट रूम

२०) १९८७-८८ मराठी शाळा इमारत बांधकाम

२१) १९८७ महाविद्यालयाच्या जागेभोवती दगडी भिंतीचे बांधकाम पूर्ण

२२) १९८८-८९ स्टाफ रूम इमारत

२३) १९९०-९१ सद्गुरू कॅन्टीन इमारत बांधकाम
२४) १९९०-९१ व्यवसाय अभ्यासक्रम इमारत
२५) १९९०-९१ शास्त्र विभागाचा दुसरा मजला बांधकाम
२६) १९९२-९३ ज्युनिअर कॉलेज इमारत
२७) १९९५-९६ UGC इमारत तळमजला इमारत पूर्ण
२८) १९९९-२००० UGC इमारत पहिला मजला बांधकाम
२९) २००१-०२ प्राचार्य ऑफीस इमारत
३०) २००३-०४ लेडिज वसतिगृह-वेटींग रूम
३१) २००३-०४ व्यवसाय अभ्यासक्रम वर्कशॉप
३२) २००३-०४ वॉटर पंपींग रूम नं.२
३३) २००४-०५ विद्यार्थी टॉयलेट (ग्रंथालयाशेजारी)
३४) २००४-०५ कॅन्टीन शेजारील लंच शेड
३५) २००४-०५ शेतकरी ग्रंथालय कक्ष
३६) २००४-०५ चौकशी कक्ष
३७) २००४-०५ नोटीस बोर्ड शेड
३८) २००४-०५ अर्थशास्त्र विभाग बांधकाम
३९) २००४-०५ सुतारकाम वर्कशॉप
४०) २००४-०५ NCC ऑफीस विद्यार्थीनी
४१) २००४-०५ लेडिज वसतिगृह-वेटींग रूम, लॉन, कंपाऊंड वॉल
४२) २००४-०५ लेडिज, कॉमनरूम सोम
४३) २००४-०५ विद्यार्थीनी व नॉन टिचींग स्टाफसाठी लंचरूम
४४) २००४-०५ कार पार्किंग
हिंदी, मराठी, इंग्रजी, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, संस्कृत, तत्वज्ञान
४५) २००४-०५ शिक्षणशास्त्र, माजी विद्यार्थी संघ, वाणिज्य, समाजशास्त्र विषयासाठी स्वतंत्र विभागाची सोय.

कॉलेजच्या भौतिक प्रगतीची वाटचाल

१५ जून १९५४ : 'मॉडर्न इंडस्ट्रीज' ची लिलावात निघालेली १६ एकर जागा संस्थेने कॉलेजसाठी सामाजिक कार्यकर्ते गौरीहर सिंहासने यांचेकडून विकत घेतली. प्रारंभी येथे कौलारू ४ खोल्या होत्या त्यातच पार्टीशन करून महाविद्यालय सुरू

१९५७-५८ : प्राचार्य व उपप्राचार्य यांच्या निवासस्थानाच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण.
१९५९ : 'प्रेक्षागृह' बांधकाम पूर्ण व उद्घाटन काँग्रेस अध्यक्षा श्रीमती इंदिरा गांधी यांच्या शुभहस्ते.
१९६०-६१ : प्रेक्षागृहातील चारी बाजूच्या चार खोल्यांचे बांधकाम पूर्ण
१९६१ ते ६४ : मुख्य इमारत तळमजला व मुलांच्या वसतिगृहाची इमारत
१७ फेब्रु १९६८ : कर्मवीर भाऊराव पाटील यांचा पुतळा अनावरण
११ मार्च १९७३ : सौ.सुमतिबाई पांडूरंग पाटील विद्यार्थीनी वसतिगृह उद्घाटक सौ. वेणुताई यशवंतराव चव्हाण
१९७२-७३ : दानशूर बंडो गोपाळा मुकादम तात्यांचे निवास स्थानाचे बांधकाम पूर्ण
१९७६ : विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सहकार्याने प्राध्यापक निवास स्थानाची इमारत पूर्ण.
७ सप्टेंबर १९८० नॉन टिचींगचे क्वार्टर्सच्या इमारतीचे उद्घाटन मुख्यमंत्री बॅ.ए.आर.आंतुले.
१९८२-८३ : शिक्षकेतर सेवकांची दोन निवास स्थानांचे बांधकाम.
१९८४ : कै.दानशूर बंडो गोपाळा मुकादम पुतळा अनावरण सोहळा.
१९८३ ते १९८६ : ग्रंथालयाची दुमजली इमारत.
१९८६ ते १९८७ : महाविद्यालयाच्या जागेभोवती दगडी भिंतीचे बांधकाम पूर्ण
१९८६ ते १९८७ : कार्यालयीन कक्षांचे नूतनीकरण
१९८७ ते १९८८ : मराठी शाळा इमारत बांधकाम.
१९८८-८९ : स्टाफ रूमच्या नूतन वास्तूचे बांधकाम पूर्ण
१९९०-९१ : शास्त्र विभागाचा दुसरा मजला पूर्ण
१९९०-९१ : व्यवसाय शिक्षण इमारत, सद्गुरू कँटीन इमारत बांधकाम
१९९५ ते २००० : विस्तारीत सायन्स दुमजली इमारत
२००१ : प्राचार्य कार्यालय इमारतीचे उद्घाटन मा.खासदार पृथ्वीराज चव्हाण व डॉ.पंतगराव कदम यांच्या शुभ हस्ते.

सोबत माहितीदर्शक परिशिष्टे जोडलेली आहेत.

परिशिष्ट क्र.१ स.गा.म.कॉलेज स्थापना वर्ष-१९५४

स्टाफ यादी

अ.क्र.	सेवकाचे नाव	हजर झाल्याची तारीख	हुद्दा
१)	मा.प्राचार्य आर.के.कणबरकर	१।५।१९५४	प्राचार्य
२)	श्री.ए.एस.कांबळे	१०।५।१९५४	क्लार्क
३)	श्री.आर.आर.कदम	१।६।१९५४	शिपाई
४)	श्री.आर.ए.वाघमारे	१।६।१९५४	शिपाई
५)	श्री.एम.एच.लोखंडे	१६।६।१९५४	क्लार्क
६)	प्रा.श्री.जी.के.पंडित	२१।६।१९५४	प्राध्यापक
७)	प्रा.श्री.जी.एस.चित्रे	२१।६।१९५४	प्राध्यापक
८)	प्रा.श्री.बी.ए.चौगुले	२३।६।१९५४	प्राध्यापक
९)	प्रा.श्री.बी.डी.काळे	२४।६।१९५४	प्राध्यापक
१०)	प्रा.श्री.एस.एन.देशपांडे	२९।६।१९५४	प्राध्यापक
११)	प्रा.श्री.व्ही.टी.डुबल	१६।७।१९५४	प्राध्यापक
१२)	प्रा.श्रीमती लीला भातवडेकर	२९।११।१९५४	प्राध्यापक

परिशिष्ट क्र.२ १९५४/५५ कॉलेज स्थापना : प्रवेशित विद्यार्थी

अ.क्र.	विद्यार्थ्याचे नाव	गाव
१)	श्री. चव्हाण अधिकराव आण्णा	कोणेगांव
२)	श्री. जगताप दादू लक्ष्मण	मसूर
३)	श्री. देशपांडे श्रीराम विश्वनाथ	कोळे
४)	श्री. पाटील निवृत्ती यशवंत	आटके
५)	श्री. पाटील आर.डी.	पार्ले
६)	श्री. सूर्यवंशी एस.एस	किर्लोस्कर वाडी
७)	श्री. गावडे राम	किर्लोस्कर वाडी
८)	श्री. वाचासुंदर प्रभाकर शामराव	कराड
९)	श्री. कुमठेकर भालचंद्र दत्तात्रय	कराड
१०)	श्री. विधार दत्तात्रय यशवंत	कराड
११)	कु. बागल शांता	कराड
१२)	कु. फाटक पुष्पा	कराड
१३)	श्री. मुठेकर (लोणारी) अण्णासो हरिभाऊ	कराड
१४)	श्री. शिंदे नारायण ज्ञानोबा	कराड
१५)	श्री. देसाई रघुनाथ ज्ञानू	कराड
१६)	श्री. पेंढारकर सदाशिव दत्तात्रय	कराड
१७)	श्री. माळी ज्ञानदेव गुंडा	मुंढे
१८)	श्री. खिरे श्रीकांत गोपाळा	सातारा
१९)	श्री. आचार्य नारायण माधवराव	सातारा
२०)	श्री. खरात	''
२१)	श्री. पाटील जगन्नाथ आण्णा	''
२२)	श्री. शेंडे मच्छिंद्रनाथ विठ्ठल	''
२३)	श्री. सातभाई कमलाकर सिताराम	''
२४)	श्री. लोखंडे एम.एच्	''
२५)	खबाले आबाजी गणू	विंग
	उपलब्ध माहीतीनुसार	

परिशिष्ट क्र.३

१९५४ ते २००४ पर्यंतच्या एकूण विद्यार्थी संख्येची यादी

वर्ष	मुले	मुली	एकूण
१९५४-५५	५२+	२	५४
१९५५-५६	४९	४	५३
१९५६-५७	६४	१२	७६
१९५७-५८	१५३	१९	१७२
१९५८-५९	२४७	३१	२७८
१९५९-६०	२६९	३७	३०६
Pre Degree Commerce			
१९६०-६१	१९८	४१	२३९
१९६१-६२	२५१	३४	२८५
१९६२-६३	२९९	३४	३३३
१९६३-६४	३१५	४०	३५५
१९६४-६५	५१८	६३	५८१
Pre Degree Science			
१९६५-६६	६१४	८७	७०१
१९६६-६७	७७२	११२	८८४
१९६७-६८	७९०	१२५	९१५
१९६८-६९	८१०	१४०	९५०
१९६९-७०	९३२	९६	१०२८
१९७०-७१	१३१७	१०५	१४२२
१९७१-७२	११९२	८८	१२८०
१९७२-७३	१३२६	५७	१३८३
१९७३-७४	१४२०	१००	१५२०
१९७४-७५	१९८८	१७२	२१६०
१९७५-७६	२१५८	१९६	२३५४
१९७६-७७	२१९२	२०५	२३९७

वर्ष	मुले	मुली	एकूण
१९७७-७८	२६०४	३३२	२९३६
१९७८-१९७९	२७०६	३५४	३०६०
१९७९-८०	२३२४	३८४	२७०८
१९८०-८१	२६१७	४९४	३१११
१९८१-८२	२५८९	४६१	३०५०
१९८२-८३	२६१७	४७०	३०८७
१९८३-८४	२५७३	५२०	३०९३
१९८४-८५	३०००	४८०	३४८०
१९८५-८६	२८४४	५२३	३३६७
१९८६-८७	२७९३	४९३	३२८६
१९८७-८८	२९६६	५२२	३४८८
१९८८-८९	२९६६	५२२	३४८८
१९८९-९०	३००७	५६२	३५६९
१९९०-९१	३१६६	५४९	३७२५
१९९१-९२	३१८८	६१९	३७२८
१९९२-९३	३२४५	७४७	३९९२
१९९३-९४	३३६३	७६९	४१३२
१९९४-९५	३३५८	८३५	४१९३
१९९५-९६	२९७७	८०४	३७८१
१९९६-९७	२९१०	९७३	३८८३
१९९७-९८	२९१०	९७३	३८८३
१९९८-९९	२९९५	११०२	४०९७
१९९९-२०००	३६३०	१३७६	५००६
२०००-२००१	३५२८	१५१२	५०४०
२००१-२००२	३१२४	१४२३	४५४७
२००२-२००३	३२२९	१४८५	४७१४
२००३-२००४	३२३७	१३३९	४६७६
२००४-२००५	२६६०	२१३६	४७९६

उच्चमाध्यमिक प्रमाणपत्र परिक्षा (H.S.C.) गुणवत्ता यादी

अ.नं.	विद्यार्थ्याचे नाव	वर्ष	गुणवत्ता
१)	कु.सुचेता मदनाईक	१९८९-९०	१२वी विज्ञान भूगोल कोल्हापूर बोर्डात प्रथम
२)	कु.मुक्ता पाटील	१९९८-९९	१२वी कला कोल्हापूर बोर्ड नववी.
३)	श्री.विजयसिंह पाटील	१९९८-९९	१२ विज्ञान कोल्हापूर बोर्ड बारावा.
४)	कु.नुतन नांगरे	१९९९-२०००	१२वी कला कोल्हापूर बोर्ड १९वी.
५)	श्री.दिगंबर पाटील	२०००-२००१	१२वी कला ऑक्टोबर कोल्हापूर बोर्ड प्रथम
६)	श्री.विनोद पवार	२०००-२००१	१२ वी व्यवसाय अभ्यासशास्त्र M.R.E.D.A. बोर्डात प्रथम
७)	श्री.पुरूषोत्तम जोगळेकर	२००१-२००२	१२वी व्यवसाय अभ्यासक्रम कोल्हापर बोर्डात प्रथम
८)	कु.ज्योती पाटील	२००१-२००२	१२ वी विज्ञान भौतिकशास्त्र कोल्हापूर बोर्डात प्रथम.
९)	श्री.सम्राट मदनाईक	२००३-२००४	१२ वी विज्ञान जीवशास्त्र विषयात कोल्हापूर बोर्डात प्रथम.

आमचा मान आमचा अभिमान

एम.बी.बी.एस. कोर्सला अभिनंदनीय निवड

मोहन मगदूम	कु. वर्षा कोगनूळकर	विजयसिंह पाटील	कु. सुप्रिया कुराडे
सिकंदर पठाण	अभिजीत महादार	विशाल पाटील	शामसुंदर थोरात
संभाजी गरुड	शेखर कोगनूळकर	राहुल कदम	दिपक शेंडे
प्रकाश शिंदे	कु. सुचेता मदनाईक	कु. मीनल पाटील	रुपेश जडगे
कु.युगांतरा पाटील	राहुल फासे	कु. ज्योती पाटील	राहुल पाटील
कु. वंदना कांबळे	कु. वृषाली निकम	कमलेश शिंदे	सम्राट मदनाईक
कु. लांडगे एस. यू.	कु. रुपाली जडगे	सत्यजित मोहिते	धनंजय पाटील
राहूल महादार	कु. भाग्यश्री पाटील	कु. गौरी मदने	

पुरस्कार प्राप्त शिक्षक-सेवक-विद्यार्थी यादी

अ.क्र.	वर्ष	नाव	पुरस्कार
१)	१९९२-९३	प्रा.डॉ.सुमन पाटील	क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले पुरस्कार महाराष्ट्र शासन
२)	१९९४-९५	प्रा.डॉ.सुमन पाटील	महाराष्ट्र शासन उच्च व तंत्रशिक्षण व सेवायोजना विभागातील राज्य पुरस्कार.
३)	१९९६-९७	प्रा.डॉ.सुमन पाटील	आदरणीय पी.डी.पाटील गौरव प्रतिष्ठानतर्फे कराडगौरव पुरस्कार.
४)	१९९७-९८	प्रा.डॉ.सुमन पाटील	प्रबोधन प्रतिष्ठान कळंबेगुरूजी पुरस्कार.
५)	२००१-०२	प्रा.डॉ.सुमन पाटील	प्राचार्य सुमतिबाई पांडुरंग पाटील आदर्श शिक्षिका पुरस्कार
६)	१९९३-९४	डॉ.कन्हैय्या कुंदप	अ.भा.महानुभाव साहित्य भूषण पुरस्कार महानुभाव महंत मंडळ, औरंगाबाद.
७)	१९९७-९८	डॉ.कन्हैय्या कुंदप	प्रबोधन प्रतिष्ठान कळंबे गुरूजी पुरस्कार.
८)	९८-९९	डॉ.कन्हैय्या कुंदप	शिवाजी विद्यापीठ प्रथम गुणवंत शिक्षक पुरस्कार
९)	९९-२०००	डॉ.कन्हैय्या कुंदप	आदरणीय पी.डी.पाटील गौरव प्रतिष्ठान तर्फे कराड गौरव पुरस्कार.
१०)	९४-९५	श्री. कैलास माने	शिवछत्रपती राज्यक्रीडा पुरस्कार महाराष्ट्र शासन ॲथलेटिक्स
११)	९६-९७	प्रा.वसंत पाटील	साहित्य अकादमी पुरस्कार. हिंदी
१२)	९६-९७	प्रा.वसंत पाटील	आदरणीय पी.डी.पाटील गौरव प्रतिष्ठान तर्फे कराड गौरव पुरस्कार.
१३)	९६-९७	प्रा.मच्छिंद्र सकटे	अण्णाभाऊ साठे विचारवेध पुरस्कार, सातारा.
१४)	२००१-०२	प्रा.मच्छिंद्र सकटे	साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे पुरस्कार, लातूर
१५)	९९-२०००	प्रा.मच्छिंद्र सकटे	सत्यशोधक पुरस्कार नांदेड
१६)	२००२-०३	प्रा.मच्छिंद्र सकटे	समाजभूषण पुरस्कार, कोल्हापूर
१७)	९७-९८	प्रा.परशुराम आर्डे	आदरणीय पी.डी.पाटील प्रतिष्ठान तर्फे कराड गौरव पुरस्कार.
१८)	९८-९९	श्री. राजेंद्र मोहिते	शिवछत्रपती राज्यक्रीडा पुरस्कार महाराष्ट्र शासन शुटिंग व्हॉलिबॉल
१९)	९८-९९	कु. सीमा लाड	शिवछत्रपती राज्यक्रीडा पुरस्कार महाराष्ट्र शासन वेटलिफ्टींग
२०)	९९-२०००	कु. सीमा लाड	आदरणीय पी.डी.पाटील प्रतिष्ठानतर्फे कराडगौरव पुरस्कार.
२१)	२०००-०१	प्रा.राजेंद्र कुंभार	आदरणीय पी.डी.पाटील प्रतिष्ठान तर्फे कराड गौरव पुरस्कार
२२)	२००१-०२	प्रा.सौ.शोभना रैनाक	आदरणीय पी.डी.पाटील प्रतिष्ठानतर्फे कराड गौरव पुरस्कार.
२३)	२००३-०४	प्रा.सौ.शोभना रैनाक	सावित्रीबाई फुले पुरस्कार, पुणे
२४)	२०००-०१	कु.शुभांगी कारंडे	शिवछत्रपती राज्यक्रीडा पुरस्कार वेटलिफ्टींग
२५)	२००२-०३	प्रा.डॉ.भिमराव पाटील	शिवशाहू कृषिमित्र पुरस्कार.

परिशिष्ट क्र.४

जिंकिली यशशिखरे जयांनी !

● विद्यापीठ परीक्षा गुणवत्ता यादी ●

अ.नं.	विद्यार्थ्याचे नाव	वर्ष	गुणवत्ता
१)	श्री भगवंत कांबळे	१९७१-७२	तृतीय वर्ष कला तत्वज्ञान विषयात शिवाजी विद्यापीठात सर्व प्रथम
२)	श्री.आत्माराम जगदाळे	१९७५-७६	बी.ए.भाग ३ राज्यशास्त्र विषयात शिवाजी विद्यापीठात प्रथम
३)	श्री.शिवाजी मुळीक	१९७७-७८	पदवीपूर्व कला अर्धमागधी विद्यापीठात प्रथम.
४)	श्री श्रीनिवास जोशी	१९७७-७८	प्रथमवर्ष वाणिज्य विद्यापीठात तृतीय.
५)	कु.उज्वला शहा	१९७७-७८	प्रथम वर्ष विज्ञान प्राणिशास्त्र शिवाजी विद्यापीठात प्रथम
६)	कु.जयश्री मगदूम	१९७७-७८	तृतीय वर्ष विज्ञान विद्यापीठात पाचवी
७)	श्री.दिलीप कुरळपकर	१९७७-७८	तृतीयवर्ष विज्ञान वनस्पती शास्त्र शिवाजी विद्यापीठात प्रथम
८)	श्री.रमजान मुलाणी	१९८२-८३	तृतीय वर्ष विज्ञान वनस्पतीशास्त्र शिवाजी विद्यापीठात प्रथम
९)	कु.सुनिता पाटील	१९८९-९०	प्रथम वर्ष कला संस्कृत विद्यापीठात प्रथम
१०)	श्री.धनाजीराव देसाई	१९९०-९१	पदव्युत्तर राज्यशास्त्र विद्यापीठात प्रथम
११)	श्री.उदय कोर्लहळ्ळी	१९९२-९३	तृतीय वर्ष वाणिज्य विद्यापीठात चौथा.
१२)	कु.नीता पाटील	१९९४-९५	पदव्युत्तर मराठी विद्यापीठात प्रथम
१३)	श्री.वैभव मंत्री	१९९६-९७	तृतीय वर्ष विज्ञान वनस्पतीशास्त्र विद्यापिठात प्रथम
१४)	कु.माधवी सावळे	१९९८-१९९९	प्रथमवर्ष कला संस्कृत विद्यापीठात प्रथम
१५)	कु.नुतन नांगरे	२०००-२००१	प्रथमवर्ष कला संस्कृत विद्यापीठात प्रथम
१६)	कु.विनया उकीर्डे	२०००-२००१	द्वितीय विज्ञान विद्यापीठात पाचवी
१७)	श्री.जोतिराम कुराडे	२०००-२००१	प्रथमवर्ष विज्ञान प्राणिशास्त्र विद्यापीठात प्रथम
१८)	श्री.संजय सरगडे	२०००-२००१	पदव्युत्तर कला मराठी विद्यापीठात प्रथम
१९)	कु.मंजुषा साबळे	२००१-२००२	प्रथमवर्ष कला संस्कृत विद्यापीठात प्रथम.
२०)	कु.सुप्रिया पाटील	२००१-२००२	तृतीय वर्ष विज्ञान शिवाजी विद्यापीठात वनस्पती शास्त्र विद्यापीठात प्रथम
२१)	श्री.जोतिराम कुराडे	२००१-२००२	द्वितीयवर्ष विज्ञान प्राणिशास्त्र विद्यापीठात प्रथम.
२२)	कु.दिपाली चव्हाण	२००१-२००२	द्वितीय वर्ष विज्ञान प्राणिशास्त्र विद्यापीठात प्रथम.
२३)	कु.विनया उकीर्डे	२००१-२००२	तृतीयवर्ष विज्ञान प्राणिशास्त्र विद्यापीठात पाचवी.
२४)	श्री.सचिन जाधव	२००१-२००२	तृतीय वर्ष कला भूगोल विद्यापीठात प्रथम
२५)	कु.सुजाता पाटील	२००१-२००२	पदव्युत्तर कला हिंदी विद्यापीठात प्रथम.
२६)	श्री.सुहास जाधव	२००१-२००२	प्रथमवर्ष कला संस्कृत विद्यापीठात प्रथम
२७)	श्री.जोतिराम कुराडे	२००२-२००३	तृतीय वर्ष विज्ञान विद्यापीठात तृतीय रसायनशास्त्रात विद्यापीठात प्रथम
२८)	कु.दिपाली चव्हाण	२००३-२००४	तृतीय वर्ष विज्ञान विद्यापीठात तृतीय रसायनशास्त्रात विद्यापीठात प्रथम
२९)	कु.अंजली गुरसाळे	२००३-२००४	शिवाजी विद्यापीठात समाजशास्त्र विषयात पदव्युत्तर विभाग प्रथम.

क्रीडाक्षेत्र गुणवत्ता यादी

• आंतरराष्ट्रीय स्पर्धेतील खेळाडूंची यादी •

अ.क्र.	वर्ष	नाव	खेळाचा प्रकार	क्रमांक
१)	१९८०-८१	श्री पवार आर.के	ॲथलेटिक्स	आशियाई चाचणी स्पर्धेतसाठी निवड
२)	१९९२-९३	श्री कैलास माने	क्रॉसकंट्री	दक्षिण आफ्रिका व हॉलंड येथे स्पर्धेसाठी निवड
३)	१९९३-९४	श्री कैलास माने	क्रॉसकंट्री व १०,००० मी. धावणे	दक्षिण आशियाई क्रीडास्पर्धेत रौप्यपदक
४)	२००३-०४	कु.शुभस्वा शिखरे	पॉवरलिफ्टींग	आशियाई स्पर्धेत चार सुवर्णपदके

• अखिल भारतीय विद्यापीठ स्पर्धेतील यशवंत खेळाडू •

वर्ष	खेळाडूचे नाव	खेळाचा प्रकार	क्रमांक
१९६३-६४	श्री शिवाजी फाटक	कुस्ती	अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत सुवर्णपदक
१९६४-६५	श्री शिवाजी फाटक	कुस्ती	अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत सुवर्णपदक
१९६५-६६	श्री शिवाजी फाटक	कुस्ती	अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत सुवर्णपदक
१९६६-६७	श्री शिवाजी फाटक	कुस्ती	अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत सुवर्णपदक
१९६७-६८	श्री शिवाजी फाटक	कुस्ती	अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत सुवर्णपदक
१९६७-६८	श्री मारूती फाटक	कुस्ती	अ.भा.आंतरविद्यापीठ स्पर्धेत सुवर्णपदक
१९६८-६९	श्री मारूती फाटक	कुस्ती	अ.भा.आंतरविद्यापीठ स्पर्धेत सुवर्णपदक
१९६९-७०	श्री मारूती फाटक	कुस्ती	अ.भा.आंतरविद्यापीठ स्पर्धेत सुवर्णपदक
१९७०-७१	श्री मारूती फाटक	कुस्ती	अ.भा.आंतरविद्यापीठ स्पर्धेत सुवर्णपदक
१९७१-७२	श्री मारूती फाटक	कुस्ती	अ.भा.आंतरविद्यापीठ स्पर्धेत सुवर्णपदक
१९६८-६९	श्री वली जमादार	कुस्ती	अ.भा.आंतरविद्यापीठ स्पर्धेत रौप्यपदक
१९६९-७०	श्री वली जमादार	कुस्ती	अ.भा.आंतरविद्यापीठ स्पर्धेत सुवर्णपदक
१९७०-७१	श्री वली जमादार	कुस्ती	अ.भा.आंतरविद्यापीठ स्पर्धेत सुवर्णपदक
१९७१-७२	श्री वली जमादार	कुस्ती	अ.भा.आंतरविद्यापीठ स्पर्धेत सुवर्णपदक
१९७३-७४	श्री दादासाहेब थोरात	कुस्ती	अ.भा.आंतरविद्यापीठ स्पर्धेत रौप्यपदक
१९७४-७५	श्री दादासाहेब थोरात	कुस्ती	अ.भा.आंतरविद्यापीठ स्पर्धेत सुवर्णपदक
१९७५-७६	श्री दादासाहेब थोरात	कुस्ती	अ.भा.आंतरविद्यापीठ स्पर्धेत सुवर्णपदक
१९७७-७८	श्री दादासाहेब थोरात	कुस्ती	अ.भा.आंतरविद्यापीठ स्पर्धेत रौप्यपदक
१९७९-८०	श्री पवार आर.के	ॲथलेटिक्स	अ.भा.आंतरविद्यापीठ २० कि.मी.चालणे रौप्यपदक
१९८१-८२	श्री पवार आर.के.	ॲथलेटिक्स	अ.भा.आंतर विद्यापीठ सुवर्णपदक
१९८९-९०	श्री प्रकाश पाटील	कुस्ती	अ.भा.आंतरविद्यापीठ कांस्यपदक
१९९७-९८	श्री अतुल पाटील	ॲथलेटिक्स	अ.भा.आंतरविद्यापीठ स्पर्धेत रौप्यपदक
१९९८-९९	कु. सीमा लाड	वजन उचलणे	अ.भा.आंतरविद्यापीठ स्पर्धेत सुवर्णपदक
१९९९-२०००	श्री अतुल पाटील	ॲथलेटिक्स	५००० मी व १०,००० मी धावणे रौप्यपदक
२०००-०१	श्री अतुल पाटील	ॲथलेटिक्स	५००० मी व १०,००० मी धावणे रौप्यपदक
२०००-०१	कु. सीमा लाड	वजन उचलणे	अ.भा.आंतरविद्यापीठ स्पर्धेत रौप्यपदक
२००२-०३	कु. मेधा पवार	क्रॉसकंट्री	अ.भा.आं.विद्यापीठ स्पर्धेत चौथा क्रमांक
२००२-०३	श्री संतोष पाटील	कबड्डी	अ.भा.आं.वि.स्पर्धेत ब्राँझपदक
२००३-०४	श्री सुनिल आडके	कबड्डी	अ.भा.आं.वि.स्पर्धेत ब्राँझपदक
२००४-०५	श्री सुनिल आडके	कबड्डी	अ.भा.आं.वि.स्पर्धेत सुवर्णपदक

• राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झालेले विद्यार्थी •

अ.क्र.	वर्ष	विद्यार्थ्यांचे नाव	खेळाचा प्रकार	क्रमांक
१)	१९६९-७०	श्री जाधव एम्.एन.	कुस्ती	राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड.
२)	१९७९-८०	श्री जाधव एम्.एन्.	कुस्ती	राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड
३)	१९८१-८२	श्री रामचंद्र शेळके	कुस्ती	राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड व महाराष्ट्र राज्य सुवर्णपदक
४)	१८८२-८३	श्री नलवडे एच्.व्ही	कुस्ती	महाराष्ट्र राज्य स्पर्धेसाठी निवड
५)	१९८९-९०	श्री संतोष जाधव	ॲथलेटिक्स	राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड.
६)	१९९२-९३	श्री शिशिकांत पाटील	ॲथलेटिक्स	राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड.
७)	१९९४-९५	श्री नितीन मराठे	ॲथलेटिक्स	राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड
८)	१९९२-९३	श्री फिरोज पठाण	कबड्डी	राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड
९)	१९९४-९५	श्री अतुल पाटील	ॲथलेटिक्स	राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड
१०)	१९९५-९६	श्री अतुल पाटील	ॲथलेटिक्स	राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड
११)	१९९६-९७	श्री अतुल पाटील	ॲथलेटिक्स	राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड
१२)	१९९७-९८	श्री अतुल पाटील	ॲथलेटिक्स	राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड
१३)	१९९५-९६	कु. सीमा लाड	वजन उचलणे	राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड
१४)	१९९६-९७	कु. सीमा लाड	वजन उचलणे	राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड
१५)	१९९५-९६	श्री जीवन मोरे	ॲथलेटिक्स	राष्ट्रीय हातोडाफेक स्पर्धेसाठी निवड
१६)	१९९८-९९	श्री धर्मो येवले	ॲथलेटिक्स	महाराष्ट्र राज्य स्पर्धेत रौप्यपदक
१७)	२०००-०१	कु. शुभस्वा शिखरे	वजन उचलणे	राज्यस्तरीय स्पर्धेत सुवर्णपदक
१८)	२००१-०२	कु. मेघा पवार	ॲथलेटिक्स	राष्ट्रीय शालेय स्पर्धेत निवड
१९)	२००१-०२	श्री सुभाष चव्हाण	ॲथलेटिक्स	महाराष्ट्र राज्य शालेय भालाफेक स्पर्धेत ब्राँझपदक
२०)	२००१-०२	श्री रोहित पाटील	वेटलिफ्टींग	महाराष्ट्र राज्य शालेय स्पर्धेत सुवर्णपदक
२१)	२००१-०२	श्री कुलदीप डुबल	शुटिंग व्हॉलिबॉल	राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक
२२)	२००१-०२	कु. रूपाली चव्हाण	वेटलिफ्टींग	महाराष्ट्र राज्यस्तरीय स्पर्धेत सुवर्णपदक
२३)	२००२-०३	श्री संतोष कुचेकर	ॲथलेटिक्स	महाराष्ट्र राज्य शालेय गोळाफेक स्पर्धेत ब्राँझपदक
२४)	२००२-०३	श्री शब्बीर पटेल	धावणे	महाराष्ट्र राज्य ५००० मी. धावणे स्पर्धेत सुवर्णपदक
२५)	२००२-०३	कु. किशोरी चव्हाण	वेटलिफ्टींग	महाराष्ट्र राज्य शालेय स्पर्धेत सुवर्णपदक
२६)	२००३-०४	श्री नागसेन कदम	वजन उचलणे	महाराष्ट्र राज्य शालेय स्पर्धेत ब्राँझपदक
२७)	२००४-०५	श्री संजय धुमाळ	वेटलिफ्टींग	राष्ट्रीय वेटलिफ्टींग स्पर्धेत रौप्यपदक

N.C.C.
Roll of Honour
International Award for Young People in India.
(Duke of Edinburgh Award)

1984-85	श्री.नरेंद्र रैनाक	C.S.U.O.	Republic Day Parade New Delhi
1985-86	श्री.जीवन पवार	C.S.U.O.	R.D.New Delhi
1986-87	श्री.एस.एन.ठोके	C.S.U.O.	R.D.New Delhi
1996-97	श्री.बजरंग भोसले	C.S.U.O.	R.D.New Delhi
1996-97	श्री.बजरंग भोसले	C.S.U.O.	Bronze Medel
1996-97	श्री.सोहरब नाईक	C.S.U.O.	Bronze Medeal
1996-97	श्री.गणेश जाधव	C.S.U.O.	Bronze Medel
1996-97	श्री.रणजीत पाटील	C.S.U.O.	Bronze Medel

1998-99	दुष्यंत तोरसे	C.S.U.O.	Brone Medel
1998-99	कु.अमिता चव्हाण	C.S.U.O.	T.S.C.New Delhi
1998-99	कु.राणी रैनाक	UO	R.D.New Delhi
1999-2000	गणेश जाधव	C.S.U.O.	Silver Medel
2000-01	कु.संजीवनी थोरात	UO	R.D.New Delhi
2000-01	कु.मेधाराणी भिसे	UO	T.S.C.New Delhi
2000-01	विकास कदम	C.S.U.O.	R.D.New Delhi
2001-02	उमाकांत वाघमारे	C.S.U.O.	T.S.C.New Delhi
2001-02	कु.सविता लोकरे	UO	T.S.C.New Delhi
2001-02	कु.शिवांगी दबडे	C.S.U.O.	T.S.C.New Delhi
2002-03	किरण अटकरे	C.S.U.O.	T.S.C.New Delhi
2002-03	प्रविण शिंदे	C.S.U.O.	T.S.C.New Delhi
2004-05	प्रताप शिंदे	C.S.U.O.	T.S.C.New Delhi
2004-05	विजय रैनाक	C.S.U.O.	R.D.New Delhi

सुवर्ण महोत्सवी वर्षातील थोर देणगीदार

- ❖ अर्बन बँक ग्रुप, कराड
- ❖ माजी विद्यार्थी संघ, स.गा.म.कराड.
- ❖ प्राचार्य अरूण बर्गे
- ❖ प्राचार्य ई.जी.निकम.
- ❖ ग्रामपंचायत सैदापूर
- ❖ मा. विठ्ठलराव जाधव
- ❖ ॲड. रविंद्र पवार
- ❖ प्रा.के.एल्.सावंत
- ❖ सौ.स्नेहा सुनिल कुलकर्णी
- ❖ डॉ.एस्.ए.पाटील.
- ❖ श्री.महादेव खाशाबा जाधव
- ❖ श्री.भानुदास मोहिते
- ❖ अकबर पटेल, कराड.
- ❖ जनता को-ऑपरेटिव्ह बँक, कराड.

❖ स्थानिक व्यवस्थापन समिती सदस्य ❖

Rayat Shikshan Sanstha's

SADGURU GADAGE MAHARAJ COLLEGE, KARAD.

STAFF-LIST-2003-2004

SENIOR COLLEGE

Prin.Barge A.E.
Shri. Patil N.D.
Shri. Jagtap S.M.
Shri. Gadhe P.B.
Shri. Jadhav S.T.
Shri. Nikam V.K.
Dr. Mirajkar P.B.
Dr. Mane P.S.
Shri. Jadhav R.M.
Shri. Jadhav S.M.
Shri. Nangare K.B.
Shri. Jadhav V.B.
Shri. Kapase D.D.
Shri. Ghorpade D.V.
Shri. Dange P.R.
Dr. Jagadale A.B.
Sou. Shinde I.S.
Shri. Kadam M.G.
Shri. Awasare V.D.
Sou. Pawar M.S.
Shri. Mohite S.L.
Shri. Mokashi A.R.
Shri. Kishore M.E.
Shri. Patil V.J.
Dr. Patil R.N.
Shri. Jadhav P.A.
Shri. Rajmane R.P.
Shri. Gune P.R.
Shri. Thorat D.S.
Dr. Patil M.M.
Shri. Patil H.D.
Shri. Jadhav V.T.
Dr. Thorat S.P.
Shri. Gadde R.P.
Shri. Madane S.S.
Dr. Patil B.J.
Shri. Mohite B.D.
Shri. Kale B.J.
Dr. Pawar S.T.
Shri. Ingole R.B.
Sou. Madanaik U.S.
Dr. Kambale A.B.
Dr. Salunkhe P.S.
Dr. Pandit N.S.
Shri. Jagtap R.V.
Shri. Junnarkar S.S.
Shri. Yadav A.N.
Sou. Rainak S.D.
Shri. Deshmukh R.S.
Sou. Kishore M.V.
Shri. Dixit D.R.
Shri. Mane S.G.
Shri. Kalekar K.S.
Shri. Thorat V.S.
Shri. Patil S.B.
Dr. Killedar V.V.
Shri. Kadam S.A.
Dr. Sou. Mote M.R.
Sou. Chavan V.R.
Sou. Nikam S.E.
Shri. Sakate M.D.
Shri. Awate P.N.
Shri. Chougule P.S.
Shri. Patil R.B.
Shri. Sanadi D.M.
Sou. Salunkhe A.S.
Shri. Pondhe M.S.
Shri. Kalyanshetti G.B.
Shri. Bagawade S.S.
Shri. Bhosale S.N.
Shri. Rainak D.B.
Shri. Sawant K.L.
Smt. Narute S.B.
Shri. Shinde S.D.
Smt. Jadhav V.K.
Kum. Atttar M.N.
Smt. Jagadale S.G.

Changes in Staff During the year 2004-05

Dr. Shinde S.B.
Shri. Desai S.B.
Shri. Todkar S.M.
Shri. Kadam S.A.
Dr. Nikam S.V.
Shri. Ghorpade V.M.
Shri. Pol H.S.
Dr. Patil B.D.

JUNIOR COLLEGE

Shri. Nalawade D.D.
Shri. Panaskar S.B.
Shri. Pandit R.S.
Shri. Shinde U.N.
Shri. Londhe B.D.
Shri. Kulkarni V.B.
Shri. Dhabu S.B.
Shri. Nadaf S.A.
Sou. Kharade B.N.
Sou. Patil V.M.
Sou. Patil L.B.
Shri. Chorage T.B.
Sou. Bhosale K.S.
Shri. Bhosale P.Y.
Shri. Rokade J.S.
Shri. Dharme D.N.
Sou. Patil A.S
Shri. Shewale S.B.
Shri. Patil M.D.
Shri. Patil S.M.
Shri. Kshirsagar H.V.
Shri. Kale V.C.
Shri. Bhosale S.D.
Shri.Waghmare U.S.
Sou. Kulkarni V.V.
Sou. Patil A.V.
Shri. Bhivare P.P.
Sou. Ghorpade S.D.
Shri. Mohite B.R.
Shri. Mahadik A.V.
Shri. Mule V.M.
Smt. Patil P.K.
Shri. Thorat P.S.
Shri. Pawar R.T.
Shri. Patil P.B.
Sou. Jagadale U.V.
Sou. Patil J.S.
Shri. Bharati B.R.
Shri. Kodgule P.D.
Shri. Kale J.P.
Sou. Thorat V.S.
Smt. Honrav S.V.
Sou. Patil A.A.
Smt. Jagtap S.M.
Shri. Shinde R.A.
Shri. Gujar J.K.
Sou. Mohite S.S.
Shri. Tadakhe R.A.
Shri. Bodake N.S.
Smt. Shaikh P.B.

Changes in Staff During the year 2004-05

Shri. Phalke G.K.
Shri. Patil A.S.
Shri. Mohite V.S.
Shri. Kumbhar S.R.

COMPUTER SCIENCE DEPARTMENT

Head of Department :
Shri. Deshmukh R.S.

FACULTY :

1. Shri. Ghare P.B.
2. Shri. Dhumal S.U.
3. Shri. Bhosale M.R.
4. Miss. Mane M.V.
5. Miss. Jadhav S.R.
6. Miss. Lokare P.M.
7. Miss. Jadhav M.T.
8. Miss. Shinde S.S.

Non-Teaching :

1. Shri. Pawar A.K.

MINIMUM COMPETENCY VOCATIONAL COURSE

Shri. Mohite D. D.
Shri. Patil B. H.
Shri. Shinde M. R.
Shri. Kamble N. V.
Shri. Pawar A. S.
Shri. Sathe P. B.
Shri. Pawar H. B.
Shri. Bankar D. L.
Shri. Kumbhar M. A.
Shri. Patil A. R.
Shri. Patil D. V.
Mrs. Yadav S. R.
Miss Shinde S. S.

Non-Teaching :
Shri. Patil S. R.
Shri. Gajare A. P.

ADMINISTRATIVE STAFF

Shri. Phase A.M.
Shri. Jadhav S.R.
Shri. Dhumal J.A.
Shri. Bhoj V.D.
Shri. Kumbhar S.M.
Shri. Sutar S.K.
Shri. Wagh B.M.
Shri. Patil B.V.
Shri. Lomate L.A.
Shri. Patil A.S.
Shri. Pawar B.A.
Shri. Patil Arjun S.
Shri. Kedar A.G.
Shri. Thorat S.B.
Shri. Garud R.T.
Shri. Jadhav M.K.
Shri. Pawar K.S.
Shri. Pawar A.N.
Shri. Jadhav S.V.
Shri. Mali K.B.
Shri. Pawar L.K.
Shri. Sutar K.R.
Shri. Kadam R.Y.
Shri. Koli P.S.
Shri. Pawar B.S.
Shri. Jadhav A.G.
Shri. Shitole G.P.
Shri. Pawar V.S.
Shri. Yadav A.R.
Shri. Patil S.K.
Shri. Salunkhe R.G.
Shri. Shedage P.B.
Shri. Mane R.C.
Shri. Awaghade S.B.
Shri. Sasane A.L.
Shri. Jaigade S.S.
Shri. Budhe A.V.
Shri. Mohite L.N.
Shri. Yedage S.N.
Shri. Kumbhar S.B.
Shri. Gavali G.M.
Shri. Chavan V.B.
Shri. Patil B.N.
Shri. Inamdar P.V.
Shri. Jadhav A.K.
Shri. Patil B.R.
Shri. Kambale R.B.
Shri. Chavan Y.K.
Shri. Jamale M.D.
Shri. Gurkha K.M.
Shri. Dhumal D.M.
Shri. Magare U.H.
Shri. Mule V.M
Shri. Kharat S.D.
Shri. Jadhav H.K.
Shri. Bagawan K.A.
Shri. Patil T.B.
Shri. Mali S.Y.
Shri. Patil D.S.
Shri. Patil N.N.
Shri. Chavan K.D.
Shri. Patil A.G.
Shri. Kambale A.S.
Shri. Yadav M.R.
Shri.Bhingardeve V.M.
Smt. Hasabe P.S.
Shri. Yadav R.D.

Changes in the Administrative Staff During the year 2004-05

Shri. Deshmukh S.N.
Shri. Desai R.K.
Shri. Mechkar R.M.
Miss. Ladake K.V.
Shri. Jadhav V.D.
Shri. Kakade R.M.
Shri. Sawant D.L.
Shri. Patil K.G.
Shri. Thorat V.K.
Shri. Khatavkar C.R.
Shri. Ingawale M.A.

सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज यांच्या सुवर्ण महोत्सव वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा

सुवर्ण अलंकाराच्या खरेदीचं कराड शहरातील विश्वासार्ह ठिकाण.....

संघवी ज्वेलर्स

९९, बुधवार पेठ, शिवाजी क्लॉथ मार्केटसमोर, कराड, फोन : २७०२७

प्रोप्रा. : श्रेणिक संघवी

सैनिक सहकारी बँक लि., सातारा

❖ संस्थापक अध्यक्ष ❖

कै.कर्नल आर.डी. निकम

मातृभुमीचे रक्षणकर्त्या सैनिकांनी संस्थापित केलेली एकमेव बँक

मुख्यालय : छ.शिवाजी महाराज सर्कल, पोवईनाका, सातारा : ४१५ ००१.

धनसंगोपन आणि संवर्धन यासाठी २० वर्षाहून अधिक काळ आता १५ संगणकीकृत कार्यालयाद्वारे कार्यरत.

❖ आपणा सर्वांसाठी ❖

कॅप्टन यु.आर. निकम ..... अध्यक्ष
सुभे. एच. बी. शिंदे ..... उपाध्यक्ष
श्री.आर.एल.मुंढे ..... महाव्यवस्थापक

॥ श्री वाघेश्वरीदेवी प्रसन्न ॥

फोन : दु.२३००८३, घर : २२७०३५
मोबाईल : ९४२६००२३५

नटराज मंडप डेकोरेटर्स

लग्न समारंभ व इतर कार्यक्रमासाठी लागणारे सर्व साहित्य योग्य दरात भाड्याने मिळतील.

२४१, शनिवार पेठ, मेनरोड, कराड.

प्रोप्रा. : दत्तात्रय विट्ठल करपे

हार्दीक शुभेच्छा.... !

ओंकार गारमेंटस्

आमचेकडे सर्वप्रकारचे रेडीमेड कपडे व होजिअरी मिळेल

डे-नाईट केमिस्टसमोर, मेनरोड, कराड

प्रोप्रा. : वादवणे

दानशूर मुकादम तात्या व एस्. जी. एम्. कॉलेज

श्री.अशोक यादव

''एक दिवस असा येतो सारा मोहरा फिरून जातो''

असाच एक दिवस कै. बंडो गोपाळा मुकादम यांच्या जीवनात आला. संत गाडगे महाराजांचे कीर्तन पंढरपूर येथे ऐकले आणि मुकादम तात्यांचे जीवनच बदलून गेले. गाडगेबाबांच्या परिसस्पर्शाने तात्यांचे अवघे जीवनच झळाळून निघाले. त्यांचे पूर्ण नाव होते बंडो गोपाळा कदम. पण मुंबईला मुकादमाचे काम केल्याने कदम नावाचे रूपांतर मुकादम असे झाले. १९०१ मध्ये कुसूर येथे अतिशय गरीब कुटूंबात त्यांचा जन्म झाला. आर्थिक परिस्थिती तशी बेताचीच. अवघ्या तीन रूपये आकाराची शेती होती. वडील मुंबईला किरकोळ स्वरूपाचा व्यवसाय करीत होते. लहानपणी ते अत्यंत खोडकर व त्यातून मुलांशी मनसोक्त भांडणे. याचा परिणाम असा झाला की सरस्वती देवी त्यांच्यावर चौथीपर्यंत प्रसन्न झाली. वयाच्या २० व्या वर्षीच त्यांना मुंबई गाठावी लागली. डोक्यावर पाटी घेवून बोजा वाहणे, माल वाहणे, हातगाडी ओढणे, कपड्यांचे काजे करणे इ. कामे खंत न बाळगता केली. वडीलांच्या कामाचा बारकाईने अभ्यास करून ते कामावर देखरेख करू लागले. हळूहळू व्यवसायाचा बराच विस्तार झाला. मोठ्या प्रमाणावर पैसा मिळू लागला. त्यातून कामगारांच्या संगतीने व्यसने आली. मनाला शांती भेटावी म्हणून व्यसनाधिन झालेल्या मुकादमांच्या मनाला ह्याने स्थैर्य मिळाले नाही. त्यांना जीवन अर्थशून्य वाटू लागले व जीवनातील सुख शोधण्यासाठी पंढरपूरची वारी ते करू लागले.

अध्यात्मिक राजधानी असलेल्या पंढरपूर तीर्थक्षेत्री तात्यांनी सद्गुरू गाडगे महाराजांचे कीर्तन ऐकले त्यांच्या विचारांचा मुकादमांच्या मनावर खोलवर परिणाम झाला व आयुष्याचा भावीकाळ देवभक्तीत व्यतित करण्याचा त्यांनी निर्धार केला. त्यांनी गाडगे महाराजांचे शिष्यत्व पत्करले. त्यांच्यामुळेच तात्यांची पांडुरंगावरील भक्ती कलेकलेने वाढू लागली. त्यातूनच कुसूर येथे हजारो रूपये खर्चून विठ्ठल मंदिर बांधले व उद्घाटनासाठी संत गाडगेबाबांना कुसूर येथे बोलावले. याच काळात सातारा व सांगली जिल्ह्यात कर्मवीर अण्णांचे शैक्षणिक कार्य जोरात सुरू होते. त्या कार्याला लोकांची मने जिंकलेल्या कर्मवीरांना, जनता सढळ हाताने मदत करीत होती. याच जनता जनार्दनाने तात्यांना सांगितले की, ''ही देव मंदिरे बांधण्यापेक्षा ज्ञानमंदीरे बांधणे अधिक चांगले. या ज्ञानमंदीराची जनतेला अधिक गरज आहे. तेव्हा आपण कर्मवीर अण्णांना बोलावून घेवून कुसूर येथे इंग्रजी शाळा सुरू करूया.'' मुकादम तात्यांना ही गोष्ट मनोमन पटली. त्यांनी कर्मवीर भाऊरावांना कुसूर येथे उद्घाटन सोहळ्यासाठी बोलावले. संत गाडगे महाराजांचे कीर्तन व कर्मवीर अण्णांचे भाषण असा दुग्धशर्करायोग कुसूरकरांच्या व पंचक्रोशीतील जनतेच्या जीवनात केवळ मुकादम तात्यांमुळेच येऊ शकला. तेव्हा संत गाडगे महाराज तात्यांना म्हणाले, ''भाऊरावांचे कार्य थोर आहे. आपण त्यांच्या कार्याला आपल्यापरीने मदत करा. आपणास मनःशांती मिळेल.'' असे तात्या कर्मवीर अण्णांच्या कार्यात संत गाडगे महाराजांच्या अमृतवाणीनेच रममाण झाले. कर्मवीर अण्णांच्या शैक्षणिक सेतूबंधाच्या महान कार्यात आपल्या कुवतीनुसार खारीचा वाटा उचलणाऱ्या, शेकडो अनुयायांपैकी मुकादम तात्या महान अनुयायी होते.

त्यावेळी प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाने गरिबांची गरज भागली पण ती तात्या एवढ्यावरच थांबले नाहीत. महाविद्यालयीन शिक्षणाची सोय झाली पाहिजे या विचारांची चक्रे फिरू लागली. सैदापूरच्या माळावर महाविद्यालय सुरू करण्याचे ठरले. अण्णासाहेब सिंहासने यांच्या सौजन्याने जमीन मिळवली. स्व.बाबुराव सणस यांनीही याकामी खूप मदत केली. १९५४ मध्ये मुकादम तात्यांच्या सढळ मदतीने व कर्मवीर अण्णांच्या भगिरथ प्रयत्नाने कृष्णा कोयनेच्या पवित्र संगमाच्या ठिकाणी स.गा.म. महाविद्यालयाची मुहूर्तमेढ रोवली गेली. उत्तर बाजूच्या उद्यमनगरीच्या परिसरात, सद्गुरू गाडगे महाराज यांच्या पदस्पर्शाने पुनित झालेल्या भूमित, कर्मयोग्यांच्या विचाराचा व भरघोस दानातून हे महाविद्यालय ५० वर्षापूर्वी सुरू झाले. तेव्हा कर्मवीर अण्णा मुकादम तात्यांना म्हणाले, 'मुकादम, गाडगे महाराजांच्या नावाने हे कॉलेज काढीत आहे, तुम्ही एक लाख रूपयांची देणगी दिली पाहिजे' तेव्हा तात्या त्यांना हसून म्हणाले, 'घ्या आम्ही एक लाख रूपये देतो' अशा स.गा.म.कॉलेजच्या उभारणीस दानशूर बंडो गोपाळा मुकादमांचे योगदान फार मोठे आहे.

खेड्यापाड्यातील मुलींना शिक्षण फारसे मिळत नव्हते. शालान्त परीक्षेपर्यंत सोय असलेल्या ठिकाणच्या मुली तिथपर्यंत कसेबसे शिक्षण घेत पण महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी मुलींची शहरात राहण्याची सुरक्षित सोय होत नसे. म्हणून अंगी कर्तृत्व व बुद्धिमत्ता असूनही महाविद्यालयीन शिक्षणापासून मुली वंचित राहत असे ही अडचण दूर करण्यासाठी कुसूर येथे १९७१ ला मध्यविभागाचे शिबीर भरले होते तेथेच त्यांनी कराड येथे स.गा.म.कॉलेजमधील मुलींची वसतिगृहाची अडचण दूर करण्यासाठी १०,००० रू.ची देणगी जाहीर केली व त्याचा भूमिपूजनाचा समारंभ मा.प्रा.सौ.सुमतीबाई पाटील यांच्या हस्ते बालप्रतिपदेच्या शुभदिनी संपन्न झाला. इमारतीचे काम प्रत्यक्ष सुरू झाल्यावर अगोदरच सढळ असलेला आपला हात आणखी सढळ केला. यातून ति.तात्यांचा ''बोले उससे जादा चाले'' या स्वभावाचेच दर्शन घडले. स्वत:च्या देखरेखीतून त्यांनी इमारत पूर्णत्वास नेली. १९७२ मध्ये कॉलेजमधील मुलींसाठी १६ खोल्यांची वसतिगृहाची इमारत सज्ज झाली. आणि आश्वासन दिले की, 'या वसतिगृहात जशी गरज भासेल तशा अधिक सोयी उपलब्ध करून देण्याचा प्रयास करीन' असा 'दाता भवति वा न वा' या वसतिगृहास त्यांनी सौ. सुमतिबाई पांडूरंग पाटील वसतिगृह असे नाव देऊन स्त्री शिक्षिकेचा व स्त्री शिक्षणाच्या चळवळीचा खऱ्या अर्थाने पुरस्कार व गौरव केला. या वसतिगृहास स्वत:च्या पत्नीचे नाव देण्याचा विचार देखील त्यांच्या मनाला शिवला नाही. त्यागाचे, कृतिशिलतेचे मूर्तीमंत उदाहरण यापेक्षा वेगळे कोणते असू शकेल ?

आयुष्याच्या उत्तरार्धात त्यांनी स्वत:जवळ असलेले सर्व मुक्तहस्ताने विठामाना कन्याशाळा, कराड, ढेबेवाडी येथील न्यू इंग्लिश स्कूल, कुरूसुंड येथील नामदार बाळासाहेब देसाई विद्यालय, चाफळ येथील विद्यालय, सातारचे कायदा महाविद्यालय ही सर्व मुकादम तात्यांच्या सार्वजनिक दानाची चालती बोलती उदाहरणे होत. 'नेत्र लागले रे पैलतिरी' अशी जाणीव तीव्रतेने होत असतानाच्या काळात त्यांनी आपली इच्छाव्यक्त केली होती. 'मी कॉलेजवर एक बंगला बांधणार व तेथेच मरेपर्यंत राहणार' संत गाडगेमहाराजांच्या नावाने सुरू केलेल्या कॉलेजची भरभराट झाली पाहिजे ही एकच आज मुकादम तात्यांच्या मनाला लागून राहिली होती. आज महाविद्यालयाने सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण केले आहे. शैक्षणिक, क्रीडा, एन्.एस.एस., एन्.सी.सी सांस्कृतिक अशा सर्वच क्षेत्रात केलेली नेत्रदीपक प्रगती पाहून खरोखरच तात्यांचा आत्मा कृतकृत्य झाला असेल.

✦ ✦ ✦ ✦

महाराष्ट्रातील लाखो विद्यार्थ्यांनी
अनुभवलेला मंत्रसिध्द मार्ग

दहाड पॅटर्न
स्व-अध्ययन माला

राज्यातील सर्वोत्कृष्ट तज्ज्ञांनी घडविलेली....
केवळ घोकंपट्टीवर भर न देता
पाठ्यपुस्तकांतून अभ्यासाला गवसणी घालणारी,
पठ्यत वाचन नव्हेतर लेखन कला विकसीत करणारी...
लिहितांना होणाऱ्या चुकांची दुरुस्ती करणारी...
आदर्श उत्तरे कशी असावीत हे सांगणारी....
पहिल्यापासून नियमित अभ्यास घडविणारी....
अपरिचित शिक्षकांकडून पेपर्स तपासणी देणारी....
मार्च २००४ परीक्षेत २०५ विद्यार्थ्यांना गुणवतायादीत नेणारी...
विद्येचे माहेरघर पुण्यात जन्मलेली, रुजलेली, वाढलेली
एकमेव दहाड स्व-अध्ययन माला...

ऑथोराईज्ड डीलर्स

ज्ञानदा ॲकॅडमी
जी-१, सुवर्णलाक्षा,
४५३ शनिवारपेठ, कराड
फोन: (ऑ) २२१२४०,
(नि.) २२६३८२
मोबाईल: ९८२२९७८४९०

आपल्या कराड शहरात प्रथमच भव्य शोरुम
१ ग्रॅम व २ ग्रॅम चोख २४ कॅरेट
सोन्याचे दागिने

देवदास सेट ज्वेलरी
कुन्दन ज्वेलरी
पोलकी ज्वेलरी

मंगळसूत्र, चेन,
ब्रेसलेट, पाटल्या,
तोडा, फॅन्सी बांगड्या,
राणी हार, लक्ष्मी हार
इ. व अनेक
व्हरायटीजच्या ज्वेलरी

रडीयम मीना ज्वेलरी
दुल्हन सेट
ॲन्टीक ज्वेलरी
अमेरीकन डायमंड ज्वेलरी

मुजावर गोल्ड
जुम्मा मस्जीद, मिनार मार्केट, गाळा नं.२,
चांदनी चौक, कराड. मो.९८९००९४४४०

''कराडचा ऐतिहासिक वारसा''

प्रा.दिनकर शंकर थोरात
इतिहास विभाग, स.गा.म.कॉलेज, कराड.

प्राचीन काळापासून कराड सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक व राजकीय क्षेत्रात काळाबरोबर बदलत, विकसत व प्रगत होत गेले आहे. पश्चिम महाराष्ट्रात सर्वात पुरातन व प्राचीन अवशेष मिळणारी ठिकाणे फारच थोडी आहेत. त्यातील कराड हे एक महत्त्वाचे ठिकाण. येथे महाभारत काळ, बौद्ध, सातवाहन काळापासूनचे ऐतिहासिक संदर्भ मिळतात. नंतरच्या वाकाटक (भोज) राष्ट्रकुट, चालुक्य व शिलाहार राजवटीचे संदर्भही येतात. यावरून कराडचे प्राचीनत्व स्पष्ट होते. प्राचीन काळापासून अर्वाचिन काळापर्यंत येथे घडलेल्या सर्वांगीण इतिहासाचा आढावा एका लेखात घेणे हे काम म्हणजे स्वतंत्र ग्रंथ व प्रबंधाचेच होय. आधुनिक इतिहासाच्या संकल्पनेनुसार हे सर्व इतिहासात यावे. असे असले तरी प्रसंग व परिस्थितीनुरूप या लेखात कराडच्या राजकीय इतिहासाचा संक्षिप्त स्वरूपात घेतलेला हा एक मागोवा आहे.

कराडचा भूगोल :

सह्याद्री पर्वतात महाबळेश्वर येथे उगम पावलेल्या व त्याच्या पश्चिम पुर्व पसरलेल्या वेड्या वाकड्या पर्वत रांगातून अवखळपणे आपला मार्ग शोधत सागराकडे निघालेल्या कृष्णा कोयना या नद्या जेथे अभिनव पद्धतीने एकमेकींना भेटतात, एकजीव व एकरूप होतात, तेथेच त्यांच्या संगमावर कराड शहर वसले आहे. कराड हे पश्चिम महाराष्ट्रातील, सातारा जिल्ह्यातील महत्त्वाचे व प्रमुख असे तालुक्याचे गाव. सर्व महाराष्ट्रात क्षेत्रफळ, लोकसंख्या, व महसूल या क्षेत्रात सर्वात मोठा तालुका कराड हे १७.१७ उ.अक्षवृत्त व ७४.१३ पूर्व रेखावृत्तावर आहे. कृष्णा कोयनेचा येथे जसा अभिनव संगम तसा दोन महामार्गाचा काटकोनात होणारा छेद कराड येथेच होतो. उत्तर-दक्षिण जाणारा पुणे-बंगळूर राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ व पुर्व-पश्चिम जाणारा विजापुर-चिपळूण-गुहागर हा राजमार्ग हे दोन्ही राजमार्ग कराड मधूनच जातात. तर मुंबई-हैद्राबाद हा रेल्वेमार्ग कराड मधून कृष्णा नदीला उजवीकडे ठेवून मार्गस्थ होतो. कराडला पर्वत राजींचे नैसर्गीक संरक्षण लाभले आहे. कराडच्या ईशान्येला सदाशिव गड, वायव्येला वसंतगड, आग्नेयेस मच्छिंद्रगड हे छ. शिवाजी महाराजांनी वसवलेले किल्ले तर नैऋत्येस आगाशिवाचा डोंगर. वरील सर्व नैसर्गिक अनुकूल परिस्थितीमुळे कराड प्राचीन काळापासून आजपर्यंत सर्वच क्षेत्रात प्रगतिशील, परिवर्तनशील व गतिशील राहिले आहे.

प्राचीन काल

कराडच्या प्राचीनत्वाचा सर्वात जुना लेखी पुरावा म्हणजे महाभारत या ग्रंथात आलेला कराडचा उल्लेख. या उल्लेखानुसार कराड हे युधिष्ठीराच्या 'राजसूय' यज्ञाच्या वेळी दक्षिण दिग्विजयात सहदेवाने जिंकलेले एक नगर होते. 'महाभारत सभापर्व ३१.७० या श्लोकाचा अर्थ' त्या बुद्धीमान सहदेवाने तिमिगंल राजास वश करून एकपाद करेल वनवासी लोक राहत असलेली नगरी की ज्यात पाखंडवादी लोक आहेत असे. करहाटक (कऱ्हाड) आपल्या दुताकडून ताब्यात आणीली व त्याजकडून कर वसूल केला.''

आज आपण ज्याला कराड म्हणतो त्याचा उल्लेख वरील श्लोकात करहाटकम् असा आला आहे. कराडला अनेक पौराणिक संदर्भ लाभले आहेत. कऱ्हाडे ब्राह्मणांचे मूळ स्थान या क्षेत्रात होते असे सह्याद्री खंडात म्हटले आहे. कराड या स्थानाच्या नावाबाबत प्राचीन व मध्ययुगीन ग्रंथ, शिलालेख, ताम्रपट, सनदा, करीने, महजर, यात वारंवार भिन्नभिन्न उल्लेख येतात. हे उल्लेख करहाटकम्, करहाटक, करहटक, करहाडक, करहाड कऱ्हाड या नावाचे मिळतात. करहाटक ते कऱ्हाड कसे झाले या संवधीची संभाव्यता मानणारे अनेक मतप्रवाह व उत्पत्ती संदर्भ आहेत. ते फार मजेशीर व मनोरंजक आहेत. काही थोडे पटणारे तर काही ओढून ताणून लावलेले आहेत. असे असले तरी कऱ्हाड व आसपासच्या परिसरातील गावे यांचा विचार करता भौगोलिक, समाजशास्त्रीय व भाषाशास्त्रीय संदर्भ शोधणे हे त्या त्या क्षेत्रातील विद्वानांना व अभ्यासुंना विचारप्रवण तसेच चिंतनशील बनवणारे

आहे. कराडच्या आसपास कारवे, कोरेगाव, करवडी, कोपरडे, कोरटी, किरपे, व कुरले, कुसूर, कुठरे ही 'क' व '२' व्यंजने असणारी गावे तर कापील, कोडोली, काले, कालवडे, कोळे, किवळ, काळगाव, ही 'क' व 'ल' व्यंजने असणारी गावे आहेत. कराड व वरील गावांच्या नावाचा काही सहसंबध असावा का ? असेल तर तो काय ? व कसा ? व त्यांचा संदर्भ काय ? या सर्वामागील सूत्र कोणते ? ही नावे अशीच का ? इतिहासाला माहीत नाही म्हणून या मागे काहीच सूत्र नाही का ? इ. प्रश्न मनामध्ये निर्माण झाल्याशिवाय राहत नाहीत. असो.

प्राचीन काळात या परीसरावर राज्य केलेल्या ज्ञात राजवटीमध्ये राष्ट्रीक-रट्टीक व मौर्य घराण्याची राज्ये असावीत असे म्हटले जाते. पण त्या संदर्भात स्पष्ट असे ऐतिहासिक पुरावे नाहीत.

१) सातवाहन :

कराडवर सातवाहनाची सत्ता होती. त्यांचा काळ इ.स.पू.दुसरे ते इ.स.नंतर दुसरे शतक हा होय. सातवानांचा काळ हा दक्षिण भारताच्या इतिहासात सुवर्ण काळ. याच काळात कराड जवळील आगाशिव डोंगरात हिनयान पंथीय बौद्ध लेणी खोदली असे मानले जाते. पेरीप्लसच्या ग्रंथातील माहीती वरून सागरी मार्गाने पाश्चात्य देशांशी सातवाहनाचे व्यापारी संबंध प्रस्थापित झाले होते. भडोच, कल्याण, सोपारा, दाभोळ, या बंदरातून हा व्यापार चालत असे. ही बंदरे खुश्कीच्या मार्गाने वेण्णा, तेर, करहाड (कराड), कोल्हापूर, नाशिक इ. व्यापारी पेठांशी जोडली होती. मिश्र (इजिप्त), रोम (इटली) व ग्रीस या देशांशी व्यापार चालत होता. याला पुष्टी देणारा पुरावा आपणास कराडच्या पंताच्या कोट परीसरात झालेल्या उत्खननावरून मिळतो. १९४८-४९ मध्ये पुण्याच्या भारत इतिहास संशोधन मंडळाने येथे उत्खनन केले त्यात सातवाहनपूर्व व सातवाहनकालीन अवशेष मिळालेले आहेत. त्यात कौले, अलंकारासाठी वापरले जाणारे विविध आकाराचे मणी, गोमेद, स्फटीक, रेड जासपर, शंख, हस्तीदंत, हाडे, खापरे, बांगड्या, हत्यारे, सातवाहन कालीन नाणी, रोमन बनावटीची पदके इ. वस्तू मिळाल्या. यावरून सातवाहन काळात कराडचा रोमशी व्यापारी संबंध असल्याचे स्पष्ट होते. याला पुष्टी देणारा दुसरा पुरावा म्हणजे कोल्हापूरला झालेल्या उत्खननात रोमन बनावटीची पदके व नाणी मिळाली. म्हणजेच कोल्हापूर व कराड यांचा रोमशी असलेला व्यापारी संबंध स्पष्ट होतो. याच काळात मध्य प्रदेशातील भारहुत स्तुपाच्या वेदिकेवरील शिला लेखात वेदिकेच्या उभारणीसाठी दान देणाऱ्या दात्यांपैकी काही दाते कराडचे होते. असा उल्लेख मिळतो.

२) क्षत्रप :

सातवहानानंतर होऊन गेलेल्या क्षत्रपांची नाणी कराड व कराडजवळील गोवारे येथे सापडली आहेत. इ.स.नंतर चे तिसरे शतक

३) चालुक्य :

वदामीच्या चालुक्याच्या काळात कराहाटक हे विषयाचे (जिल्ह्याचे) स्थान होते. असा चालुक्य राजा विजयादित्य याच्या पाली ताम्रपटात उल्लेख आहे. या विजयादित्याची पत्नी कराडची राजकन्या होती. चालुक्य राजा जनमेजय याच्या चिकुरडे शके १०७६ (इ.स.११५४) च्या ताम्रपटात जनमेजयाने करहाटक येथील तळावरून बलियवाड (बेलवडे) व चिखलवाड (चिखली) या गावांची जमिन मुक्त करून ती राम गावुंडा यास दिल्याची नोंद आहे. तर माधव वर्मा राजाच्या ताम्रपटात रेट्टरक (रेठरे), बेलवाटीका (बेलवडे) कोलिकावारीका (कोळे, काले) वट्टरिका (वाठार) इ. चा उल्लेख येतो.

४) राष्ट्रकुट :

राष्ट्रकुट राजा कृष्ण तिसरा याच्या संवत ८८० च्या लेखात करहाटक विषयातील (जिल्ह्यातील) स्थानांची, गावांची नोंद आहे. नदी कन्हवन्ना(कृष्णा वेण्णा), काकेम (कोळे), कल्ही (काले) कराडच्या नैऋत्येस असलेले ओढम (ओंड) यांचा उल्लेख होतो.

५) शिलाहार :

इ.स.१० व्या व ११ व्या शतकात कराड कोल्हापूर प्रदेशावर शिलाहारांचे राज्य होते. पश्चिम महाराष्ट्रातील दगडी व भक्कम किल्ल्यांची निर्मिती शिलाहार काळात झाली असे मानले जाते. कराड मधील प्रितीसंगमावरील भुईकोट किल्ला त्यांनीच बांधला असावा. मरसिंह राजाच्या मिरज ताम्रपटात २४ डिसेंबर १०५८ त्याचे राज्य करहाटक व कुंडी विषयात असल्याचा उल्लेख आहे. काश्मीरी कवि व पंडीत बिल्हन याने लिहिलेल्या 'विक्रमांक देवचरित' या ग्रंथात करहाटक पतीची मुलगी चंद्रलेखा हिचा विवाह राजा विक्रमादित्य सहावा याच्या बरोबर करहाटक येथे झाला. याचे रसभरीत वर्णन केले आहे. राजा मोठा, लवाजमा मोठा, विवाह मोठा व लग्नाचे स्थळ त्या सर्वांना शोभणारे मोठे यावरून कराड त्याकाळी वैभवशाली, संपन्न, महत्त्वाचे व भरभराटीचे शहर असावे असे स्पष्ट होते. हे शिलाहार राजे नंतरच्या काळात देवगिरीच्या यादवांचे मांडलिक झाले असावे. वरील विविध राजवटीमध्ये कराडच्या आलेल्या उल्लेखांवरून त्याचे प्राचीनत्व व संपन्नत्व स्पष्ट होते.

'कराडच्या प्राचीनत्वाचा व कराडमध्ये होत गेलेल्या बदलांचा भौगोलीक व समाजशास्त्रीय अभ्यास फारसा झालेला नाही. परंतु त्या संदर्भात पुरातन कराड, मूळ कराड व कोयना नदीचा पुरातन प्रवाह याविषयी भौगोलिक व समाजशास्त्रीय दृष्टीने काही मते मांडलेली आहेत तर काही मांडता येतील त्या संबंधी सारांश रूपाने थोडेसे.'

सध्याचा कृष्णा कोयनेचा प्रितीसंगम हा मानव निर्मित आहे. कोयनेस डावीकडे - उत्तरेकडे वळवून कृष्णेस मिळवलेली आहे. मग, पुर्वीचा कोयनेचा मूळ प्रवाह कोठून जात असावा ? पाटण कॉलनी-तालुका न्यायालय, बुधवार पेठ ही उत्तर किनाऱ्याची बाजू तर दत्त मंदिर, बस स्थानक, कॉटेज हॉस्पिटल ही दक्षिण तीराची बाजू म्हणजेच कोयनेच्या जुन्या पुलापासून कोयना नदी वर सांगीतलेल्या मार्गाने सध्याच्या कृष्णा नदीच्या पुलाच्या पूर्वेस कोयना कृष्णेस मिळत असावी किंवा त्याच्याही पूर्व दिशेस मिळत असावी. कराडमधील भूपृष्ठाची ठेवण, उंच सखल भाग, उंचवटे यांचे निरिक्षण केल्यास वरील बाब लक्षात येते.

समाजशास्त्रीयदृष्ट्या कोणत्याही गावाची वसाहत होत असताना गावाच्या पुर्वेस दलित वस्त्या असत. त्याचप्रमाणे नदीच्या प्रवाहाच्या खालच्या बाजूस दलित वस्त्या असत. सध्याची बुधवार पेठेतील मूळ दलित वस्त्यांची ठिकाणे पाहील्यास या वस्त्या जून्या कोयनेच्या उत्तर तीरावर खालच्या बाजूस वसलेल्या आढळतात. तसेच पूर्वीच्या 'विरगळ' याच परिसरात मिळतात. ब्राह्मण वस्ती ही गावाच्या पश्चिमेस व नदीच्या प्रवाहाच्या वरच्या बाजूस असते. कराड येथे कृष्णेच्या तीरावरील सोमवार पेठ व त्याला लागून मूळ गावच्या पाटलांचे वस्तीचे ठिकाण हे कराडमध्ये हे स्पष्ट जाणवते.

कराडच्या बसस्थानकाच्या पलीकडे असणाऱ्या निमजग्याच्या माळावर जेथे सध्या कबरस्थान आहे. त्यावर महालक्ष्मीचे भव्य मंदिर होते (मंदिराचा चौथरा आज देखील पहावयास मिळतो. तो २२८ फुट लांब व ९० फुट रूंद आहे) त्या मंदिरावर उंच शिखर होते व त्या शिखराचे प्रतिबिंब कोयना नदीत पडत होते अशी माहिती परंपरेने दिली जाते, पण हे प्रतिबिंब आजच्या कोयनेच्या पात्रात पडणे कधीच शक्य नाही. पण वर कथन केलेल्या मूळ मार्गाने नदीचा प्रवाह जात असल्यास प्रतिबिंब कोयनेच्या पात्रात पडणे शक्य होते. अशा प्रकारे कोयना नदी मूळ कराड गावच्या दक्षिणेकडून वाहत असावी असा निष्कर्ष निघतो. आजचा संगमावर असलेला भुईकोट किल्ला मानव निर्मित आहे. तो बनवण्यासाठी तसेच त्याच्या सुरक्षीततेसाठी कोयनेचा मार्ग जाणीवपूर्वक उत्तरेकडे वळवलेला असावा तसेच भुईकोट किल्ल्यास खंदकाचीही सोय केली असावी. असा प्राथमिक स्वरूपाचा अंदाज वर्तवता येतो पण याचे अभ्यासूंनी व संशोधकांनी बारकाईने, सर्वांगाने संशोधन करणे गरजेचे आहे.

'कराडचा भुईकोट किल्ला, त्याचे बुरूज, त्यातील नकट्या रावळची प्रचंड विहिर, तिचे स्थापत्य, तिची खोली व भव्यता यावरून भुईकोट किल्ला व त्याचे महत्त्व स्पष्ट होते. मराठेशाहीत हा भुईकोट पंतप्रतिनिधीच्या जहागिरीचे मुख्य ठाणे होता. प्रतिनिधींचे निवासस्थान व जहागिरीच्या राज्य कारभाराच्या कचेऱ्या येथेच होत्या. त्यामुळे या भुईकोट किल्ल्यास पंताचा कोट म्हणू लागले.

कराडचे प्राचीनत्व सिद्ध करणारी अनेक शिवालये कराडमध्ये आहेत. काशीविश्वेश्वर, हाटकेश्वर (करहाटकेश्वर) रत्नेश्वर, रूद्धवेश्वर, संगमेश्वर, त्र्यंबकेश्वर, पावकेश्वर, कमळेश्वर इ. कराडच्या प्राचीनत्वाचा, वैभवाचा व समृद्धीचा वस्तूनिष्ठ पुरावा म्हणजे आगाशिवाच्या डोंगरात कोरलेली हिनयानपंथी बौद्ध धर्माची लेणी. या लेण्यांचा काळ इ.स.पू.२०० ते इ.स.२०० असा येतो. या लेण्या खोदण्याचे प्रचंड काम जवळजवळ ४०० वर्षे चालले होते. आज मितीस या डोंगरात ६४ लेणी असल्याची नोंद आहे. नवीन लेणी सापडत आहेत. या प्रचंड लेण्यांचे महाप्रचंड खोदकाम. त्यात काम करणारे कारागिर व कामगार व त्यांच्या उदरनिर्वाहाची सोय, त्यांच्या दैनंदिन गरजा या सर्वांची पूर्तता करण्याची क्षमता कराड गाव व त्या परिसरात होती म्हणूनच या लेण्यांचे खोदकाम शतकानुशतके चालल्याचे दिसते.

मध्ययुगीन काळ

दक्षिण हिंदुस्थानात महाराष्ट्रावर पहिले मुस्लीम आक्रमण दिल्लीचा सुलतान अल्लाउद्दीन खिलजीने इ.स.१२९६ मध्ये केले. त्याने देवगिरीच्या यादवांचा पराभव केला. या खिलजींचा सुभेदार हसनगंगू बहामनी याने दक्षिण हिंदुस्थानात इ.स.१३४७ मध्ये स्वतःचे राज्य निर्माण केले. ते राज्य साधारण १५० वर्षे टिकले. पुढे बहामनी राज्याची ५ शकले झाली. त्यातील निजाम व आदिलशाहीने महाराष्ट्रावर राज्य केले. इ.स.१६३६ मध्ये दिल्लीचे मुघल व आदिलशहा यांनी एकत्र येऊन निजामशाही नष्ट केली. आणि उत्तर महाराष्ट्रावर मुघलांचे तर दक्षिण महाराष्ट्रावर आदिलशहाचे राज्य प्रस्थापित झाले. याच आदिलशाही बरोबर शिवाजी महाराजांनी संघर्ष करून स्वराज्याची स्थापना केली. अशा प्रकारे मध्य युगात यादव, बहामनी, निजामशहा, आदिलशहा व मराठा या राजवटींनी कराड परिसरावर राज्य केले. वरील राजवटींचा ऐतिहासिक

वारसा, ऐतिहासिक कागदपत्रे, स्थळे व स्मारके यातून स्पष्ट होते. पंताच्या कोटातील नकट्या रावळची विहिर कराड वैभव असणारी गुरूवार पेठेतील जुम्मा मशिद त्यावरील १०५ फुट उंच मनोरे, गुरूवारातील दोन दर्गे, शनिवारातील दर्गा, मंगळवारातील करडे पिर, आणि निमजग्याच्या माळावरील कबरस्थानातील इदगाह ही स्थळे व स्मारके त्याचप्रमाणे अनेक उपलब्ध कागदपत्रे इस्लामी राजवटीचे साक्षीदार आहेत. गुरूवारातील जुम्मा मशिद व त्यावरील सुंदर मनोरे हे सुलतान अलिअदिलशहा पहिला (इ.स.१५५७ ते इ.स.१५८०) याच्या काळात बांधले गेले. इ.स.१५७३ ते इ.स.१५७६ या तीन वर्षात इब्राहिम खान याने हे मनोरे बांधून पूर्ण केले. असा मशिदितील शिलालेखात उल्लेख आहे. गुरूवारातील १ दर्गा अहमदनगरच्या चांदबिबिने बांधला असा संदर्भ मिळतो. कराडमधील इस्लामधर्मीय सर्वात पुरातन स्मारक म्हणजे मंगळवार पेठेतील करडेपिर याचा काळ इ.स.१२६२. मुस्लिम काळातील कागदपत्र कराडचा ''कल्हार'', ''कल्हाराबाद'' असा उल्लेख आढळतो. या काळात कराडची वतनदारी - देशमुखी एकाकडून दुसरीकडे सतत बदलत गेल्याची दिसते. एखलास खान - आसदखान - मोकासाईखान - आलमखान - मुस्ताभाखान - यादव - रनदुल्ला खान व इ.स.१६३७ मध्ये शहाजी राजे भोसले.

अफजलखान वधानंतर (१६५९) कराड स्वराज्यात आले. कराडजवळील चंद्रगीरी (चांदोबा) डोंगरावर शिवाजी महाराजांनी वसंतगड बांधून काढला तसेच शिवकाळातील कराड संबंधी काही उल्लेख 'कसबे कन्हाड स्थलिच्या ब्रम्हनास पूर्वी अदिलशहाच्या कारकीर्दित कित्येक वृत्ती होत्या त्या काढून छत्रपतीने योग्यता पाहून त्या धर्मादाय दिल्या. स्वराज्याचे सेनापती हंबीरराव हे कराड जवळील तळबिडचे छत्रपतीचे घराणे व तळबीडचे मोहिते घराणे यांचा तीन पिढ्यांचा नातेसंबंध. हंबीरराव मोहित्यांची आत्या तुकाबाई ही शहाजी राजे भोसले यांची पत्नी. हंबीरराव यांची बहिण सोयराबाई ही छ.शिवाजी महाराजांची राणी. तर रणरागिणी ताराबाई ही हंबिररावांची मुलगी ही छ. राजारामांची राणी होती.

छ.शिवाजी महाराजांच्या मृत्युच्या वेळी हंबिरराव कराड तळबिड परिसरात लष्कराचा तळ देऊन होता. येथेच त्याने मोरोपंत पिंगळे, अण्णाजी दत्तो यांचा युवराज संभाजीला कैद करण्याचा डाव त्यांच्यावरच उलटविला. व त्या दोन प्रधानांना कैद केले. व सहफौज पन्हाळगडावर असणाऱ्या संभाजीस मिळाले. बहिण सोईराबाई व भाचा राजाराम या रक्ताच्या नात्याचा स्वार्थी विचार न करता हंबीररावाने स्वराज्याचा विचार करून युवराज संभाजीला रायगडावर छत्रपति केले. ही स्वराज्यनिष्ठा, स्वामी निष्ठा याच मातीतील. इ.स.१६९९ मध्ये दिल्लीपती औरंगजेबाने कन्हाड जवळील वसंतगड जिंकून घेतला. कन्हाड व त्याचा परिसर मुघली साम्राज्यात सामील झाला. व मराठ्यांनी तो परत जिंकून घेतला. छ.राजारामाच्या मृत्यूनंतर साधारण १७०५-०६ च्या दरम्यान युवराजांच्या मौजीबंधन प्रसंगावरून रामचंद्रपंत अमात्य व ताराबाई यांच्यात तीव्र मतभेद झाले. ताराबाईने पंतास वसंतगडावर कैदेत ठेवले. २०फेब्रु.१७०७ रोजी औरंगजेबाचा मृत्यू झाला. त्यानंतर शाहुमहाराज व ताराबाई यांच्यात यादवी सुरू झाली. सेनापती धनाजी जाधव छ.शाहूंच्या बाजूस गेला. धनाजीच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा चंद्रसेन शाहूचा सेनापती झाला. याच चंद्रसेन जाधवाचा व पेशवा बाळाजी विश्वनाथाचा हरणाच्या शिकारीच्या प्रकरणावरून आगाशिव डोंगराच्या पायथ्याशी तंटा झाला. लढाईच होणार पण बाळाजीने पळ काढला व पुरंदर किल्ला गाठला. छ. शाहूचा पेशवा पहिला बाजीराव याला छ. शाहुने पेशवेपदाची वस्त्रे कराड जवळील मसूर या ठिकाणी दिली. इ.स.१७३१ मध्ये सातारचे छ.शाहू व कोल्हापूरचे छ. संभाजी यांची भेट कराड जवळील जखिणवाडी येथे झाली. आणि दोन्ही राज्याच्या सीमा ठरवणारा व दोन छत्रपतीत सौहार्द वाढवणारा वारणेचा तह येथेच झाला.

कराडच्या देशमुखी वतनाचे प्रकरण हे मोठे मनोरंजक आहे. अदिलशाही काळात शहाजीराजांच्या पूर्वी यादव हेच कन्हाडचे देशमुख होते म्हणून यादवांनी हे वतन परत मिळविण्याचा प्रयत्न पिढ्यानपिढ्या सुरू ठेवला होता. छ. संभाजीला संगमेश्वर मुक्कामी मुघलांनी पकडले. त्याच्या आदल्यादिवशी १ फेब्रु. १६८९ रोजी कराडच्या देशमुखीचे वतन यादवांना दिल्याचा निकाल दिला पण सनदा तयार झाल्या नाहीत. पुढे छ. राजारामाने त्या तयार करून दिल्या. कराडची देशमुखी यादवांना मिळाली. कराडच्या या देशमुखी वतनाच्या विभाजनाचे एक अत्यंत महत्त्वाचे निवाडा पत्र उपलब्ध झाले आहे. त्या निवाडापत्राचा कागद अस्सल आहे. तो चिकटबंद असून वळकटी करून ठेवला आहे. त्याची लांबी ६७ १/२ फुट असून रूंदी सव्वा सहा इंच आहे. उजव्या व डाव्या बाजूस इंचभर समास सोडले आहेत. ''कराडच्या देशमुखीचे विभाजन स्वरूपजी बिनपिराजी यादव देशमुख प।। कन्हाड व गिरजोजी बिनमुधोजी यादव देशमुख प।। यांचेत कन्हाड मुक्कामी झाले दि. ५/१०/१७१६.''

याशिवाय मध्ययुगीन काळातील कन्हाडसंबंधी अनेक नोंदी मिळतात. पण त्यातील महत्त्वाच्या नोंदी म्हणजे समर्थ रामदासांच्या शिष्या अक्का कन्हाडच्या, संत सखू कन्हाडच्या.

इ.स. १६९९-१७०० मध्ये धनाजी जाधव याने मुघली सरदार अल्लाउद्दीन याचा कऱ्हाडजवळ पराभव केला. इ.स.१७६३ मध्ये पंत प्रतिनिधींचा मुतालीक गमाजी यमाजी व पेशव्यांचा सरदार नरसिंह पागे यांची लढाई कऱ्हाडलाच झाली. मुतालीक पराभूत झाला. अशा प्रकारे मध्ययुगीन कालखंडातील कऱ्हाडचा हा संक्षिप्त इतिहास.

स्वातंत्र्य चळवळीचे पहिले पर्व

ब्रिटीश राजवट हिंदुस्थानमध्ये वाढत जावून स्थिर झाली. इ.स. १८१८ मध्ये पेशवाई संपली. त्यानंतर इंग्रजांनी सातारा छत्रपतींचे सातारा स्टेट निर्माण केले. पण ते सुद्धा १८४८ मध्ये खालसा केले. यावेळी इंग्रजांच्या विरूद्ध जे उठाव झाले त्यात कराड अग्रेसर होते. धारराव पवार व दौलतराव पवार यांचा संदर्भ येतो. इ.स. १८८५ साली राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली तसेच सर्व देशभर व कराड परिसरात सुद्धा राष्ट्रवादी भावना दिवसें दिवस वाढत होती. येथे लोकांच्या प्रबोधनाचे कार्य सुरू झाले होते. सार्वजनिक सभा व शेतकरी सभा होत होत्या. गोपाळ गणेश आगरकर हे श्रेष्ठ दर्जाचे समाजसुधारक कराडजवळील टेंभू गावचे. टिळक व आगरकरांना इंग्रजांनी तुरुंगवासाची जी शिक्षा दिली तिची प्रतिक्रिया कराडमध्ये उमटली. इ.स.१८८८ मध्ये राष्ट्रीय सभेचे प्रत्यक्ष काम कराड मध्ये सुरू झाले. राष्ट्रीय सभेचे काम चांदशा काझी, सुपनेकर वकील, भाऊसाहेब भागवत हे करत होते. पुण्यामध्ये लोकमान्य टिळकांनी सुरू केलेला सार्वजनिक गणेश उत्सव व शिवजयंती उत्सव कराडमध्ये उत्सहात पार पाडले जात होते. विविध नेत्यांच्या नेतृत्वाखाली कराडमध्ये सनदशीर मार्गाने प्रबोधनाचे काम सुरू होते. स्वदेशीच्या चळवळीचा प्रसार व प्रत्यक्ष स्वदेशी वस्त्रांची निर्मिती कराडमध्ये सुरू झाली होती.

१९०५ च्या वंगभंग चळवळीनंतर देशात जहालवादी विचारांचा प्रभाव वाढला. कराड त्याला अपवाद नव्हते. येथेही जहालवादी व क्रांतीकारी चळवळी सुरू झाल्या. त्यात हसन मुझावर, नारायण जोगळेकर, भाऊसाहेब कळंबे (गुरूजी), विनायक जोशी, बाळकृष्ण जोशी, पांडुअण्णा शिराळकर, अप्पासाहेब अळतेकर, लक्ष्मण पराडकर, नारायण भावे, बाळकृष्ण बुधकर इ. लोकांनी भाग घेऊन राष्ट्रीय चळवळीस आक्रमक स्वरूप दिले. महात्मा फुले यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक चळवळीचे कार्य कराड जवळील काले गावात सुरू झाले होते. तेथे सत्यशोधक समाजाच्या बैठका होत. राष्ट्रभक्तीपर गीते व जलसे इ. मार्गाने हा सत्यशोधक समाज प्रबोधनाचे कार्य करत होता.

१९२० साली लो.टिळकांच्या मृत्यूनंतर हिंदुस्थानात गांधी युगाची सुरूवात झाली. १९२१ मध्ये गांधीजीनी असहकाराचे धोरण जाहीर केले. या काळात कराडमध्ये गांधीजींची सभा झाली. त्याचा परिणाम या परिसरातील लोकांवर व कार्यकर्त्यांच्यावर झाला. या चळवळीत माऊलकर वकील, आप्पासाहेब अळतेकर, नारायण शिराळकर, बटाणे, बाबुराव गोखले यांनी भाग घेतला. सभा व संमेलने घेऊन असहकार व सत्याग्रह याविषयीचे लोकांच्यात प्रबोधन केले. याच काळात कराडमध्ये होऊन गेलेले कर्तृत्वसंपन्न नेतृत्व म्हणजे नानासाहेब देशपांडे त्यांनी तुकडेपट्टी बिल, शेतकरी परिषद, कराड नगरपालिकेचे अध्यक्ष, टिळक हायस्कूल व कराड अर्बन को-ऑप बँक स्थापन करण्यात मोठे योगदान दिले. तसेच १९२६ ते १९३० ते कायदेमंडळाचे सभासद होते.

इ.स.१९२९ मध्ये काँग्रेसने संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव मंजूर केला. म.गांधींनी कायदेभंगाची चळवळ सुरू केली. मीठाच्या सत्याग्रहाचा निर्णय झाला त्याची प्रतिक्रिया कराड मध्ये उमटली. चळवळ सुरू झाली. त्याचे नेतृत्व बाबुराव गोखले यांनी केले. यात नारायणराव शिराळकर, गणपतराव आळतेकर, राघूअण्णा घोपाटे, बटाणे इ.चा सहभाग होता. वरील लोकांचे कार्य चळवळीची तीव्रता, शालेय विद्यार्थ्यापर्यंत पोहचली होती. याच काळात विद्यार्थी असलेल्या यशवंतराव चव्हाण व त्यांच्या मित्रांनी कराड मधील टिळक हायस्कूलच्या आवारातील लिंबाच्या झाडावर राष्ट्रीय झेंडा फडकविला. त्यात त्यांना शिक्षा झाली. राष्ट्रीय झेंडा हा त्या काळात चळवळीचा मान बिंदू बनला होता. १९३० मध्ये मिठाच्या सत्याग्रहाबरोबर जंगलसत्याग्रह सुध्दा सुरू झाले. बीळाशीचा जंगल सत्याग्रह याच साली झाला. कराड परिसरातील स्वातंत्र्य सैनिकांचा त्यात सहभाग होता. १९३५ साली राष्ट्रीय सभेचा सुवर्ण महोत्सव सर्व भारतभर साजरा झाला. सातारा कराड येथे ही समारंभ साजरे झाले. या निमित्ताने बाबुराव गोखले यांनी सातारा जिल्ह्यातील स्वातंत्र्य चळवळीचा आढावा घेणारा 'जागृत सातारा' हा ग्रंथ लिहीला. सातारा जिल्ह्याच्या स्वातंत्र्य लढ्याचा माहिती देणारा तो बहुमोल ग्रंथ होय.

१९४२ चा अभूतपुर्व लढा

दुसरे महायुध्द सुरू होते. राष्ट्रीय सभेने इंग्रजांच्या विरूध्द जहाल व आक्रमक धोरणाचा पुरस्कार केला. ८ ऑगस्ट, १९४२ रोजी मुंबईत भरलेल्या राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात म.गांधीनी इंग्रजांविरुध्द 'चलेजाव' ची घोषणा दिली. सर्व देशात हिंसा-अहिंसेचा विचार न करता इंग्रजांविरूध्द लढा तीव्र करण्याचा संदेश लोकांना मिळाला. इंग्रजांनी कडक कारवाई

सुरू केली. राष्ट्रीय नेत्यांना अटक केली. ९ ऑगस्ट, १९४२ पासून सर्व देशभर क्रांतीचा वणवा भडकला. यात सातारा जिल्हा व कराड तालुका आघाडीवर होता. काँग्रेसच्या अधिवेशनास हजर असलेले यशवंतराव चव्हाण, विठ्ठलराव पागे, काशीनाथ देशमुख, गौरीहर सिंहासने गुप्तपणे कराडात येऊन पोहोचले होते. काँग्रेसचे सर्व कार्यकर्ते 'करू अथवा मरू' या ईर्षेने चळवळीत सामील झाले. सगळीकडे मिरवणूका, मोर्चा, सभा यांना उत आला होता. २४ ऑगस्ट १९४२ रोजी कराडच्या तहसिल कचेरीवर मोर्चा नेण्याचे निश्चित झाले. बाबुराव गोखल्यांना अगोदरच अटक झाली होती. मोर्चात दोन गट तयार करण्यात आले. पहिल्या गटाने न्यायालया समोर निदर्शने करण्याचे ठरविले. या गटाचे नेतृत्त्व गणपतराव बटाणे, दिनकरराव निकम, भिकोबा साळुंखे, यांनी केले. न्यायालयासमोर निदर्शने झाली. दुसऱ्या गटाने कचेरीवर मोर्चा नेऊन तेथे तिरंगी झेंडा लावावा असे ठरले होते. या गटाचे नेतृत्त्व बाळकृष्ण आनंदराव पाटील उर्फ दादा उंडाळकर यांनी केले. कचेरीवर मोर्चा नेला. पोलीसांनी विरोध केला. लोक व पोलीस यांच्यात झटापट झाली. त्यानंतर तेथे सभा झाली. दादा उंडाळकरांना अटक झाली. लोक भडकले, दादा उंडाळकरांनी त्यांना शांत राहण्यास सांगितले. अहिंसेच्या मार्गाने लढा चालविण्याचे त्यांनी लोकांना आवाहन केले. दोन्ही मोर्चाचे गट एकत्र येऊन संगमावर त्याची सभा झाली. यशवंतराव चव्हाणांच्या सह सर्व प्रमुख नेते भूमिगत होते. भूमिगत राहून चळवळ चालू ठेवण्याचा त्यांनी निर्धार केला होता. या काळात कराडमध्ये हिंसक घटना घडल्या. कराडची चावडी, डाक बंगला, शिरवडे स्टेशन येथे आगी लावल्या. क्रांतीने उग्र स्वरूप धारण केले. प्रमुख नेते पकडले गेले. तरी सुध्दा लक्ष्मण कालगावकर (धन्वंतरी) माधवराव जाधव यांच्या नेतृत्वाखाली लढा चालूच होता.

भूमिगत राहून कार्य करणाऱ्या क्रांतीकारकांनी सातारा जिल्ह्यात प्रतीसरकारची स्थापना केली. प्रतीसरकारचे नेतृत्व क्रांतीसिंह नाना पाटील करत होते. नाना पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी १९४५ मध्ये शेणोली स्टेशनच्या पुढे मंच्छिद्र गडाच्या पायथ्याशी पगार घेऊन जाणारी रेल्वे लुटली. प्रतिसरकारने स्वंतत्र शासनयंत्रणा उभी करून गुन्हेगारांचा, देशद्रोह्यांचा, गुंडाचा शोध घेणे, न्याय दान करणे व नंतर त्यांना शिक्षा करणे इ. कामे सुरू केली. शिक्षा देणे म्हणजे पत्र्या मारणे (पायाच्या तळव्यावर वेताच्या काठीने जबर मार देणे) म्हणून प्रतीसरकारला प्रत्रीसरकार म्हणू लागले. प्रतिसरकारने तूफानी दल तयार केले होते. त्याचे नेतृत्त्व कुंडलचे जी.डी.लाड यांच्याकडे होते. क्रांतीसिंह नाना पाटलांनी आपल्या अस्सल ग्रामीण व मराठमोळ्या ढंगात बोलून लोकजागृतीचे काम केले. या क्रांतीसिंहाचे जन्म गाव कराड जवळील येडे मच्छिद्र हे होय. यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, किसन वीर, बरडे मास्तर, पांडू मास्तर यांनी या चळवळीचे नेतृत्व केले. तसेच रामानंद भारती व भाई विष्णूपंत चितळे यांचीही साथ मिळाली या भारलेल्या काळात कापील येथील तरूण बब्रु वाहन जाधवने सातारा जिल्हा विद्यार्थी परिषद कापील येथे भरवली. अशा या अभुतपूर्व लढ्याची परिणीती म्हणजे १५ ऑगस्ट १९४७ ला इंग्रजांनी भारताला स्वातंत्र्य दिले. भारत स्वंतत्र झाला.

स्वातंत्र्यानंतर

स्वातंत्र्यानंतर कराड परिसराची सर्वांगीण विकासाची जी घोडदौड झाली या परिसराने सर्व क्षेत्रात नेत्रदिपक अशी झेप घेतली, त्याचे सर्वस्वी श्रेय मा.यशवंतराव चव्हाण यांच्याकडेच जाते. त्याचे स्वयंभू व स्वयंमी नेतृत्त्व, राजकीय कर्तृत्व, प्रशासकीय कौशल्य, अभ्यासपुर्वक व विचार पूर्वक स्विकारलेली भूमिका, सामान्य माणसांविषयी करूणा, माणसे जोडण्याची व संघटना निर्माण करण्याची अप्रतिम कला समाजाच्या सर्वांगीण विकासाची तळमळ तसेच त्यांच्या अंगी असणारी नितिमत्ता, प्रामाणिकपणा, नम्रता व शहाणपण इ. गुणसमुच्चयामुळे राजकारण, धर्मकारण, समाजकारण, अर्थकारण, साहित्य, शिक्षण, कला, विज्ञान, क्रिडा या सर्वच क्षेत्रावर ते आपला ठसा उमटवून गेलेले दिसतात. ते सर्वांना आपले वाटतात. म्हणूनच त्यांना आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार, म्हणतात. पार्लमेंट्री सेक्रे टरी पदापासून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ते भारताचे उपपंतप्रधानांपर्यंतची विविध पदे त्यांनी भूषविली. कराड परिसरात राजकीय, सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांचे मोहळ त्यांनी निर्माण केले. प्रत्येक कार्यकर्त्याला त्याच्या त्याच्या क्षेत्रात बळ दिले.

मा.यशवंतराव चव्हाणांच्या प्रेरणेने व बरोबरीने अनेक लोकांनी कराड परिसराचा विकास करण्यात आपल्या परीने प्रयत्न केल्याचे दिसते. पी.डी.पाटील यांना आधुनिक कराडचे शिल्पकार म्हणावे लागेल. त्यात विधान सभेचे प्रतिनिधित्व कराणारे बाबुराव गोखले, गैरीहर सिंहासने, व्यकंटराव पवार, आबासाहेब पालैकर, बाबुराव कोतवाल, केशवराव पवार, पी.डी.पाटील, बाळासाहेब पाटील इ.नेते तर मंत्रीपद भुषवणारे यशवंत राव मोहीते, दादासाहेब जगताप, शामराव आष्टेकर, विलासराव पाटील-उंडाळकर, इ.विधान परिषदेत गेलेले

नानासाहेब देशपांडे, पांडू आण्णा शिराळकर, संभाजी बाबा थोरात, भास्करराव शिंदे, जयवंतराव भोसले इ. तसेच लोकसभेत गेलेले व्यंकटराव पवार, गणपतराव अळतेकर, प्रेमलाकाकी चव्हाण, यशवंतराव मोहिते, श्रीनिवास पाटील तर केंद्रीय मंत्रीपद भुषवणारे आनंदराव चव्हाण व सध्याचे पृथ्वीराज चव्हाण इ. नेत्यांची कराडच्या सर्वांगीण विकासात मोलाची भर घातली आहे. व आज काही नेते ती भर घालतच आहे. असाच कराड परिसराचा सर्वांगीण विकास व्हावा व उत्तरोत्तर प्रगती होत रहावी ही अपेक्षा व ईश्वर चरणी प्रार्थना.

'कराडमध्येच नव्हे तर सर्व भारतात तालुका स्तरावर महाविद्यालय स्थापन करण्याचा शिक्षण क्षेत्रातील धाडसी प्रयोग इ.स.१९५४ मध्ये कर्मवीर भाऊराव पाटील यांनी कराडमध्येच केला. संत गाडगे महाराजांच्या हयातीतच त्यांच्या पदस्पर्शाने पुनीत झालेल्या जागेवर त्यांच्याच नावाने 'सद्गुरु गाडगे महाराज' कॉलेज सुरू केले. या कॉलेजने कराड परिसराच्या शैक्षणिक क्षेत्रात व कराडच्या सर्वांगीण जडणघडणीत भरीव काम केले आहे. अशा या महाविद्यालयाचे २००४ साल सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे म्हणूनच 'कराडच्या ऐतिहासिक वारसा' या लेखाचे औचित्य पूर्ण हे प्रयोजन होय.

✦ ✦ ✦ ✦

संदर्भ

१) सातारा जिल्ह्याचे गॅझेटिअर (१९९९ आवृत्ती) मराठी

२) म.रा.गुप्ते - कऱ्हाड - १९२९

३) महादेव शास्त्री जोशी - भारतीय संस्कृती कोश खंड २

४) सिध्देश्वर शास्त्री चित्राव - प्राचीन भारतीय स्थल कोश.

५) ॲड.- डी.एम.पाटील - सातारचे पहिले लोकराज्य प्रतिसरकार, कऱ्हाड २०००

६) प्रा.का.धों.देशपांडे - कऱ्हाड : राजकीय इतिहास, ७६ वे अ.भा.मराठी साहित्य संमेलन, स्मरणिका - कऱ्हाड २००३

७) सं. बालशंकर देशपांडे - साहित्य संमेलन विशेषांक- वसंत कराड २००३

८) प्रा.प्र.कृ.ढवळे - मध्यकालीन भारत - नागपूर १९८७

९) प्रा.ग.ल.भिडे व प्रा.ना.द.पाटील - प्राचीन भारताचा इतिहास - कोल्हापूर १९९०

१०) सं.डॉ.आप्पासाहेब पवार - ताराबाई कालीन कागदपत्रे खंड - १ कोल्हापूर १९६९.

देवकर हॉस्पिटल व गायत्री नेत्र रुग्णालय

४६९/अ, शनिवार पेठ, कोयना ॲटोमोबाईल्सच्यावर,
कराड फोन : (०२१६४) २४०७०

डॉ. सौ. सविता देवकर एम.बी.बी.एस.डी.ओ.एम.एस
नेत्ररोग तज्ञ कन्सल्टंट : लायन्स आय हॉस्पिटल, कराड.

डॉ. वसंत देवकर एम.डी.(मेडीसीन)
● हृदयविकार, ● मूत्रविकार, ● मधूमेह तज्ञ
कन्सल्टंट : सिद्धिविनायक हॉस्पिटल, कराड,
कृष्णा हॉस्पिटल, कराड.

● अतिदक्षता विभाग कार्डीॲक ● मॉनिटर एक्स रे मधुमेह
● हृदयविकार ● मुत्रविकार ● पोटाचे विकार चिकित्सा व उपचार
उपलब्ध सोयी : ● कॉम्प्युटराईज्ड फेकोद्वारे मोतिबिंदू शस्त्रक्रिया
● विनाटाक्याची मोतीबिंदू शस्त्रक्रिया ● कृत्रिम भिंगारोपण (लेन्स)
● शस्त्रक्रियाकाचबिंदू, ● निदान व उपचार ● व्हिट्रीओरेटीनल सर्व्हिसेस
● कॉन्टॅक्ट लेन्सेस ● ए स्कॅन अल्ट्रा सोनोग्राफी

हार्दिक शुभेच्छा !

सोन्या, चांदीचे दागिने मिळण्याचे ठिकाण

बाजार पेठ - येळगांव
ता. कराड. जि. सातारा

।। सहकाराच्या दिपज्योती रयत सेवकांचे जीवन उजळती ।।

पगारदार नोकरांच्या सहकारी बॅकांमधील अग्रेसर बँक.

रयत सेवकांच्या अडचणीचे वेळी सहकार्याचा हात सदैव
पुढे करणारी, त्यांचे आशास्थान असणारी जिव्हाळ्याची बँक.

हिरक महोत्सवी बँक

दि रयत सेवक को-ऑपरेटिव्ह बँक लि., सातारा

मुख्य कार्यालय :- ४५५/२/२० फ, पेठ सदर बझार, सातारा
फोन : २३०६३१, २३१३१३ फॅक्स : (०२१६२) २३१३१३
स्थापना : १६-८-१९४०. ऑडिट वर्ग ''अ''



संस्थापक

पद्‌मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील

शाखा विस्तार :

✦ औंधगाव (पुणे) ✦ अहमदनगर ✦ सांगली ✦ पंढरपूर ✦ कोपरगांव ✦ बारामती ✦ विटा ✦ वाशी (नवी मुंबई) ✦ दहिवडी ✦ सदरबझार (सातारा) ✦ कर्मवीर समाधी परिसर (सातारा) ✦ छ. शिवाजी कॉलेज परिसर (सातारा) ✦ मंचर ✦ श्रीरामपूर ✦ कराड ✦ कोल्हापूर ✦ कर्जत ✦ आडगांव (नाशिक) ✦ हडपसर ✦ लोणंद.

महाविद्यालयाची निर्मिती

मा. भि. काटकर,
सातारा

परमपूज्य कर्मवीर अण्णांना प्राथमिक शाळा, माध्यमिक विद्यालये, महाविद्यालये भरपूर निघावीत आणि त्यामध्ये हजारो मुल शिकावीत, त्यांनी स्वाभिमानाने राहावे. 'आईबापाचा पैसा न आणता स्वत:चे शिक्षण स्वत:च्या कष्टाने घ्यावे' असे वाटे. यासाठीच आपला जन्म आहे. आपला स्वत:चा प्रपंच न करता बहुजन समाजातील मुलांचा संसार उभा करावा असे त्यांना वाटे. या कार्याचे चिंतन त्यांचे चोवीस तास चाले. इतका ध्येयवेडा माणूस कर्मवीर भाऊराव पाटील यांचेशिवाय मला कोणी आढळला नाही.

या विचारातूनच त्यांनी कराड येथे थोर संत सद्गुरु गाडगे महाराज यांचे नावे महाविद्यालय काढण्याचे जाहीर केले. त्यांच्या कार्याची दिशा अशी होती की ते प्रथम नवीन योजना जाहीर करीत. म्हणजे अमुक ठिकाणी विद्यालय/ महाविद्यालय सुरु करणार आणि त्याच्या पुर्ततेसाठी खटपट करीत, त्याप्रमाणे त्यांनी कराड येथे सद्गुरू गाडगे महाराज यांच्या नावे कॉलेज काढण्याचे जाहीर केले.

पहिली बाब म्हणजे या कॉलेजसाठी मोठी जागा पाहिजे. त्यावेळी त्यांना कराडचे जे विद्यानगर आहे तेथील जागेत (हल्ली कॉलेज उभे आहे ती) उद्योगपतींनी व्यवसाय सुरु केला होता, पण तो मोडकळीस आल्याने कोर्टातर्फे या जागेचा लिलाव करण्याचे ठरले. ही बाब त्यावेळचे संस्थेचे आश्रयदाते व माजी अध्यक्ष श्री. बंडोबा गोपाळा कदम (मुकादम) यांना समजली. कॉलेजकरता ही जागा घेण्याचे ठरवून ते स्वत: लिलावाला हजर राहिले. सदरचा लिलाव घेणेसाठी अनेकजण उपस्थित होते. श्री. बंडोबा गोपाळा कदम यांनी तिथे लिलावासाठी आलेल्या सर्वांना विनंती केली की, 'आम्ही ही जागा रयत शिक्षण संस्थेमार्फत कराड येथे निघणाऱ्या सद्गुरू गाडगे महाराज कॉलेजसाठी घेणार आहोत. तरी आपण कोणीही लिलाव घेऊ नये' सर्व उपस्थित मंडळींनी कर्मवीर भाऊराव यांच्या कॉलेजसाठी ही जागा जात आहे तर आपण कोणीही लिलावात भाग घेऊ नये असे ठरले. शेवटी श्री. बंडोबा कदम (मुकादम) यांनी लिलाव घेतला. अशा रितीने कॉलेजच्या जागेचा प्रश्न सुटला.

कर्मवीर अण्णांनी कॉलेजकरता लागणाऱ्या पैशासाठी पुण्यास प्रयाण केले. प्रथम ते समाधान गेस्ट हाऊसचे मालक श्री. गणपतराव शेडगे यांचेकडे गेले. त्यांच्या समाधान गृहात अण्णा नेहमी उतरत असत. यामुळे श्री. शेडगे यांच्याशी आण्णांचा फार परिचय होता. श्री. शेडगे हे देखील राजकारणी गृहस्थ होते. त्यांनी काही दिवस शे. का. पक्षात काम केले होते. यामुळे त्यांचा कर्मवीर अण्णांच्यावर अति लोभ होता. हे समाधान गेस्ट हाऊस फुले मार्केटमध्ये असल्याने श्री. शेडगे यांचा फुले मार्केटमधील सर्व व्यापाऱ्याशी चांगला संबंध होता. त्यांना सर्व व्यापारी मानत होते. श्री. गणपतराव शेडगे अण्णांना श्रीमंत बाबूराव सणस यांचेकडे घेऊन गेले. श्रीमंत बाबुराव सणस हे पूणे येथील फार मोठे बडे प्रस्थ होते. ते महान कॉन्ट्रॅक्टर होते. पुणे नगरपालिकेचे कैक वर्षे अध्यक्ष होते. ज्यावेळी पुणे महानगरपालिका झाली त्यावेळी ते सर्वानुमते पहिले महापौर झाले. जितके धनवान तितकेच ते परोपकारी होते. जेवढा पैसा मिळवीत तेवढाच सढळ हाताने खर्च करीत. कर्मवीर अण्णा व शेडगे ज्यावेळी श्रीमंत बाबूराव सणस यांना भेटले त्यावेळी ते म्हणाले, 'अण्णा काही काळजी करु नका, आपण तुम्हाला जरूर ती मदत करू.'

नंतर रोज मंडईतून ओळखीच्या व्यापाऱ्याकडून पैसे गोळा करण्यास सुरूवात झाली. रोज ठराविक रक्कम जमा करायचीच असा कार्यकर्त्यांनी निर्धार केला. कोणीही नकार दिला नाही. मंडईतील सर्व व्यापारी अण्णांना फार मानीत. लवकरच अपेक्षेप्रमाणे रक्कम गोळा झाली. नंतर कर्मवीर अण्णा सणस यांना म्हणाले, 'आता कॉलेजच्या उद्घाटन समारंभास तुम्ही सर्व कार्यकर्त्यांनी कराडला आले पाहिजे. तेव्हा बाबुराव सणस म्हणाले, आनंदाने! आम्ही सगळे कार्यकर्ते घेऊन येतो. त्यासाठी एक एस. टी. नक्की करतो. नंतर कर्मवीर अण्णांनी या कॉलेजचा उद्घाटन समारंभ संस्थेचे विश्वस्त डॉ. धनंजयराव गाडगीळ यांच्या शुभहस्ते करण्याचे ठरविले. ते ही आनंदाने येण्यास राजी झाले. उद्घाटनाच्या दिवशी एक एस.टी. भरुन पुण्याहून कराडला

कार्यकर्ते आले. त्यामध्ये गणपत शेडगे, नामदेवराव मते, जाधव इत्यादी बरीच मंडळी होती. शिवाय कराड शहारातील शिक्षणप्रेमी मंडळी बरीच आली होती. सभेमध्ये डॉ. धनंजयराव गाडगीळ, श्रीमंत बाबूराव सणस, महापौर शंकरराव उरसळ यांची भाषणे झाली. अण्णांचेही भाषण झाले. या सभेस श्री बंडोबा गोपाळा कदम (मुकादम) हे ही उपस्थित होते. कार्यक्रम एक तासभर चालला होता.

या जागेच्या पुढील भागात कराड येथील उद्योगपती श्री. गौरीहर सिंहासने यांचा पितळी पत्र्याचा कारखाना होता. त्यांनी या सभेस आलेल्या सर्व मंडळींना मिष्टान्नाचे भोजन दिले. अशा रितीने या सभारंभाचा गोड शेवट झाला.

काही दिवसांनी हे कॉलेज सुरु होणार आहे त्याची चौकशी करण्यासाठी पुणे विद्यापीठाचे कमिशन आले. त्या कमिशनपुढे श्री. बंडो गोपाळा कदम यांनी सांगितले की मी या कॉलेजसाठी एक लाख रुपये देणार आहे. पुढे विद्यापीठाची या कॉलेजला मान्यता मिळाली व कॉलेज १९५४ साली सुरू झाले.

✦ ✦ ✦ ✦

कै. मिलिंद बाळकृष्ण पाटील
जन्म- १४/६/१९७७
मृत्यू - ४/४/२०००

लहानपणापासून खेळाची परंपरा घराण्यात असल्यामुळे कै. मिलिंद यालाही कब्बड्डी आणि क्रिकेट या खेळांची आवड होती. त्यांचे वडील बाळासाहेब पाटील कबड्डी व खो-खो चे खेळाडू तर त्यांचे वडील बंधू श्री. दादासो. पाटील कबड्डीचे खेळाडू आहेत. मिलिंद याने टिळक हायस्कूल, कराड येथे कबड्डी आणि क्रिकेट खेळण्यास प्रारंभ केला. 'मुलाचे पाय पाळण्यात दिसतात' या उक्तीप्रमाणे कॉलेजमध्ये आल्यानंतर १९९१ ते १९९७ या अल्पावधीत सलग तीन वर्षे कुमार गटात कबड्डीसाठी अभिनंदनीय निवड होऊन 'हॅट ट्रिक' साधली व जिल्ह्याचे कप्तानपद भूषविले. त्याचप्रमाणे सिनियर कॉलेजच्या टीममधून झोनल आणि इंटर झोनल सामन्यात उत्तुंग कामगिरी करुन महाविद्यालयास अजिंक्यपद मिळवून दिले. पण जो सर्वांना आवडतो तो देवालाही आवडतो आणि अचानकपणे या उमलणाऱ्या फुलावर काळाने झडप घातली. तेजस्वी जीवनाचा अकस्मात अंत झाला.

शेतीतून स्वयंरोजगार बेरोजगारांसाठी आशास्थान

प्रा.डॉ.बी.जे.पाटील
वनस्पतीशास्त्र विभाग, स.गा.म.कॉलेज, कराड

कृषिप्रधान भारतातील ७०% लोक शेतीवर अवलंबून आहेत. अगदी स्वातंत्र्यकाळापर्यंत भारतीय जनतेला पुरेल एवढे धान्योत्पादन आपण करत होतो. स्वातंत्र्यानंतर लोकसंख्या झपाट्याने वाढत गेली पण त्या मानाने धान्योत्पादन वाढले नाही. यथावकाश हरितक्रांतीचा जन्म झाला आणि पुन्हा एकदा शेती जोमाने फुलू लागली. सर्वत्र आधुनिकतेचे वारे वाहू लागले. शैक्षणिक क्रांतीला सुरवात झाली. शिक्षणाच्या सुविधा सर्वांना उपलब्ध झाल्या. व्यावसायिक शिक्षण सुद्धा सुरू झाले. सुरूवातीच्या काळात ज्याला त्याला त्याच्या लायकीप्रमाणे नोकऱ्या मिळत होत्या. पण आता वाढती लोकसंख्या व शिकणाऱ्यांचे प्रमाण व्यस्त झाल्यामुळे प्रत्येकाला नोकरी मिळेलच याची खात्री नाही. गेल्या ५० वर्षात अगदी योजनाबद्ध रीतीने शेती व्यवस्थेची पिळवणूक करण्याचे धोरण आखण्यात आले. त्यातून कारखानदार व्यापारी, दलाल व नोकरदार यांचा भरमसाठ फायदा झाला. कारागीर भूमीहीन झाला. शेतकरी अल्पभूधारक झाले आणि श्रमिक भाकरीच्या शोधात शहरातील झोपडपट्ट्यांची वाट चालू लागले. साहजिकच बेकार तरूणांचे लोंढेच्या लोंढे रस्त्यावर फिरू लागले.

काही वर्षापर्यंत अस्तित्वात असणारी बलुतेदारी शेतीशी निगडितच होती. त्यामुळे गावे स्वयंपूर्ण असावयाची. गावातील बलुतेदारांना रोजगार असायचा. सारा गाव एकमेकांवर अवलंबून असायचा. पण नंतरच्या काळात आधुनिकतेचे वारे वाहू लागले आणि सारी बलुतेदारीच मोडकळीस आली. चर्मकाराने बनविलेल्या कातडी चपला वापरण्याऐवजी 'बाटा' कंपनीने तयार केलेल्या चपला वापरण्याकडे लोकांचा कल वाढू लागला. कुंभाराने बनविलेल्या मातीच्या घागरी जावून लोखंडी व तांब्याच्या घागरी आल्या. मांगाने तयार केलेल दोर वापरण्याऐवजी गरवारे नायलॉनचे दोर वापरले जावू लागले. एकूणच काय कारागीरांचे तंत्रज्ञान व शेतकऱ्यांचे ज्ञान अभियांत्रिकी व कृषिमहाविद्यालयांचे बटीक बनून उच्चवर्णीयांची सेवा करत आले. गळीताची धान्ये पिकवून तेल्याच्या घाण्यावर घरी लागणारे तेल काढले जायचे. पण आज आकर्षक वेष्टनातील भेसळयुक्त तेल आले. घरच्या धान्याची व कडधान्यांची भरड जनावरांना देण्याऐवजी सुग्रास सारखी पशूखाद्ये देण्यात लोक धन्यता मानू लागले. पूर्वी घराघरामध्ये दुधदुभत्यांची रेलचेल असायची, पण आज भरपूर दूध असूनसुद्धा ते सारे डेअरीला जाते आणि ऐनवेळी पाहुणा आला तर चहासाठी मागील दारातून अर्धाकप दूध मागून आणावे लागते. पूर्वी मानवाच्या सर्वच गरजांना मर्यादा होत्या पण आज मारूतीच्या शेपटीसारख्या गरजांची संख्या वाढतच आहे.

आधुनिकतेच्या तुफानातून शेती कशी बाजूला राहील. आधुनिकतेच्या गोंडस नावाखाली पारंपारिक सेंद्रिय खते जावून रासायनिक खतांचा भडीमार होवू लागला. शेतीमध्ये जनावरांचा वापर कमी होवून मशीन्सचा वापर वाढू लागला. व शेतकरी कर्जबाजारी झाला. ट्रॅक्टरच्या खरेदीला ४-५ लाखाचे कर्ज, त्या कर्जाचे व्याज याशिवाय डिझेल, दुरूस्ती, पंक्चर इ. किरकोळ कारणासाठी शहराकडे धाव घ्यावी लागते. जनावरांची संख्या कमी झाल्यामुळे शेणखताचे प्रमाण कमी झाले. शेतीसाठी लागणारे बैल, दूध, शेण, गोमूत्र हे सर्व घरच्या गाईपासून विनामोबदला मिळत असे. पण आता हर एक कारणासाठी गावातून बाहेर जाणारा पैसा व बाहेरून गावात येणारा पैसा यांचे गुणोत्तर बिघडून गेले. छोट्या छोट्या कारणासाठी गावातील पैसा शहराकडे जावू लागला. कुटूंबातील कोणीतरी नोकरी करते त्या कुटूंबाचेच थोडे बऱ्यापैकी चालले आहे. पण केवळ शेतीवरच उपजिविका करणारांची आबाळ होवू लागली. आणि 'उत्तम शेती, मध्यम व्यापार व कनिष्ठ नोकरी' हे सूत्र उलटे झाले.

सध्याच्या शिक्षण पद्धतीत शेताचे तोंडही न पाहिलेली श्रीमंताची मुठभर मुले इंग्रजीतून शेतीचे तथाकथित ज्ञान मिळवतात व बँकेत वसुली अधिकारी होतात. शेतीच्या ज्ञानाची गरज असणाऱ्या शेतकऱ्यांच्या मुलांना कृषिमहाविद्यालयात प्रवेश मिळतोच असे नाही. शेतीचे शिक्षण घेणारे काही विद्वान

शेतकऱ्यांपासून कित्येक किलोमीटर दूर असलेले संशोधन करतात व त्यातून काही निष्कर्ष निघालाच तर तो शेतकऱ्यांपेक्षा कारखानदार, व्यापारी व दलाल यांच्या फायद्याचा असतो महाराष्ट्रातील कृषिमहाविद्यालयातून बाहेर पडणाऱ्या ९८ % विद्यार्थ्यांची शेतीत परत येण्याची धारणा नसते. म्हणूनच त्यांचे ज्ञान कुचकामी ठरू लागले आहे.

आज एकूणच बाजारपेठेवर किंवा उद्योग धंद्यावर केवळ भांडवलदारांचेच वर्चस्व आहे. बेरोजगार तरूणांना याचा फायदा होतो असे दिसत नाही. म्हणूनच शेतीशी निगडीत स्वयंरोजगाराचा विचार व्हायला हवा. केवळ पोटासाठी शेती करण्याचे दिवस आता संपले आहेत. आजची शेती व्यापारी होवू लागली आहे. म्हणूनच संकरित बियाणे, खते, औजारे, मशीन्स, किडनाशके यांचे उत्पादक शेतीकडे आकर्षित होवू लागले व शेतकऱ्यांना भुरळ घालून त्यांना ग्राहक बनविले. साहजिकच शेतकरी कर्जबाजारी झाला. त्यातच शेतकऱ्यांची मागणी नसताना सुद्धा केवळ त्यांना मोफत वीज दिली जाते व त्यासाठी सर्वांना वेठीला धरले जाते. लोकांच्या गरजा भागविणाऱ्या वस्तू गावातच तयार होवू लागल्या तर बरोजगारांना रोजगार मिळू शकेल. यासाठी काम करण्याची बेरोजगारांची मानसिकता बदलायला हवी. शिक्षण झाले की शहराकडे धाव घेण्यापेक्षा संघटना करून गावातच काही व्यवसाय सुरू केला तर त्याचा फायदा सर्वांनाच होऊ शकतो. केवळ श्रमदान, रक्तदान, ग्रामस्वच्छता असे प्रकल्प करण्यापेक्षा बेरोजगारांना उपयोगी पडणारे स्वयंरोजगाराचे शिक्षण द्यायला हवे. वाणिज्य शाखेतील सर्वसामान्य युवकांना रोजगार निर्मिती करता येण्यासारखा अभ्यासक्रम असावा. त्यांना गॅटकरार, जागतिकीकरणाचे फायदे, तोटे समजून द्यायला हवेत. त्याला समर्थपणे तोंड देऊ शकणाऱ्या युवकांची समर्थ फळी निर्माण करायला हवी. आज पीक उत्पादन घेणे ही एकच गोष्ट वगळता साऱ्याच गोष्टीवर व्यापाऱ्यांचे व भांडवलदारांचे नियंत्रण आहे. धान्य विक्रीतून शेतकऱ्यांकडे पैसे येतात व हजारो मार्गाकडून त्यांच्याकडून काढून घेतले जातात. म्हणून शेतकऱ्यांच्या मुलांनी आपली शेती उत्पादने घेवून बाजारात विक्रीसाठी बसायला कमीपणा मानू नये. त्याला व्यापाऱ्याच्या व दलालाच्या भूमिका पार पाडता आल्या पाहिजे.

सेंद्रिय पद्धतीने उत्पादित केलेल्या शेतमालाला आज मोठी मागणी आहे. म्हणून त्याचा प्रचार व प्रसार करण्याची युवा वर्गाला नामी संधी आहे. कराड परिसरातील दारिद्रय रेषेखालील ३४ महिलांनी गांडूळखत वापरून भाजीपाला उत्पादन घ्यायला सुरवात केली आहे. अशा भाजीपाल्यास बारामाही मागणी असते. उत्पादन, वितरण व विक्रिव्यवस्थापन यामधून अनेकांना रोजगार मिळू शकतो. गावांमध्ये उपलब्ध असणाऱ्या दूधाचा एकही थेंब गावाबाहेर जाणार नाही हे ठरवले तर दूध संकलन करणे, त्यावर प्रक्रिया करून दही, ताक, लोणी, चक्का, श्रीखंड, आम्रखंड, पेढे, खवा इ. अनेक पदार्थ तयार करणे व नजिकच्या गावातून हॉटेल्समधून व बाजारपेठेत त्याची विक्री करणे इ. बाबीतून बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होवू शकतो. संपूर्ण जनावरांसाठी लागणारे पशूखाद्य गावातीलच भरड धान्य व इतर बाबींपासून तयार करून उपयोगात आणणे शक्य आहे. यामधून कमी किंमतीत सकस पशूखाद्य पुरविणे सहजशक्य आहे. गावामध्ये उपलब्ध असणाऱ्या कच्च्यामालावर प्रक्रिया करून जैविक कीडनाशके, गांडूळखत, आल्याचा रस, टोमॅटो पावडर, सॉस, जॅम, जेली, पिकल्स, सेंद्रिय गूळ, मसाला गूळ, काकवी, राब, सूक्ष्म अन्नद्रव्य निर्मिती, त्याचबरोबर शेळी पालन, कुक्कुटपालन, वराहपालन, ससेपालन इ. व्यवसायही करणे शक्य आहे. 'ओझोला' वापरल्यामुळे दूध उत्पादन व गुणवत्ता वाढते हे लोकांना पटू लागले आहे म्हणून बेरोजगारांनी ओझोलांचे व्यापारी उत्पादन करायला काहीच हरकत नाही. शिक्षक म्हणून नोकरी करण्यासाठी दुसऱ्याच्यामागे वणवण भटकण्यापेक्षा ५,७ तरूणांनी एकत्र येवून एक माध्यमिक शाळा सुरू केल्याची घटना कराडजवळच घडली आहे. आज हे तरूण स्वतः त्या शाळेचे मालक आहेत. व त्यांनी इतरांनाही रोजगार उपलब्ध करून दिला आहे.

एकूणच काय सरकार माझ्यासाठी काहीतरी करील व ही जबाबदारी केवळ सरकारचीच आहे असे समजून गप्प बसण्यापेक्षा बदलत्या परिस्थितीचा बारकाईने अभ्यास करून आपली बेकारी आपणच संपवण्याचा प्रयत्न केला तरच हे स्वयंरोजगाराचे 'शिवधनुष्य' यशस्वीपणे पेलून उद्याच्या सामर्थ्यशाली भारत आपण उभा करू शकू.

✦ ✦ ✦

हनुमान प्रिंटर्स

क्वालिटी प्रिंटर्स ॲण्ड बुक बाईंडर्स

अनंत कॉम्प्लेक्स, ५८, मंगळवार पेठ, कराड

फोन : २२२५५१ (०२१६४)

जागतिकीकरण आणि शिक्षण

मुकुंद एस्. पोंधे
शिक्षणशास्त्र विभागप्रमुख, स.गा.म.कॉलेज, कराड.

''श्रेष्ठ शिक्षण तेच की जे केवळ माहिती देत नाही, तर आपल्या जीवनाचा संपूर्ण विश्वाशी मेळ घालते. व्यक्ती व विश्व यात सुसंवाद प्रस्थापित करते. हेच एकरुपतेचे आणि एकात्मतेचे शिक्षण.'' - गुरुदेव रविंद्रनाथ टागोर.

पार्श्वभूमी :

खुली अर्थव्यवस्था, आर्थिक उदारीकरण आणि जागतिकीकरणाच्या प्रक्रियेस जवळजवळ आता दशक लोटले असून त्याचे परिणाम आता निश्चितपणे जाणवू लागले आहेत. मात्र जागतिकीकरणाची सुरुवात १९४०च्या दरम्यान जेंव्हा आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक बँकेची स्थापना झाली तेंव्हाच झाल्याचे आढळते. याचाच परिणाम म्हणजे ३० ऑक्टोबर १९४७ रोजी जिनिव्हा येथे झालेल्या परिषदेतील वाटाघाटीतून 'गॅट' (GATT : General Agreement on Tariffs and Trade) कराराची निर्मिती झाली. आर्थिक उदारीकरण आणि व्यापार संबंधित अनेक परिषदा 'गॅट' द्वारे झाल्या. यातूनच १९९४ मध्ये मोरोक्कातील मॅरेकेश येथे झालेल्या परिषदेत 'जागतिक व्यापार संघटना' (WTO : World Trade Organization) उदयास आली.

जागतिक व्यापार संघटना ही कायमस्वरूपी संस्था आहे. सदस्य राष्ट्रांत व्यापारवृद्धीसाठी सुयोग्य कार्यपद्धती राबविणे व व्यवस्थापन करणे, व्यापार सुरळीत होण्यासाठी वाटाघाटी किंवा चर्चा घडवून आणणे, देशादेशांत व्यापार समझोता होण्यासाठी स्वतंत्र समिती नेमणे अशा प्रकारची कार्ये जागतिक व्यापार संघटना करते. आजमितीस भारतासह १४६ देश या संघटनेचे सभासद आहेत.

जागतिक व्यापार संघटने अंतर्गत सेवाविषयक 'गॅटस्' (GATS : General Agreement on Trade in Services) कराराचा समावेश करण्यात आला आहे. १९९६ पासून या कराराची अंमलबजावणी सुरु झाली आहे. सेवाविषयक व्यापार अधिक सुलभ करणे आणि उदारीकरणाची प्रक्रिया सुरु करणे हा कराराचा प्रमुख उद्देश आहे. व्यापारासाठी उपयुक्त देशांचा प्राधान्याने विचार आणि सर्व सदस्य राष्ट्रांना व्यापारासाठीची समान संधी उपलब्ध करुन देणे ही 'गॅटस्' करार निर्मितीची प्रमुख दोन तत्वे होती. कराराच्या कलम ११.१ मध्ये तसा स्पष्टपणे उल्लेख करण्यात आला आहे.

जागतिक व्यापार संघटनेने केलेल्या व्याख्येनुसार व्यापारासाठी निवडलेल्या १२ सेवाक्षेत्रांमध्ये शिक्षणक्षेत्राचाही समावेश करण्यात आला आहे. त्यामुळेच शिक्षणक्षेत्रदेखील आता जागतिकीकरणाला खुले झाले आहे.

खुली अर्थव्यवस्था व आर्थिक उदारीकरणाच्या धोरणातून सदस्य राष्ट्रांमध्ये आर्थिक विकास घडवून आणणे ही 'गॅटस्' कराराची मध्यवर्ती कल्पना आहे. त्यानुसार जागतिक व्यापार संघटनेने मनोरंजन, दळणवळण आणि शिक्षणाचा व्यापार सेवाक्षेत्रात समावेश केला आहे. संघटनेच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार जुलै, २००१ पर्यंत जगातील ५१ देशांनी शिक्षणसेवेच्या व्यापाराविषयी आपली वचनबद्धता व्यक्त केली आहे. भारताने यासंदर्भात आपले मत अद्याप नोंदवलेले नाही.

शिक्षणप्रक्रियेचे स्वरुप :

'गॅटस्' करारामध्ये शिक्षणसेवेचा व्यापार करताना प्रमुख चार पद्धतींचा विचार केला गेला आहे.

१. सरहद्दपार सेवा व्यापार :

सदस्य राष्ट्राने दुसऱ्या सदस्य राष्ट्रामध्ये दूरस्थ शिक्षणपद्धतीद्वारे कोर्सेस सुरु करणे, ऑन-लाईन कोर्सेस सुरु करणे, शैक्षणिक साधने, शैक्षणिक सीडीज्, संदर्भ पुस्तके इ. ची विक्री करणे.

२. परकीय लाभार्थींना सेवा लाभ :

सदस्य राष्ट्रातील विद्यार्थ्याने आवश्यक शिक्षणशुल्क भरल्यास त्याला शिक्षणसेवेचा लाभ देणे.

३. शिक्षणसेवेचे व्यापार स्वरुप :

सदस्य राष्ट्रांतील विद्यापीठांद्वारे इतर सदस्य राष्ट्रांत आपली शिक्षणसंस्था तथा कोर्सेस सुरु करणे. उदा. सदस्य राष्ट्रांतील कोणतेही विद्यापीठ भारतात संगणक शिक्षण केंद्र सुरु करु शकते. त्याद्वारे तेथे प्रवेश घेतलेल्या सदस्य राष्ट्रातील कोणत्याही विद्यार्थ्यास त्या विद्यापीठाची पदवी मिळविता येईल.

४. तज्ञ मार्गदर्शकांचे आदान-प्रदान :

सदस्य राष्ट्रांमध्ये शिक्षणक्षेत्राशी निगडित तज्ञ मार्गदर्शकांचा पुरवठा करणे. उदा. भारतातील अर्हताधारक विषयतज्ञ अमेरिकेतील उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांमध्ये तज्ञ मार्गदर्शक म्हणून आपली भूमिका बजावू शकतात.

याखेरीज शिक्षणसेवेचे पाच उपविभागात वर्गीकरण करण्यात आले आहे.

१. प्राथमिक शिक्षण :

यामध्ये नेहमीच्याच प्राथमिक शिक्षणाचा अंतर्भाव करण्यात आला आहे. प्रौढ साक्षरता उपक्रमांचा देखील यात समावेश आहे.

२. माध्यमिक शिक्षण :

यामध्ये माध्यमिक शाळा, + २ स्तरावरील वर्ग, व्यावसायिक, तांत्रिक व अपंग विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा समावेश आहे.

३. उच्च शिक्षण :

उच्च शिक्षणाचे दोन भाग केले आहेत.

अ) नेहमीचे पदवी-पदव्युत्तर शिक्षण : बी.ए., बी.एस्सी., बी.कॉम., एम.ए., एम.एस्सी., एम.कॉम.इ.

ब) कौशल्याधिष्ठित शिक्षण : तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणाचे पदवी अभ्यासक्रम.

४. प्रौढ आणि निरंतर शिक्षणसेवा :

साक्षरता उपक्रम, पत्राद्वारे शिक्षण इ.

५. इतर शिक्षणसेवा :

अंशकालिक कोर्सस, प्रशिक्षण कार्यक्रम, मनोरंजनातून शिक्षण इ.

शिक्षणव्यवस्थेस होणारे फायदे :

जागतिक व्यापार संघटनेच्या मते जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे सदस्य राष्ट्रांना खूपच फायदा होणार आहे. सदस्य राष्ट्रांमध्ये होणाऱ्या परकीय गुंतवणुकीमुळे या राष्ट्रांमध्ये आर्थिक विकासाला चालना मिळणार आहे. जागतिकीकरणामुळे निर्माण झालेल्या स्पर्धेमुळे व्यापारामध्ये वृद्धीसह पारदर्शकता निर्माण होईल, नवीन तंत्रज्ञानासह दर्जेदार उत्पादने बाजारपेठेत येतील आणि याचा थेट फायदा ग्राहकांना होणार आहे. यादृष्टीने विचार करता जागतिकीकरणाचे शिक्षण व्यवस्थेला होणारे फायदे पुढीलप्रमाणे -

१. भारतासारख्या इतर विकसनशील देशांमध्ये उच्च शिक्षण अपेक्षेइतकी उंची गाठू शकलेले नाही, उदाहरणच द्यायचे झाले तर भारतातील उच्च शिक्षण घेणाऱ्या युवकांच्या वयोगट विचारात घेतल्यास केवळ ६ टक्के युवक उच्चशिक्षण घेताना आढळतात, याउलट विकसित राष्ट्रांमध्ये हेच प्रमाण ५० टक्केपेक्षा अधिक आहे. नवीन परकीय शिक्षण-संस्थांच्या आगमनामुळे हे प्रमाण भारतासारख्या विकसनशील देशांमध्ये वाढू शकते.

२. शिक्षणप्रक्रियेतले महत्त्वाचे घटक असणारे शिक्षक व सेवक यांची आवश्यक त्या संख्येप्रमाणे नेमणूक करणे भारतासारख्या अनेक देशांना अवघड जात आहे. शिक्षण घेणाऱ्या एकूण विद्यार्थ्यांसाठी हे प्रमाण ६ टक्के इतके आवश्यक असताना भारतात मात्र हे प्रमाण ३.५ टक्के इतकेच आढळते. उच्च शिक्षणाचा विचार करता ही टक्केवारी आणखी कमी असल्याचे आढळते. नवीन शिक्षणसंस्थांच्या आगमनामुळे शिक्षणप्रक्रियेत शिक्षकांची व आवश्यक मनुष्यबळाची योग्य प्रमाणात वाढ होण्यास चालना मिळू शकेल.

३. सध्याच्या शिक्षणसंस्था त्यांना मिळणाऱ्या अनुदानामुळे पूर्णपणे शासनसंस्थेवर अवलंबून आहेत. 'गॅटस्' करारामुळे या शिक्षणसंस्था शासनसंस्थेच्या बंधनातून मुक्त होतील आणि जीवनाभिमुख व बदलत्या काळाला अनुरूप असे नवनवीन, लवचिक अभ्यासक्रम सुरु करु शकतील.

४. शिक्षणसंस्थांना दिल्या जाणाऱ्या अनुदानाविषयीचे सध्याचे नियम हे नोकरवर्गाला डोळ्यासमोर ठेवून बनविले गेले आहेत. संपूर्ण राज्यासाठी हा एकच एक नियम असल्याचे आढळते. कार्यक्षम शिक्षणसंस्थांसाठी हाच नियम व अकार्यक्षमपणे चालणाऱ्या शिक्षणसंस्थांसाठी देखील हाच नियम. त्यामुळे कार्यक्षम शिक्षणसंस्था आता शासनाच्या पूर्वापार चालत आलेल्या अनुदान योजनेच्या प्रक्रियेतून बाहेर पडू शकतील आणि जागतिक स्पर्धेला डोळ्यासमोर ठेवून नवनवीन व गरजाधिष्ठित असे उपक्रम सुरु करु शकतील. विद्यार्थी त्यांच्या करिअरला उपयुक्त अशा अभ्यासक्रमांची निवड करु शकतील. यासर्व बाबींमुळे

शासनाला आपल्या अनुदान प्रक्रियेबाबतच्या धोरणांचा पुनर्विचार करावा लागणार आहे. याचाच अर्थ असा की, शिक्षणक्षेत्रात गुणवत्ता वाढीसाठी शासनसंस्थेच्या अनुदान विषयक धोरणात शिथिलता व लवचिकता येणार आहे. सहाजिकच यामुळे संस्थागत आणि व्यक्तिगत उत्तरदायित्त्वाची भावना वाढीस लागेल.

५. ज्या देशांमध्ये शिक्षणक्षेत्राला उपलब्ध करुन देण्यास पुरेसा निधी नाही, वैकल्पिक अभ्यासक्रमांची संख्या मर्यादित आहे, अपु-या निधीमुळे जेथे कोर्सेसच्या विश्वसनियतेबाबत व गुणवत्तेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे अशा ठिकाणी शिक्षणप्रक्रिया गतीमान करण्याचे - कार्य नवीन येणाऱ्या शिक्षणसंस्था करु शकतात. आधुनिक शिक्षणप्रक्रियेत उत्प्रेरकाची भूमिका करणारा 'गॅटस्' करार हा या दृष्टीने वरदानच म्हणावा लागेल.

६. केवळ शासनाच्या अर्थसहाय्यवर तग धरुन असलेल्या अनेक अकार्यक्षम शिक्षणसंस्था आहेत. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत गुणवत्ता व कार्यक्षमतेवर अधारित अर्थपुरवठ्याचे धोरण अवलंबिल्यास अशा अकार्यक्षम शिक्षणसंस्था बंद होतील. यादृष्टीने विचार करता शिक्षणसंस्था आत्मनिरीक्षण करु लागतील, उच्च पारदर्शकता व कार्यक्षमता वाढण्यासाठी प्रयत्न करतील. एकंदरित, शैक्षणिक गुणवत्ता वाढीचे प्रयत्न होतील असे खात्रीने सांगता येते.

७. सध्या अनेक विद्यार्थी उच्च शिक्षण घेण्यासाठी परदेशात जाताना आढळतात. काही राष्ट्रांनी अशा विद्यार्थ्यांसाठी मर्यादित जागा राखून ठेवल्या आहेत. अशा विद्यार्थ्यांच्या शिक्षणखर्चाचा विचार केल्यास त्यामध्ये शिक्षणशुल्क, निवासशुल्क, प्रवासखर्च, भोजन आणि इतर नैमित्तिक खर्च यांचा समावेश होतो. परकीय शिक्षणसंस्थांच्या आगमनामुळे हा खर्च आपोआपच कमी होण्यास मदत होणार आहे. परदेशातील शिक्षण आता मायदेशात उपलब्ध झाल्याने अधिकाधिक विद्यार्थी त्याचा लाभ घेवू शकतील.

८. आधुनिक संप्रेषण तंत्रज्ञानाचा होणारा वापर हा आर्थिक उदारीकरणाचा व जागतिकीकरणाचा आणखी एक फायदा आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना व शिक्षकांना आता जगातील सर्व ठिकाणांहून एकत्र केलेले दर्जेदार अध्ययन-अध्यापन साहित्य इंटरनेटवर उपलब्ध होणार आहे. जागतिक स्तरावरचे मिळणारे ज्ञान ही शिक्षणाच्या 'व्यापारीकरणा' तील गुंतवणूकच म्हणावी लागेल. याचा परिणाम म्हणजे 'एकक मूल्य' (Unit Cost) म्हणजेच 'दरडोई शिक्षणखर्च' यामध्ये लक्षणीय घट होण्याची शक्यता आहे. उच्चशिक्षण देणारी विद्यापीठे कमीत कमी खर्चात उच्च दर्जाच्या शैक्षणिक साहित्याची निर्मिती करु शकतील. पाठ्यक्रम, शैक्षणिक साहित्य यांचा व्यापार म्हणजे शिक्षणाचा व्यापार असा येथे अर्थ घेण्याची आवश्यकता नाही. शिक्षक नवनवीन उपयुक्त माहिती संकलित करु शकतील, ती विद्यार्थ्यांमध्ये संक्रमित करु शकतील व त्याआधारे विद्यार्थ्यांच्या ज्ञानाचे मूल्यमापन करु शकतील.

शिक्षणव्यवस्थेस होणारे तोटे :

शिक्षणक्षेत्रामध्ये होणारा मुक्त व्यापार स्वीकारण्याचे जसे काही फायदे आहेत तसेच अनेक तोटे देखील आहेत. असे हे तोटे खालीलप्रमाणे-

१. आर्थिक उदारीकरण, जागतिकीकरण व त्या अनुषंगाने अस्तित्वात येणारी शिक्षणक्षेत्रातील व्यापायंत्रणा यामुळे ज्या विद्यार्थ्यांची बाजारमूल्य भरुन शिक्षण घेण्याची कुवत आहे अशाच विद्यार्थ्यांना शिक्षणप्रक्रियेचा लाभ होणार आहे. सहाजिकच त्यामुळे समाजातील कमकुवत स्तरातील विद्यार्थी उपेक्षिले जातील. अधिक फायदेशीर कोर्सेस आणि त्यासाठी प्रवेश घेणारे हुशार विद्यार्थी याबाबत खाजगी आणि परकीय शिक्षणसंस्थांची मक्तेदारी निर्माण होईल. भारतासारख्या देशात सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागास घटकांची संख्या अधिक आहे, या घटकांना सापत्न वागणूक मिळणार आहे.

२. सामाजिक घटकांकडून व शासनसंस्थेकडून मिळणाऱ्या अर्थसहाय्यावर अवलंबून असणाऱ्या शिक्षणसंस्थांना आता अर्थसहाय्यासाठी इतर स्त्रोतांकडे लक्ष द्यावे लागणार आहे. देश आणि परदेशातील उद्योग व व्यापार जगताकडे या शिक्षणसंस्था वळल्यास त्यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही.

३. संलग्नीकरण, मान्यतातत्त्व, अनुदानप्रणाली यामुळे सध्याच्या शिक्षणसंस्था सामाजिक जबाबदारीच्या भावनेने कार्य करीत आहेत. शिक्षणक्षेत्रातील व्यापारयंत्रणेमुळे आता या शिक्षणसंस्था सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि प्रशासकीय बंधनातून मुक्त होणार आहेत, साहजिकच यामुळे मनमानीपणा वाढीस लागण्याची शक्यता आहे.

४. शिक्षणक्षेत्रातील व्यापारयंत्रणेच्या रेट्यामुळे नवीन खाजगी संस्थाचालक स्वत:च्या फायद्यासाठी सामाजिक आशयाचे भान न ठेवता निकृष्ट व दर्जाहीन शिक्षणक्रम चालू करण्याची शक्यता आहे. त्यामुळे लवकरच उच्च शिक्षण हे विशिष्ट छाप (brand) असलेले खरेदी-विक्रीचे 'व्यापारी उत्पादन' म्हणून आपणास पहावयास मिळणार आहे.

५. शिक्षणक्षेत्रातील तथाकथित 'आधुनिकीकरणा' मुळे उच्च शिक्षण देणाऱ्या विद्यापीठांची भूमिका व्यापार करणाऱ्या एखाद्या बहुराष्ट्रीय कंपनीप्रमाणे असणार आहे. आदर्श समाजबांधणीस उपयुक्त अशा मूल्यांवर पर्यायाने संपूर्ण राष्ट्रावर या आधुनिकीकरणाचे घातक परिणाम संभवू शकतात. महत्त्वाचा मुद्दा म्हणजे या आधुनिकीकरणामुळे पाश्चात्यांच्या अनुकरणाचा एककलमी कार्यक्रम वाढीस लागेल.

६. सामाजिक मूल्ये, गुणवत्तासुधार यासारख्या महत्त्वाच्या बाबींना उदारीकरणामुळे तिलांजली मिळण्याची शक्यता आहे. जागतिक व्यापार संघटनेने घेतलेल्या निर्णयांमुळे विद्यापीठांची आदर्शतत्वे, शासनसंस्थांचा अंकुश याविषयी प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विकसनशील राष्ट्रांमध्ये विद्यापीठे स्थापन करण्याचा मूळ उद्देश समाजात आदर्श मूल्ये रुजविणे, समाज पर्यायाने राष्ट्रविकासास हातभार लावणे हा होता, आता या उद्देशपूर्तीबाबत साशंकता निर्माण झाली आहे.

७. भविष्यात पालकांना आपल्या एकूण उत्पन्नाचा मोठा भाग आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी खर्च करावा लागणार आहे. ही बाब समाजातील आर्थिक असमतोलास कारणीभूत ठरु शकते. म्हणजेच उच्चशिक्षणाच्या जागतिकीकरणामुळे जनता, संस्था, विद्यापीठे आणि राष्ट्रांमधील असमानता वाढीस लागेल असे म्हणता येते.

८. ज्ञानाचा प्रस्फोट, इंटरनेटचा वाढता वापर यासर्व कारणांमुळे गरीब राष्ट्रांना मोठ्या समस्यांना तोंड द्यावे लागणार आहे. नवनवे शोध, ज्ञानाच्या नव्या संकल्पना या सदस्य राष्ट्रांमध्येच उदयास येणार आहेत. या संकल्पनांचा प्रसार आर्थिक आणि राजकीयदृष्ट्या प्रबळ असणारी राष्ट्रे विकसनशील राष्ट्रांमध्ये करु शकतील परंतू त्या देशांच्या शिक्षणसंस्थांमध्ये उपक्रमांच्या माध्यमातून, पदवी-पदविका अभ्यासक्रमांच्या माध्यमातून या शोधांचा, कल्पनांचा प्रसार करणे तसे अवघड असणार आहे.

९. उच्च दर्जाचे अभ्यासक्रम चालविणाऱ्या कार्यक्षम शिक्षणसंस्था दुसऱ्या राष्ट्रांमध्ये जातीलच असे नाही. आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या, अधिकृत नसलेल्या व फारशी प्रसिद्धी नसलेल्या अनेक संस्था या आंतरराष्ट्रीय बाजारात उतरण्यास उत्सुक असतील परंतू त्यांच्यासाठी हे खडतर आव्हान असणार आहे. जाहिरातबाजीवर प्रचंड खर्च होणार आहे. त्यामुळे फारशा परिचित नसलेल्या संस्थेने सुरु केलेले दुय्यम दर्जाचे कोर्सेस देखील विद्यार्थी आणि पालकवर्गाला आकर्षक वाटू लागतील यात शंका नाही.

१०. भारतामध्ये अभियांत्रिकी, व्यवस्थापन, वैद्यकीय, औषधनिर्माण, शिक्षणशास्त्र, विधी यासारख्या व्यवसायशिक्षणाच्या पदवी अभ्यासक्रमांसाठी ऑल इंडिया कौन्सिल ऑफ टेक्निकल एज्युकेशन (AICTE), मेडिकल कौन्सिल ऑफ इंडिया (MCI), नॅशनल कौन्सिल ऑफ टिचर्स एज्युकेशन (NCTE) आणि बार कौन्सिल यासारख्या अधिकारसंस्थांकडून मान्यता मिळवावी लागते, याशिवाय विद्यापीठाची मान्यता तर आहेच. खाजगी व परकीय संस्थांनी जर अशा अशा स्वरुपाची मान्यता असल्याचे उघड केले नाही तर विद्यार्थी स्वत:च्या अजाणतेपणाची शिकार होऊ शकतात.

व्यापारयंत्रणेतील अडथळे :

१. शिक्षणक्षेत्रामध्ये होणारा व्यापार ही आता नवीन बाब राहिली नाही. परंतू या व्यापाराकडे सामाजिक व आर्थिक दृष्टीकोनातून पहाणे अधिक उचित ठरेल. उदाहरणादाखल, भारतातील दोन तृतीयांश लोकसंख्येचे मजूरी खेरीज दुसरे उत्पन्नाचे साधन नाही. एक तृतीयांश लोकसंख्या दारिद्र्यरेषेखालचे जीवन जगत आहे. त्यांचे देखील मजूरी हेच उत्पन्नाचे एकमेव साधन आहे. यास्तव त्यांच्या मजूरीचे स्वरुप देखील आता शिक्षणावर अवलंबून असणार आहे. कमी उत्पन्न असल्याकारणाने गरीब जनता शिक्षणसंस्थांचे बाजारमूल्यानुसार पूर्ण फी भरुन शिक्षण घेवू शकणार नाही. त्यांना फी सवलतीची गरज भासणार आहे. खास करुन उच्च शिक्षणाबाबत असे घडणार आहे. यादृष्टीने विचार करता शासन तर उच्च शिक्षणाच्या जबाबदारीतून आपले अंग काढून घेवून ती जबाबदारी स्थानिक खाजगी व परकीय शिक्षणसंस्थांवर सोपविण्याच्या मनोभूमिकेत दिसत आहे.

२. जाणकार विद्यार्थी व पालक आता प्रचलित शिक्षणव्यवस्थेतील कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील अभ्यासक्रम सोडून कौशल्य व क्षमतावृद्धीस पूरक अशा नवीन व्यावसायिक व जीवनाभिमुख कोर्सेसकडे वळताना दिसत आहेत. शासनसंस्थेचे नियंत्रण व सवलतप्रक्रियेचे निकष यामुळे सध्याची उच्च शिक्षण देणारी विद्यापीठे नवनवीन व जीवनाभिमुख कोर्सेस सुरु करण्यास अक्षम आहेत. अशा परिस्थितीमध्ये उच्चशिक्षण प्रक्रियेत शिरकाव करुन व्यापक आणि वाढू पाहणाऱ्या शिक्षणक्षेत्रास लुबाडण्याची चांगली संधी स्थानिक खाजगी व परकीय संस्थाचालकांना मिळाली आहे.

३. शिक्षणक्षेत्रातील या व्यापारात अधिक फायदा मिळवणाऱ्या संस्था तांत्रिक, कायदेशीर, राजकीय, सामाजिक, प्रादेशिक, शैक्षणिक इत्यादी बाबतच्या मुद्यांवर इतर संस्थांवर हुकूमत गाजविण्याची शक्यता आहे. दुसऱ्या शब्दांत, त्यांचे नेतृत्व करण्याची शक्यता आहे. 'चकाकते ते सर्व सोने नसते' या म्हणीप्रमाणे उच्चशिक्षणाच्या जागतिकीकरण प्रक्रियेत सर्व काही आलबेल आहे असे म्हणता येणार नाही.

शिक्षणसेवेच्या बाबतीत 'गॅटस्' करारामध्ये ज्या प्रमुख चार पद्धतींचा विचार केला गेला त्या अनुषंगाने विचार करता पुढील स्वरुपाचे अडथळे उत्पन्न होण्याची शक्यता आहे.

४. सरहद्दपार सेवा व्यापार :

इतर देशांमध्ये शिक्षणसेवेचा व्यापार सुरू करताना पुढील अडथळे येण्याची शक्यता आहे.

१) विषयांशाचे इलेक्ट्रॉनिक प्रसारण
२) अधिस्वीकृती चाचण्या
३) पदवी देणारी संस्था म्हणून मान्यता
४) इतर देशांतून मिळविलेल्या जुन्या व नवीन पदव्यांची ओळख पटविणे
५) स्थानिक पातळीवर भागीदाराची निवड करणे
६) संयुक्त भागीदारीतून उत्स्फूर्तपणे मुक्त होणे
७) प्रचंड शिक्षणशुल्क, परवाना पद्धती, पगार रकमेवरील करपद्धती इ.
८) इंटरनेट तसेच उपग्रह सेवेच्या वापरात येणारे कायदेशीर अडथळे
९) उपयुक्त शैक्षणिक साहित्यांवरील बंधने. इ.

५. परकीय लाभार्थींना सेवा लाभ :

इतर राष्ट्रांमध्ये जावून शिक्षणसेवेचा लाभ घेताना पुढील अडचणी येवू शकतात.

१) व्हिसा व पारपत्र प्रक्रिया, त्यासाठीचा खर्च
२) स्थानांतरणाची पूर्तता
३) राष्ट्रीयत्वाचा प्रश्न तसेच निवास सुविधा
४) परकीय चलनाचा प्रश्न
५) शिष्यवृत्त्या व आर्थिक सवलतींचे प्रश्न
६) शिक्षण फी इतर फी चे स्वरुप
७) परकीय विद्यार्थ्यांसाठीच्या राखीव जागा
८) शिक्षण घेताना व घेतल्यानंतरचा नोकरीचा प्रश्न इ.

६. शिक्षणसेवेचे व्यापार स्वरुप :

शिक्षणसंस्थेतील व्यापार यंत्रणेत आपले अस्तित्व टिकवताना शिक्षणसंस्थांना पुढील अडचणींना तोंड द्यावे लागणार आहे.

१) सर्वांसाठी समान गुंतवणुकीचे धोरण त्यामुळे थेट कमाल गुंतवणुकीवरील मर्यादा
२) परकीय शिक्षकांच्या नेमणुकीवरील बंधने
३) शासनसंस्थांचे बदलते धोरण
४) स्थानिय संस्थांना मिळणारी भरीव सूट
५) अधिक सुविधांच्या उपलब्धतेबाबत परवानगी
६) संस्थेसाठी जागा, मूलभूत सोयीसुविधांसाठी येणारा प्रचंड खर्च, त्यावरील बंधने, मालकी हक्काचे प्रश्न
७) भाडेमूल्य तसेच उपभोगकालाची प्रतिकूलता
८) विशिष्ट भागांमध्ये परकीय संस्थांना होणारा प्रतिबंध
९) स्थानिक भागीदारीचे निकष
१०) संयुक्त भागीदारीतून मुक्त होण्यात येणाऱ्या अडचणी
११) कर आकारणीतील भेदभाव
१२) परकीय भागीदारांबाबत शासनाकडून केला जाणारा भेदभाव
१३) इतर घटनात्मक ढवळाढवळी इ.

७. तज्ञ मार्गदर्शकांचे आदान-प्रदान :

इतर राष्ट्रांमध्ये तज्ञ मार्गदर्शक वा शिक्षक म्हणून भूमिका बजावताना येणाऱ्या अडचणी पुढीलप्रमाणे -

१) परदेशगमनासाठीची पूर्तता
२) राष्ट्रीयत्वाचा प्रश्न, निवास सुविधा
३) नेमणुकांसंबंधीचे कठीण निकष, उदा. प्रकाशने, पेटंटस् इ.
४) संबंधित देशात प्रवेश व देश सोडविण्याचा अधिकार

५) हंगामी सेवकांची संख्या
६) उत्पन्नाचा भाग मायदेशात पाठविण्यासंदर्भात बंधने
७) चलन साठ्यावरील कर
८) काही महत्वाच्या शैक्षणिक साधनांचा वापर करताना परकीय शिक्षकांवर येणारी बंधने
९) नोकरीविषयक नियम इ.

उच्च शिक्षणाचे जागतिकीकरण आणि भारत :

जागतिककरणाच्या प्रक्रियेचा सध्या जर विचार केला तर पाश्चिमात्य राष्ट्रे ही पूर्वेकडील वा आशियाई राष्ट्रांच्या तुलनेत खूपच आघाडीवर आहेत. अमेरिकेमध्ये शिक्षण घेणाऱ्या ७,९४,००० परकीय विदयार्थ्यांपैकी ६४ टक्के विद्यार्थी हे आशिया खंडातील आहेत. विद्यार्थ्यांना अमेरिकेमध्ये शिक्षणासाठी पाठविणाऱ्या पहिल्या दहा देशांमधील सात देश हे आशियाई आहेत. याउलट अमेरिकेतील विद्यार्थ्यांना शिक्षणसेवा पुरविणाऱ्या पहिल्या दहा देशांमध्ये आशिया खंडातील एकही देश नाही ही वस्तुस्थिती आहे. एकट्या भारत देशातील ६२,००० पेक्षा जास्त विद्यार्थी सध्या अमेरिकेत उच्चशिक्षण घेत आहेत. २००२-०३ या शैक्षणिक वर्षाचा आढावा घेतल्यास भारतात उच्चशिक्षण घेणाऱ्या एकूण १००७ अमेरिकन विद्यार्थ्यांच्या तुलनेत हे प्रणाण खूपच जास्त असल्याने आढळते. दरवर्षी शिक्षणासाठी परदेशात जाणाऱ्या विद्यार्थ्यांची माहिती जागतिक पातळीवर 'युनेस्को' (UNESCO) द्वारा संकलित केली जाते. त्यांचा अहवाल देखील भारत व इतर औद्योगिक राष्ट्रांमधील विद्यार्थ्यांच्या देवाण घेवाणीबाबत विषमता दर्शवितो.

भारतात आर्थिक उदारीकरणाची सुरुवात खऱ्या अर्थाने १९९१ मध्ये झाली. परदेशामध्ये शिक्षण घेण्यासाठी भारतीय विद्यार्थ्यांची वाढती संख्या हा त्याचाच परिणाम आहे. १९९० पूर्वी मोजकीच अशी कुटुंबे होती की जी आपल्या मुलांना उच्च शिक्षणासाठी परदेशात पाठवू शकत होती. बदलत्या परिस्थितीनुसार भारतातील मध्यमवर्ग देखील आपल्या मुलांना उच्च शिक्षणासाठी परदेशात पाठवू लागला आहे. याचा पुरावा म्हणजे १९९० ते २००३ सालादरम्यान अमेरिकेमध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांची संख्या ५६ टक्क्यांनी वाढली.

भारतातील बहुतेक सर्वच विद्यार्थी पदवीपूर्व शिक्षण मायदेशातच घेताना आढळतात. त्यामुळे परदेशात शिक्षण घेणारे भारतीय विद्यार्थी व त्यांचे पदवीपूर्व शिक्षण असे समीकरण करणे चुकीचे ठरणार आहे. अमेरिकेत शिक्षण घेणाऱ्या एकूण भारतीय विद्यार्थ्यांपैकी ७०% पेक्षा जास्त विद्यार्थी पदव्युत्तर तर २२ टक्के विद्यार्थी पदवीपूर्व शिक्षण घेताना आढळतात. या एकूण विद्यार्थ्यांपैकी ७५ टक्केपेक्षा जास्त विद्यार्थी व्यापार/व्यवस्थापन, अभियांत्रिकी, गणित, संगणकशास्त्र यासारख्या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतात. यावरून भारतातील उच्चशिक्षण अशा विद्यार्थ्यांच्या गरजा पूर्ण करण्यात कमी पडत असले पाहिजे असे म्हणता येते.

भारतामध्ये अभियांत्रिकी, व्यवस्थापन यासारख्या अभ्यासक्रमासाठीच्या जागा मर्यादित आहेत. प्रत्येक वर्षी या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या लक्षात घेता ही बाब लक्षात येते. त्याचबरोबर शासनाची 'कोटा' पद्धत व आरक्षणविषयक धोरणांमुळे अनेक हुशार विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणे शक्य होत नाही. त्यामुळे अशा हुशार व वंचित विद्यार्थ्यांना आपल्या आवडीच्या क्षेत्रात करिअर करण्यासाठी परकीय विद्यापीठे हाच सुरक्षित मार्ग वाटतो.

आणखी एक महत्वाचा मुद्दा म्हणजे भारतातील सर्वोत्कृष्ट विद्यार्थी आपल्या शिक्षणसंस्थेत यावेत यासाठी परकीय विद्यापीठांमध्ये चढाओढ सुरु आहे. अमेरिका याबाबतीत सध्या आघाडीवर आहे. ऑस्ट्रलिया, फ्रान्स, कॅनडा यासारखी राष्ट्रेदेखील या स्पर्धेत आता वेगाने पुढे येत आहेत. मागील काही वर्षात अमेरिका, ऑस्ट्रेलिया आणि फ्रान्स या राष्ट्रांनी आशियाई विद्यार्थी भरतीची जोरदार मोहीम उघडल्याचे निदर्शनास येते. १९९०च्या उत्तरार्धात आशिया खंडात चलन समस्या उत्पन्न झाल्याने पूर्व व दक्षिणपूर्व आशियाई देशांतील विद्यार्थी भरती खूपच कमी झाली होती. अशा परिस्थितीतही दक्षिण आशियातील विद्यार्थी मिळविण्यासाठी अमेरिकन विद्यापीठांनी आपले प्रयत्न वाढविले होते.

भारतातील अनेक हुशार विद्यार्थी परदेशात जाऊन उच्च शिक्षण घेतात हे आपण समजलो. परंतु भारतात उच्च शिक्षण घेणाऱ्या परकीय विद्यार्थ्यांची संख्या कमी का बरे ? ज्या घटकांमुळे भारतातील विद्यार्थ्यांना परदेशात जाऊन उच्चशिक्षण घेण्याची प्रेरणा मिळाली त्यातल्याच काही घटकांमध्ये या प्रश्नाचे उत्तर आपल्याला आढळेल. मूलभूत सोयीसुविधांची कमतरता, परकीय विद्यार्थ्यांना आकर्षित करणाऱ्या खास उपक्रमाचा अभाव, अधिस्वीकृत नसलेली महाविद्यालये हे त्यातलेच काही महत्वाचे घटक आहेत.

आंतरराष्ट्रीय शिक्षण संस्था (IIC) अमेरिकन विद्यार्थ्यांसाठी इतर राष्ट्रांतील उच्च शिक्षणाच्या संधी विषयी माहिती देणारी मार्गदर्शिका दरवर्षी प्रकाशित करत असते. या मार्गदर्शिकेत विविध देशांच्या शिक्षण उपक्रमांची यादी असते.

या संस्थेच्या सन २००२-०३च्या आवृत्तीत भारताच्या फक्त ३१ उपक्रमांची यादी आहे. मार्गदर्शिकेत असलेल्या फ्रान्सच्या २७२, ऑस्ट्रेलियाच्या २३४ आणि जपानच्या ९९ उपक्रमांबरोबर आपण भारताच्या ३१ उपक्रमांची तुलना करु शकतो. एवढे असूनही भारतायी भू-सांस्कृतिक आणि ऐतिहासिक पार्श्वभूमी, पर्यावरण स्त्रोत, नैसर्गिक साधनसंपत्ती, विकसित होऊ पाहणारे उच्च शिक्षणाचे स्वरुप या सर्व बाबींमुळे पाश्चात्य विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यास भारत हा सर्वात उपयुक्त असा देश आहे. या देशात परकीय विद्यार्थ्यांना आकर्षित करणारे शिक्षणाचे अनेक स्त्रोत आहेत परंतु ते बंदिस्त स्वरुपात आहेत असेच म्हणावे लागेल.

सारांश :

भूतकाळाचा विचार केल्यास भारत देश हा सांस्कृतिक व शैक्षणिकदृष्ट्या संपन्न असा देश होता. परंतू आज गुणवत्ता, समर्पकता, स्वायतत्ता, कार्यक्षमता या सर्व बाबींचा विचार करता भारतातील शिक्षणक्षेत्राची पिछेहाट झाल्याचे आढळते. यामध्ये सुधारणा होण्यासाठी निकोप स्पर्धा व्हावयास हवी. आणि त्यासाठी परकीय शिक्षणसंस्थांचे स्वागत होणे आवश्यक आहे.

भारताची शिक्षणप्रणाली इतकी मागास नव्हती. तिला मागास बनविले गेले असे म्हणणे योग्य ठरेल. शासनाचा प्रमाणापेक्षा जास्त होणारा हस्तक्षेप, विविध स्तरावरील शिक्षणसंस्था चालविणारे कुचकामी संस्थाचालक यांनी तिला मागास बनविले. अजूनही चांगल्या शिक्षणसंस्थांना उत्तेजन दिल्यास त्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत आत्मविश्वासाने उतरु शकतील. वाढती शिक्षण फी भरु न शकणाऱ्या विद्यार्थ्यांना फी मध्ये सवलत दिल्यास आणि कार्यक्षम शिक्षणसंस्थांना स्वायतत्ता दिल्यास स्थानिक संस्थाचालकांना त्याद्दष्टीने उत्तेजन मिळेल व ते शिक्षणक्षेत्रातील कोणत्याही स्तरावरच्या स्पर्धेस तोंड देण्यास तयार होतील.

जागतिकीकरणामुळे शिक्षणप्रक्रिया अधिक जीवनाभिमुख, 'स्व' ची ओळख करुन देणारी आणि आनंददायी बनणार आहे हे निश्चितच, मात्र या शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार भारतातील कुमकुवत घटकापर्यंत होणे आवश्यक आहे. यासाठी शासनसंस्थेची भूमिका महत्वाची असणार आहे. कविवर्य रविंद्रनाथ टागोरांचे उद्‌गार या बाबतीत अगदी समर्पक आहेत. ''शिक्षण जर समाजातील खालच्या स्तरापर्यंत पोहचू शकत नसेल आणि पोहचूनही जर अपेक्षित गुणवत्ता साध्य होत नसेल तर ते शिक्षण पृष्ठभागावर नाच करणाऱ्या व क्षणिक सौंदर्य असणाऱ्या पाण्याच्या बुडबुड्याप्रमाणे आहे. आदर्श राष्ट्रउभारणीस असे शिक्षण प्रेरक ठरत नाही.'' म्हणूनच विविध भू-सांस्कृतिक पार्श्वभूमी असणाऱ्या शिक्षण-संस्था भारतात आल्यास विद्यार्थ्यांचा दृष्टीकोन विश्वव्यापक होण्यास मदत होणार आहे.

वरील विवेचनावरुन, सर्व लाभार्थी घटक-शासनसंस्था, विद्यापीठे, UGC व AICTE सारख्या प्रशासकीय अधिकार संस्था, शिक्षक, विद्यार्थी आणि पालक यांनी आपल्या गुणवत्तेच्या आणि क्षमतेच्या आधारे, सर्व विकल्पांचा विचार करुन शिक्षणक्षेत्रातील व्यापाराच्या या भोवऱ्यात उडी घ्यावी हेच श्रेयस्कर !

हार्दिक शुभेच्छा !

जलसंधारणाच्या प्रभावी योजना राबवून

सांगली जिल्ह्यात

रेणावी रेवणगाव पॅटर्नचे

कृतिशील व्यक्तिमत्व

मा. श्री. अधिकराव

विठ्ठल पाटील

• उपसरपंच •

रेणावी, ग्रामपंचायत रेणावी

• संचालक •

कृषि उत्पन्न बाजार समिती विटा.

हार्दिक शुभेच्छा !

रेणुका

कन्स्ट्रक्शन

इंजिनीयअर्स ॲन्ड कॉन्ट्रॅक्टर

रेणुका टॉवर्स, सैदापूर विद्यानगर, कराड, जि. सातारा

फोन : (०२१६४) ७१०२५ रेणुका ग्रुप

सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज यांच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा

"आपली बँक, आपली माणसं"
(अमृतमहोत्सवी बँक)

प्राथमिक शिक्षक सहकारी बँक लि., सातारा

मुख्यालय : १२ ब, रविवार पेठ, सातारा.
फोन : २३४०४६/२३४३३८/२३०४४०/२३७२६२
E-mail : pssbsat@sanchar.in

शाखा : वडूज, वाई, फलटण, दहिवडी, कोरेगांव, मेढा, महाबळेश्वर, खंडाळा, म्हसवड, रहिमतपूर

सांपत्तीक स्थिती (३०/११/०४)

सभासद : ८,४४१ निधी : ०७ कोटी ५५ लाख
भागभांडवल :०८ कोटी ६० लाख कर्जे : ९१ कोटी ४० लाख
ठेवी :११७ कोटी ०४ लाख खेळते भांडवल : १३७ कोटी ९८ लाख

सिद्धेश्वर पुस्तके : चेअरमन

विद्याधर देशमुख
व्यवस्थापक

संभाजी भिलारे
व्हा.चेअरमन

संचालक मंडळ व सर्व सदस्य

शुभम्

हॉस्पिटल, उंब्रज
मॅटर्निटी व सर्जिकल

उंब्रज, फोन : २६४५५२

- प्रसूतीपुर्व तपासणी व सल्ला
- सरकारमान्य गर्भपात केंद्र
- स्त्रीरोग चिकित्सा व शस्त्रक्रिया
- प्रसूती
- सोनोग्राफी
- सुसज्ज ऑपरेशन थिएटर व स्पेशल रुमची सोय.

डॉ.अरुण भोसले
MBBS, DGO

डॉ.सौ.शिल्पा भोसले
MBBS



रुचकर स्वादांची आतषबाजी

आम्रखंड, केशर वेलची, बदाम पिस्ता व स्ट्रॉबेरी या चार स्वादात श्रीखंड उपलब्ध

वारणा

वारणा श्रीखंड, दूध, दूध पावडर, घी, बटर, चीज, लस्सी, दही, पनीर, जॅम, फ्रेश फ्रुट ज्युसेस

● उत्पादक ●

श्री वारणा सहकारी दूध उत्पादक प्रक्रिया संघ लि.,
जिल्हा कोल्हापूर फोन : ०२३३८-२२४१८१ ते ८७

ISO 9001-2000
HACCP CERTIFIED
WARANA

महाविद्यालयीन स्तरावर मूल्यशिक्षणाची आवश्यकता

प्रा.सौ.कौसल्या भोसले
मराठी विभाग, स.गा.म. कॉलेज, कराड

सकाळचे वर्तमानपत्र उघडले आणि माझी नजर 'दोन मुलांची मातेसह निघृण हत्या' या बातमीकडे गेली. पुण्यासारख्या विद्येच्या माहेरघरी, भरवस्तीत राहुल वय वर्षे चार व राजेश वय वर्षे एक या दोन कोवळ्या मुलांची त्यांच्या मातेसह अज्ञात मारेकऱ्यांनी हत्या केली व घरातील मौल्यवान वस्तू आणि रोख रकमेसह ते पसार झाले. परंतु पोलिसांच्या सतर्कतेमुळे त्यांना अवघ्या चार तासात मुद्देमालासह पकडण्यात पोलिसांना यश मिळाले. त्यांची कसून चौकशी केली असता ते वीस, बावीस वयोगटातील महाविद्यालयीन शिक्षण घेणारे दोन विद्यार्थी असल्याचे निष्पन्न झाले. केवळ पैश्यासाठी अत्यंत निर्दयपणे तीन जीवांची अमानुषपणे हत्या केल्याचे कबूल केले. ही बातमी वाचून होताच माझे मन अस्वस्थ झाले आणि

''मानसा मानसा
कधी व्हशील मानूस
लोभासाठी झाला
मानसाचा रे कानूस''

ही बहिणाबाईंची खंत माझ्याही मनाला टोचणी लावून गेली. माणूस माणूसकी निर्माण करण्यात आजच्या काळात कमी पडतो आहे. त्यासाठीच शाळा व महाविद्यालयातून मूल्यशिक्षण देण्याची गरज आहे.

ज्या गुणांमुळे तत्त्वांमुळे व्यक्ती, समाज आणि विश्व यामध्ये परस्पर सुसंवाद साधून सर्वांचा विकास होतो ती तत्त्वे म्हणजे मूल्य. मानवाचे वर्तन-आदर्श समाजाने निर्माण केले आहेत. हे आदर्श म्हणजेच मूल्य. ही मूल्ये आचरणाची संहिता आहेत. 'जीवन म्हणजे संस्कार संचय' असे विनोबा भावे म्हणतात. हे संस्कार व्यक्तीला घर, समाज, शाळा या संस्कार केंद्रातून प्राप्त होतात. शिक्षणाने विद्यार्थी ज्ञानसंपन्न होतो. तसाच तो कौशल्यपरायणही होतो. मनाच्या सुयोग्य मशागतीसाठी मूल्यशिक्षण आवश्यक आहे.

प्राचीन काळी गुरूगृही अध्ययन करावे लागे. बाराव्या वर्षी उपनयन संस्कार झाला की मुलाला गुरूगृही पाठविले जाई. शिक्षण संपवून तो परत येई ते माता-पित्यांचे, समाजाचे ऋण फेडण्यासाठीच. तेथे तो मानसिक, शारीरिक व बौद्धिकरित्या परिपूर्ण होत असे. त्याच्या मनावर चांगली मूल्ये बिंबविण्यात गुरूचा वाटा सिंहाचा असे. आजच्या धकाधकीच्या जीवनात 'मूल्यशिक्षण' देणारी घरे फार थोडी आहेत. पूर्वी वडीलधाऱ्या स्त्री-पुरूषांकडून, वृद्ध आजी-आजोबांकडून मुलांवर संस्कार होत होते. पण आज जसजसे कुटुंबाचे स्वरूप लहान होत गेले व घरातील स्त्री-पुरूष नोकरी व्यवसायानिमित्त घराबाहेर राहू लागले तसे संस्कार दुर्मिळ होत गेले.

आज सर्वत्र भ्रष्टाचाराचा धुमाकूळ सुरू आहे. अनाचार, स्वार्थांधता, काळाबाजार, पाशवीवृत्ती, वशिलेबाजी पराकोटीला जावून भिडली आहे. पैशाची हाव, विध्वंसवृत्ती, सत्तालोलुपता शिगेला पोहचली आहे. गलिच्छ, किळसवाण्या राजकारणापायी देशाचा बळी जाण्याची वेळ आली आहे. याचे कोणालाच सोयरसुतक नाही. दुसरीकडे देशापुढे पर्यावरण असंतुलन, प्रदूषण, वाढती लोकसंख्या, नैसर्गिक प्रकोप यांसारखे यक्षप्रश्न आहेत. ''सोनं काठीला बांधून देशाच्या या टोकापासून त्या टोकाला काशीपर्यंत खुशाल जावे'' अशी एकेकाळी ख्याती असलेल्या देशात दैनंदिन जीवन असुरक्षित व्हावे याची टोचणी संवेदनशील मनाला व्यथित करते. हे चित्र बदलवायचे असेल तर मूल्यशिक्षण शालेय स्तरापासून महाविद्यालयीन स्तरापर्यंत आवश्यक आहे.

२१ व्या शतकातील पहिल्या दशकात पदार्पण करणारे जग समृद्ध व समर्थ झालेले आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर तर ज्ञानाचा विस्फोट झाला आहे. जगाने भौतिक विकासात नेत्रदीपक मजल मारली आहे. आधुनिक तंत्रज्ञानाने प्रचंड प्रगती केली आहे. परंतु मानवी जीवन अधिकच असुरक्षित झाले आहे. सुसंगत अशी मानवी मूल्ये मात्र जोपासली गेली नाहीत. जुने तर सोडले पण नवे मात्र सापडले नाही असा बिकट प्रसंग मानवतेवर ओढावला आहे. मानवतेवरील हे अरिष्ट टाळायचे असेल तर मानवी मूल्यांचा समाजामध्ये व प्रत्येक व्यक्तीमध्ये परिपोष होण्याची गरज आहे. व तो अधिक परिणामकारकतेने शिक्षणातूनच होवू शकतो. जागतिक स्तरावरील निर्माण झालेली ही दुरावस्था नष्ट

करण्याचा श्रीगणेशा प्राथमिक शिक्षणापासून विद्यापिठीय शिक्षणापर्यंत मूल्यशिक्षणाद्वारेच गिरवला जावा असे शिक्षण आयोगाने शाळा, महाविद्यालयांना परिपत्रकांद्वारे कळविले आहे.

जून १९९७ पासून महाराष्ट्र शासनाने शाळा, महाविद्यालयातून मूल्यशिक्षणासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करण्याच्या दिशेने पाऊल उचलले आहे. मूल्यशिक्षणात निवडक मूल्ये कोणती असावीत याचा विचार वर्धा शिक्षण आयोग, विद्यापीठ शिक्षण आयोग, माध्यमिक शिक्षण आयोग, भारतीय शिक्षण आयोग आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण यामध्ये केला आहे. १९९० च्या राममूर्ती समितीच्या अहवालातही मूल्यशिक्षणात प्रमुख चार निवडक मूल्यांचा विचार करून एकूण दहा मूल्यांचा अंतर्भाव केला. तो पुढीलप्रमाणे

१) स्वविषयक मूल्ये ..... १. नीटनेटकेपणा
२. वक्तशीरपणा ..... ३. श्रमप्रतिष्ठा

२) सामाजिक मूल्ये ..... १. स्त्री-पुरुष समानता
२. सौजन्यशीलता ..... ३. संवेदनशीलता.

३) राष्ट्रविषयक मूल्ये ..... १. राष्ट्रभक्ती
२. राष्ट्रीय एकात्मता.

४) सांस्कृतिक मूल्य ..... १. वैज्ञानिक दृष्टिकोण
२. सर्वधर्म सहिष्णूता.

मूल्यशिक्षण केवळ प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाचाच भाग आहे असे म्हणून महाविद्यालय व विद्यापिठांना ही जबाबदारी झटकून टाकता येणार नाही.

शिक्षकच शाळा, महाविद्यालयात मूल्यसंस्काराचे कार्य प्रभावीपणे करू शकतील. त्यासाठी शिक्षकाने पोषाखापासून ते न्यायबुद्धिने वागण्यापर्यंत सर्वच बाबी तपासून पाहिल्या पाहिजेत. शांतपणा, प्रयोगशीलता, नवनवीन उपक्रमांचा शोध, स्वच्छता, वक्तशीरपणा, नीटनेटकेपणा, शिस्तप्रियता, विशालता आपुलकी या बाबींकडे शिक्षकाने जाणीवपूर्वक लक्ष दिले पाहिजे. कारण शिक्षक विद्यार्थ्यांचे 'आदर्श' असतात. 'आडात असेल तरच पोहऱ्यात येते' या न्यायाने शिक्षकाजवळ या गुणांचा संचय असल्यास विद्यार्थ्यात वेगवेगळ्या प्रसंगानुरूप त्याचे संस्कार होवू शकतात. म्हणूनच मूल्यसंस्कारात अध्यापक हा घटक अतिशय महत्त्वाचा आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर विद्यापीठ शिक्षणाचा आयोग १९४८ मध्ये डॉ. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त झाला. महाविद्यालयातून व विद्यापीठातून विद्यार्थ्यांत राष्ट्रीय दृष्टिकोण विकसित करावा. राष्ट्रभक्ती व देशप्रेम, राष्ट्राशी बांधिलकी निर्माण करणारा अभ्यासक्रम व त्यावरील भाषणे आयोजित व्हावीत. सर्वधर्म समभाव, सहिष्णुता व राष्ट्रीय एकात्मतेला पोषक असे वातावरण व अभ्यासक्रमाची रचना असावी असा विचार आयोगाने मांडला. १९६४-६६ च्या कोठारी आयोगानेही ''शिक्षण हे सामाजिक, राजकीय व आर्थिक परिवर्तनाचे साधन व्हायला हवे'' असे सूचविले.

महाविद्यालयीन स्तरावर मूल्यशिक्षण प्राथमिक व माध्यमिक शिक्षणस्तराप्रमाणे तासिकेद्वारे देता येणार नाही. ते अभ्यासक्रमातून, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, विविध विषयांची चर्चासत्रे, सांस्कृतिक कार्यक्रम, विविध प्रकल्प, शैक्षणिक सहली, क्रीडास्पर्धा, निवासी शिबीरे, परिसर अभ्यास, कार्यशाळा, युवक महोत्सव व वक्तृत्व स्पर्धा इत्यादी उपक्रमातून मूल्यसंस्कार व मूल्यसंवर्धन झाले पाहिजे. निवासी शिबीरातून हस्तव्यवसाय, वाचन, खेळ, अशा सुप्त कलागुणांना वाव मिळतो. त्यातून समायोजनाचे, सहकार्याचे, सहनशीलतेचे, संवेदनक्षमतेचे धडे मिळतात. श्रमसंस्काराचे महत्त्व कळते. कोणतेही काम करताना त्याची आखीव-रेखीव मांडणी करण्याचा संस्कार मिळतो. राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्रसेना या दोन बाबी विद्यार्थ्यांवर खुपच चांगले संस्कार करतात. निरक्षरतेचे निर्मूलन, व्यसनमुक्ती, जलसंधारण, वनस्पतीसंवर्धन, वृक्षारोपण, माती-वाळूचे बंधारे बांधणे, परिसर स्वच्छतेचे आयोजन करणे, घाण व रोगराईपासून मुक्तता, साक्षरता अभियान राबविणे, प्रौढ शिक्षण योजना, राष्ट्रीय दिन साजरे करणे, संतांच्या व राष्ट्रपुरूषांच्या जयंती व पुण्यतिथी साजरी करणे, छोट्या-मोठ्या कार्यक्रमांचे आयोजन व नियोजन करणे, पोलिओ लसीकरण मोहिमेत सहभागी होणे. एड्स जाणीव-जागृती कार्यक्रमात सहभागी होणे. रक्तदान, भूकंप, वादळ, युद्धकाळ, महापूर अशा दुर्घट प्रसंगी साह्य करण्याचे संस्कार या सर्व कृतीतून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांवर अध्यापकांना करता येतील. हे सर्व उपक्रम प्रत्येक महाविद्यालयास विद्यापीठाने सक्तीने राबविण्याचे ठरविले. त्यासाठी विद्यार्थी संख्येची मर्यादा न घालता महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी अशा योजना सक्तीच्या केल्यास आपोआप मूल्ये जोपासली जातील. भारताने सांभाळलेल्या परंपरा व अमूल्य वारसा यांचे जतन करण्याचे सामर्थ्य या मूल्यशिक्षणात आहे. 'माझा विद्यार्थी डॉक्टर, इंजिनियर, होणार की नाही हे मला सांगता येणार नाही. पण तो एक चांगला माणूस, देशाचा आदर्श नागरीक असेल' असे प्रत्येक शिक्षकाला वाटले पाहिजे. चला आपण सारे एकत्र येवूया व देशाच्या भावी नागरिकांना उत्तम माणूस बनवण्यासाठी एकजुटीने प्रयत्न करूया.

मा.प्राचार्य ए.एस.महादार

सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा

शब्दांकन : प्रा.वसंतराव निकम, प्रा.मानसिंग कदम, श्री. विवेक भोज, श्री. अशोक यादव

(लहानपणातच संस्काराचे बाळकडू मिळून, संस्कारातच वाढलेले, उच्च विद्याविभूषित, निगर्वी, सालस आणि प्रेमळ व्यक्तिमत्व मा.प्राचार्य ए.एस.महादार यांनी स.गा.म कॉलेजमध्ये विविध पदांवर १९ वर्ष सेवा केली आहे. सैदापूर आणि कराडवासियांबद्दल गौरवोद्‌गार काढून त्यांनी संस्थेच्या सचिव पदापर्यंत पोहचण्याचे श्रेय स.गा.म कॉलेजला दिले आहे. महाराष्ट्राची शैक्षणिक जडणघडण रयत शिक्षण संस्थेने केली, असे ते अभिमानाने नमूद करतात.)

आपल्या जडणघडणीमध्ये रयत शिक्षण संस्थेचा वाटा कितपत आहे ?

आमच्या संपूर्ण कुटूंबाची जडणघडणच रयत शिक्षण संस्थेमध्ये झाली आहे. माझे वडील श्री. शंकर ज्ञानदेव महादार हे संस्थेच्या पहिल्या १५ आजीव सभासदांपैकी एक होते. माझे आजोबा वडिलांच्या लहानपणीच वारल्यामुळे वडिलांचा सांभाळ माझ्या वडिलांच्या मामांनी केला. मुळातच हुशार असणाऱ्या माझ्या वडिलांना कर्मवीर अण्णांनी हेरले व त्यांना नेर्ल्याहून साताऱ्याला शाहू बोर्डींगला घेवून आले. साताऱ्यातच वडिलांचे शिक्षण पूर्ण झाले. आज, मी व माझी भावंडे उच्च विद्याविभूषित आहोत. विविध क्षेत्रात यशस्वीपणे काम करीत आहोत. या सर्व गोष्टींचे श्रेय कर्मवीर अण्णांना व रयत शिक्षण संस्थेलाच जाते.

आपली प्रेरणास्थाने कोणती ?

अनेकांची प्रेरणा मिळाली. मोकळ्या मनाने सांगायचे झाले तर माझे आई, वडील, संस्थेचे संस्थापक कर्मवीर अण्णा हे माझे प्रेरणास्त्रोत. याचबरोबर असे अनेक प्राचार्य, की ज्यांच्या हाताखाली मला काम करण्याची संधी मिळाली, त्यांच्याकडूनही मला प्रेरणा मिळाली, खूप काही शिकता आलं.

आपल्या मातापित्यांचे तुमच्या व्यक्तिमत्त्वावर कोणते संस्कार झाले ?

मघाशी सांगितल्याप्रमाणे माझे वडील तसे पोरकेच. मामांनी त्यांचा सांभाळ केला. परंतु खरा सांभाळ, केला तो कर्मवीर अण्णांनीच. संस्थेमध्ये पदवीधर झाल्यानंतर महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्यासमोर संस्थेच्या ज्या पहिल्या १५ विद्यार्थ्यांनी संस्थेसाठी आजन्म सेवेची शपथ घेतली त्यात माझे वडील होते. त्याचप्रमाणे त्यांनी आपली पूर्ण हयात संस्थेच्या सेवेसाठी खर्च केली. काम करताना त्यांनी स्वतःचा व कुटुंबाचा कधी विचार केला नाही. सेवेसाठी त्यांनी स्वतःला अगदी झोकून दिले. त्यांचं हे काम मी लहानपणापासून पहात होतो. ते आजीव सभासद म्हणून काम करत असताना घरी अनेक लोक येत असत. त्यांच्या आदरातिथ्याचं, पाहुणचाराचं काम माझी आई करायची, हाही संस्कार माझ्यावर झाला. आई स्वतः अशिक्षित असताना तिने जे कष्ट घेतले, वडिलांना कामात जे सहकार्य दिले या सर्व गोष्टींचा परिणाम नकळतपणे माझ्यावर झाला.

आपल्या आयुष्यातील एखादा संस्मरणीय प्रसंग ?

कर्मवीर भाऊराव पाटील दरवर्षी आष्ट्याला येत असत. त्यावेळी आमचं वास्तव्य आष्ट्याला होतं. साधारणपणे सप्टेंबर मध्ये ज्यावेळी पाऊस जास्त असतो अशा काळात अण्णा आष्ट्यासारख्या ठिकाणी रहायला जात असतं. मी माध्यमिक शाळेत शिकत असताना, मला आठवतं, सलग ४ वर्षे आठ-आठ दिवस अण्णा आमच्याकडे रहायला यायचे. त्यांचा जो सहवास लाभला तो एक कायम स्मरणात राहिलेला आहे आणि दोन वर्षापूर्वी जेव्हा मी संस्थेचा सचिव झालो, तो एक मनावर कोरला गेलेला प्रसंग म्हणावा लागेल. कारण सचिव कोण होणार हे त्या दिवसापर्यंत म्हणजे ९ मे रोजीपर्यंत कुणालाच सांगता येत नव्हतं. सकाळी १० वा. जेव्हा आपल्याला संधी मिळते असं समजलं तेव्हा खूप आनंद झाला. वडिलांना जेव्हा ही बातमी समजली तेव्हा त्यांच्या डोळ्यातून अश्रू आले. हा प्रसंग माझ्या मनात कोरला गेलेला आहे.

स.गा.म.कॉलेजमध्ये सेवा करीत असताना स्थानिक पातळीवरील कुणाकुणाचे सहकार्य लाभले ?

स.गा.म.कॉलेजमध्ये मी एकूण १९ वर्षे काम केलं. त्या कालावधीमध्ये काम करत असताना कराड गावातील अनेकांचे सहकार्य लाभले. त्यामध्ये केशवराव पवार यांचं नाव प्रामुख्याने घ्यावं लागेल. सुरूवातीच्या काळामध्ये संस्थेचे त्यावेळचे ट्रस्टी

बंडो गोपाळा मुकादम हे हयात होते. त्यांचंही सहकार्य आणि मार्गदर्शन लाभलं. त्यानंतर, ज्या परिसरामध्ये स.गा.म.कॉलेज वसलेलं आहे, त्या भागातील म्हणजे सैदापूर गावातील विठ्ठलराव जाधव, आनंदराव जाधव, या व्यक्तींचं सहकार्य लाभलं. कराड गावातील ज्या व्यक्तींचं सहकार्य लाभलं त्यामध्ये आर.एस.घाडगे यांचं नाव घ्यावं लागेल आणि त्याचबरोबर पी.डी.पाटील आणि शंकरअप्पा संसुद्दी यांचंही सहकार्य मला लाभलं. आणखी एक म्हणजे केशवराव पवार उर्फ दादा यांच्या निधनानंतर चिरंजीव ॲड.रविंद्र पवार यांचंही सहकार्य मला लाभलं आणि अजूनही लाभत आहे.

स.गा.म.च्या विज्ञान शाखेच्या विकासातील आपले महत्त्वपूर्ण योगदान काय ?

१९७० साली मी स.गा.म. कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून बदलून गेलो. त्यावेळेला तेथे S.Y.B.Sc.पर्यंतचेच वर्ग होते. S.Y.चा वर्ग नुकताच सुरू केलेला होता, विद्यार्थ्यांची संख्या अत्यंत कमी होती. शेजारचं सायन्स कॉलेज हे तसं जुनं असल्यामुळे तिथं विद्यार्थ्यांचा ओढा अधिक असायचा. म्हणून आपल्या शाखेत विद्यार्थी संख्या वाढवण्यासाठी मी व माझ्या सहकाऱ्यांनी कराड परिसरातील सर्व गावांना, हायस्कूलना भेटी दिल्या. आमच्या विज्ञान शाखेची माहिती त्या विद्यार्थ्यांपर्यंत, त्यांच्या शिक्षकांपर्यंत गावोगाव पोहचवली. अशा रितीने गावोगाव हिंडून आम्ही विद्यार्थी गोळा केले. पुढच्याच वर्षी T.Y.B.Sc चा वर्ग चालू केला. आमच्या विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी, त्यांना परिक्षेत जास्तीत जास्त मार्कस् कसे पडतील याद्दष्टीने सर्वांनी कष्ट घेतले आणि आज अशी परिस्थिती आहे की विज्ञान शाखेसाठी प्रवेश बंद करावे लागत आहेत. एवढी विद्यार्थी संख्या आता वाढली आहे. सुरूवातीला विज्ञानशाखेच्या प्रयोगशाळांसाठी इमारत नव्हती ती इमारत आम्ही १९७२ साली पूर्ण केली.

आपल्या कारकिर्दीतील स.गा.म.कॉलेजमधील एखादी संस्मरणीय आठवण सांगाल काय ?

१९ वर्षाचा कालावधी तेथे गेल्यामुळे अनेक आठवणी आहेत. त्यातल्या महत्त्वाच्या सांगायच्या झाल्या तर मघाशी सांगितल्या प्रमाणे विद्यार्थी संख्या कमी असल्यामुळे त्यावेळचे प्राचार्य बॅरि.पी.जी.पाटील यांनी सायन्स शाखा बंद करण्याचे ठरविले होते. आणि आम्ही तर म्हणत होतो की शाखा कुठल्याही परिस्थितीत चालू ठेवायची, वृध्दिंगत करायची. परंतू प्राचार्य तयार नव्हते. मग त्यांच्या पत्नी सौ.सुमतिबाई पाटील यांच्याशी आम्ही संपर्क साधला अन् आमचे मत पटवून दिले आणि मग प्राचार्यांना त्यांचा निर्णय बदलावा लागला. नंतर विद्यार्थी संख्या वाढली हे आपल्याला माहिती आहेच. १९७२ ला संपूर्ण महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडला होता. त्यावेळेला आमच्या सर्व सहकाऱ्यांनी अन् विद्यार्थ्यांनीसुद्धा समाजामध्ये जावून अनेक प्रकारची कामं केली, पाझर तलावांची कामं केली वगैरे. ते एक महत्त्वाचं योगदान सहकारी व विद्यार्थ्यांमार्फत झाल्याचं आठवतं.

आपली संस्थेच्या सचिवपदी निवड झाली. आपण उत्तम प्रशासक म्हणून काम केले. याबावतीतील स.गा.म.चे योगदान काय ?

स.गा.म.कॉलेजमध्ये १९ वर्षे प्राध्यापक, विभागप्रमुख व उपप्राचार्य म्हणून काम केलं आणि हे काम करत असताना मला जे काही शिकायला मिळालं त्याचाच एक परिपाक म्हणजे प्रशासक म्हणून मला काम करता आलं. त्या काळामध्ये मला जवळजवळ १५ प्राचार्यांच्या हाताखाली काम करण्याची संधी मिळाली आणि प्रत्येक प्राचार्यांकडून किंवा सिनिअर सहकाऱ्यांकडून मला जे काही शिकायला मिळालं त्यातूनच माझी जडणघडण होत गेलीय असं मी म्हणेन आणि म्हणून प्राचार्य म्हणून माझी निवड झाली किंवा सचिव म्हणून माझी निवड झाली याच्या पाठीमागे मला सगाम कॉलेजमध्ये जे काही शिकायला मिळालं किंवा अनुभवायला मिळालं त्याचा फार मोठा वाटा आहे असं मी समजतो.

आपल्या सौभाग्यवती आणि मुलांची आपण शिक्षणासारख्या पवित्र कार्यास वाहून घेतल्याबद्दल कितपत साथ मिळाली ?

प्राचार्य पदासाठी मी जेव्हा अर्ज केला, त्यावेळेला संस्थेची अशी पद्धत होती की विनाअनुदानित कॉलेजवर काम करावं लागत असे आणि मग तिथं पूर्ण पगार मिळण्याची शक्यता नव्हती. कमी पगारावर काम करावं लागणार होतं. मुलं तर मेडिकल क्षेत्रामध्ये शिकत होती आणि मुलं आमच्यापासून दूर होती. खर्चाच्या बाबी अनेक होत्या. फक्त पगार हेच उत्पन्नाचं साधन होतं. अशा परिस्थितीमध्ये आपण विनाअनुदानित कॉलेजवर जायचं की नाही असा प्रश्न होता. परंतु मुलांनी सांगितलं की तुम्ही हे स्वीकारायला काही हरकत नाही आणि मग त्यांची साथ मिळाल्यामुळं मी प्राचार्य झालो. पत्नीबद्दल सांगायचं झालं तर प्राध्यापक, प्राचार्य म्हणून काम करत असताना, सचिव म्हणून काम करत असताना घरची सर्व जबाबदारी पत्नीनं उचलली. ती स्वत: नोकरी करते संस्थेमध्येच, पण अगदी नोकरी सांभाळून माझ्या ज्या काही अडीअडचणी असतील त्या सोडविण्यासाठी ती प्रयत्न करीत असते.

स.गा.म. कॉलेज आणि शहरातील इतर महाविद्यालये यामध्ये नेमका फरक कोणता ?

स.गा.म. कॉलेजमध्ये काम करत असताना तिथली विज्ञानशाखा वाढीसाठी आम्ही जे काही प्रयत्न केले, जीवाचं रान केलं त्यामुळं त्या कॉलेजबद्दल एक वेगळी आपुलकी निर्माण झालेली आहे. विशेषत: एकूण नोकरीच्या कालावधीमधील

निम्म्यापेक्षा जास्त कालावधी कराड कॉलेजमध्ये गेल्यामुळे तिथं एक वेगळा स्नेहभाव, तिथल्या परिसराबद्दल, तिथल्या सहकाऱ्यांच्या बद्दल निर्माण झालेला आहे. कराड शहारामध्ये विशेषत: विद्यानगर परिसरामध्ये जी कॉलेजेस आहेत, त्या कॉलेजेसमध्ये कराड शहरातील विद्यार्थ्यांची संख्या जास्त आहे आणि स.गा.म. कॉलेजमध्ये ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची संख्या जास्त आहे. ग्रामीण भागातील मुलांचे प्रश्न हे शहरी भागातील मुलांच्या प्रश्नांपेक्षा वेगळे असतात आणि या ग्रामीण भागातील मुलांना घडविण्यासाठी स.गा.म. कॉलेजचा सर्वच स्टाफ प्रयत्न करीत असतो. रयत शिक्षण संस्थेचं ध्येयच असं आहे की तळागाळातल्या विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थीकेंद्रीभूत होऊन काम करणं. इथल्या सर्व सेवकांनी त्याप्रमाणं कामही केलं आहे, करत आहेत.

या कॉलेजच्या उज्ज्वल भविष्यासाठी एखादा "Master Plan" आपल्या विचाराधीन आहे काय ?

विज्ञान शाखेच्या बाबतीत विचार केला तर विद्यार्थी संख्या चांगली झालेली आहे. विद्यार्थीसंख्या विचारात घेता सध्या असणाऱ्या प्रयोगशाळा अपुऱ्या पडताहेत असं मला वाटतं. ज्युनिअरच्या प्रयोगशाळा ह्या स्वतंत्र व्हायला पाहिजेत. कॉलेजकडे जागा भरपूर आहे. असं झाल्यास विज्ञानशाखेच्या सर्व अडचणी दूर होतील आणि दुसरं म्हणजे आता तिथं जे क्रीडासंकुल उभारलं जात आहे त्याचा लाभ कराड परिसरातील सर्वच विद्यार्थ्यांना होणार आहे.

आपल्या कॉलेजला नॅककडून "A" ग्रेडचे नामांकन मिळाले आहे. परंतु आमच्या कॉलेजला "B+" मानांकन मिळाले. भविष्यात सुधारणेसाठी या कॉलेजसाठी काही उपाय सुचवाल काय ?

यशवंतराव चव्हाण सायन्स कॉलेजमध्ये मी गेली पाच-साडेपाच वर्षे झाली काम करतो आहे. या कॉलेजचा नावलौकीक पूर्वीपासूनचा आहे. केवळ मीच नव्हे तर या कॉलेजमध्ये जे जे प्राचार्य म्हणून होऊन गेले त्या सर्वांच्या कार्याचा हा परिपाक आहे असे मी म्हणेन. या कॉलेजमधील पीएच.डी धारक प्राध्यापकांचेही मोठे योगदान आहे. त्यांनी UGC चे अनेक प्रोजेक्टस् हाती घेतले आहेत आणि या सर्व गोष्टींमुळे या कॉलेजला A ग्रेड मिळाली. सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे यात मोठे योगदान आहे. स.गा.म. कॉलेजला सुद्धा A ग्रेड मिळायला पाहिजे होती. तशी त्यांची तयारी सुद्धा झाली होती. मी स्वत: ती तयारी पाहिली होती. परंतु A ग्रेड मिळाली नाही. म्हणून नाराज व्हायचे काही कारण नाही. मघाशी सांगितल्याप्रमाणं ज्युनियरच्या प्रयोगशाळा जर स्वतंत्र झाल्या व आपल्याकडे जेथे कला आणि विज्ञान शाखेला PG सेंटर आहे तेथे जर पीएच.डी धारक प्राध्यापकांची संख्या वाढली तर अधिक चांगलं असणार आहे. कारण PG सेंटर असेल त्या कॉलेजकडे विद्यापीठ दर्जाचं कॉलेज म्हणून पाहिलं जातं. या बाबतीमध्ये स.गा.म. कॉलेजमध्ये कमतरता आढळली असं मला वाटतं. बाकी इतर कुठल्याही बाबतीमध्ये स.गा.म. कॉलेज मागं नाही.

परदेशी विद्यापीठे देशात स्थापन होऊन उच्च शिक्षणामध्ये स्पर्धा निर्माण करीत आहेत. तेंव्हा संस्थेच्या महाविद्यालयामध्ये या स्पर्धेला सामोरे जाण्यासाठी कोणकोणते प्रकल्प राबविणे आवश्यक आहे ?

या २००५ सालापासून परदेशी शिक्षणसंस्था इतर देशांमध्ये उच्चशिक्षण तसेच माध्यमिक शिक्षणाच्या सोयी सुरू करताहेत. याला सामोरं जाणं आपल्याला भाग आहे. स्पर्धा फार मोठी आहे. त्यासाठी सेवकांपासून प्राचार्यांपर्यंत सर्वांना आपली गुणवत्ता सिद्ध करावी लागणार आहे. त्याद्दष्टीने आपली संस्था देखील काही स्वतंत्र अभ्यासक्रम सुरु करेल. हा अभ्यासक्रम येणाऱ्या शिक्षणसंस्थांच्या तोडीचा असेल. अडचणी भरपूर आहेत परंतु संस्थेने काही कॉलेजेसमध्ये असे कोर्सेस सुरु करण्याचे ठरविलेले आहे. त्याद्दष्टीने नवीन इन्स्टिट्यूट स्थापन करण्याचा विचार सुरू आहे. त्यासाठी मुंबई व पुणे येथे संस्थेने जागा देखील खरेदी केली आहे.

आपली सेवानिवृत्तीनंतरची भावी योजना कोणती ?

माझी सेवानिवृत्ती जवळ आलेली आहे. परंतु सेवानिवृत्तीनंतर काय करायचं हा विचार करायला सुद्धा वेळ नाही अशी परिस्थिती आहे. कारण सचिव म्हणून काम करत असताना एका शाखेचा शाखाप्रमुख म्हणून काम करण्याचीही जबाबदारी आहे. त्यामुळे सेवानिवृत्तीनंतरचा फारसा विचार केलेला नाही. पुढं जे काही आपल्याला करता येण्यासारखं असेल, जे परवडेल त्याचा विचार करायचा ठरवलेलं आहे. संस्थेनं जर काही काम सांगितलं तर ते विनामोबदला करण्याची तयारी आहे. कारण संस्थेमध्येच मी घडलो, संस्थेमुळेच मी इथपर्यंत आलो. संस्थेच्या ऋणातून मुक्त होण्यासाठी संस्था सांगेल ती जबाबदारी स्वीकारण्याची तयारी आहे.

आता शेवटचा प्रश्न. रयत शिक्षण संस्थेने आधुनिक महाराष्ट्र घडविण्याचे धनुष्य उचलले आहे. यामध्ये आपली संस्था कितपत यशस्वी झाली आहे असे आपणास वाटते ?

महाराष्ट्रामध्ये रयत शिक्षण संस्था ही एक मोठी शिक्षण संस्था आहे. महाराष्ट्राच्या १६ जिल्ह्यामध्ये संस्थेचा कारभार सुरु आहे. ४३२ हायस्कूल्स आहेत, ४० कॉलेजेस आहेत. याशिवाय संस्थेचे इतरही अनेक उपक्रम सुरु आहेत आणि म्हणून या महाराष्ट्राची शैक्षणिक जडण-घडण रयतशिक्षण संस्थेने केली आहे, असे म्हटल्यास वावगं ठरणार नाही. आज वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींमध्ये रयत शिक्षण संस्थेच्या

विद्यार्थ्यांचा वाटा मोठ्या प्रमाणावर आहे. तरीसुद्धा आज संस्थेसमोर अनेक आव्हाने आहेत. संस्थेच्या शाखा शासकीय अनुदानावर चालू आहेत. सध्या शासन वेतनेतर अनुदान या शाखांना देत नाही आणि त्यामुळे आता हायस्कूल्स आणि कॉलेजेस इथून पुढं चालवणं फार अवघड जाणार आहे. हा पैसा आपल्याला समाजाकडूनच उभा करावा लागणार आहे. त्यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न करणं गरजेचं आहे. आतापर्यंत फक्त तळागाळाच्या विद्यार्थ्यांना घडविण्यासाठी संस्थेने प्रयत्न केले. पण सध्याचा विद्यार्थी फक्त परिक्षार्थी म्हणूनच घडवला जातोय. त्यांना खऱ्या अर्थानं जर घडवायचं असेल तर अभ्यासक्रमाच्या बाहेर जावून विद्यार्थ्यांवर संस्कार करणं गरजेचं आहे. त्यामध्ये आपण थोडेसं कमी पडत आहोत असं वाटतं. इथून पुढं तसे प्रयत्न होतील अशा योजना संस्थेमध्ये आखल्या जात आहेत. शैक्षणिक क्षेत्रात बदल होऊ घातले आहेत. संगणक, माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे. हे बदल सर्वांनी स्वीकारणे गरजेचे आहे. शिक्षकांनी प्रथम हे बदल स्वीकारावेत. त्यानुसार आपल्या अध्यापन पद्धती बदलाव्यात म्हणजेच प्रत्येक घटकाला आपली गुणवत्ता सिद्ध करावी लागणार आहे. आपल्याकडचं ज्ञान हे अद्यावत ठेवावं लागणार आहे. एकंदरीत संस्थेचं आतापर्यंतचं काम फार चांगलं झालेलं आहे. त्यामुळेच संस्थेचा समाजाने गौरव केलेला आहे. शासनानं गौरव केलेला आहे, विविध पुरस्कार संस्थेला मिळालेले आहेत. म्हणून ही संस्था राजमान्य व समाजमान्य अशी संस्था झाली आहे. आव्हानं देखील आहेत. त्यादृष्टीने प्रयत्न सुरु आहेत. संस्थेचे सर्व सेवक त्यादृष्टीने काम करताहेत. यापुढेही संस्था याच प्रकारचे कार्य करत राहील अशी आशा आहे.

✦ ✦ ✦ ✦

सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज, कराड.
माजी विद्यार्थी सेवा संघ

स्थापना वर्ष : २००३ — नोंदणी क्र.: MH/8188/Satara.

ॲड.रविंद्र केशवराव पवार	अध्यक्ष
श्री.विलासराव गोविंदराव पाटील (वाठारकर)	उपाध्यक्ष
ॲड.सदानंद नारायण चिंगळे	उपाध्यक्ष
श्री.रामराव महादेव जाधव	कार्यकारी अध्यक्ष
श्री.सुमंत मुगुटराव जगताप	सचिव
श्री.बाळकृष्ण जयसिंग काळे	सहसचिव
श्री.मानसिंग गोविंदराव कदम	खजिनदार

श्री.नारायण धोंडिबा शिंदे	सदस्य	श्री.सत्यनारायण शिवराज मिनीयार.	सदस्य
श्री.मारूती हरी पाठक	सदस्य	श्री.राजेंद्र रायाप्पा कुंभार	सदस्य
सौ.सूर्यमाला प्रतापराव जाधव	सदस्य	सौ.मंगला सर्जेराव पवार	सदस्य
श्री.दत्तात्रय बाळकृष्ण रैनाक	सदस्य	श्री.विजयकुमार जनार्दन पाटील	सदस्य.
श्री.राजाराम तुकाराम पवार	सदस्य	श्री.डॉ.प्रकाश शंकर साळुंखे	सदस्य
श्री.अयुब सत्तार कच्छी	सदस्य	श्री.अशोक राजाराम यादव	सदस्य

मा.प्राचार्य के.एस.मोहिते

सहसचिव (उच्च शिक्षण), रयत शिक्षण संस्था, सातारा

शब्दांकन : प्रा.मानसिंग कदम, प्रा.वसंतराव निकम, प्रा. एस. टी. जाधव, प्रा.मुकुंद पोंधे

(स.गा.म.च्या जडणघडणीचे साक्षीदार आणि सध्याचे संस्थेचे सहसचिव प्राचार्य के.एस.मोहिते त्यांचे गुरुजन, मातापिता, चुलते, पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ.एन.डी.पाटील, प्राचार्य बॉरि.पी.जी.पाटील, प्राचार्या सौ.सुमतिबाई पाटील आणि प्राचार्य ए.बी.मगदूम यांना आपली प्रेरणास्थाने मानतात.)

तांदूळवाडीसारख्या खेडेगावची व शेतकरी कुटुंबाची पार्श्वभूमी असतानाही आपण उच्च शिक्षण पूर्ण केलेत. यापाठीमागे कोणाकोणाच्या प्रेरणा कारणीभूत ठरल्या ?

कोणतेही काम एखाद्या प्रेरणेशिवाय होत नाही याची मला पूर्ण जाणीव आहे. वास्तव अर्थाने पाहिल्यास माझे जे शिक्षक होते, मग ते यशवंत कांबळे असतील, सदाशिव थोरात असतील, आनंदा पाटील असतील, त्यांचे नि माझे घरचे संबंध होते. मला शाळेची गोडी लावण्याचं काम या शिक्षकांनी केलं. घरच्यांनी त्याला पाठिंबा दिला. यातून मी घडत गेलो. त्यामुळे माझे वडील, चुलते व माझे शिक्षक या सर्वांना त्याचं श्रेय द्यायला पाहिजे.

आपण आपल्या शैक्षणिक कार्यासाठी रयत शिक्षण संस्थाच का निवडली ?

माझ्या घरच्या मंडळींना सामाजिक कार्याची पहिल्यापासूनच ओढ होती. वडिलांना व चुलत्यांना कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याबद्दल एक प्रकारच आकर्षण होते. त्यामुळे रयत शिक्षण संस्थेचे आकर्षण केवळ मलाच नव्हे तर संपूर्ण घरालाच होते. भाऊराव पाटलांची काही वाक्ये बैठकीत बसता उठता माझे वडील व चुलते इतरांना ऐकवायचे आणि मग 'ही संस्था म्हणजे आपली संस्था' हा संस्कार लहानपणापासूनच होत गेला. या संस्थेतच घडत गेलो आणि जिथं घडलो तिथं काम करावं असं सहजपणे वाटत गेलं आणि त्या वाटण्यातूनच काम केलं हे सर्व योगायोगाने जुळून आलं.

आपण कोणकोणत्या शाखांमध्ये उच्चशिक्षण देण्याचे आणि शाखा विकासाचे काम केले आहे ?

माझी सुरुवात सोलापूर जिल्हयातल्या माढा येथील ग्रामीण भागातील महाविद्यालयामध्ये झाली. १९७० मध्ये हे महाविद्यालयच सुरु झालेलं. प्राचार्य भगरे यांनी तसा निरोप पाठवला व माझी कामाची सुरुवात झाली. माढ्यामध्ये मी १९७९पर्यंत काम केलं. मी त्या ठिकाणची वसतिगृह चालवणं, शेती विभाग पहाणं, बोर्डिंग पहाणं, लेबरस्कीमचा रेक्टर अशा सगळ्या प्रकारची कामं केली. अगदी दुष्काळाच्या परिस्थितही ही कामं मी यशस्वीपणे केली. त्यानंतर माझी कराडला बदली झाली. त्यावेळी कराडचे कॉलेज स्थापन होऊन जवळ जवळ २५ वर्षे झाली होती. तरी देखील तिथली सायन्स शाखा चांगली विकसीत झाली नव्हती. परंतु एस.जी.एम.चा स्टाफ हा फारच कार्यक्षम होता. त्यानंतर माझी दहिवडीला बदली झाली. नंतर पुन्हा मला एस.जी.एम.ला घेण्यात आलं. तेथून माझी कोल्हापूरला बदली झाली. कोल्हापूरहून मी इनचार्ज प्राचार्य म्हणून मलकापूरला गेलो. त्यानंतर रीतसर प्राचार्य म्हणून माझी महिला कॉलेज, उंब्रजला बदली झाली. पुढे पंढरपूरला प्राचार्य म्हणून बदली झाली आणि आता छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा येथे प्राचार्यपदाचे काम मी पहात आहे.

आणखी एखादे भरीव स्वरुपाचे शाखा उभारणीचे उदाहरण ?

भरीव काम जर म्हटलं तर त्याचे दोन विभाग केले पाहिजेत. एक म्हणजे प्राध्यापक म्हणून काम करत असताना व दुसरं प्राचार्य म्हणून काम करत असताना केलेलं काम. माढ्याला जे काम केलं ते एक प्राध्यापक म्हणून. त्या ठिकाणी रयत शिक्षण संस्थेची 'कमवा व शिका' योजना राबवताना, दुष्काळ असताना शासकीय मदत मिळवणं, शेतामध्ये विहिरी खोदणं, मुलांच्या-बरोबर स्वत: काम करणं हे मी जीव ओतून केलं. मलकापूरचं कॉलेज हे तसं नवीनच होतं. नॉन-ग्रँट होतं. अनेक प्रश्न होते. ते प्रश्न सोडविण्यासाठी मी नेतृत्व दिलं. इतरांच्या मदतीनं काम

करीत राहिलो. महिला महाविद्यालय उंब्रज इथं संस्थेच्या धोरणाला पूरक असं काम करीत राहिलो. मग ते इमारत बांधणीचं काम असेल, गावोगाव फिरण्याचं, देणग्या, धान्य गोळा करण्याचं काम असेल, असं सर्व प्रकारचं काम मी करत राहिलो. पंढरपूरच्या कॉलेजमध्ये काही स्थानिक प्रश्न होते. तिथं माझ्या नेतृत्वगुणांचा खरा कस लागला. पण मी कसोटीस उतरलो असं माझं प्रामाणिक मत आहे. छत्रपती शिवाजी कॉलेजच्या 'कमवा व शिका' योजनेतील विद्यार्थी हळूहळू कमी होत होते. मी प्राचार्य म्हणून आल्यानंतर या योजनेला नवं रुप देण्याचा प्रयत्न केला. म्हणजे जेथे गेलो तेथे कुवतीनुसार प्रमाणिकपणे काम करत राहिलो.

सद्गुरु गाडगे महाराज कॉलेजचा व आपला संबंध कधी व कसा आला ?

स.गा.म. कॉलेजचा संबंध तसं पाहता विद्यार्थी दशेमध्येच आला. पण फार काळ नाही. कोल्हापूरचं कीर्ती कॉलेज आपल्या संस्थेकडं आलं अन् मी तिकडे गेलो. स.गा.म. कॉलेजचा अन् माझा खऱ्या अर्थाने संबंध आला तो प्राध्यापक म्हणून. १६ जून १९७९ ला मी तिथं प्राध्यापक म्हणून रुजू झालो आणि १ ऑगस्ट १९९३ पर्यंत मी तिथं काम केलं. म्हणजे माझ्या उमेदीची १४ वर्षे मी तिथं काढली. त्यामुळे तिथल्या प्रत्येक गोष्टीचा मी साक्षीदार आहे आणि माझ्या जडणघडणीला कॉलेज साक्षीदार आहे.

स.गा.म. कॉलेजच्या जडणघडणीमध्ये आपले योगदान कोणते ?

स.गा.म. कॉलेजमध्ये त्यावेळी इतर कुठेही आढळणार नाही असं 'टीम वर्क' होतं. आजचं जे स.गा.म. कॉलेज आहे त्यापाठीमागे या 'टीम वर्क'चं योगदान आहे. आमची एक टीमच होती. कॉलेजच्या कामासाठी झोकून देण्याची वृत्ती होती. टीका होत होती. पण आम्ही एक होतो. प्राचार्य ए.बी. मगदूम यांनी खऱ्या अर्थाने नेतृत्व दिलं. एक काळ सायन्स बंद करण्यापर्यंत प्रशासन आलं होतं. कारण १३ मुलं व ११ स्टाफ अशी परिस्थिती. पण प्राचार्या सौ. सुमतिबाई पाटील ठामपणे आमच्या बाजूने होत्या. सायन्स शाखा टिकवण्याचं श्रेय त्यांनाच द्यावं लागेल. त्यावेळी श्री. आनंदराव चव्हाण केंद्रीय मंत्री होते. त्यांनी यू.जी.सी.च्या काही ग्रँटस् मिळवून दिल्या. त्यातून सायन्सची इमारत उभी राहिली. सांघिक काम हे मात्र स्टाफचं वैशिष्टय होतं. ते एस.जी.एम.च्या विकासाचं खरं कारण आहे.

या महाविद्यालयातील आपली एखादी संस्मरणीय आठवण ?

एस.जी.एम.चं वैशिष्ट्य म्हणजे तिथं होणारी गॅदरींग्ज आणि या गॅदरीग्जमध्ये विद्यार्थ्यांचा होणारा मुक्त संचार आणि त्या संचारावरील प्राध्यापकांचं नियंत्रण. याचे कटू आणि गोड जे प्रसंग होते ते आजही मला आठवतात. तिथं माझ्या सहकाऱ्यांचं नैतिक अधिष्ठान प्रभावी होतं. इतर ठिकाणी ते दुर्मिळ असतं.

आपण कर्मवीर भाऊराव पाटील यांची विचारसरणी व तत्त्वज्ञान यांचा कशाप्रकारे पाठपुरावा केला ?

माणसाला कार्य करण्यासाठी प्रेरणा हव्या असतात. आदर्श डोळ्यासमोर ठेवावे लागतात. तसे आदर्श मी डोळ्यासमोर ठेवले. बौद्धिक क्षेत्रामध्ये मी बॅ. पी.जी.पाटील व सौ. सुमतिबाई पाटील यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवला. माझ्या वैचारिक जडणघडणीवर संस्थेचे चेअरमन मा. एन्. डी. पाटील यांचा प्रभाव आहे. माझ्या प्रशासकीय कार्याची प्रेरणा मी प्राचार्य ए.बी. मगदूम सर यांच्याकडून घेतली. या सर्व व्यक्ती माझे प्रेरणास्त्रोत आहेत.

आपल्या कार्यामध्ये आपल्या सौभाग्यवतीची साथ आपणास लाभली काय ?

सामाजिक काम करणाऱ्या माणसासाठी वेळ काळ नसतो. त्याने काम करायचं असतं. घड्याळाप्रमाणे काम करणाऱ्यांकडून फारसं काम होत नाही. त्यासाठी वेडं व्हावं लागतं. असा वेडेपणा कधी-कधी केला. हा वेडेपणा माझ्या सौभाग्यवतीने सहन केला. कधी तक्रार केली नाही, तिची साथ नसती तर असं काम करता आलं नसतं.

आपणास उत्तम प्रशासक घडविण्यामध्ये स.गा.म.कॉलेजचा वाटा कितपत आहे ?

योगायोगानं मी स.गा.म. कॉलेजला काम करत असताना मा.ए.बी.मगदूम सर तिथं प्राचार्य होते. त्यांचं माझ्याकडे विशेष लक्ष असायचं. जी.आर. कसा वाचावा, निर्णय कसा घ्यावा, जबाबदाऱ्या कशा पार पाडाव्यात हे ते समजावून सांगायचे. जबाबदारीसाठी कधी संधी देवून बघायचे तर कधी परीक्षा घ्यायचे. चुकल्यास समजावून सांगायचे. खोटं न बोलता आपल्याला जे सांगायचं ते कसं सांगायचं आणि आपला मुद्दा कसा पटवून द्यायचा ही कला त्यांच्याकडून शिकलो. त्यांची प्रशासकीय तंत्रे मला आजही उपयोगी पडतात.

सहसचिवपदी अभिनंदनीय निवड ही आपल्या कार्याची व संस्थेवरील निष्ठेची पावतीच म्हणावी लागेल ना ? या काळातील प्रशासकीय कार्याविषयी आपले मनोगत...

माझी संस्थेच्या उच्चशिक्षण सहसचिवपदी निवड झाली, त्याबद्दल मी आनंदी आहे. परंतु अशी अनेक माणसे संस्थेमध्ये आहेत की जी चांगलं काम करीत आहेत, परंतु त्यांना संधी मिळाली नाही. धोरणात्मक निर्णय घेणाऱ्यांनी मला संधी दिली ते काम पाहूनच. मी माझं काम प्रामाणिकपणे केलं, करीत आहे व

करीत राहीन.संस्थेसमोर उदारीकरणामुळे व जागतिकीकरणामुळे अनेक आव्हाने आहेत. त्यामुळे गुणवत्तावाढीशिवाय पर्याय नाही. या कार्यासाठी आपल्याला काय योगदान देता येईल याचाच विचार मी करतो.

तुमच्या काळातील स.गा.म. आणि आताचे स.गा.म. याविषयी आपली प्रतिक्रीया काय ?

त्या काळातील स.गा.म. व या काळातील स.गा.म. यामध्ये फार काळ गेला असं मी मानत नाही. त्या काळात आमच्यात बौद्धिक चर्चा व्हायच्या. आपलं ज्ञान अद्ययावत कसं ठेवावं याचे प्रयत्न व्हायचे, आताचे स.गा.म. भौतिकदृष्ट्या खूपच सुधारलेले आहे. आता गुणवत्तेच्या सुधारणेची गरज आहे.

आता शेवटचा प्रश्न. रयत शिक्षण संस्थेच्या आजच्या स्वरुपाबद्दल आणि उच्च शिक्षणाबद्दल आपणास काय वाटते ?

जागतिकीकरण प्रक्रियेमुळे उच्च शिक्षणाबाबत अनेक आव्हाने उभी राहिली आहेत. या आव्हानांना आपण कसे तोंड देतो त्यावर आपले अस्तित्व अवलंबून असणार आहे. कर्मवीरांच्या पुण्याईवर मात्र आपण इथवर आलो आता बदलत्या काळानुसार आपण सतर्क रहाणं ही काळाची गरज आहे. आजचे युग ज्ञानाचे युग आहे. आपल्याला आपलं ज्ञान अद्ययावत ठेवावं लागेल. खाजगी क्षेत्रातच फक्त रोजगाराच्या संधी आहेत. तिथं फक्त निवडक माणसेच घेतली जातात. मग गरीबांचं काय ? अशा गरीब विद्यार्थ्यांना योग्य त्या भौतिक व शैक्षणिक सुविधा देवून त्यांना आपल्या पायांवर उभं करणं ही रयत शिक्षण संस्थेची भूमिका आहे आणि ती योग्य आहे. त्यादृष्टीने संस्था विविध प्रयोग करीत आहे. स्पर्धेला तोंड देणारी शैक्षणिक केंद्रे उभारण्यासाठी पुणे व मुंबई येथे जागा खरेदी केली आहे. तळागाळातल्या विद्यार्थ्यांना शिक्षण हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून अण्णांनी संस्थेची निर्मिती केली. त्याला अनुसरुनच आपण सर्व सेवकांना काम करावे लागणार आहे. एवढेच या निमित्ताने मला सांगावेसे वाटते.

✦ ✦ ✦ ✦

यशोदीप सामाजिक विकास संस्था

४३६, सह्याद्रि भवन, मार्केट यार्ड रोड, शनिवार पेठ, कराड. फोन व फॅक्स : २२०१८६

संस्थेतील उपक्रम

१) **कृषि पदवी - स्थापना सन २०००**
शैक्षणीक अहर्ता : १२ वी विज्ञान जीवशास्त्र विषयासह, प्रशिक्षण कालावधी : ४ वर्ष, प्रवेश क्षमता : ९६, शाखा : कृषि महाविद्यालय, सरळगांव, कल्याणनगर हायवे, ता.मुरबाड,जि.ठाणे, फोन : ०२५२४-२४०७७०

२) **कृषि पदवीका - स्थापना १९९९**
शैक्षणीक अहर्ता : १० वी पास, प्रशिक्षण कालावधी : २ वर्ष ६ महिने, प्रवेश क्षमता : ६०, शाखा : कृषि महाविद्यालय, सरळगांव, कल्याणनगर हायवे, ता.मुरबाड,जि.ठाणे, फोन : ०२५२४-२४०७७९

३) **प्रयोगशाळा तंत्रज्ञ - स्थापना १९९८**
प्रवेश अहर्ता : १२ वी पास/नापास, प्रवेश क्षमता : ४०, शाखा : प्राचार्य डी.एन.एल.टी. कॉलेज, सायन्स कॉलेज शेजारी, विद्यानगर कराड, फोन : ०२१६४ २७२३१६

४) **दुग्धव्यवसाय व्यवस्थापन व पशुसंवर्धन अभ्यासक्रम**
शैक्षणिक अहर्ता : १० पास, प्रशिक्षण कालावधी : २ वर्ष, प्रवेश क्षमता : ६०, शाखा : प्राचार्य दुग्धव्यवसाय व्यवस्थापन व पशुसंवर्धन पदवीका, श्री साईबाबा कॉर्नर कोपरगांव, जि.अहमदनगर, फोन : ९४२२०७६३५७, शाखा : प्राचार्य दुग्धव्यवसाय व्यवस्थापन व पशुसंवर्धन पदवीका, एस.टी.स्टॅण्डशेजारी, कडेगांव, जि.सांगली, फोन : ०२३४७२५२४८२, शाखा : प्राचार्य दुग्धव्यवसाय व्यवस्थापन व पशुसंवर्धन पदवीका, सरळगांव, ता.मुरबाड, जि.ठाणे, फोन : ०२५२४२४०७७०, शाखा : प्राचार्य दुग्धव्यवसाय व्यवस्थापन व पशुसंवर्धन पदवीका, विद्यानगर, कराड, जि.सातारा. फोन : ०२१६४२७२३१६

५) **माध्यमिक विद्यालय**
शाखा : प्रेरणा विद्यानिकेतन, स्थापना - १९९८, इ. ५ वी ते १० वी, मराठी माध्यम, निवासी शाळा, सायन्स कॉलेजशेजारी, विद्यानगर, कराड. ता.कराड,जि.सातारा. फोन : ०२१६४२७२३१६, शाखा : माध्यमिक विद्यालय, गोपूज, स्थापना - १९९६, इ. ८ वी ते १० वी, मराठी माध्यम शाळा, मु.पो.गोपुज, ता.खटाव, जि.सातारा. फोन : ०२१६१ २८६६९०

६) **पशुधन व्यवस्थापन अभ्यासक्रम**
शैक्षणिक अहर्ता : १० वी पास/नापास, प्रवेश क्षमता : २०, प्रशिक्षण कालावधी : १ वर्ष, शाखा : पशुधन व्यवस्थापन अभ्यासक्रम, सायन्स कॉलेजशेजारी, विद्यानगर, कराड. फोन : ०२१६४ २७२३१६

७) **यशोदीप ग्रामीण बिगरशेती सह. पतसंस्था मर्या, विद्यानगर कराड**

टीप - वरील सर्व अभ्यासक्रम ज्या विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रामध्ये आहे, त्या विद्यापीठाशी अथवा शासनमान्य मंडळाशी संलग्न असून मान्यताप्राप्त आहेत. प्रवेशासाठी शासकीय नियमानुसार आरक्षण लागू आहे. व्यवस्थापन कोट्यातील प्रवेशासाठी संस्था कार्यालयाशी संपर्क साधावा.

श्री संतकृपा शिक्षण संस्था

श्री संतकृपा कॉलेज ऑफ फार्मसी

घोगाव (शिवाजीनगर)
ता.कराड,जि.सातारा, पिन : ४१५१११, फोन : (०२१६४) २५७४०४
ई-मेल : santkrupass@rediffmail.com

❖ संस्थापक चेअरमन ❖
मा.श्री.अशोकराव भावके

❖ प्राचार्य ❖
श्री.जडगे डी.आर.

सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज यांच्या सुवर्ण महोत्सव वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा

राजारामबापू सहकारी बँक लि., पेठ.

संस्थापक : लोकनेते राजारामबापू पाटील

मार्गदर्शक : मा.नाम.जयंतराव पाटील, अर्थ व नियोजन मंत्री, महाराष्ट्रराज्य

दिनांक ०२.०१.२००४ अखेरची सांपत्तीक स्थिती

१. भाग भांडवल ..... १४५.९७ लाख
२. राखीव व इतर निधी ..... २५५१.०६ लाख
३. ठेवी ..... २७५००.४४ लाख
४. कर्जे ..... १८०७१.५७ लाख
५. निव्वळ नफा (३१.०३.२००३) .. ४७६.४५ लाख

बँकेची ठळक वैशिष्ट्ये

- देशातील प्रमुख ठिकाणी डिमांड ड्राफ्ट देणेची सुविधा.
- बँकेच्या एकुण २४ शाखा व २ विस्तारीत कक्ष कार्यरत.
- बँकेच्या सर्व शाखामध्ये संगणकाचा पूर्ण वापर.
- बँकेची स्वतःची प्रशिक्षणाची व्यवस्था.
- सभासदांना १५ % लाभांश जाहिर.
- ज्येष्ठ नागरिकांना ठेवीवर ०.५ % ज्यादा व्याज.
- नियमीत कर्जदारांना कर्जपरतफेडीमध्ये १ % सुट
- सवलतीच्या १२ % व्याजदराने समान मासिक हप्त्यावरील (EMI) कर्जाची सोय.

श्री.आर.एस.जाखले, कार्यकारी संचालक — श्री. जनार्दन पाटील, व्हा.चेअरमन — प्रा. शामराव पाटील, चेअरमन

व संचालक मंडळ

मे. मुनीर अजीज सुतार

JOHNSON Not just tiles Lifestyles

Marbonite

Porselano

Bell CERAMIC LIMITED

Crabtree

Frattini Italian Bath Fittings

कोटा, कडप्पा, मार्बल, ग्रॅनाइट, जॉनसन टाईल्स, बेलसिरॅमिक्स, सॅनिटरी वेअर्स आणि बाथरूम फिटींग्ज

३८३/११, शनिवार पेठ, मार्केट यार्ड, कराड - ४१५११०. फोन : (०२१६४) २२४४८६, २२५४८६

सत्यम

ELECTRONICS

Authorise Dealer Sales & Service

ONIDA PHILIPS

CROWN

VOLTAS Air Conditioners

Carrier Air Conditioners

97, Raviwar Peth, KARAD-415110.
Dist. Satara.

S.K.VYAS
GIRISH VYAS

Phone : (02164) 22334

रजि.नं. २९४८३ (तारीख २३-९-१९६१)
से.टॅ.नं.एन.२६के.११७ (ता.१-१०-१९६७)
फोन : २६६३४८ शिवनगर

कृष्णा साखर कामगार सह.सेवा मंडळ मर्यादित,
शिवनगर (रेठरे बु ।।) ता. कराड, जि. सातारा.

संस्थेची सांपत्तीक स्थिती खालीलप्रमाणे

सभासद संख्या २८६१
वसुल भागभांडवल ..... रू. १ कोटी ६३ लक्ष ६ हजार
फंडस ..... रू. १ कोटी २ लक्ष ५९ हजार
ठेवी ..... रू. ४३ लक्ष २८ हजार
गुंतवणुक ..... रू. २३ लक्ष ३३ हजार
नफा ..... रू. ११ लक्ष ३ हजार
वार्षिक उलाढाल ..... रू. ३ कोटी ७१ लक्ष ८७ हजार

संस्था सभासदांच्यासाठी व ग्राहकांचेसाठी खालील विभाग चालवित.

व्यवहार - कर्ज विभाग, किराणा, कापड, भांडी, स्टेशनरी, स्वस्तधान्य, दुध विभाग, चक्की विभाग, टायर विभाग, गाडीवान विभाग

श्री. बाजीराव थोरात, व्हा. चेअरमन — **पै. आनंदराव मोहिते**, चेअरमन

संचालक मंडळ व कर्मचारी

श्री. उदय चव्हाण- अ.सि.सेक्रेटरी

मा.प्राचार्य प्र.आ.तथा आप्पासाहेब पानवळ

शब्दांकन : प्रा.नारायण पाटील, प्रा.सुमंत जगताप, प्रा.राम जाधव

प्रश्न : आपण खळे, ता. पाटण येथील अशिक्षीत शेतकऱ्याच्या घरी जन्म घेऊनही उच्च शिक्षण पूर्ण केले, ही गोष्ट अभिमानास्पद आहे! या पाठीमागे कोण-कोणत्या प्रेरणा कारणीभूत ठरल्या ?

उत्तर : प्रथम मला माझ्या आई-वडिलांची प्रेरणा लाभली. तसेच वडीलांची बहीण श्रीमती गुणवंताबाई सूर्यवंशी या प्राथमिक शिक्षिका असल्यामुळे त्यांचीही प्रेरणा मिळाली. माझे आई-वडील अंगठेबहादूर असले; तरी आमच्या आत्यांचे सहकार्य खूप लाभले. माझे मामा 'शंकर बहिणाजी सावंत' रा. धामणी हेही प्राथमिक शिक्षक असल्यामुळे त्यांनाही वाटत होते की, आपल्या बहिणीच्या मुलाने खूप शिकावे. अशा प्रकारे माझ्या पाठीमागे माझे आई-वडील, मामा व आत्यांची प्रेरणा होती.

सातवी पर्यंतचे शिक्षण घेतल्यानंतर माझ्या वडिलांना असे वाटत होते की, मुलाने आता शिक्षकाची नोकरी करून आर्थिक ओढाताणीमध्ये हातभार लावावा. परंतू आत्यांच्या सहकार्यामुळे मी 'दानशूर बंडो गोपाळा कदम' मुकादम यांनी 'कूसुर' ता. कराड येथे सुरू केलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या विद्यालयात प्रवेश घेतला. माझी एस.एस.सी. कुसूर हायस्कूल मध्ये झाल्यानंतर मी त्यावेळचे कराडचे सुप्रसिद्ध ॲडव्होकेट 'आनंदराव चव्हाण' यांच्याकडे सल्ला घेण्यासाठी गेलो. त्यांनी मला असा सल्ला दिला की, तू पुढील शिक्षणासाठी कोल्हापूरच्या 'राजाराम महाविद्यालयात' जा. कारण ते सरकारी कॉलेज असल्यामुळे तेथे हुशार मुलांना स्कॉलरशिप दिली जाते. तेव्हा तुला चांगला अभ्यास करून मिळणाऱ्या स्कॉलरशिपद्वारे शिक्षण घेता येईल. तेव्हा मी 'राजाराम कॉलेज' मध्ये गेलो. आणि तेथून 'इतिहास' हा विषय घेऊन बी.ए. पास झालो. नंतर मी ठरविले की, हायस्कूलमध्ये नोकरी करत, कोल्हापूर येथेच (LL.B.) करावयाची. परंतु माझ्या प्राध्यापकांनी मला सांगितले की तुझी आर्थिक परिस्थिती चांगली असली तरच तू एलएल.बी. कर अन्यथा तू एम.ए. कर. माझी आर्थिक परिस्थिती चांगल्या प्रकारची नसल्यामुळे एलएल.बी. चे खूळ तात्पुरते डोक्यातून काढून टाकले.

प्राध्यापकांच्या सल्ल्यानुसार एम.ए. च्या शिक्षणासाठी मी मुंबईला गेलो. मुंबई विद्यापीठात एम.ए. इतिहास या वर्गात प्रवेश घेतला. एम.ए. ला द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झालो. ज्या 'रयत शिक्षण संस्थेच्या हायस्कूलमुळे माझी आर्थिक परिस्थिती चांगली नसताना देखील मला शिक्षण घेता आले, त्या संस्थेत मी इतिहासाच्या प्राध्यापकाची नोकरी, सातारा येथील 'शिवाजी कॉलेजमध्ये' स्विकारली.

अशा तऱ्हेने माझे आई-वडील, मामा व आत्यांची तसेच कुसूर हायस्कूलचे मुख्याध्यापक मा. बापूसाहेब येडेकर यांची मला प्रेरणा मिळाली.

प्रश्न : आपल्या माता-पित्यांची भूमिका कोणती ?

उत्तर : माझे आई-वडील निरक्षर असले तरी आपल्या मुलाने खूप शिकावे अशी त्यांची भूमिका होती. तसेच, माझ्या शिक्षणासाठी माझ्या आई-वडिलांनी खूप कष्ट घेतले.

प्रश्न : आपण डॉ. कर्मवीर अण्णांच्या रयत शिक्षण संस्थेकडे आकर्षित होण्याचे काय कारण होते ?

उत्तर : कराडला अनेक हायस्कूल्स असली तरी तेथे खोली घेऊन रहाणे व खानावळीत जेवण घेणे, या खर्चाची आर्थिक कुवत नसल्यामुळे शक्य नव्हते. जर 'कुसूर' येथे रयत शिक्षण संस्थेचे स.गा.म.विद्यालय नसते तर मला हायस्कूलचे शिक्षणही घेता आले नसते.

प्रश्न : संस्थेच्या कोण-कोणत्या शाखांमध्ये शाखाप्रमुख म्हणून काम केले आहे ?

उत्तर : सन १९५९ ते १९६६ या कालावधीत रयत शिक्षण संस्थेत इतिहासाचा नामवंत प्राध्यापक म्हणून मान्यता.

सन १९६६ ते जुलै १९९३ पर्यंत एकूण २७ वर्षे, रयत शिक्षण संस्थेच्या खालील कॉलेज मध्ये शाखाप्रमुख म्हणून कारकीर्द पार पाडली.

१) अण्णासाहेब आवटे कॉलेज, मंचर जि.पुणे
२) बळवंत कॉलेज, विटा जि. सांगली
३) कर्जत कॉलेज, कर्जत जि. अहमदनगर
४) रा.ब.नारायणराव बोरावके, कॉलेज, श्रीरामपूर जि. अहमदनगर

५) पंढरपूर कॉलेज, पंढरपूर. जि. सोलापूर

६) स.गा.म.कॉलेज, कराड. जि. सातारा

या महाविद्यालयातून एक खंबीर, गुणग्राही, न्यायी आणि विश्वासपात्र प्राचार्य म्हणून ख्याती.

प्रश्न : स.गा.म.कॉलेज मध्ये काम करीत असताना आपण काही प्रकल्प राबविले आहेत काय ?

उत्तर : स.गा.म.कॉलेज मध्ये काम करीत असताना 'व्होकेशनल' वर्गाची इमारत व 'सायन्स' च्या इमारतीचा दुसरा मजला, तसेच क्रीडा विभागातील कुस्तीसाठी लागणारी मॅट व एन.सी.सी. च्या मुलांसाठी ऑबस्टॅकल्स कोर्सची सोय उपलब्ध करून दिली. तसेच उन्हाळ्यात कॉलेजमध्ये पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी पाच 'बोअरवेल्स' काढल्या. त्यापैकी दोन विहिरींना चांगल्या प्रकारे पाणीही लागले.

प्रश्न : स.गा.म.चे विद्यार्थी व सेवक यांच्याविषयी आपले मत काय आहे ?

उत्तर : माझे मत अतिशय चांगले आहे. तसेच जून १९९१ ते जुलै १९९३ या दोन वर्षात ९५ % टक्के विद्यार्थी व सेवक वर्गाचे महाविद्यालयाचे कामकाज उत्तम प्रकारे चालविण्यासाठी मला चांगले सहकार्य लाभले.

प्रश्न : आपल्या कार्यात आपल्या सौभाग्यवती आणि मुलांचे सहकार्य आपणास मिळाले असेलच ? याविषयी आपण काय सांगू इच्छिता ?

उत्तर : मी हाती घेतलेले काम चांगल्या प्रकारे झाले पाहिजे असे मला वाटायचे. त्यामुळे घराकडे आणि आमच्या मुलांकडे मला लक्ष देता येत नसे. माझी पत्नी सौ. शकुंतला पानवळ हिनेच मुलांचे शिक्षण अभ्यास, आरोग्य, याकडे लक्ष देऊन, त्यांच्यावर उत्तम संस्कार केले. त्यामुळेच मी माझ्या कल्पनेप्रमाणे काम करू शकलो. तसेच मुलांनी देखील वडील प्राचार्य आहेत या अहंपणाने न वागता आज्ञाधारक, नम्रपणाने व शिस्तबद्ध वर्तन ठेवले. मुलांचेही सहकार्य मला चांगल्या प्रकारे लाभले आहे.

प्रश्न : संस्थेमध्ये कार्यरत असताना आपण अनेक वैशिष्ट्यपूर्ण प्रकल्प राबविले; त्याची दखल घेऊन मंचर आणि आंबेगाव तालुक्यातील जनतेने आपणास 'वृक्षमित्र' हा किताब प्रदान केला. याबद्दल आपले अभिनंदन! परंतू काही प्रकल्प राबवायचे राहून गेले असतील तर ते कोणते ?

उत्तर : 'मंचर' कॉलेजमध्ये काम करत असताना तेथे १०० एकर जागा सरकारकडून मिळवून त्या जागी 'फलोद्यान आणि वनीकरण' हा प्रकल्प चांगल्या प्रकारे राबविला, परंतु हा प्रकल्प मला महाराष्ट्र राज्यातच नव्हे तर संपूर्ण देशभरात पहील्या नंबरचा आदर्श प्रकल्प म्हणून नावारूपास आणावयाचा होता. परंतू माझी तेथून बदली झाल्यामुळे तो प्रकल्प राबविण्याचे राहून गेले.

प्रश्न : संस्थेच्या भावी वाटचालीविषयी आपल्या काही आदर्श कल्पना आहेत काय ?

उत्तर : मी जनता-जनार्दनाच्या सहकार्याने कर्मवीरांची तत्त्वे; संस्थेने मला ज्या-ज्या ठिकाणी शाखाप्रमुख म्हणून काम करण्याची संधी दिली, त्या-त्या ठिकाणी माझ्या कुवतीनुसार प्रामाणिकपणाने राबविण्याचा प्रयत्न केला. माझ्या निवृत्तीनंतर संस्थेचे जे पदाधिकारी आणि सेवक असतील; त्यांना त्यांच्या कल्पनेप्रमाणे काम किंवा वाटचाल करता यावी, म्हणून मी संस्थेशी फारसा संबंध ठेवला नाही.

प्रश्न : 'बलशाली भारत होवो' यासाठी आपल्या मनातील काही संकल्पना ?

उत्तर : भारत हा देश अविकसित, मागासलेला, गरीब, दरिद्री रहाण्याऐवजी तो बलशाली करावयाचा असेल तर; भारतातील कोणत्याही धर्माच्या, पंथाच्या, जातीच्या, भाषेच्या, वंशाच्या नागरिकाने ध्येयवादी, शिस्तशीर आणि वैज्ञानिक दृष्टीकोन स्विकारून कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय असा सर्वांगीण विकास करण्याची प्रवृत्ती स्विकारणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे दैववाद, धर्मभोळेपणा, अंधश्रद्धाळूपणा सोडून देऊन भारतातील सर्व नागरीक ही भारत मातेचीच लेकरे असल्यामुळे ते कोणत्याही धर्माचे, जातीचे, भाषेचे असले तरी त्यांच्याशी भ्रातृभावाने, प्रेमाने आणि जिव्हाळ्याने वागणे आवश्यक आहे. माझ्यामध्ये जी शक्ती, बुद्धी आणि क्षमता आहे, तिचा जास्तीत जास्त वापर करून माझ्या देशाचा सर्वांगीण विकास करण्याची भावना मनात ठेवली पाहिजे. 'माता आणि मातृ-भूमी ही मला स्वर्गापेक्षाही श्रेष्ठ वाटली पाहिजे,' हा विचार या देशातील बहुसंख्य नागरीक जर आपल्या कृतीत आणतील तर भारत देश पूज्य 'साने गुरूजींनी म्हटल्याप्रमाणे 'बलसागर' होईल. आणि या जगामध्ये सर्वांना प्रभावित करणारा असा शोभून राहील.

प्रश्न : सेवानिवृत्तीनंतर आपण कोणते प्रकल्प हाती घेतले आहेत ? व त्याबाबत आपण समाधानी आहात काय ?

उत्तर : सेवा-निवृत्तीनंतर मी समाज-प्रबोधनाचा प्रकल्प हाती घेतला आहे. व त्यात मी खूप समाधानी आहे.

✦ ✦ ✦ ✦

सद्‌गुरु गाडगे महाराज कॉलेज : काही आठवणी

श्रीमती सुमतिबाई पांडुरंग पाटील
माजी अध्यक्षा, महाराष्ट्र लोकसेवा आयोग
कर्मवीर छाया, पारसनिस कॉलनी, सातारा

रयत शिक्षण संस्थेच्या सेवेतील सर्वात अधिक काळ १९६४ ते १९७२ म्हणजे आठ वर्षाचा काळ माझा सद्‌गुरू गाडगे महाराज महाविद्यालयाच्या सेवेत गेला. १९६४ साली ते कॉलेज थोडेफार प्राथमिक अवस्थेत होते त्यामुळे बऱ्याच गोष्टी सुरू करणे आवश्यक होते. त्यावेळी तेथे फक्त कला व वाणिज्य शाखा चालू होत्या.

१९५९ ते १९६४ पर्यंत साताऱ्याच्या छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये एम.ए.(एंटायर) इंग्रजी वर्ग चालू होते. आमची तेथून बदली झाल्याने हे वर्ग बंद होण्याचा धोका निर्माण झाला होता. आमची अडचण ओळखून व विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी त्यावेळच्या शिवाजी विद्यापीठाच्या माननीय कुलगुरूंनी कराड येथे एम.ए चे वर्ग सुरू करण्याची परवानगी दिली. त्याप्रमाणे जून १९६४ पासून सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेजमध्ये शनिवार व रविवार एंटायर इंग्रजीचे वर्ग सुरू झाले. त्यामुळे नोकरी करून शिकणारे कराडच्या परिसरातील अनेक विद्यार्थी या वर्गाचा फायदा घेऊ लागले.

या काळात कराडमध्ये निरनिराळ्या शिक्षण संस्थांमध्ये एक प्रकारच्या स्पर्धेचे वातावरण होते. त्याचप्रमाणे निरनिराळ्या आव्हानांनाही आम्हाला तोंड द्यावे लागले.

११ डिसेंबर १९६७ ची पहाट झाली तीच मुळी कोयनेच्या भूकंपाचा जबरदस्त धक्का घेऊन ! उजाडल्यानंतर मनुष्यहानी व वित्तहानीच्या बातम्या येऊ लागल्या. कॉलेजचे बहुसंख्य विद्यार्थी कराड, पाटण तालुक्यातील असल्यामुळे जवळ जवळ एक दोन आठवडे शाळा कॉलेजिस ओस पडली. वातावरण हळूहळू पूर्ववत होऊ लागल्यानंतर, विद्यार्थ्यांनी एक नाटकाचा प्रयोग करून, ती रक्कम आम्ही भूकंपग्रस्तांच्या मदतीसाठी पाठवून दिली. त्यानंतरही कित्येक महिने कमी अधिक तीव्रतेचे भूकंपाचे धक्के, भूकंपाची आठवण देत राहिले.

महाविद्यालयात विद्यार्थ्यांची संख्या वाढत होती. असणारे वर्ग अपुरे पडू लागले. नवीन खोल्या बांधण्याची गरज तीव्रतेने भासू लागली. असलेल्या तुटपुंज्या रक्कमेतूनच नवीन बांधकाम सुरू करून मुख्य इमारतीचा संपूर्ण दुसरा मजला बांधून पुरा करण्याचा मी निश्चय केला. हे बांधकाम सुरू असतांना दानशूर कै. बंडो गोपाळा मुकादम (कदम) उर्फ तात्या यांची बहुतेक दररोज कॉलेजवर फेरी असे. ते बांधकाम पाहत उभे राहत. त्यावेळी कॉलेजमध्ये मुलांचे वसतिगृह होते. पण मुलींच्यासाठी ती सोय नव्हती. याच वेळी कै. तात्यांच्या मनात मुलींचे वसतिगृह बांधण्याची कल्पना घोळू लागली. कै. तात्यांच्या कृपेने सुरू झालेल्या या इमारतीने आज भव्य रूप धारण केले आहे. आज मुलींच्या वसतिगृहाची ही इमारत दिमाखाने उभी आहे आणि त्याचबरोबर तिने कै. तात्यांचेही नाव अजरामर केले आहे.

आमची कला व वाणिज्य शाखेच्या प्रगतीच्या दृष्टीने संथपणे वाटचाल चालू असतांना एक जबरदस्त आव्हान आमच्यासमोर येऊन उभे राहिले. पूर्वी आम्ही ऐकत होतो की रयत शिक्षण संस्थेचे व्यवस्थापन व शेजारच्या शिक्षण संस्थेचे व्यवस्थापन यांच्यामध्ये अनौपचारिक चर्चा होऊन असे ठरले होते की त्यांनी फक्त शास्त्र शाखा चालू ठेवावयाची व रयत शिक्षण संस्थेने फक्त कला व वाणिज्य शाखेवर लक्ष केंद्रित करावयाचे, कोणीही दुसऱ्या शाखेमध्ये हस्तक्षेप करायचा नाही. त्याप्रमाणे काही वर्षे हे काम चालू राहिले. पण आता आम्हांला असे कळले की शेजारची शिक्षण संस्था कला व वाणिज्य शाखा सुरू करण्याचा विचार करीत आहे. नंतर आम्हाला असेही कळले की त्या सुरू करण्याचा त्यांचा निर्णय पक्का झाला आहे. त्यामुळे आम्ही अत्यंत अस्वस्थ झालो. त्यांचा निर्णय ठाम आहे असे दिसून आले. त्यांना कला व वाणिज्य शाखा सुरू करणे अवघड नव्हते. पण आम्हाला शास्त्र शाखा सुरू करण्यासाठी अनेक आर्थिक व इतर अडचणींना तोंड द्यावे लागणार होते. पण अशावेळी स्वस्थ बसणे म्हणजे आमच्या कला व वाणिज्य महाविद्यालयाचे मरण स्वतःच्या डोळ्यांनी पाहण्यासारखे होते, म्हणून मी सहकाऱ्यांचा विचार घेऊन शास्त्र शाखा सुरू करण्याचा निर्णय घेतला व त्यानुसार संस्थेचे त्यावेळचे चेअरमन भाऊसाहेब नलवडे व मानद सचिव मुल्लासाहेब यांना परिस्थितीची व संभाव्य धोक्याची कल्पना तपशिलवार सविस्तर पत्र लिहून दिली व शास्त्र शाखा सुरू करण्याची परवानगी मिळावी अशी विनंती केली. त्यांनी ताबडतोब माझी ही विनंती मान्य केली.

एकदा हा निर्णय झाल्यानंतर आम्ही पुढच्या तयारीला लागलो. संस्थेच्या निरनिराळ्या शास्त्र महाविद्यालयातील उत्तमोत्तम तरूण प्राध्यापकांची बदली करून घेतली. सातारा येथील शास्त्र शाखेमध्ये पहिल्या वर्गात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना कराड येथे प्रवेश दिला व नवीन येणारे विद्यार्थी सुद्धा इकडे वळवले व विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे आवश्यक असलेल्या विद्यार्थी संख्येची पूर्तता केली. नेमलेली प्राध्यापक

मंडळी प्रयोगशाळेची व इतर आवश्यक गोष्टींची पूर्तता करण्यात गुंतलेली होती. अशाप्रकारे शास्त्र शाखेची सुरूवात झाली.

दरम्यानच्या काळात आम्ही विद्यापीठ अनुदान मंडळाकडे, शास्त्र शाखेसाठी असलेल्या अनुदानासाठी अर्ज केला होता. त्या काळात कराडचे सुपुत्र खासदार आनंदराव चव्हाण हे केंद्रीय मंत्रिमंडळात राज्यमंत्री होते. त्यांना आम्ही विद्यापीठ अनुदान मंडळाकडून या अनुदानासाठी ताबडतोब मंजुरी मिळविण्यासाठी विनंती केली. त्यांनी त्या कार्यालयाशी संपर्क साधून तातडीने ही मंजुरी मिळविली. पण अनुदान मिळाले तरी काही टक्के अनुदानाची रक्कम आम्हांला जमविणे जरूरीचे होते. त्यासाठी विद्यार्थ्यांनी कराड शहरामध्ये नाटकाचा प्रयोग करून, काही रक्कम जमविली. मी स्वतः काही सहकाऱ्यांसह कराड शहरामध्ये व व्यापारी पेठांमध्ये फिरून देणगी जमविण्यासाठी प्रयत्न केला. त्यावेळी गावातील व्यापारी वर्गाचा प्रतिसाद उत्तम होता. या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे आमचा उत्साह द्विगुणीत झाला. कराड शहरातील सर्व थरातील लोकांनी या शास्त्र शाखेच्या बांधकामासाठी भरघोस मदत केली. प्राध्यापकांनी आपले एक महिन्याचे वेतन यासाठी देऊ केले. अशा अनेक प्रकारे आम्ही जरूर असलेली रक्कम जमा केली. विद्यापीठ अनुदान मंडळाची अनुदानाची मंजूरी आल्याबरोबरच आम्ही शास्त्र शाखेच्या इमारतीचे बांधकाम सुरू केले होते. ही इमारत हळू हळू आकार घेऊ लागली होती. शास्त्र शाखेची तरूण प्राध्यापक मंडळी उत्साहाने आपापली प्रयोगशाळा सुसज्ज करण्यामध्ये दंग झालेली होती. शास्त्र शाखेची इमारत आता हळूहळू विद्यार्थ्यांना शास्त्र शाखेकडे आर्कषून घेऊ लागली होती. ही संख्या वाढत चालली आणि आज शास्त्र शाखेचे बऱ्याच विषयांचे स्पेशलचे वर्ग तेथे चालू आहेत. काही विषयांचे पदव्युत्तर वर्गही सुरू झाले होते. या शाखेकडे विद्यार्थ्यांचा लोंढा चालूच आहे. एक आव्हान म्हणून रूजविलेल्या बीजाचा इतका प्रचंड वृक्ष झालेला पाहून, जे सात्विक समाधान होते ते शब्दात वर्णन करता येणार नाही.

या महाविद्यालयामध्ये वार्षिक स्नेहसंमेलन आयोजित करणे म्हणजे एक दिव्यच होते. कॉलेजला मोठा मनोरंजन हॉल नव्हता. उघड्या जागेवर करमणूकीचे कार्यक्रम घ्यावे लागत. त्यामुळे दुसऱ्या शिक्षण संस्थांतील अनेक विद्यार्थी यावेळी येऊन कार्यक्रम उधळून लावण्याचा प्रयत्न करत. पण पोलिसांची मदत न घेता आम्ही प्राचार्यासह सर्व प्राध्यापक मंडळी ठिकठिकाणी कार्यक्रम संपेपर्यंत उभे राहून कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडत असू. कॉलेज स्थापन होऊन दहाच वर्षे झाली असल्यामुळे अनेक गोष्टी करणे जरूरीचे होते. विद्यापीठ अनुदान मंडळाचे अनुदान मिळत असूनसुद्धा आम्हाला काटकसरीने खर्च करावा लागे. कार्यालयासाठी किंवा प्राचार्यांच्या कार्यालयासाठी जरूर ते फर्निचर घेण्यापूर्वी मला दहा वेळा विचार करावा लागे. कॉलेजमध्ये एकच टेलिफोन आणि तोही कार्यालयामध्ये असे. कॉलेजच्या वेळा व्यतिरिक्त प्राचार्यांना कोणाचा फोन आला तर त्यांना आपल्या निवासस्थानापासून कार्यालयापर्यंत पळत येऊन फोन घ्यावा लागे. तरीपण कॉलेजमध्ये असलेल्या रकमेतून काटकसरीने आम्ही एकेक गैरसोय दूर करत असू.

पैशाची नेहमीच कमतरता भासे. कॉलेजच्या बांधकामासाठी काही खर्च करावा लागे. महिन्याच्या महिन्याला सर्वांचे वेतन देणे शक्य होत नसे. जेव्हा पैसे शिल्लक असतील तेंव्हा आम्ही पहिल्यांदा शिपाई व कारकूनांचा पगार करत असू. नंतर हळूहळू प्राध्यापक वर्गाची अडचण भागवत असू. प्राचार्यांचा पगार तर तीन-चार महिने होतच नसे. माझा तीन-चार महिन्यांचा पगार तर मी साताऱ्याला बदलून गेल्यानंतर मिळाला. याबाबतीत माझ्या सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर वर्गाचे सहकार्य वाखाणण्यासारखे होते.

या आठ वर्षाच्या वाटचालीमध्ये शहरी व ग्रामीण भागातील सर्व विद्यार्थ्यांनी कौतुकास्पद सहाकार्य दिले. प्राचार्य निवासापासून जवळच असलेल्या जुन्या कौलारू खोल्यांमध्ये कॉलेजचे प्राध्यापक आनंदाने राहात. आज प्राध्यापकांसाठी अनुदानातून निवासस्थाने उपलब्ध आहेत. गेल्या तीन चार वर्षात संस्थेच्या सेवेतून निवृत्त झालेले व नजीकच्या वर्षभरात निवृत्त होणारे बहुसंख्य प्राध्यापक व कार्यालयीन कर्मचारी हे त्यावेळी नुकतेच संस्थेच्या सेवेत रूजू झाले होते. त्यामुळे त्यांचा उत्साह नेहमीच ओसंडून जात असे. या सर्व सहकाऱ्यांकडून काम करवून घेताना व त्यांच्या बरोबर काम करताना नेहमीच आनंद वाटे. या सर्वांच्या सहकार्यामुळेंच आमची तेथील कारकीर्द मला नेहमीच संस्मरणीय वाटते.

आज निरनिराळी अनुदाने मिळतात. प्राध्यापकांचे वेतनही भरपूर वाढलेले आहे. आलेली रक्कम कशी खर्च करायची हाच व्यवस्थापनापुढे प्रश्न उभा राहातो. हेवा वाटेल अशा सुखसोईंनी प्राचार्य कार्यालये सुसज्ज करू शकतात. काटकसरीने कॉलेज चालवत असतांनासुध्दा एक प्रकारचा आनंद वाटे. गरीबीने संसार करण्यात किती समाधान असते याचा अनुभव मला येथे आला.

यावर्षी कॉलेज ५० वर्षांची सुवर्ण महोत्सवी वाटचाल करीत आहे. ५० वर्षात प्रत्येक प्राचार्यांनी व प्राध्यापकांनी कॉलेजच्या प्रगतीमध्ये पुष्कळ हातभार लावलेला आहे. कोणत्याही मंदिराच्या उभारणीमध्ये शिखराप्रमाणे पायाचा दगडही तितकाच, किंबहूना अधिक महत्त्वाचा असतो. १९५४ पासून आजपर्यंत संस्थेची सेवा ज्यांनी केली असे सर्व प्राचार्य व प्राध्यापक यांनी कॉलेजची नेत्रदीपक प्रगती करण्यात वाटा उचललेला आहे. आज कला, वाणिज्य व शास्त्र या तीनही शाखा एकत्र असलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या मोठ्या कॉलेजमध्ये सद्गुरू गाडगे महाराज कॉलेजची गणना केली जाते. यापुढेही या महाविद्यालयाची उत्तरोत्तर प्रगती व्हावी हीच प्रार्थना ॥

विद्यानगरात । स.गा.म.कॉलेज ।।
सर्वांना नॉलेज । देत आहे ।।

काही आठवणी

प्राचार्य आ.भा. मगदूम
माजी सचिव, र. शि. संस्था, सातारा

कराड येथे कॉलेज काढावे अशी बंडो गोपाळा कदम (मुकादम तात्या) यांची इच्छा होती. कराडमधील प्रमुख लोकांना भेटण्यास त्यांनी प्रारंभ केला. कर्मवीर अण्णांचे जुने विद्यार्थी व कराडचे प्रसिद्ध वकील केशवराव पवार सातारा येथे येऊन अण्णांना भेटले. अण्णांनी कराड येथे कॉलेजला परवानगी मिळण्यासाठी पुणे विद्यापीठाकडे अर्ज केला. नंतर त्यांनी कराडला जाऊन तेथील प्रमुख लोकांची बैठक घेऊन, आपण संस्थेतर्फे कराड येथे कॉलेज काढणार असल्याचे जाहीर केले. सदर कॉलेजला ''सदगुरू गाडगे महाराज कॉलेज'', असे नाव समजल्यावर बंडो गोपाळा मुकादम यांनी एक लाख रूपये देण्याची घोषणाही केली. कालांतराने त्यांनी याची पूर्तता केली.

कॉलेजसाठी विद्यापीठाच्या अटीनुसार १ लाख रूपये डिपॉझिट भरणे आवश्यक होते. अण्णांनी स्वतःच्या प्रकृत्तीकडे दुर्लक्ष करून पुण्यातच फिरून रक्कम जमविण्याचे ठरविले. दररोज एक हजार रूपये मिळाल्याखेरीज अण्णा जेवत नसत. पुण्यातच पंचवीस हजार रूपये जमा झाले. या मदतीत पुण्यातील महात्मा फुले मंडई येथील व्यापारी, हातगाडीवाले, पाटीवाले, हमाल इत्यादी सर्वांनी आपली एक दिवसाची कमाई दिली. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या मुलांच्या उच्च शिक्षणासाठी, पुणे शहरातील कामगारांनी मदत केली होती.

कॉलेजसाठी जागेची अडचण होती. कराड शेजारी सैदापूर गावच्या हद्दीत उद्यमनगरमधील एका कारखान्याची इमारत लिलावात निघाली होती. सर्वांच्या सहकार्यामुळे सदर जागा संस्थेला स्वस्तात मिळाली. या कामी कराडचे एक सामाजिक कार्यकर्ते गौरीहर सिंहासने यांचे फार मोलाचे साहाय्य झाले.

सदर कॉलेजच्या उद्घाटन प्रसंगी केलेल्या भाषणात डॉ. धनंजयराव गाडगीळ म्हणाले, ''या ठिकाणी पुणे विद्यापीठ आणि मंडई विद्यापीठ यांचा अपूर्व संगम झाला आहे.''

एक जून १९७२ पासून कराड येथील सदगुरू गाडगे महाराज कॉलेजचा प्राचार्य म्हणून माझी बदली झाली. जूनच्या सुरवातीस मी तेथे हजर झालो. कॉलेज २० जून पासून सुरू होणार होते. या अवधीत मी कॉलेजचे जुने रेकॉर्ड पाहत होतो.

वीस जून उजाडला. माझ्या सवयीनुसार मी ठीक अकरा वाजता कॉलेजमध्ये गेलो. कार्यालयात एकही लिपिक हजर नव्हता. शिपाईही अद्याप यावयाचे होते. मुख्य लिपिक आल्यावर मी त्याला बोलावून घेतले व म्हणालो ''आज कॉलेज सुरू झाले. उन्हाळ्याच्या सुटीत तुम्ही उशीरा येत होता., पण आता वेळेवर आले पाहिजे.'' मुख्य लिपिक म्हणाला, ''चुकलो, क्षमा करा. पुन्हा अशी चूक होणार नाही.'' शिपायांनी तर त्याहून लवकर येणे आवश्यक होते. झाडलोट, पाणी भरणे इत्यादी कामे अकरा वाजण्यापूर्वी पूर्ण होणे आवश्यक होते. कर्मचाऱ्यांसाठी एक लेखी सूचना काढली. त्यानुसार लिपिकांनी अकरा वाजता व शिपायांनी दहा वाजता कॉलेजमध्ये उपस्थित होणे अगत्याचे असल्याचे त्यांना कळविले. त्यानुसार दुसऱ्या दिवसापासून सर्वजण वेळेवर येऊ लागले. मुख्य लिपिकांनी सर्व लिपिकांना कामे वाटून देण्याबद्दल सुचविले. त्याने स्वतःची कामे सांभाळून इतरांच्या कामावर देखरेख करावी असेही सुचविले. सर्वजण जबाबदारीने काम करू लागले. कागदपत्रांचे फायलिंग नव्हते. विषयवार फायलिंग करविले. जुने कागदपत्र व त्यांच्या फायली मी वाचत असे. त्यामुळे बरीच माहिती मिळाली.

शेजारचा एक वयस्क शेतकरी येऊन भेटला व म्हणाला, ''कॉलेजच्या आवाराच्या सर्व जमिनी आम्हा सैदापूरच्या जाधव लोकांच्या आहेत. आम्ही त्या संस्थेला देणगी दिल्या आहेत.'' मी म्हणालो, ''जमिनी तुमच्या होत्या. पण तुम्ही त्या संस्थेस देणगी दिलेल्या नाहीत. तुमच्या जमिनी औंध संस्थानने संपादित करून त्या ठिकाणी नवे गावठाण वसविण्याचे ठरविले होते. गावठाण वसले नाही. एका कारखान्याने ही जागा विकत घेतली. कारखाना बंद पडला. कारखान्यावर बँकेचे कर्ज होते. कर्जापोटी जागा बँकेकडे तारण होती. बँकेने जागा लिलावात काढली. संस्थेने ती जागा लिलावात विकत घेतली आहे.'' तो शेतकरी आश्चर्याने माझ्याकडे पाहून थोड्या वेळाने न बोलता निघून गेला.

या शेतकऱ्याचे कॉलेजच्या जागेवर अतिक्रमण होते. ते हटविण्याबाबत संस्थेमार्फत प्रयत्न सुरू होते.

प्रत्यक्ष वर्ग सुरू होईपर्यंतच्या कालावधीत प्राध्यापक गावोगाव फिरून विद्यार्थ्यांना कॉलेजमध्ये प्रवेश घेण्यासंबंधी प्रचार करीत. कराडची इतर महाविद्यालयेही असेच करीत असत. आमच्या प्राध्यापकांनी मला सांगितले, ''सर, बहुतेक मुख्याध्यापक तुमचे विद्यार्थी आहेत. तुम्ही येथे प्राचार्य म्हणून आल्याचे कळताच त्यांनी विद्यार्थ्यांना या कॉलेजमध्ये पाठविण्याचे ठरविले आहे. तुमच्याबद्दल त्यांचे मत फारच चांगले वाटले.'' विद्यार्थी प्रवेशाचे काम पूर्ण झाले. आदल्या वर्षापेक्षा विद्यार्थीसंख्या शंभरने वाढली होती.

अनौपचारिक विस्तारसेवा सुरू असतानाच कॉलेजमध्ये ''महाविद्यालय- शाळा - समूहकेंद्र'' शासकीय मान्यतेने अधिकृतपणे सुरू केले. मी आमची सेवा जिल्ह्यातील सर्व माध्यमिक विद्यालयांना उपलब्ध करून दिली. परिणामी आमचे ''महाविद्यालय-शाळा-समूहकेंद्र'' महाराष्ट्रात श्रेष्ठ दर्जाचे ठरले होते.

पावसाळ्याच्या सुरवातीला कॉलेजच्या आवारात गवत व तण दिसू लागले. सफाईसाठी मजूर मिळेनात. कॉलेजचे गरीब व हुशार विद्यार्थी आर्थिक मदतीच्या अपेक्षेने मला भेटत होते. विद्यार्थ्यांची व कॉलेजची गरज यांची सांगड घालून गरजू विद्यार्थ्यांना सफाईचे, लेव्हलिंगचे वा अन्य काम देऊन त्याच्या मोबदल्यात त्यांना आर्थिक मदत व अन्य सवलती देण्यास सुरूवात केली.

मी कुसूर येथे मुख्याध्यापक म्हणून काम करीत असताना, मुकादम तात्यांचा जवळून परिचय झाला होता. १९७२ मध्ये संस्थेची परवानगी घेऊन त्यांनी कॉलेजच्या आवारात एक बंगला बांधला व तिथे राहू लागले. त्यांनी नुकतीच कॉलेजच्या आवारात मुलींच्या वसतिगृहाची सोळा खोल्यांची इमारत बांधून दिली होती.

मुलींचे वसतिगृह सुरू झाले आहे, सुरक्षितता आहे, योग्य देखरेख आहे, याची माहिती परिसरात झाली. त्यामुळे पुढील वर्षी अधिक मुलींनी वसतिगृहात प्रवेश घेतला. मुलींच्या वसतिगृहाच्या अभावी ज्या मुली उच्च शिक्षणापासून वंचित राहात असत अशा मुलींच्या कॉलेज शिक्षणाची सोय झाली.

१९७२ च्या भीषण दुष्काळाचे वेळी, दुष्काळाची झळ बसलेल्या विद्यार्थ्यांना विद्यार्थी सहाय्य निधीतून रोख मदत दिलीच, त्याशिवाय बाह्य जगातून निधी उपलब्ध करून त्यातूनही अशा विद्यार्थ्यांना भरपूर मदत दिली. कराड शहरातील व्यापाऱ्यांच्या मदतीने दुष्काळपीडित विद्यार्थ्यांची दोन-तीन महिने मोफत जेवणाची सोय केली.

पहिल्या सत्रात विद्यार्थी-प्रतिनिधींच्या निवडणुका घ्यावयाच्या होत्या. पूर्वानुभवामुळे प्राध्यापक धास्तावले होते. निवडणुकीच्या पद्धतीत बदल करण्याचे मी ठरविले, सर्व विद्यार्थ्यांनी आपापल्या वर्गात ठराविक वेळी ओळखपत्रासह हजर व्हावयाचे होते. मतदान केलेल्या विद्यार्थ्याने ताबडतोब केवळ वर्गाबाहेरच नव्हे तर आवाराच्या बाहेर जावयाचे होते. मतदान व्यवस्थित पार पडले. कुठलाही अनुचित प्रकार घडला नाही. प्राध्यापकांच्या सहकार्यामुळे, माझ्या नियोजनानुसार निवडणुका शांततेने पार पडल्या. प्राध्यापकांना सानंद आश्चर्य वाटले.

काही प्राध्यापक मला भेटले व एम.ए.(इंग्रजी) ही सुरू करण्याबद्दल विनंती करून गेले. मी प्रयत्न केला तर यश येईल असा प्राध्यापकांना विश्वास होता. एम.ए. (इंग्रजी) बंद करून विद्यार्थ्यांची गैरसोय करू नये असे विद्यापीठानेही सुचविले, आणि आम्ही सुरू न केल्यास कराड येथील अन्य कॉलेजमध्ये ही सोय करता येते का याची विद्यापीठ चाचपणी करू लागले. ही सर्व वस्तुस्थिती संस्थेला कळविली व एम.ए.(इंग्रजी) चालू ठेवण्यास परवानगी मागितली. संस्थेने संमती दिली. जून १९७३ पासून एम.ए.(मराठी), एम.ए. (हिंदी) आणि एम.ए. (इंग्रजी) या विषयांसाठी विद्यापीठाची परवानगी मिळविली.

कॉलेजच्या जागेवर शेतकऱ्यांची अतिक्रमणे होती. ती हटविण्यासाठी पूर्वीच्या प्राचार्यांनी प्रयत्न केला होता. संस्थेचे सचिवही कायदेशीर मार्गाने प्रयत्न करीत होते. आवारात राहावयास आलेले बुवासाहेब मुकादम हे केशवराव दादा या दोघांना शेतकरी मानत होते. मी त्या दोघांना भेटलो. त्यांनी शेतकऱ्यांशी चर्चा करून मार्ग काढावा अशी विनंती केली. त्यांनी शेतकऱ्यांशी चर्चा करून अतिक्रमणे हटविण्यास सांगितले. केशवराव दादा मला म्हणाले, ''मगदूम, आम्ही दाखवतो त्या त्या ठिकाणी ताबडतोब काँक्रीटमध्ये लोखंडी अँगल रोवा. नंतर तार ठोकून कंपाऊंड करा. थांबलात तर अतिक्रमण चालूच राहील.'' यासाठी खूप खर्च येणार होता. कॉलेजकडे पैसा नव्हता. मी बुवासाहेब मुकादमांना भेटलो व त्यांच्याकडे पंचवीस हजार रूपये उसणवार मागितले. एक वर्षात पैसे परत करण्याचे आश्वासन दिले. त्यांनी पैसे दिले. कॉलेजला कंपाऊंड झाले. मी बुवासाहेबांना दिलेला शब्द पाळला. मी मुदतीत पैसे परत केले.

विज्ञान विभागाकडे फार कमी विद्यार्थी असल्यामुळे तो विभाग बंद करण्याचा पूर्वी एकदा प्रयत्न झाला होता. माजी प्राचार्या सौ. सुमतीबाई पाटील यांनी तो बंद होऊ दिला नव्हता. १९७२-७३ मध्ये प्रि-डिग्री ते बी.एस्सी.अखेर शास्त्र शाखेकडे एकूण फक्त पन्नास विद्यार्थी होते.

गोडाऊनमध्ये असणाऱ्या प्रयोगशाळेचे मी जून १९७३ मध्ये प्रयोगशाळेसाठी बांधलेल्या नव्या इमारतीत स्थलांतर केले. मी

स्वतः आर्टसचा पदवीधर असूनही विज्ञान विभागाकडे अधिक लक्ष दिले. गणित, पदार्थविज्ञान व रसायनशास्त्र हे तीनच विषय बी.एस्सी.ला मुख्य विषय म्हणून शिकविले जात होते. विद्यापीठाची परवानगी मिळवून मी वनस्पतिशास्त्र, प्राणिशास्त्र, पीक संरक्षण, सूक्ष्मजीवशास्त्र, संख्याशास्त्र इत्यादी विषयही मुख्य विषय म्हणून शिकविण्याची सोय केली. एक वर्षभर प्रि-डिग्रीच्या विद्यार्थ्यांना मी गणित शिकविले. विद्यार्थीसंख्या वाढू लागली. दहा वर्षात ही संख्या शंभरवरून हजारच्या वर गेली. मी शिक्षणशास्त्र विभागाकडचा प्राध्यापक असूनही विज्ञान विभागाकडे इतके लक्ष दिले. याचे आमच्या महाविद्यालयातील व अन्य महाविद्यालयांतील प्राध्यापकांनी कौतुक केले.

बुवासाहेबांनी एक दिवस मला बोलावून सांगितले, ''मगदूम, मुलींच्या वसतिगृहासाठी कॉलेजमार्फत आणखी आठ खोल्या बांधा. त्यासाठी मी दहा हजार रूपये देणगी देईन.'' मी म्हणालो, ''तुम्ही तुमची इच्छा व्यक्त केलीत तरी आम्ही पूर्तता करू. फक्त तुमचा आशीर्वाद आमच्या पाठीशी असू दे.'' दुसऱ्याच दिवशी भूमिपूजन करून बांधकाम सुरू केले. बांधकाम वेगाने पूर्ण केले. बुवासाहेबांचे माझ्याशी बोलणे झाल्यानंतर लवकरच ते आजारी पडले. बेशुद्धावस्थेत त्यांना मिरज येथील मिशन हॉस्पिटलमध्ये नेले. तेथेच त्यांचा अंत झाला. त्यांच्या इच्छेची पूर्तता झाल्याचे ते पाहू शकले नाहीत. दहा हजार रूपये देणगी देण्याची त्यांची इच्छाही अपुरी राहिली. बुवासाहेबांचा अंत्यविधी कॉलेजच्या आवारात झाला. तेथे त्यांची आम्ही समाधी बांधली. समाधी शेजारी त्यांचा पूर्णाकृती पुतळाही बसविण्यात आला आहे.

बुवासाहेब मुकादम यांच्या इच्छेनुसार व त्यांच्या सक्रिय सहभागाने कराड शहरात अण्णांचा पुतळा बसविला. मा. यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते अण्णांच्या पुतळ्याचे अनावरण व्हावे व सौ. वेणुताई चव्हाण यांच्या हस्ते मुलींच्या वसतिगृहाचे उद्घाटन व्हावे ही संस्थेची विनंती मान्य होऊन दोन्ही कार्यक्रम पार पडले. वसतिगृहाच्या उद्घाटन प्रसंगी सौ. वेणुताई उद्घाटक पाहुण्या होत्या. अध्यक्षस्थानी मा. यशवंतराव चव्हाण होते. संस्थेचे अध्यक्ष या नात्याने मा. यशवंतराव यांनी उद्घाटक पाहुण्या सौ. वेणुताई यांना हार घालावा अशी विनंती करण्यात आली. त्याप्रमाणे त्यांनी हार घातला. नंतर अध्यक्षीय भाषणात मा. यशवंतराव म्हणाले, ''आमच्या लग्नात मी यांना हार घातला होता. त्यानंतर आज हार घालत आहे.'' दोघेही आनंदी दिसले. मा. यशवंतरावांनी सौ. वेणुताईंना हार घातला ही बातमी फोटोसह सर्व वर्तमानपत्रात छापून आली.

जून १९७३ पासून एम.ए.(मराठी), एम.ए.(हिंदी) आणि एम.ए.(इंग्रजी) चे वर्ग सुरू झाले. सुमारे दीडशे विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. एम.ए.चे अध्यापन शनिवारी दुपारी व रविवारी सकाळी चाले. प्रत्येक विषयासाठी कॉलेजमधील दोन पदव्युत्तर शिक्षक व अन्य ठिकाणाहून येणारा एक पदव्युत्तर शिक्षक अध्यापन करीत. मराठीसाठी रामानंदनगरहून प्रा. सुमन पाटील येत. हिंदीसाठी साताऱ्याहून प्रा. माळी व इंग्रजीसाठी विट्याहून प्रा. कदम येत असत. काही काळ वारणानगर येथील हिंदीचे पदव्युत्तर शिक्षक प्रा. कोतमिरे यांनीही रविवारी सकाळी कराडला येऊन एम.ए. विद्यार्थ्यांना हिंदी शिकविले. याच कालावधीत प्रा. कोतमिरे यांना पी.एच.डी. पदवी प्राप्त झाली. एका रविवारी अध्यापन संपल्यावर एम.ए.चे सर्व विषयांचे विद्यार्थी व प्राध्यापक यांच्या उपस्थितीत शाल-श्रीफळ देऊन प्रा.डॉ.कोतमिरे यांचा सत्कार केला. उत्तरादाखल ते म्हणाले, ''जेथे मी पूर्णवेळ काम करतो तेथे माझा सत्कार झाला नाही. मात्र जेथे आठवड्यातून एखादा तास मी अध्यापन करतो त्या ठिकाणी माझा सत्कार होत आहे. त्यामुळे माझे मन भारावून गेले आहे, 'गुणी गुणं वेची' हे खरे.''

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासासाठी त्यांच्या हितासाठी, कल्याणासाठी मी सदैव झटत असे. आमच्या कॉलेजचे विद्यार्थी जसे अभ्यासात चमकत तसे खेळातही चमकत. शिवाजी विद्यापीठाचे अर्धमागधीचे ''पी.एल.वैद्य पारितोषिक'' दरवर्षी आमच्या कॉलेजला मिळे. कुस्तीमध्ये या महाविद्यालयाचे विद्यार्थी, आंतरमहाविद्यालयीन, आंतर्विभागीय व आंतर्विद्यापीठीय स्पर्धामध्ये विजयी राहिले. अनेक सांघिक खेळातही त्यांनी विजय मिळविला. एकदा सांघिक खेळात विजयी होऊन कॉलेजचा संघ परतत होता. संघ कराडला पोहोचण्यापूर्वीच संघाच्या विजयाची वार्ता कॉलेजवर पोहोचली होती. संघाच्या अभिनंदनाच्या सभेचे आयोजन चालले होते. संघाचे विजयी विद्यार्थी हल्लागुल्ला करीत स्टँडपासून कॉलेजपर्यंत आले. ते बेशिस्तीने वागले होते. अभिनंदनाची सभा पार पडली.शेवटी अध्यक्षीय भाषणात मी म्हणालो, ''यापूर्वी तुम्ही पराभव पत्करून आला होता. आज तुम्ही विजयी होऊन आला आहात. पूर्वी तुम्ही पराभव पचवून दाखविला. पण आज तुम्हाला विजय पचविता आला नाही. विजय पचविण्यास शिका. ते अधिक महत्त्वाचे आहे. तुमच्याच अभिनंदनाची आम्ही तयारी करीत असताना स्टँडपासून तुम्ही शांततेने आला नाही - शिजेपर्यंत तुम्ही थांबला. निवेपर्यंतही थांबण्यास शिका. अन्यथा तोंड भाजून घ्याल.'' अभिनंदनाच्या सभेतच सौम्य शब्दात विद्यार्थ्यांची कानउघाडणी केल्याबद्दल सभेनंतर प्राध्यापकांनी माझे कौतुक केले.

अनेक कारणानिमित्त विद्यार्थी मला भेटावयास येत. तेथे प्राचार्यांच्या समोरील खुर्चीवर किंवा टेबलावर हात ठेऊन उभे राहात. मी त्यांना हात काढण्यास सांगे व म्हणे, ''पायाला लागले आहे का ? पाय दुखतो का ? नाही ? तुम्हाला कशाचाही आधार न घेता उभा राहता येते की!'' विद्यार्थी न टेकता उभे राहू लागले.

मला वाटते- आपल्याला आधाराशिवाय उभा राहता येत नाही अशी त्यांच्या अबोध मनात भावना असावी. आधाराशिवाय आपण उभे राहू शकतो हे कळल्यावर त्यांचा आत्मविश्वासही वाढीला लागला असावा.

विद्यार्थ्यांना त्यांचे म्हणणे नेमक्या शब्दात नीट सांगता येत नसे. म्हणणे लिहून आणण्यास सांगितले. विचार नेमके लिहिताही येत नसत. शिवाय लिखाण अशुद्ध असे. अर्जाचा मायनाही चुकलेला असे. मी शक्य तेवढ्या दुरूस्त्या करून अर्ज पुन्हा लिहिण्यास सांगे. काही वेळा अर्ज मराठीच्या प्राध्यापकांकडून दुरूस्त करून घेण्यास सांगे. प्राध्यापकांनाही बोध होई. चार वर्षे आमच्या महाविद्यालयात शिकून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्याला नीट उभा राहता आले पाहिजे, नीट बोलता आले पाहिजे, नीट लिहिता आले पाहिजे, समाजात नीट वागता आले पाहिजे. असे न घडले तर तो कॉलेजचा कमीपणा आहे असे मला वाटते.

विशेषतः मी मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडे अधिक लक्ष देत असे. परवा मला एक जुना विद्यार्थी भेटला. तो मला म्हणाला, ''मी मुदतीत बी.सी.स्कॉलरशिपसाठी अर्ज दिला नव्हता. कारण बरेच दिवस मी कॉलेजलाच येत नव्हतो. तुम्ही सर्वांचे अर्ज आले आहेत का हे जातीने तपासले. माझा अर्ज नसल्याचे व मी कॉलेजमध्येही येत नसल्याचे लक्षात आल्यानंतर मला शोधून आणून माझा अर्ज घेतला. माझ्या अडचणींचे निवारण करून मला नियमित हजर राहण्यास सांगितले. मी पदवीधर झालो. सरकारी नोकरीत आहे. आम्हा बी.सी.विद्यार्थ्यामध्ये भेटल्यावर चर्चा होते. बी.सी.विद्यार्थ्यांच्या हिताकडे जातीने लक्ष देणारा असा प्राचार्य दुर्मिळच!''

एकदा एका विद्यार्थ्याला घेऊन त्याचे मित्र व एक प्राध्यापक रात्रीच माझ्याकडे आले. तो विद्यार्थी वसतिगृहात राहणारा व स्कॉलरशिप मिळणारा होता. पण अलिकडे तो वसतिगृहाबाहेर मित्राच्या खोलीवर जाऊन राहिला होता. तो कॉलेजला येत नसे. अभ्यास करीत नसे. कोणाशी बोलतही नसे. सर्वांना घेऊन मी रात्रीच कॉलेजमध्ये जाऊन बसलो. मी विद्यार्थ्याला प्रश्न विचारले. तो न बोलता नुसता बसून राहिला. मी त्याच्या मित्रांना बाहेर पाठविले. तरीही तो बोलेना. मग मी प्राध्यापकांनाही बाहेर जाण्यास सांगितले. ते गेल्यानंतर त्या विद्यार्थ्याशी सहानुभूतीने व जिव्हाळ्याने बोललो. हळूहळू तो बोलू लागला. तो मनोरूग्ण बनल्याचे मला जाणवले. पण सुरूवात होती. त्वरित उपचार केल्यास तो बरा होईल असे मला वाटले. त्याचे वडील अडाणी होते. मामा सुशिक्षित होता व मुंबईला नोकरीला होता. मी तार करून मामाला बोलावून घेतले. त्याला भाच्याच्या अवस्थेबद्दल कल्पना दिली व एक पत्र देऊन मिरजेला एका मनोविकारतज्ज्ञाकडे पाठवून दिले. फार कमी कालावधीत विद्यार्थी बरा झाला. कॉलेजला परतला. नियमित हजर राहून अभ्यास करू लागला. चांगल्या गुणांनी पदवीधर झाला.

सन १९७५ मध्ये नव्या अभ्यासक्रमानुसार १० वी अखेर एस.एस.सी.परीक्षा झाली. १९७५-७६ मध्ये शाळांमधील जुन्या अकरावीचे वर्ग बंद झाले. निवडक माध्यमिक शाळांना नव्या अकरावीचे (उच्च माध्यमिक-प्रथम वर्षाचे) वर्ग चालविण्यास परवानगी देऊन अतिरिक्त शिक्षकांना सामावून घेतले. सन १९७६-७७ मध्ये कॉलेजमधील प्रि-डिग्रीचे वर्ग बंद झाले. त्यामुळे कॉलेजांना नव्या बारावीचे (एस.वाय.जे.सी.चे) वर्ग उघडण्यास परवानगी दिली व अतिरिक्त प्राध्यापकांना सामावून घेतले. बारावीच्या प्रत्येक विषयाचा पहिला तास विभाग प्रमुखाने स्वतः घ्यावा असे मी सुचिवले. पहिल्या दिवशी मी स्वतः एक तास घेतला. त्यामुळे सर्व विभागप्रमुख जातीने लक्ष देऊ लागले. बारावी सायन्स या वर्गाला मी वर्षभर गणित शिकविले. सर्वांच्या सहकार्याने नवा अभ्यासक्रम व्यवस्थित राबविला गेला. बारावीमधील चार विद्यार्थ्यांना एम.बी.बी.एस.ला आणि चार विद्यार्थ्यांना बी.ई.ला गुणवत्तेनुसार प्रवेश मिळाला.

प्राध्यापक निवास बांधण्यासाठी यू.जी.सी.कडे पत्रव्यवहार करून ग्रँट मंजूर करून घेतली. ग्रँट ५० % उभारून प्राध्यापक निवास बांधले. प्रयोगशाळा इमारत अपूर्ण होती. ती पूर्ण केली. मुलींच्या वसतिगृहासाठी आठ जादा खोल्या बांधल्या होत्याच. बुवासाहेब मुकादमांची समाधी बांधली. त्यांचा पुतळाही उभा केला.

१० मे, १९७८ ते नऊ मे, १९८१ या कालावधीत तीन वर्षे मी डेप्युटेशनवर संस्थेच्या कार्यालयास सचिव म्हणून गेलो होतो. १० मे १९८१ पासून कराड येथे मी माझ्या प्राचार्य या मूळ पदावर रूजू झालो.

प्राध्यापकांनी मला भेटून, स्टाफ ॲकॅडमी सुरू करण्याची विनंती केली. ''वैदिक गणित'' या विषयावर मी प्रथम व्याख्यान दिले. ज्यांना गणितात रस नव्हता किंवा जे संस्कृत शिकले नव्हते त्यांनाही समजेल व मनोरंजक वाटेल अशा रीतीने तासभर व्याख्यान दिले. सर्वांना आवडले. गणित व संस्कृत जाणणाऱ्यांना तर फारच आवडले. माझ्या व्याख्यानानंतर अनेक प्राध्यापकांची व्याख्याने झाली.

प्रत्येक सत्राच्या शेवटी अध्यापन संपल्यानंतर हा व्याख्यानांचा कार्यक्रम चाले. पुढच्या वेळी मी ''व्यक्तिभेद'' या विषयावर व्याख्यान दिले. कराडमधील अन्य महाविद्यालयीन प्राध्यापक माझ्या या व्याख्यानाला येऊन बसले होते. पुढील सत्राचे शेवटी, ''विश्व आणि मानव'' या विषयावर प्रदीर्घ व्याख्यान दिले. सुमारे दीड तास व्याख्यान चालले होते. व्याख्यान सर्वोत्तम झाल्याचा प्राध्यापकांनी निर्वाळा दिला. ते व्याख्यान शेवटचे ठरले. कारण त्यानंतर मी सेवानिवृत्त झालो.

ज्युनियर कॉलेजकडील शिक्षक एम.ए./एम.एस्सी./एम.कॉम.परीक्षा उत्तीर्ण असत. पण त्यापैकी बहुसंख्य शिक्षक अप्रशिक्षित असत. त्यांनी बी.एड.होणे आवश्यक होते. शिवाजी विद्यापीठाने डी.एच.ई. (डिप्लोमा इन हायर एज्युकेशन) हा बी.एड.ला समकक्ष डिप्लोमा सुरू केला. माझी पात्रता व पूर्वानुभव यांचा विचार करून या शिक्षकांचे अभ्यासपाठ स.गा.म.महाविद्यालयात पूर्ण करून घेण्यास परवानगी दिली. पंधरापैकी चौदा शिक्षकांच्या पाठ-निरीक्षणाची जबाबदारी विद्यापीठाने माझ्यावर सोपविली. पंधराव्या शिक्षकाच्या पाठनिरीक्षणाची जबाबदारी एका अन्य वरिष्ठ प्राध्यापकावर सोपविली. दोन शिफ्टमध्ये भरणाऱ्या कॉलेजचा नेहमीचा व्याप सांभाळून, चौदा शिक्षकांना पाठांसाठी मार्गदर्शन केले व त्यांच्या पाठांचे पूर्ण वेळ निरीक्षणही केले. वर्षाअखेर सर्व पंधरा शिक्षक विद्यापीठाच्या डी.एच.ई परीक्षेस बसले. त्यापैकी चौदा शिक्षक उत्तीर्णही झाले.

✦ ✦ ✦ ✦

यू.जी.सी.कडे पत्रव्यवहार करून, प्रयोगशाळा इमारत विस्तार, प्रयोगशाळा उपकरणांची खरेदी, ग्रंथालयासाठी ग्रंथखरेदी, मुलांच्या वसतिगृहासाठी स्वयंपाकघर व भोजनगृह यांचे बांधकाम व साहित्य खरेदी इत्यादी अनेक प्रकल्प अनुदान मिळवून पूर्ण केले. अनेक प्राध्यापकांना पीएच डी साठी तीन वर्षासाठी फेलोशिप मिळवून दिली. तसेच एम.फिल.साठी एक वर्षाची फेलोशिप मंजूर करण्याचे अधिकार कॉलेजला मिळवून दिले.

स.गा.म.कॉलेजचे दोन प्राचार्य शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू झाले, दोघा प्राचार्यांना आदर्श प्राध्यापक म्हणून राज्य पारितोषिक मिळाले आणि दोन प्राचार्य रयत शिक्षण संस्थेचे सचिव झाले.

With Best Compliments From



SHETH

PUBLISHERS PVT. LTD.

★ MUMBAI ★

★ PUNE ★ GOA ★

★ NAGPUR ★ KOLHAPUR ★



साईराज प्लाझा

कराड, ढेबेवाडी रोड,
मलकापूर रोड, कराड.

* ऑफीस व दुकान गाळे
* २/३ रुम्सचे लक्झरिअस फ्लॅट
* भुकंप प्रतिबंधक आर.सी.सी.बांधकाम
* आकर्षक डिझाईन
* वित्त संस्थांमार्फत कर्जाची सोय

श्री.राजेंद्र पाटील
फोन : २४१२३१
९४२२०३९६०८

श्री.शंकर सुर्वे
फोन : २२९६३६

हार्दिक शुभेच्छा !...

धनश्री वीट कारखाना

स्टोन क्रशर

विद्यानगर, कृष्णा कॅनॉल,
सैदापूर, कराड .जि. सातारा
फोन नं : २७१९०१
मो.: ९८५०५२०७८३

धनाजी श्रीपती जाधव,
श्रीरंग अंतू जाधव



With Best Compliments from

Bhadi & Company

Hardware Merchant

31, Shaniwar Peth, Karad - 415 110. Phone - 222821
Wholeseller: Nut Bolts & Hardware Material

Bhadi Steel Industries

Manufacturers of Heavy "T' Hinges

❖ **Factory** ❖
Koyana Audyogik Sahakari Vasahat
Maryadit, Plot No. 8/1-2
MALKAPUR (karad)
Phone - 241104

Bhadi Electrods

Manufacurers of Welding Electrods

❖ **Factory** ❖
Gat No. 295, Padali (Kese)
Tal. Karad Dist. Satara
Phone- 255786

Office - Shaniwar Peth, Karad - 415 110 Phone - (02164) 222821

स.गा.म. महाविद्यालय - एक भाग्यविधाते ज्ञानमंदीर

प्राचार्य डॉ.एस.आर.सूर्यवंशी
माजी सहसचिव (उच्च शिक्षण), र. शि. संस्था, सातारा

स.गा.म.महाविद्यालयाच्या प्रांगणाचा व माझा संबंध महाविद्यालय स्थापनेच्याही पूर्वी आला होता. त्या आवारात पूर्वी जी 'मॉडर्न इंडस्ट्रीज' नावाची एक फॅक्टरी होती तिचे तीन शेअर्स मी लहान असताना आमचे घरात घेतले होते. वार्षिक सभांपैकी मी ही एक दोन सभांना उपस्थित होतो. परंतु त्या भूमीस ज्ञानमंदीर अधिक पवित्र वाटल्यामुळे की काय ती आयर्न इंडस्ट्री बंद पडून त्याच जागेत या महाविद्यालयाची स्थापना झाली. जरी शेअर्स बुडाले तरी या महाविद्यालयातच माझी विशेष प्रगती झाली. खऱ्या अर्थाने ही पवित्र भूमी व्यक्तिश: मला पावली. सन १९७२ पासून सातारच्या छ.शिवाजी कॉलेजमधून या महाविद्यालयात इंग्रजी विषय विभागप्रमुख म्हणून बदलून आल्यानंतर १९७५ मध्ये मी रयत शिक्षण संस्थेचा आजीव सभासद झालो. १९७८ साली याच कॉलेजमध्ये मी प्रथमच प्राचार्यही झालो. येथेच काम करीत असतांना १९७९ मध्ये मला इंग्रजी विषयात पीएच्.डी. पदवीही प्रदान करण्यात आली. असे भाग्य इतर अनेक प्राध्यापकांचे व महाविद्यालयाच्या अनेक माजी विद्यार्थ्यांचे उदयास आले आहे. येथील सेवा व शिक्षण यामुळे यापुढेही हजारोंचे भाग्य उदयास येणार आहे. म्हणून हे पवित्र महाविद्यालय मूलत: भाग्यविधाते आहे. रयत शिक्षण संस्थेच्या अनेक महाविद्यालयांपेक्षा या महाविद्यालयाविषयी मला अप्रतिम जिव्हाळा वाटतो.

सन १९५४ मध्ये सुरू झालेले हे रयत शिक्षण संस्थेचे दुसरे महाविद्यालय. स्थापनेचा इतिहासही मोठा रंजक आहे. कर्मवीरांच्या व संत गाडगेबाबांच्या पदस्पर्शांनी पुनीत झालेल्या या प्रांगणातून गेल्या पन्नास वर्षात खेड्यापाड्यातील हजारो विद्यार्थी उच्चशिक्षणाच्या पदव्या घेवून बाहेर पडले. महाविद्यालयाच्या वाढीसाठी येथे अनेकांचे परिश्रम, त्याग, आपुलकी, कारणीभूत ठरलेली आहेत. मी १९७२ ते १९८१ या काळात सहा वर्षे इंग्रजी विभागप्रमुख व नंतरची तीन वर्षे प्राचार्य म्हणून यशस्वी रित्या व्यतीत केली. प्राचार्य ए.बी.मगदूम यांच्या कुशल नेतृत्वाखाली महाविद्यालयाची संख्यात्मक व गुणात्मक वाढ झपाट्याने होऊ लागली. सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना उत्तमोत्तम शैक्षणिक प्रशासन कसे असते याचा अनुभव लाभला. त्यांच्या नेतृत्वाच्या कालावधीमध्ये प्रामुख्याने महाविद्यालयाच्या सर्व बाजूंच्या सीमा पक्क्या करण्यात आल्या. विद्यार्थिनी वसतिगृहाच्या अपूर्ण इमारतीचे आणि प्राध्यापक निवासाचे प्रचंड बांधकाम हाती घेऊन पूर्ण करण्यात आले. मुख्य इमारतीच्या पोर्च, लॉफ्ट, जिना इ. भागांची दुरूस्ती करण्यात आली. प्रयोगशाळा वेगात पूर्ण करण्यात आली. शास्त्रशाखेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्याही प्रतिवर्षी वाढू लागली. आवारातील सर्व इमारती व त्यामधील साहित्य, प्रांगण इ. सर्व काही नीटनेटके व उजळून दिसू लागले. हजारो मुलांचे थवे महाविद्यालय सुटताना व भरताना पाहून सर्वांची मने अधिक उल्हसित होऊ लागली. अभ्यासक्रम वेळेत पूर्ण होऊ लागले. वृक्षराज व बागा नटू लागल्या. परीक्षांच्या निकालामध्ये गुणवत्तावाढ प्रकर्षाने दिसू लागली. एके काळी ''गाडगे महाराजांचा मठ'' म्हणून संबोधिल्या जाणाऱ्या महाविद्यालयाकडे पहातांना मुख्य रस्त्यावरून येणाऱ्या जाणाऱ्यांचे व असे म्हणणारांचेही डोळे दिपून जावू लागले.

प्राचार्य निवासा शेजारील इमारतीतच मलाही रहाण्याची संधी मिळाल्यामुळे जशी प्राचार्यांच्या काम करण्याच्या कौशल्याची जवळून ओळख झाली, तशी अनेक जबाबदारीची कामेही आपोआपच माझेकडे आली. अभ्यासेतर कामांच्या अनेक समित्यांवर माझे नाव दिसू लागले. वसतिगृह, शिस्त, लेबर-स्कीम, कार्यालयीन पत्रव्यवहार इ. समित्यांच्या कामांमध्ये माझा बराच वेळ कारणी लागला. पण त्यामुळे माझ्या प्रलंबित संशोधनाच्या कामास फारच अपुरा वेळ मिळू लागला. तरीदेखील हरघडी ''पीएच्.डी.चे काम कुठपर्यंत आलेय ? लवकर संपवून टाका'' असे प्राचार्यांचे प्रोत्साहन मिळत गेल्यामुळे ते काम रात्रीच्या वेळी होऊ लागले व एकदाचा प्रबंध १९७८ साली सादर केला

१० मे १९७८ पासून मान.प्राचार्य मगदूमसाहेब हे रयत शिक्षण संस्थेचे सचिव झाले. एक ज्येष्ठ प्राध्यापक व संस्थेचा आजीव सभासद म्हणून संस्थेने माझी याच महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून नियुक्ती केली. संस्थेच्या एका महान महाविद्यालयाच्या प्राचार्यपदाची धुरा संभाळताना प्रत्यक्षात

किती महत्वाच्या जबाबदाऱ्या येऊन पडतात याची जाणीव मला होऊ लागली.

सुदैवाने मला येथील सर्व प्राध्यापक, कर्मचारी, हितचिंतक, महाविद्यालयाचा इतिहास, सभोवतालची परिस्थिती, कार्यालयीन प्रशासन इ. सर्वांची जवळून तपशिलवार माहिती असल्यामुळे प्राचार्यपद म्हणजे एक फार मोठे आव्हान आहे असे कधीच वाटले नाही. पूर्वीच्या प्राचार्यांनी जी प्रशासकीय घडी घातली होती त्याप्रमाणेच काम करावयाचे असे मी ठरविले, त्याचबरोबर आपणही काहीतरी अधिक, चांगले करण्याची उर्मी निर्माण झाली.

आणि लवकरच रौप्य महोत्सवी वर्ष सुरू झाले. अनेक कार्यक्रम आखण्यात आले. अधून मधून माजी प्राचार्यांची व्याख्याने आयोजित केली. शैक्षणिक मेळावे भरविले. अनेक दिवस मनात खटकत असलेली बाब म्हणजे महाविद्यालयाचे पहिल्या मजल्यावर असलेले भूकंपप्रवण भागातील प्रचंड असे ग्रंथालय, तळमजल्यावर घेतले. त्यावेळी ग्रंथालयाची स्वतंत्र इमारत नव्हती. महाविद्यालयाच्य प्रशस्त क्रीडांगणातही अनेक उंचवटे व चढउतार होते. मग दहा दिवस सतत बुलडोझरने त्याचे सपाटीकरण करून घेतले. आवारामध्ये अशा अनेक मोकळ्या जागा होत्या की त्यांना वनराईने अगर शेतीने व बागांनी नटविता आले असते. अशा सर्व स्थळांवर झाडी, फुलझाडे इ.ची लागवड करून घेतली. आवाराच्या बाहेरून जाणाऱ्या उघड्या पाटातून पाईपने आवारात पाणी आणून ते झाडापर्यंत नेण्याची व्यवस्था केली. आवाराच्या दक्षिणेकडील उताराच्या बाजूस शेतीच्या दोन पट्ट्या लेबर स्कीमच्या विद्यार्थ्यांकडून तयार करण्यात आल्या व तेथे ऊस व कांदा यांची लागवड करण्यात आली. मुबलक पाणी उपलब्ध व्हावे म्हणून मुलांच्या वसतिगृहाच्या दक्षिणेकडील बाजूस ब्लास्टिंग घेऊन बोअर घेण्याचा अयशस्वी प्रयोग केला. नंतर मुख्य इमारतीसमोर बोअर घेतली, परंतु त्यास फारच कमी पाणी लागले. आवारातील एका विशाल शेडचे दोन भाग करून एका भागात कँटीन व दुसऱ्यात जिमखाना सुरू केला. जिमखान्यामध्येही अद्ययावत साहित्य भरले. त्यानंतर शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या निवासाच्या मोठ्या इमारतीचे बांधकाम घेतले व ते पूर्ण झाल्यावर त्यावेळचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री बॅरि.ए.आर.अंतुले यांचे हस्ते त्याचे उद्घाटन झाले. त्यावेळी त्यांनी महाविद्यालयास पंचवीस हजार रुपयांची देणगी दिली. त्या तीन वर्षात अनेक छोटी मोठी कामे करण्यास सर्वांचा हातभार लागला. क्रीडांगणाच्या एका कोपऱ्यात चार खोल्यांचे बांधकाम अतिक्रमण होऊ नये म्हणून पूर्ण केले. प्राचार्य निवासाच्या उत्तरेकडे दगडाच्या खाणीमुळे फार मोठा खड्डा अनेक वर्षे पाणी साठवून होता. तोही बुलडोझरने बुजविला. मायक्रो बायॉलॉजी विषय सुरू करून त्याची स्वतंत्र प्रयोगशाळा व साहित्य पुरविण्यात आले.

या महाविद्यालयातील सेवा-कालात मला महाविद्यालयाची अनेक वैशिष्ट्ये जाणवली. पहिले म्हणजे येथील सर्व सेवकवर्गात असलेली एकजूट. महाविद्यालयाच्या कामात त्यांच्यात कसलेही मतभेद नसत. विद्यार्थ्याकडून गैरशिस्तीचे प्रकार घडू नयेत म्हणून प्रामुख्याने वर्गप्रतिनिधींच्या निवडणुका व स्नेहसंमेलन प्रसंगी सर्वजण कटाक्षाने व एकजुटीने झटत. या महाविद्यालयाचे बहुसंख्य विद्यार्थी हे आसपासच्या अनेक खेड्यांतून व तालुक्यांतून आलेले असत. पुढे पुढे ज्युनियर व सिनियर विभागांची विद्यार्थीसंख्या वाढत गेल्यावर महाविद्यालयाचे कामकाज सकाळ व दुपार अशा दोन वेळात सुरू झाले.

कै.दानशूर बंडो गोपाळा मुकादम उर्फ तात्या यांचा कुसूरचे हायस्कूल व हे महाविद्यालय वाढविणेसाठी सिंहाचा वाटा होता. त्यांच्या आधाराने कसलीच कमतरता पडली नाही. तात्यांचे वास्तव्य काही काळ महाविद्यालयाच्या आवारातच होते. त्यांनी स्वत:च्या निवासासाठी एक बंगलाही आवारातच स्वखर्चाचे बांधला होता. दुर्दैवाने त्यांचे निधन झाले त्यामुळे त्यांची समाधी त्यांच्या बंगल्यासमोरच उभारली आहे. संस्थेचे मॅनेजिंगचे सदस्य व कराडमधील नामवंत शे.का.पक्ष नेते मान.केशवराव पवार यांचाही स्थानिक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष या नात्याने सर्वप्रकारे हातभार लाभत असे. खऱ्या अर्थाने ते महाविद्यालयाचे आधारस्तंभ होते.

गेल्या पन्नास वर्षात या महाविद्यालयाचे अनेक माजी विद्यार्थी पदवी संपादन करून विविध क्षेत्रात उच्च स्थानावर राहून समाजाची सेवा करीत आहेत. जसे समाजाने या महाविद्यालयास भरघोस सहाय्य केले तसेच महाविद्यालयाने ही प्रत्यक्ष अप्रत्यक्षरीत्या समाजासाठी पुष्कळ केले आहे. संत गाडगे बाबांच्या नावाने चाललेले हे महाविद्यालय कोणत्याच आघाडीवर कमी पडणार नाही. आज या महाविद्यालयाच्या प्रांगणात परत प्रवेश केल्यावर सर्व ठिकाणी झालेले यथायोग्य बांधकाम, रस्ते, क्रीडांगण, बगीचे, वृक्ष, व अलिकडेच मान.नाम.डॉ.पंतगराव कदम यांनी दिलेल्या देणगीतून साकारलेले भव्य ''कै.अभिजीत क्रीडासंकुल'' इ. अनेक बाबी मन आकर्षून घेतात. कोणत्याही विद्यार्थी व सेवकास व व्यक्तिश: मला हे सर्व सौभाग्य पाहून आपण स्वत: याच प्रांगणात काही वर्षे शैक्षणिक कार्य करीत होतो, याचा सार्थ अभिमान वाटतो. कराडच्या विद्यानगरीचे हे महाविद्यालय एक भूषण ठरले आहे व ते तसेच राहो ही सदिच्छा!

वन् - हाफ्

प्रा. डी. बी. पठाण

मित्र हो,

१९५८ मध्ये मी एम.ए. झालो. 'समर स्कूल ऑफ लिंग्विस्टिकस' चा कोर्स करून मी नुकताच म्हैसूरहून आलो होतो. प्राध्यापकांची नोकरी मिळत होती. तथापि मी पुढील शिक्षण चालू ठेवावे अशी कर्मवीर अण्णांची इच्छा होती. आंतरराष्ट्रीय कीर्तीचे डॉ.ए.एन.उपाध्ये व प्राचार्य बी.ए.चौगुले यांच्या सल्ल्याने त्यांनी मला बिहार राज्यातील 'वैशाली पोस्ट ग्रॅज्युएट रिसर्च इन्स्टिटच्यूट ऑफ प्राकृतस जैनालॉजी ॲण्ड अहिंसा, मुझफ्फरपूर' येथे पीएच.डी. साठी नाव नोंदविण्यास सांगितले. रीतसर प्रवेश मिळून तिकडे जाण्यासाठी अद्याप महिना दोन महिन्याचा कालावधी होता. इकडे स.गा.म कॉलेजमधील इंग्रजीचे प्राध्यापक एन.सी.सी.च्या कोर्ससाठी गेले होते. त्यांच्या जागेवर काही काळासाठी इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून माझी नेमणूक झाली. स.गा.म.मधील हा माझा पहिला प्रवेश. विद्यार्थी म्हणून शिकणे व प्राध्यापक म्हणून शिकविणे यातील फरक यावेळी तीव्रतेने जाणवला. समोर अतिशय तल्लख बुद्धीचे विद्यार्थी पाहून खूप घाम फुटायचा. त्यातील काही विद्यार्थी पुढे प्राध्यापक झाले, नामवंत प्राचार्य झाले व आता निवृत्तपण झाले आहेत. स.गा.म.मधील हा अल्पसा काळ माझ्या जीवनाची दिशा ठरवून गेला, तो कायमचाच स्मृतीत राहिला.

१९३५ मध्ये प्रा. ढणाल यांची दहिवडीस बदली झाली आणि त्यांच्या जागी मी स.गा.म.मध्ये रूजू झालो. मी बॅ.पी.जी. पाटील सरांचा विद्यार्थी होतो. त्यामुळे त्यांच्या हाताखाली काम करताना खूप आनंद व्हायचा. पण त्याचबरोबर मनात एक आदरयुक्त भीती पण वाटायची. एकदा मला सत्वर परगावी जावे लागले. रजेचा अर्ज न देता, केवळ तोंडी निरोप देऊन मी निघून गेलो. दुसऱ्या दिवशी सरांनी हजेरी घेतली. 'पठाण' हे बरोबर नाही. तुम्ही संस्थेत शिकलात ना ? मग इतरांमध्ये आणि तुमच्यात काय फरक ? संस्थेला वाहून घेणाऱ्या सेवकास एवढे बोलणे पुरेसे होते, नाही का ? सर व्याख्यानासाठी बाहेर जाताना कधी कधी मी त्यांच्याबरोबर जात असे. स.गा.म.च्या काळात त्यांची बरीच व्याख्याने ऐकली. त्यातील तीन व्याख्याने कायम आठवणीत राहिली. इंजिनियरींग कॉलेजमध्ये तांत्रिक शिक्षण देणारे प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने सरांचे इंग्रजीतील व्याख्यान ऐकण्यास उपस्थित होते. त्यांच्यासमोर इंग्रजी वाङ्मयातील सुंदर कविता व संवादाचा धबधबा वाहू लागला व ते त्यात ओलेचिंब झाले. कार्वे येथे ज्ञानेश्वर व्याख्यानमालेत सरांचे भाषण झाले. शेतकरी कुटुंबातील आबालवृद्ध स्त्री-पुरूष, विद्यार्थी-समुदाय, गरीब-श्रीमंत असे सर्वजण उपस्थित होते. त्या सर्वांच्या भावनांना स्पर्श करीत त्यांना दीड-दोन तास एका जागेवर बांधून ठेवण्याची किमया केवळ पी.जी.सरच करू शकतात. बुधवार पेठेत आंबेडकर जयंतीच्या समारंभात सरांना प्रमुख पाहुणे म्हणून बोलावले होते. पाच साडेपाच वाजता आम्ही तिथे पोहचलो. सभेची व्यवस्था व जमलेला श्रोतृवृंद पाहून माझ्यासारख्या तडक परत फिरला असता. परंतु सरांनी तसे केले नाही. सर सभेत खुर्चीवर बसले. समोर बुधवार पेठेतील छोटी मुले-मुली बसली होती. काही कार्यकर्ते व प्रौढ माणसे आजुबाजूला व समोर होती. सभेतील प्राथमिक स्वागत, परिचय वगैरे संपल्यावर सर भाषणासाठी उभे राहिले. हळूहळू गर्दी होऊ लागली. अशा समुदायासमोर सुद्धा सरांनी आंबेडकरांचा जीवनपट इतक्या तन्मयतेने व श्रद्धेने उभा केला की, दीडतास केव्हा संपला हे कळलेसुद्धा नाही.

सरांच्या संदर्भातील आणखी काही प्रसंग आठवतात. फार जुनी गोष्ट आहे. एकदा शिवाजी विद्यापीठाचे एक वन-मॅन कमिशन महाविद्यालयात तपासणीसाठी आले. कमिशनमधील हे गृहस्थ म्हातारे होते. त्यांनी डोक्यावर काळी टोपी व अंगावर लांब सडक मोठ्या बटणांचा कोट घातला होता. त्यांच्या कोटाचे मधले बटन तुटले होते. त्यामुळे पोटावरील भाग उघडा पडत होता. तो झाकण्याचा ते सारखा प्रयत्न करायचे. समोरच्या खुर्चीवर मा. प्राचार्य बसले होते त्यामुळे त्यांना फारच अवघडल्यासारखे वाटत असावे. सरांच्या लक्षात ही गोष्ट आली. चहापाण्याची व्यवस्था करीत मी तेथे थांबलो होतो. माझ्याकडे तिरकस पहात ते पाहुण्यांना म्हणाले, 'अरेरे! प्रवासात बटणाने दगा दिला वाटतं. होतं असं कधी कधी'! हे ऐकून पाहुण्यांची काय अवस्था झाली हे मी सांगत नाही. सरांचा मिश्किलपणा मात्र कायम लक्षात राहिला.

एकदा कवी पी. सावळाराम यांचे महाविद्यालयात भाषण झाले. त्यावेळी ते ठाण्याचे महापौर होते. पी.जी.सरांनी त्यांचा परिचय करून दिला. ते म्हणाले, 'विद्यार्थ्यांनो, आपले पाहुणे श्री. सावळाराम पाटील येड्याचे (म्हणजे येडेनिपाणीचे) म्हणून मला वाटते, नागरिकांनी त्यांना 'ठाण्याचे' 'प्रथम नागरीक' म्हणून निवडले.

स्नेहसंमेलनासाठी आलेल्या दोन प्रमुख पाहुण्यांची आठवण मी कधीही विसरू शकणार नाही. पी.जी.सरांनी आचार्य भागवत यांना निमंत्रित केले होते. त्यांचे विद्यार्थ्यांसाठी आणखी एक

खास व्याख्यान आयोजित केले होते. ते व्याख्यान अतिशय उद्‌बोधक व प्रभावी होते. आचार्य भागवतांच्या निवासाची सोय सर्किट हाऊसवर करण्यात आली होती. प्रमुख पाहुणे या नात्याने रात्री त्यांना भारदस्त भोजन देण्याचे ठरले. भोजनासाठी काय पदार्थ ठेवावेत असे आम्ही त्यांना विचारले. त्यांनी दिलेली सूचना ऐकून मी थक्क झालो ते म्हणाले, ''जेवणात मला फक्त एक ग्लास दूध व बेकरीतील एक साधा पाव द्या.'' नंतर काही वर्षांनी आणखी एका प्रमुख पाहुण्यांच्या दुपारच्या भोजनाची व्यवस्था करण्याची जबाबदारी माझ्याकडे आली. त्यावेळी मी प्राध्यापकांच्या सहा नंबरच्या क्वार्टरमध्ये सहकुटूंब राहत होतो. तेथेच भोजनाची व्यवस्था केली. प्राचार्यासमवेत आणखी पाचसहा जणांची पाने लावली. दोन्ही प्रकारचे अस्सल महाराष्ट्रीयन भोजन वाढण्यात आले. पाहुणे पाटावर बसले आणि अनपेक्षितपणे त्यांनी चपाती ऐवजी ज्वारीच्या भाकरीची मागणी केली. मी गोंधळलो. परंतू नशिबाने ज्वारीचे पीठ घरात होते. अगदी सात-आठ मिनिटात त्यांच्या ताटात गरम भाकरी आली आणि माझा जीव भांड्यात पडला.

१९६७ साली एका विनाशकारी भूकंपाने महाराष्ट्र हादरला तेव्हा भूकंप पिडितांना मदत करण्यासाठी तिकीट लावून नाटकाचा प्रयोग करण्याचे कॉलेजने ठरविले. आचार्य अत्रे यांच्या नाटकाची निवड होऊन दिग्दर्शनाचे काम प्रा. जे.आर दाभोळे यांच्याकडे आले. नगरपालिकेच्या एका हॉलमध्ये प्रॅक्टीस करण्याचे ठरले. पात्रांची निवड सुरू झाली. ग्रामीण भागातून आलेला एक विद्यार्थी त्याला या नाटकात काम करण्याची मोठी इच्छा; तथापि डायरेक्टरच्या निकषांना तो काही उतरत नव्हता. त्याला कटविण्यासाठी गंमत म्हणून नाटकातील सर्व पात्रांचा अभिनय त्यांच्याकडून करवून घेण्यात येत होता. पण तो इतका जिद्दीचा व चिकाटीचा होता की त्याने नाटकात काम मिळविलेच ! हा विद्यार्थी पुढे एक नामवंत प्राध्यापक व सिनेसृष्टीतील प्रसिद्ध गीतकार झाला.

विविध गुणदर्शन समितीचा चेअरमन म्हणून काम करताना खुप चांगले कलाकार व गायक विद्यार्थी भेटले. अगदी सुरूवातीच्या काळात श्री. नाईक व श्री. प्रभुणे हे विद्यार्थीच पेटी-तबला वाजवायचे व त्यांच्या संगीतावरच कार्यक्रम व्हायचा पण पुढे मात्र श्री. जांभळे यांच्या ऑर्केस्ट्राची साथ मिळाली व त्यांच्या सुरेल संगीतावर जी गाणी गायली गेली ती अजूनही आठवतात. दोडके, शर्मा, मुल्ला, घाडगे, कु. कुलकर्णी, कु. जाधव, कु. व्यास हे त्यावेळचे पट्टीचे गायक होते. 'ताजमहल के खंडहर' मधील श्री. मुकुंद कुलकर्णी यांचा अभिनय सर्वांचीच दाद घेऊन गेला होता. भांगडा नृत्याने चांगलाच इतिहास घडविला.

मी वर्ग-प्रतिनिधी निवडणूक समितीचा चेअरमन होतो. वर्गाची संख्या मोठी होती त्यामुळे मतदारांची संख्या प्रचंड होती. निवडणूका नेहमीप्रमाणे चुरशीच्या झाल्या. निकाल जाहीर झाले परंतू काही वेळातच प्राचार्य मगदूम सरांनी समितीची बैठक बोलाविली. मी थंडीतापाने आजारी असतानाही हजर राहिलो. फेर-मतमोजणीच्या मागणीस सरांनी परवानगी दिली होती. मतांची फेरमोजणी झाली परंतू त्यात एकाही मताचा फरक पडला नाही. आम्हा सेवकांचे टीमवर्क अतिशय बिनचूक व शिस्तबद्ध असे व त्याचा मला नेहमी अभिमान वाटे. ऑफिसमधील सेवक अतिशय विश्वासू कार्यतत्पर होते. या संदर्भात मला एका सेवकाचा आवर्जुन उल्लेख करावा वाटतो. पूर्वी विद्यापीठ परीक्षांच्या प्रश्नपत्रिका कॉलेजमध्ये सायक्लोस्टाईल केल्या जात असत. मोठ्या जोखमीचे व गोपनीय असे काम शिवराम जाधव या शिपाई सेवकाने त्याच्यावर टाकलेल्या विश्वासाला केव्हाही तडा जाऊ न देता पार पाडले.

माझ्या पीएच.डी. च्या प्रबंधाचे अपूर्ण राहिलेले काम मी पूर्ण करून कोल्हापूरहून परत येत असताना प्राचार्य सूर्यवंशी साहेबांनी मला पहिले. माझ्या हातातील बॅग पाहून त्यांनी विचारले, 'थेसिस सबमीट करून करून आलात की काय ?' मी हो म्हणताच त्यांनी, व्हेरी गुड ! एक्सलंट ! असे उत्स्फूर्त उद्‌गार काढले की जे अजूनही माझ्या कानात घुमतात. पीएच.डी.ची पदवी संपादन केल्यावर माझ्या सहकारावेळी प्राचार्य मगदूम व मा. केशवराव पवार उर्फ दादा यांनी माझे, माझ्या कामाचे केलेले मूल्यमापन मला माझ्या परीक्षणाची पावतीच देऊन गेली.

या कॉलेजचा प्राचार्य म्हणून मी फार अल्प काळ काम केले. या काळात माझे अनेक जेष्ठ प्राध्यापक सहकारी उपप्राचार्य म्हणून बढतीने बदलून जाऊ लागले. त्यांच्या जागी माझी चिंता दूर करण्यासाठी नवी माणसे आली. यावेळी स्टाफ क्वॉर्टरचे फेर वाटप करताना प्रशासनाच्या दृष्टीने नव्या व्यक्तींना जागा देताना एका जुन्या जिवलग सहकाऱ्याला त्याचा रास्त अधिकार असताना जागा देऊ शकलो नाही याची खंत अद्याप मनाला लागून राहिली आहे.

स्टाफ क्वॉर्टरमध्ये रहात असताना माझ्या कुटुंबावर मोठा दुःखाचा डोंगर कोसळला. जुलै महिन्याचा शेवटचा दिवस, अमावस्येची रात्र संपता संपता सकाळी सकाळीच सूर्यग्रहण लागले होते. याच दिवशी माझ्या मुलाला काळाने ओढून नेले. या माझ्या कौटुंबिक दुःखात धो धो पाऊस पडत असताना व कृष्णेला महापूर आला असताना माझ्या सर्व सहकाऱ्यांनी व विद्यार्थ्यांनी, विशेषतः मा. श्री. केशवराव पवार, श्री. रविंद्र पवार, प्रा. कदम, प्रा. माळवे, प्रा. महादार, प्रा. निकम, प्रा. के.पी.पाटील, प्रा. हेरवाडे, प्रा. मोरे यांनी केलेली मदत व सांत्वन यांची आठवण झाली म्हणजे हृदय भरून येते.

तेव्हा मित्र हो, 'स.गा.म' मधील माझ्या या सुखदुःखाच्या आठवणी. संस्थेत मी एकतीस -बत्तीस वर्षे सेवा केली. त्यामधील सतरा वर्षे मी 'सगाम' मध्ये रमलो म्हणजे मोअर दॅन वन्-हाफ् काळ. या काळाबद्दल अजून भरभरून भरपूर लिहिता येईल परंतु स्मरणिकेसाठी एवढा उजाळा पुरे.

✦ ✦

स.गा.म.मधील योगदान

माजी प्राचार्य एन.एन.भगरे
पंढरपूर

रयत शिक्षण संस्थेचे मानद सचिव पै. मुल्लासाहेब व कै. रामभाऊ नलवडे, चेअरमन रयत शिक्षण संस्था यांनी मला संस्थेत सेवा करण्याची संधी दिली. आज माझे वय ७२ वर्षे आहे पण इच्छा शक्ती कर्मवीरकृपा आणि गुरुवर्यांच्या आशीर्वादावर हिंडतफिरत आहे. गेल्या आठ वर्षापासून मी अर्धांगवायूने जर्जर आहे. स.गा.म. कॉलेजमध्ये प्राचार्य कणबरकर व प्राचार्य शिंदे कार्यरत असताना त्यांचा एक आवडता विद्यार्थी म्हणून मी वारंवार कराडला येत असे. या कॉलेजमध्ये मी ८.८.१९८३ ते ३०.४.१९८४ पर्यंत काम पाहिले प्रथम कॉलेजच्या प्रथा व त्रुटी यांचा एक महिना अभ्यास केला. सर्व सहकाऱ्यांना विश्वासात घेऊन प्रत्येक आठवड्याला कामाचा आढावा घेण्यासाठी बैठका घेतल्या.

कॉलेजला स्वतंत्र ग्रंथालयाची इमारत नव्हती. त्याद्दष्टीने सर्व प्रस्ताव विद्यापीठ अनुदान मंडळाकडे पाठविले. पंजाब विद्यापीठाच्या ग्रंथालयाच्या इमारतीचा आराखडा प्रत्यक्ष तेथे जाऊन घेऊन आलो. श्री. जानुगडे इंजिनियर यांच्या साह्याने ग्रंथालय इमारतीचे बांधकाम पूर्ण केले.

सायकल स्टॅण्डची उभारणी मुख्य ग्राऊंडजवळ करुन त्याचे उद्घाटन एका विद्यार्थ्याकडून केले. विद्यार्थिनींना पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी म्हणून कार्यालयाच्या पूर्वेस पाण्याची टाकी बांधली.

स्वातंत्र्यदिन, प्रजासत्ताक दिन व महाराष्ट्र दिनासारखे राष्ट्रीय सण साजरे करण्यासाठी आवश्यक असणारा ध्वजस्तंभ मुख्य इमारतीच्या उत्तरेस उभारला. त्याचे उद्घाटन कै. केशवराव पवार यांच्या हस्ते केले.

विद्यार्थिनींची संख्या विचारात घेता लेडीजरुम छोटी होती. म्हणून कार्यालयाच्या पाठीमागे त्यावेळी असलेल्या बागेत सावली मंडप, कट्टे बांधून मुलींची बसण्याची सोय केली.

तिर्थरुप प्राचार्या सुमतिबाई पाटील यांच्या नावे असलेल्या मुलींच्या वसतिगृहात स्वयंपाकघर, स्टोअर व स्नानगृह यांचे नव्याने बांधकाम करुन मा. आप्पासाहेब पाटील, संघटक, रयत शिक्षण संस्था आणि मा. केशवराव पवार यांच्या हस्ते उद्घाटन केले.

कॉलेज परिसरातील व सेवकांच्या मुलांसाठी बालवाडीची आवश्यकता होती. या संदर्भातील जबाबदारी प्रा. सौ. इंदिरा शिंदे व पाटील यांचेकडे सोपविण्यात आली. यामधूनच आज पूर्वप्राथमिक शिक्षणापासून पदव्युत्तर शिक्षणापर्यंतची सोय महाविद्यालयाच्या प्रांगणात झाली आहे.

पसरलेल्या इमारती, विभाग, वसतिगृहे, स्टाफ क्वार्टर्स यांच्याशी संपर्क साधण्यासाठी मनुष्यबळ खर्च होत होते. इंटरकॉमच्या सोईमुळे वेळेची बचत झाली व कार्यक्षमता वाढली.

सेवकांच्या कुटुंबातील मुलांच्या आरोग्यविषयक अडचणी दूर करण्याच्या दृष्टीने मार्गदर्शन, औषधपाणी सोय सुरु केली.

डेडमनी समितीद्वारा प्रत्येक सेवकाकडून प्रतिमहिना रु. १० गोळा केले जात असत या डेडमनी फंडातून गरजू सेवकांची आकस्मिक आर्थिक अडचण दूर होत असे.

'रयत शिक्षण संस्था ही शिक्षकांची ! शिक्षकांनी रयतेसाठी चालविलेली संस्था' हे कर्मवीरांचे तत्वज्ञान आम्ही या कॉलेजमध्ये तंतोतंत पाळले. परिणामी, सर्व सेवकांत आपण प्रशासक आहोत ही भावना वाढीस लागली. सर्व सेवकांचे दैनंदिन कामकाज वेळेनुसार आणि योग्य पद्धतीने होत असे. या महाविद्यालयात मिळालेले सहकार्य, प्रेम, जिव्हाळा अन्यत्र उपभोगता आला नाही.

कुसुरच्या विद्यार्थ्यांनी कॉलेजला भेट दिलेला दानशूर बंडो गोपाळा कदम मुकादम तात्यांच्या पुतळ्याची उभारणी करून मा. मातोश्री प्राचार्या सुमतीबाई पाटील यांचे हस्ते उद्घाटन केले. त्यावेळी मा. प्राचार्य एन. डी. पाटील जातीने हजर होते.

महाविद्यालयात 'कमवा व शिका' योजना यशस्वीपणे कार्यरत होती. प्रा. डॉ. एस. बी. शिंदे यांच्या नेतृत्वाखाली ४० विद्यार्थ्यांसाठी श्रमयोजना टीम तयार केली. त्यांचे लेझीम पथक कर्मवीर जयंती व विविध मिरवणूकीच्या प्रसंगी सहभागी होवून कराडकरांची वाहवा मिळविली होती. कॉलेजच्या पूर्वेकडील पडीक जमीन व्यवस्थित करून त्याजागी उसाची लागवड केली व त्यातून उत्पन्न घेण्यास प्रारंभ केला. ऑडिटोरीयम उन्हाळी सुटीच्या काळात, साखर कारखान्यास भाडेतत्वावर देवून 'कमवा व शिका' योजनेस रु २५०००/- ची मदत मिळविली.

कॉलेज स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने होणाऱ्या खर्चात बचत व्हावी म्हणून गादीच्या बैठक व्यवस्थेस फाटा दिला. विद्यार्थ्यांनी केलेल्या आवाहनास मान देवून त्यांनी तीन दिवस जमिनीवर बसूनच कार्यक्रमाचा आनंद घेतला. शिस्तप्रिय प्राध्यापक आणि एन.सी.सी.चे कमांडर प्रा. अरुण बर्गे व इतर प्राध्यापकांच्या सहकार्यामळे प्रचंड गर्दी असूनही कार्यक्रम शांततेत पार पाडीत असे.

कॉलेज N.C.C. च्या कँप आयोजनात कॅप्टन बर्गे यांचा महत्वाचा वाटा असे. याच काळात अंडर ऑफिसर जीवन पवार याची प्रजासत्ताक दिन परेडसाठी निवड झाली.

✦ ✦

कॉलेजचे खेळाडू वेगवेगळ्या स्तरांवर आपली चुणूक दाखविली. विद्यापीठ स्तरांवर आमचा कबड्डी संघ अजिंक्य ठरला.

स.गा.म. कॉलेजमधील एका वर्षाच्या काळात मला सर्व शिक्षक, शिक्षकेतर सेवक वर्गाचे सहकार्य लाभले. मा. केशवराव पवार, मा. सरपंच जाधव, सभापती मा. चव्हाण, श्री. रेठरेकर पाटील यांचे सहकार्य लाभले. सुवर्ण महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी मी उपस्थित राहिलो.

महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासास माझ्या शुभेच्छा !

जय कर्मवीर !

✦ ✦

दि प्रेस ॲण्ड रजिस्ट्रेशन ऑफ बुक्स ॲक्ट
फॉर्म ४ : नियम ८ अनुसार

प्रकाशन स्थळ	:	रयत शिक्षण संस्थेचे, सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड
प्रकाशन काल	:	सुवर्ण महोत्सवी
प्रकाशकाचे नाव	:	मा.प्राचार्य अरूण बर्गे
राष्ट्रीयत्व	:	भारतीय
पत्ता	:	रयत शिक्षण संस्थेचे, सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड
संपादकाचे नाव	:	प्रा.मानसिंग कदम
राष्ट्रीयत्व	:	भारतीय
पत्ता	:	रयत शिक्षण संस्थेचे, सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड
मालकी	:	रयत शिक्षण संस्थेचे, सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड
मुद्रकाचे नाव	:	श्री. संदेश शहा
राष्ट्रीयत्व	:	भारतीय
पत्ता	:	प्रिंट ओम ऑफसेट, २६९ब/२, नर्मदा स्कूल रोड, दौलतनगर, सातारा

(फक्त खाजगी वितरणासाठी)

(या अंकातील विचारांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.)

मी प्राचार्य अरूण बर्गे जाहीर करतो की वर दिलेला तपशील माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे खरा आहे

प्राचार्य अरूण बर्गे
प्रकाशक

स. गा. म. : एक स्मरण

श्री. डी. के. खोत
सेवानिवृत्त प्राचार्य

सद्गुरु गाडगे महाराज महाविद्यालयात मी १६ मे १९८५ रोजी प्राचार्यपदी रुजू झालो. एकूण १६ एकराचा अवाढव्य परिसर पाहून स्तंभीत झालो. हे एक कराड तालुक्याच्या परिसरातील 'जनता महाविद्यालय' आहे असे जाणवू लागले.

मी या कॉलेजात आलो तेव्हा ग्रंथालयाची इमारत अर्धवट अवस्थेत होती. ती केली. ग्रंथालयाची दुमजली इमारत ह्या महाविद्यालयाचे मर्मस्थान आहे; कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाच्या सर्व शाखांच्या संदर्भ ग्रंथासह एक लाखाहून अधिक पुस्तकांनी हे ग्रंथालय आज समृद्ध आहे. गरीब विद्यार्थ्यांसाठी पुस्तक पेढीची सोय सुद्धा उपलब्ध आहे.

विद्यार्थी संख्या तीन हजाराच्या आसपास होती. एकूण प्राध्यापक दोनशेच्यावर होते. प्राध्यापकांच्या बैठकीसाठी सर्व सोयीनी युक्त असा एक मोठा हॉल बांधून घेतला. याच काळात मी शिवाजी विद्यापीठाच्या कार्यकारिणीवर ऑक्टो. १९८५ रोजी निवडून गेलो.त्यामुळे महाविद्यालयासाठी अनेक प्रकारची कामे करुन घेता आली.

कायमस्वरुपी संलग्नता -

विद्यार्थ्यांसाठी लेक्चर हॉलच्या इमारती भव्य व पुरेशा होत्या. कला, वाणिज्य, विज्ञान शाखेत प्रथम वर्षापासून तृतीय वर्षापर्यंत भरपूर विद्यार्थी संख्या होती. सहा विषयांचे एम. ए. चे वर्ग होते. सर्व प्राध्यापक गुणवत्तापूर्ण होते. स्वतंत्र जिमखाना हॉल होता. करमणूक, सर्व सामान्य व्याख्याने इ. साठी प्रेक्षागृह होते. बी.एस्.सी. पदवीसाठी सात विषयांची मान्यता होती. ज्युनिअर व सिनिअरसाठी सुसज्ज प्रयोगशाळा होत्या. दिडशे विद्यार्थ्यांसाठी व शंभर विद्यार्थिनींसाठी सर्व सोयीनीयुक्त स्वतंत्र वसतिगृहे होती. खेळाचे विस्तीर्ण पटांगण होते. मुलांचे एन.सी.सी. पथक होते. नंतर मुलींसाठी स्वतंत्र एन.सी.सी.चे पथक सुरु केले. कार्यालयीन कर्मचाऱ्यांसाठी आणि प्राध्यापकांसाठी उत्तम निवासस्थाने होती. प्राचार्य निवास होते. कोणत्याही गोष्टीची कमतरता नव्हती. म्हणून या महाविद्यालयाला कायमस्वरुपी संलग्नता मिळावी यासाठी शिवाजी विद्यापीठाकडे अर्ज केला. या अर्जास फेब्रुवारी १९८६ रोजी मंजुरी मिळाली.

पदव्युत्तर विद्यापीठ परीक्षा केंद्र :

कराड येथे एम. ए. व एम. कॉम परीक्षार्थी विद्यार्थ्यांची संख्या तीनशेच्यावर असल्यामुळे व वेणूताई महाविद्यालयाचे प्राचार्य प. ता. थोरात व मी विद्यापीठ कार्यकारिणीवर असल्यामुळे कराडला पदव्युत्तर परीक्षेचे केंद्र मंजूर करुन घेतले.

एम.ए.साठी समाजशास्त्र विषयाला परवानगी मिळवून घेतली. जिल्हा परिषद सातारा यांच्या विद्यमाने या कॉलेजमध्ये ''विज्ञानमंच''ची सुरुवात केली. संगणक खरेदी करुन विद्यार्थ्यांसाठी व कार्यालयीन कामकाजासाठी वापण्यास प्रारंभ केला.

शिवाजी विद्यापीठाच्या मान्यतेने सर्वप्रथम एम.फिलचे वर्ग सुरु केले. शास्त्र शाखेच्या विकासासाठी यु.जी.सी.कडून प्रत्यक्ष दिल्लीला जावून २५ लाखाच्या प्रकल्पास मंजुरी मिळवून आणली. महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा मंत्रालयातून रु.५०,००० ची क्रींडागणासाठी मदत मिळविली. शेजारच्या कृष्णा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन मा. जयवंतराव भोसले यांना प्रत्यक्ष भेटून त्यांच्याकरवी कारखान्याच्या यंत्रणेमार्फत सुमारे ७०,००० रु.च्या खर्चाने क्रींडागण मोफत करवून घेतले. कारण या महाविद्यालयाला B.Sc. फिजिकल एज्युकेशनसाठी यु.जी.सी.चे साडेबारा लाखाचे अनुदान मंजुर झालेले होते. पण माझी येथून बदली झाली म्हणून ते जमले नाही.

विद्यापीठात कर्मवीरांचा पुतळा :

सन १९८६-८७ साल हे कर्मवीर अण्णांच्या जन्मशताब्दीचे वर्ष होते. विद्यापीठानेसुद्धा कर्मवीरांच्या कार्याची दखल घेऊन काही कार्यक्रमांचे आयोजन करावे अशा आशयाचा ठराव विद्यापीठ कार्यकारिणीसमोर मी ठेवला. प्रस्तावास विद्यापीठ

कार्यकारिणीने मंजुरी देवून माझ्या अध्यक्षतेखाली एक उपसमिती नियुक्त केली. समितीचा अहवाल कार्यकारिणीने मंजूर केला. कर्मवीरांच्या जीवन व तत्त्वज्ञानावर निबंध, वक्तृत्व स्पर्धा व जिल्ह्याच्या ठिकाणी व्याख्याने विद्यापीठाने आयोजित करण्याचे ठरले. त्याचबरोबर महत्त्वाचे म्हणजे र.शि.संस्थेने कर्मवीर अण्णांचा एक पूर्णाकृती भव्य पुतळा द्यावा व विद्यापीठाने स्वखर्चाने बसवावा, असे ठरले. विद्यापीठ व संस्था यांच्यामार्फत पुतळ्याचे ठिकाण निश्चित करण्यात आले. संस्थेचे संघटक मा. आप्पासाहेब पाटील यांनी स्वत: लक्ष घालून संस्थेकडून पुतळा देण्याचे मान्य करवून घेतले. सदरहू पुतळ्याचे अनावरण मा. राष्ट्रपती शंकरदयाळ शर्मा यांनी मे १९८८ ला केले.

✦ ✦

काही अपेक्षा :

कर्मवीर अण्णांच्या पुतळ्याशेजारी सद्गुरु गाडगे महाराज यांचा अर्धपुतळा असावयास पाहिजे असे वाटते. हे महाविद्यालय कराड परिसरातील बहुजन समाजाच्या आशा-आकांक्षाचे प्रातिनिधिक स्वरुप आहेच त्याचबरोबर सर्वांगीण विकासास वाव असलेले हे महाविद्यालय कराड परिसराचे मार्गदर्शक केंद्र होईल असे वाटते. महाविद्यालयास सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा.

✦ ✦

With Best Compliments From

ASHOK D. KADAM
B.E.(Civil), AMIE, FIV

Tel. : (02164) 225921
Mobile : 9422400541

KADAM & ASSOCIATES

Consulting Civil Engineers
Contractors & Approved Valuers
(f-14020)

RESI & OFFICE
'ANUBANDH' 21/1, NEAR
RANJEETNAGAR, WAKAN ROAD,
MANGALWAR PETH, KARAD : 415 110.
DIST. : SATARA

With Best Compliments From



OKASA PHARMA PVT. LTD.

L-2, Additional M.I.D.C.,
SATARA : 415 004

स्मरण स. गा. म. चे

प्राचार्य एम.एम.स्वामी
माजी प्राचार्य व माजी सचिव,रयत शिक्षण संस्था सातारा

रयत शिक्षण संस्थेच्या 'कमवा व शिका' या मुशीतून तयार झालेला मी एक रयत सेवक. प्रा.बॅरि.पी.जी.पाटील, प्राचार्या सौ. सुमतिबाई पाटील, प्रा.गो.ह.महाजन, प्रा.पोंधे, डॉ. मॅथ्यू., प्राचार्य उनउने, प्राचार्य रा.कृ.कणबरकर यासारख्या अनेक उच्चतम आदर्श शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली वाढलो आणि पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानाचा पायिक झालो हे मी माझे भाग्य समजतो. कर्मवीरांची छाया व स्मृती माझ्या रोमारोमात भिनली आहे व ती तशीच माझ्या अंतःकरणात शेवटपर्यंत राहील.

रयत शिक्षण संस्थेने भारतात कराड तालुक्यातील सैदापूर सारख्या खेड्यात स्थापन केलेल्या पहिल्या व संस्थेतील दुसऱ्या सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज कराड ने ५० वर्षे पूर्ण केली ही सुवर्ण अक्षरात लिहून ठेवण्यासारखी घटना आहे. जर हे कॉलेज नसते तर ग्रामीण विद्यार्थ्यांचे अगणित नुकसान झाले असते. 'रयत' या वटवृक्षाच्या फांदीचा आधार मिळाल्यामुळेच आज असंख्य गरीब दीन दलित व्यक्ती शासकीय, सामाजिक, राजकीय, आणि शैक्षणिक क्षेत्रात स्वाभिमानाने कार्यरत आहेत हे मी या महाविद्यालयाचा माजी प्राचार्य आणि रयत शिक्षण संस्थेचा सचिव म्हणून नमूद करू इच्छितो. उदाहरणच द्यायचे झाले तर या सुवर्ण महोत्सवानिमित्त प्रसिद्ध होणाऱ्या स्मरणिकेचे प्रमुख संपादक प्रा. मानसिंग कदम, आणि शाळगाव या खेडेगावातील प्रा.डॉ.अशोक करांडे यांना जर मी माझ्याबरोबर मंचर आणि श्रीरामपूर या ठिकाणी, उच्च शिक्षणासाठी नेले नसते तर आज हे दोघेही इंग्रजी विषयातील डॉक्टर झाले नसते व खेड्यात गुरे राखत बसले असते.

रयत शिक्षण संस्थेच्या इतिहासातील, स.गा.म.कॉलेज हे एक दुसरे सोनेरी पान आहे. मला या कॉलेज मध्ये १/७/१९८९ ते १४/६/१९९० या कालावधीत प्राचार्य म्हणून काम करण्याची संधी मिळाली हे मी माझे भाग्य समजतो. कारण याच कॉलेजमध्ये कार्यरत असताना मला रयत शिक्षण संस्थेच्या सचिवपदी विराजमान होण्याची संधी मिळाली. सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या उद्घाटन सोहळ्यास समक्ष हजर राहून सत्कार, स्वीकारताना सध्याचे प्राचार्य अरूण बर्गे अल्पावधित 'महाविद्यालयाचा कायापालट' करू शकतात. आपण मात्र हे सर्व काही करू शकलो नाही याची आजही खंत वाटते तरी देखील मी माझ्या कारकिर्दीत काही स्तुत्य उपक्रम, प्रकल्प, आणि योजना राबवल्या आहेत याचा नामोल्लेख करणे आवश्यक वाटते.

मी जे जे केले ते रयत शिक्षण संस्थेचा विद्यार्थी म्हणून आणि सामाजिक बांधिलकीने जातीधर्म निरपेक्ष वृत्तीने 'रयतसेवक' म्हणून काम करीत राहणे या भावनेने. माझा १००% विश्वास आहे की रयत शिक्षण संस्था ही नैतिक शिक्षणाची प्रयोग शाळा आहे.

स.गा.म.कॉलेजमधील ते मंतरलेले दिवस अजूनही मला आठवतात. महत्त्वाचे म्हणजे अल्पशा कालावधीत मुलींच्या वसतिगृहात नवीन खोल्यांचे बांधकाम पूर्ण केले. त्यामुळे ७० मुलींची राहण्याची व्यवस्था करता आली विशेष म्हणजे पायाखुदाई पासून स्लॅब होईपर्यंत प्रशासकीय सेवकांनी प्रत्यक्ष स्वतःची जबाबदारी सांभाळून इमारतीच्या बांधकामास हातभार लावला त्यांनी मला अत्यंत मोलाची साथ दिली. सर्वांच्या सहकार्यामुळेच विद्यार्थिनींनी सुमारे १४०००/- रूपये देणगी जमा केली व सद्गुरू कँटीन, व्यवसाय अभ्यासक्रमाची इमारत आणि कार्यालयाच्या पाठीमागील स्टोअररूम इत्यादीचे बांधकाम सुरू केले. याशिवाय पिण्याच्या पाण्याच्या दोन टाक्या बसवल्या.

माझ्या सेवाकालात मा. बा.ह.कल्याणकर औरंगाबाद, मा. आबासाहेब पार्लेकर कराड, प्रा. एन.डी.पाटील, चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा, प्रा.डॉ.औंटी व्ही.बी., पारनेर, मा. मामासाहेब कुलकर्णी मुंबई, ॲड.दत्ताजीराव माने, सांगली, डॉ. चव्हाण पी.डी, कोल्हापूर, डॉ.द.ता.भोसले, पंढरपूर आणि श्रीमंत शाहुमहाराज सातारा इत्यादी मान्यवरांनी विविध प्रसंगी महाविद्यालयात भेटी दिल्या. मला या महाविद्यालयात अनेक प्रकल्प राबवायचे होते परंतु संस्थेने मला सचिव पद बहाल केले त्यामुळे संस्थेत मला व्यापक स्वरूपाचे काम करण्याची संधी मिळाली.

खरोखर हा कर्मवीरांचा सन्मान आहे. असे मला मनोमनी वाटते.

✦ ✦ ✦ ✦

श्री सिद्धीविनायक शिक्षण संस्था, कराड

श्री सिद्धी डी. एम्. एल. टी. कॉलेज, कराड

D.M.L.T.

(Diploma in Medical Laboratory Technology)

किमान शैक्षणिक पात्रता - १२ वी आर्टस, सायन्स, कॉमर्स, बी.एस्सी, एम.एल.टी, सी.एम.एल.टी., डी. फार्म

नर्सिंग कोर्स

किमान शैक्षणिक पात्रता - १०वी उत्तीर्ण (फक्त महिलांसाठी)
इच्छुक व पात्र उमेदवारांनी प्रवेशासाठी तात्काळ संपर्क साधावा.

प्रत्येक कोर्ससाठी कालावधी १ वर्ष

ठळक वैशिष्ट्ये

- अद्यावत सोयींनी युक्त अशी लॅबोरेटरी
- विद्यार्थ्यांना एस.टी. पासची सोय
- विद्यार्थ्यांना होस्टेलची सोय
- अनुभवी प्राध्यापक वर्ग
- गरीब व गरजू विद्यार्थ्यांना फी मध्ये सवलत
- वैयक्तिक मार्गदर्शन

श्री. सुर्यकांत आनंदराव पाटील
संस्थापक
श्री सिद्धी डी. एम. एल. टी. कॉलेज, कराड
श्रद्धा कॉम्प्लेक्स, कंटक हॉस्पिटल जवळ,
संकेत सोनोग्राफी शेजारी, स्टेशन रोड, कराड.
फोन : (०२१६४) २२६३६२

With Best Compliments From

K.K.Jamdade

JAMPOW FACRICATORS

Mfrs.: Ind. Fabrication & All Sorts Of Engg. Works.
Plot No. 18/1, 17/3,4 Koyana Industrial Estate Ltd.
Malkapur, Karad - 415110 (Maharashtra)
Ph. (02164) 242112,
Tel Fax - (02164) 241112
Visit us - www.jampow.com

सद्‌गुरू : त्रिवेणी संगमातील निर्मळ क्षण

प्राचार्य ई. जी. निकम
'श्रेयस' कर्मवीर कॉलनी, विद्यानगर, कराड

जून १९५८ चा तो दिवस ! लाजरेपणाने, बुजरेपणाने 'वशी' या खेड्यातून सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेजमध्ये प्री-डिग्री आर्टस्‌च्या वर्गात प्रवेश घेण्यासाठी आलो तो दिवस ! आणि याच महाविद्यालयाचा प्राचार्य म्हणून एप्रिल १९९९ साली सेवानिवृत्त झालो तो दिवस ! या ४१ वर्षाच्या कालखंडात नवनेच्या रुपानं गाडगे महाराजांच्या 'मठाचं' गाडगे महाराजांच्या 'अभियाना'त झालेलं रुपांतर पाहून मन प्रसन्न होतं आणि कर्मवीरांनी जे स्वप्न पाहिलं ते साकार झाल्याचं समाधान मिळतं.

मार्च १९५८च्या एस. एस. सी. परीक्षेत कर्मवीर विद्यालय ऐतवडे बुद्रुक या कर्मवीरांच्या गावच्या हायस्कूल मधून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाल्यावर शिक्षणासंबंधी सल्ला घेण्यासाठी मी व माझे वडील मुख्याध्यापक मा. श्री. बी. डी. चौगुले सर यांच्याकडे गेलो. त्यांना माझ्या घरच्या आर्थिक परिस्थितीची कल्पना होती. कारण माझ्यापुढे अंधाराचे साम्राज्य, रखरखीत वाळवंट होते. पण या 'वाळवंटा'च 'ओऍसिस' मध्ये रुपांतर करण्याची प्रेरणा त्यांनी मला दिली तो क्षण आज अनमोल ठरला. कारण मला 'कमवा व शिका' या योजनेतून कॉलेज फी व जेवणखर्च भागवून शिक्षण घेता आले.

१९५८ साली महाविद्यालय बाल्यावस्थेत होते.फक्त आर्टस् व कॉमर्स विभागच होते. विद्यार्थीसंख्या जेमतेम २०० ते २२५ इतकी होती. प्रत्येक वर्गातील असंख्य स्मृतींची गर्दी त्याच वर्गात प्राध्यापक व पुढे प्राचार्य म्हणून पाऊल टाकताना वरचेवर होत होती. आयुष्यातील ते सोनेरी दिवस निघून गेले असले तरी आजही त्या स्मृतीचा गंध दरवळत राहतो. आपण विविध स्पर्धेमध्ये हिरीरीने घेतलेला भाग, वार्षिक क्रीडास्पर्धेत संपादन केलेले यश, वर्गाला आपण मिळवून दिलेली चँपीयनशीप, प्राध्यापकांनी केलेले सहकार्य व उपदेश, प्राचार्य बी.ए. चौगुले यांचा दरारा अशा असंख्य स्मृती चलत चित्रपटाप्रमाणे हृदयपटलावर हुबेहुब उभ्या राहतात. गेले ते दिवस !

जून १९७४ मध्ये याच महाविद्यालयात मी पाऊल टाकले ते इंग्रजी विषयाचा प्राध्यापक व विभाग प्रमुख म्हणून ! माझ्यात झालेल्या बदलाप्रमाणे महाविद्यालयाचे रुप अमुलाग्र बदलेले होते. रंग, रुप, आकार जसा बदलत होता त्याचबरोबर कला व क्रीडा क्षेत्रात यशाची ध्वजा उंच फडकत होती. नव्या उत्साहाने विविध उपक्रमात सक्रीय सहभाग घेत होतो. वार्षिक स्नेहसंमेलनाच्या विविध गुणदर्शनाच्या कार्यक्रमाच्या सरावामध्ये क्रित्येक तास खर्च करत होतो. कार्यक्रम सादर होईपर्यंत मन अस्वस्थ असायचे. रात्रीचे दिवसात रुपांतर करावे लागत असे. महाविद्यालयात प्रवेश घेणारे विद्यार्थी हे ग्रामीण परिसरातीलच. ८०/८५ टक्के मुलांचे इंग्रजी कच्चेच ! ग्रामीण परिसराशी आपली नाळ जोडली असल्याने या मुलांच्या अडचणी समजावून घेऊन प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे मदत करीत होतो. त्यांना कर्तव्य सन्मुख होण्यासाठी इंग्रजी विषयाची आवड निर्माण केली. या विद्यार्थ्यांना घडविण्याचे, योग्य दिशा देण्याचे काम १९८३ पर्यंत करीत राहिलो. नेहमीच एम. ए. चे तास शनिवार व रविवारीच घ्यावे लागत होते.

१ ऑगस्ट १९९३ मध्ये माझी बदली सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड येथे प्राचार्य म्हणून झाली. मी सेवा निवृत्त होईपर्यंत म्हणजे ३१ मार्च १९९९ पर्यंत सदैव कार्यरत राहिलो. या कालावधीमध्ये मी कॉलेजमध्ये शिस्तीची परंपरा जोपासून ठेवली. कराड-मसूर रस्त्याकडेचे कॉलेजच्या दगडीभिंतीचे काम केले. प्रयोगशाळा इमारतीच्या ३ऱ्या मजल्याचे बांधकाम पूर्ण केले. स्वतंत्र संगणक प्रयोगशाळेची स्थापना केली. यु.जी.सी. च्या आर्थिक मदतीने प्रयोगशाळेच्या दक्षिणेस ३ वर्गांचे बांधकाम पूर्ण केले. त्यावरील पहिल्या मजल्याच्या ३ क्लासरुमच्या विस्तारीत कामासाठी यु.जी.सीची मंजूरी मिळवली. प्रयोगशाळेसाठी असलेल्या गॅस प्लँटसाठी सॉल्व्हंट ऑईल मिळविणे खर्चिक ठरत असल्याने शास्त्रप्रयोगशाळेत प्रयोगासाठी एल. पी.जी. गॅस सिलेंडरचा वापर सुरु केला. शासनाच्या मोजणी

विभागाकडून मोजणी आणून महाविद्यालयाच्या सर्वबाजूंनी हद्दी निश्चित करून घेतल्या. त्यामध्ये कॉलेजच्या वापरात नसलेले पण मालकीचे असलेले ६ गुंठ्यांचे ६ प्लॉटस् कॉलेजला मिळवून दिले. विद्यार्थ्यांना व्यायामाचे साधन म्हणून Sixteen Station (मल्टीजिम) शासनाच्या साह्याने उपलब्ध करुन दिल्याने तेथे एकाचवेळी १६ विद्यार्थी व्यायाम करु लागले. महाविद्यालयाच्या स्थापनेपासून कुस्तीची परंपरा चांगली असल्याने कुस्तीगिरांसाठी नवीन मॅट उपलब्ध करुन दिली. मुख्य इमारत गळत होती. त्यासाठी जाहीर टेंडरद्वारे निविदा मागवून गळती बंद करण्याचे काम केले. मा. ना. डॉ. पतंगराव कदम हे या कॉलेजच्या स्थानिक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष असल्याने त्यांना विनंती करुन कायम स्वरुपाचे काहीतरी भरीव कार्य करावे म्हणून त्यांचेकडून क्रीडा संकुलाचे आश्वासन मिळवले होते. त्यानुसार त्यांनी दिलेल्या अर्थसाह्य, शासकीय मदत, लोकवर्गणीतून सदरचे क्रीडा संकुलाचे काम पूर्णत्वाकडे जात आहे. माझ्या कारकिर्दीत अनेक विद्यार्थी बोर्ड, विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत चमकले. तसेच कैलास माने, कु. सीमा लाड, अतुल पाटील यांनी राष्ट्रीय स्तरापर्यंत यश संपादन केले. सप्टेंबर १९९८ मध्ये मी अचानकपणे आजारी पडल्यावर या कॉलेजमधील शिक्षक व शिक्षकेतर सेवकांनी औषध उपचारासाठी आर्थिक सहकार्य तर केलेच व अनेक माझ्या विद्यार्थ्यांनी माझी सेवा सुश्रुषा केली. या सर्वांच्या अनंत उपकारामुळे व शुभेच्छांमुळे आज मी माझे मनोगत या कॉलेजच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त व्यक्त करु शकलो. सर्वांचा ऋण निर्देश मन:पूर्वक व्यक्त करीत आहे.

जय कर्मवीर !!

✦ ✦ ✦ ✦

With Best Compliments From

RESEARCH LAB
CHEMICAL
CORPORATION

1, Devkaran Mansion,
3rd Floor, 79, Princess Street,
MUMBAI : 400 002

लोकनेते बाळासाहेब देसाई
साखर कामगार सह.सेवा
सोसायटी लि; दौलतनगर

ता.पाटण, जि.सातारा. फोन : (०२३७२) २६८१५२

संचालक मंडळ

मा.श्री. शिवाजी परशराम शेवाळे	चेअरमन
मा.श्री. उत्तम कृष्णा गवळी	व्हा.चेअरमन
मा.श्री. दत्तात्रय शंकर पवार	संचालक
मा.श्री. दिनकर मारुती शेजवळ	संचालक
मा.श्री. दिलीप आनंदराव पाटील	संचालक
मा.श्री. जगन्नाथ हणमंत नलवडे	संचालक
मा.श्री. भिमराव शामराव उडुगडे	संचालक
मा.श्री. रघुनाथ कोंडीबा ढवळे	संचालक
मा.श्री. आनंदराव केरु गायकवाड	सेक्रेटरी
मा.श्री. निवृत्ती पांडूरंग शेजवळ	अकौंटंट

सर्व समासद व कर्मचारी वर्ग

सोनेरी पाने

डॉ. कन्हैया कुंदप,
कराड

भारतात ख्यातनाम असलेल्या आणि आशियाखंडात नामांकित असणाऱ्या रयत शिक्षण संस्थेची शाखा म्हणून डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज हे कृष्णा कोयनेच्या प्रीतिसंगमावर जून १९५४मध्ये सुरू केले. सद्गुरू गाडगे महाराजांच्या नावाने विभूषित झालेले हे महाविद्यालय गाडगे बाबांच्या समाजनिष्ठेवर आणि परिश्रमावर निष्ठा ठेवणारे आहे. शिक्षण हे माणसाला विवेकशील बनवते; असणारी संवेदनक्षमता प्रगल्भ करुन माणुसकी शिकविते. त्यामुळे मानवतावादावर आधारलेले स्वातंत्र्य-समता-बंधुत्व हे तत्वज्ञान विद्यार्थ्यांच्या मनीमानसी सतत खेळते ठेवता येते, आणि हवा असणारा विद्यार्थी योग्य रीतीने तयार करून माणूस आणि नागरिक बनवून आपण समाजाला देऊ शकतो हा कर्मवीरांना विश्वास होता, तो त्यांचा ध्येयवाद होता. म्हणून अन्यायाविरुद्ध झगडणाऱ्या आणि संवेदनशील असणाऱ्या गाडगे बाबांचे नाव या महाविद्यालयाला दिले. नावामागचा हा इतिहास वाचला तर कुणालाही या महाविद्यालयाचा अभिमानच वाटेल.

केवळ ५४ विद्यार्थ्यांनिशी एकान्तात अध्ययन आणि अध्यापन करणारे हे महाविद्यालय आता साडेपाच हजाराच्या विद्यार्थी संख्येने गजबजून गेलेले आहे. हा सारा आसमंत अजूनही जुनी पुराणी कहाणी अत्यंत तत्परतेने सांगतो. गतकाळाच्या अनंत साक्षींनी मन भारावते आणि महाविद्यालयाच्या उज्ज्वल भविष्याच्या वाटचालीने कृतार्थता वाटते.

शिक्षणामुळे माणसाच्या मताची, बुद्धीची व कार्यशक्तीची वाढ होते हे शैक्षणिक तत्त्वज्ञान वरवर 'अज्ञ' वाटणाऱ्या पण आत मात्र खऱ्या अर्थाने 'तज्ज्ञ' असणाऱ्या अण्णांच्या रोमरोमी भिनले होते. साऱ्या समाजाच्या उद्धाराची घोषणा अनेकांनी केली पण 'ज्ञानाशिवाय उद्धार नाही' हे सत्य जाणून ज्ञानदानाचे पवित्र कार्य अण्णांनी आपल्या मनाशी ठरवून या क्षेत्रात पहिली पाऊलवाट निर्माण केली. आज तिचे रुपांतर हमरस्त्यात झाले आहे. मोठमोठ्या शहरात आणि जिल्ह्याच्या गावी अनेक कॉलेजिस निघाली पण तालुक्याच्या गावी आणि ग्रामपंचायतीच्या कक्षेत महाविद्यालय काढण्याचं फार मोठं धाडस १९५३ साली अण्णांनी करावयाचे ठरवले. त्याप्रमाणे संत शिरोमणी सद्गुरु गाडगे महाराज यांच्या नावाने जून १९५४ साली हे कॉलेज अण्णांनी कराडला सुरु केले. देशाच्या इतिहासात ग्रामपंचायतीच्या कक्षेत सुरु केलेले हे पहिलेच कॉलेज म्हणावे लागेल.

१० जुलै १९५४साली उद्घाटन सोहळा झाला, तो तर अपूर्वच होता. प्रा. धनंजयराव गाडगीळ मुख्य पाहुणे म्हणून उपस्थित होते. पैसे गोळा करण्यासाठी ज्यांनी मदत केली ते पुण्याच्या मंडईतील मजूर, हमाल व व्यापारी दोन ट्रक घेऊन या समारंभाला उपस्थित होते. त्यावेळी धनंजयराव गाडगीळ म्हणाले, ''कराडला आल्यावर प्रत्येकाला कृष्णा-कोयनेच्या प्रीतीसंगमाची आठवण येणे रास्त आहे पण मला येथे वेगळाच संगम दिसतो. आम्ही पुणे विद्यापीठाचे पुस्तकपंडित व मंडई विद्यापीठातील कृषिपंडित या दोघांचा मनोहर संगम कर्मवीर अण्णांनी अत्यंत शिताफीने व बहारदारपणाने घडवून आणला आहे हे या समारंभाचे खास वैशिष्ट्य होय.''

इतक्या सायासाने सुरु केलेल्या या कॉलेजमध्ये सुरुवातीला एफ.वाय.आर्टस्चा वर्ग होता. विद्यार्थी होते अवघे चोपन्न. प्राचार्य कणबरकर यांच्या नेतृत्वाखाली हा ज्ञानयज्ञ संस्थेने येथे आरंभला. उद्यमनगरीचे रुपांतर विद्यानगरात झाले. इमारत बांधण्यासाठी विनामूल्य विटा पुरविल्या त्याही कृष्णाकाठच्या कुभारांनी ! हर तऱ्हेचे सहाय्य केले ते सैदापूरच्या शेतकरी बांधवांनी !

१९५५साली एका सुप्रभाती एक लुंगी लावलेला साधा गृहस्थ कॉलेजच्या आवारात शिरला अन् काय आश्चर्य ? त्याने स्वत:च साफसफाई सुरू केली. आवारात पडलेला केरकचरा, वाढलेले गवत काही-काही ठेवले नाही. आश्चर्याने दिङ्मूढ झालेल्या प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थ्यांना थोड्या वेळाने समजले की, ती व्यक्ती म्हणजे खुद्द गाडगे महाराज होते. संतांच्या पदस्पर्शाने पुनित झालेली माती देखील सोन्याचे रुप घेऊन उठते याचे प्रत्यंतर नंतरच्या काही वर्षात आले.

त्यानंतर कॉलेजने मागे वळून कधी पाहिलेच नाही. १९६१-६२ सालापासूनची महाविद्यालयाची घोडदौड पाहण्याचे भाग्य मला लाभले आहे. १९६२ ते १९६५ च्या काळात महाविद्यालयाचा विद्यार्थी म्हणून प्राचार्य ए.डी. अत्तारांच्या काळातील महाविद्यालयाचे क्षण अनुभवायला मिळाले. त्याच काळात १९६५ला संपूर्ण कराड परिसरात बी.ए.ला मराठी घेऊन मी पहिला आलो होतो. एज्युकेशनमध्ये सुपर डिस्टिक्शनचे गुण

मला मिळाले होते आणि अत्तार सरांनी त्यावेळी प्राचार्य निवासात बोलवून माझे हार्दिक अभिनंदन केले होते. याच भक्कम पायावर पुढे एम.ए. भाग १ साठी मी विलिंग्डन कॉलेजला गेलो. त्यावर्षीही मी विद्यापीठात पहिला होतो. १९६६ला मा. प्राचार्य ऊनऊने साहेबांनी सातारला एम.ए.चे मराठीचे केंद्र सुरु केले त्यामुळे मी छत्रपती शिवाजी कॉलेजला प्रवेश घेतला. मी एम.ए. ला शिवाजी विद्यापीठात सर्वप्रथम आलो आणि मा. बापूसाहेब ऊनऊने यांचा आनंद त्यांच्या प्रसन्न चेहऱ्यावर झळकला. त्यानंतर लगेचच १९६७ साली मी कराडच्या सद्गुरु गाडगे महाराज कॉलेजवर मराठीचा व्याख्याता म्हणून हजर झालो. त्यावेळेपासून या कॉलेजचे सर्व बदलते रुप मी अनुभवले आहे. १९६७ ते २००० या कालावधीत मी मराठीचा प्राध्यापक, विभाग प्रमुख, उपप्राचार्य आणि अखेरीला प्राचार्य म्हणून काम करण्याची संधी मला मिळाली. आम्ही प्राध्यापक म्हणून सेवा करीत असताना विद्यार्थ्यांना शिकवत होतो. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देत होतो. त्यावेळी आम्ही स्वत:ही शिकत होतो. स्वत:चे व्यक्तिमत्वही त्यातून आकाराला येत होते. अध्यापन आणि अध्ययन प्रक्रिया एकाच वेळी चालू होती. काही नवीन मिळवावे आणि काही नवीन विद्यार्थ्यांना द्यावे हाच आमचा ध्यास होता. आज जेव्हा माजी विद्यार्थी भेटतात तेव्हा त्यावेळच्या भारलेल्या क्षणांचे आणि आमच्या शिकविलेल्या तासांचे ते जेव्हा वर्णन करतात तेव्हा आमचे वयही पुन्हा त्याकाळातले होऊन जाते. मंतरलेले... भारावलेले अनेक सोनेरी क्षण पुन्हा जिवंत होतात. त्याकाळात विद्यार्थ्यांना केवळ अध्यापन आम्ही करत नसू! तर त्यांना त्यांच्या व्यक्तिमत्व विकासाच्या वाटा वक्तृत्वातून, वादविवादातून, लेखन प्रक्रियेतून, नाटकांच्या अभिनय दिग्दर्शनातून, सामाजिक सेवा भावातून, क्रीडा विभागातून, रक्तदानासारख्या पवित्र सामाजिक बांधिलकीच्या उपक्रमातून, भूकंपासारख्या नैसर्गिक आपत्तीतून समाजाला मदतीचा हात कसा द्यावा याचेही जागरण आम्ही करत असू. त्यामुळे आमचा विद्यार्थी विद्यार्थिनींशी दैनंदिन संपर्क यायचा. मुलांची नावे, गावे, त्यांचे आईवडील यांच्याशी आमचे संबंध यायचे. कॉलेजच्या इमारत निधीसाठी आम्ही नाटके बसवत असू. प्रयोग तिकिटावर लावून त्यातून इमारत फंड उभा करत असू. म्हणजे अभिनयाचे धडे त्यांना देत असू आणि अर्थाजनाचे मार्गही त्यांना दाखवत असू. आम्ही परिसरात व्याख्यानाला जाताना चांगले वक्ते घडविण्यासाठी विद्यार्थ्यांना सोबत नेत असू. त्यातून कितीतरी वक्ते तयार झाले. कितीतरी नाट्यकलावंत, कवी, क्रीडापटू, बँकिंग क्षेत्रातले अधिकारी, वकिली व्यवसायातील नामवंत वकील; उत्तम प्राध्यापक यातूनच घडले. आमचे कितीतरी विद्यार्थी राज्य-राष्ट्र पातळीवर खेळाडू, अभिनेते, नेते, डॉक्टर, इंजीनीयर्स, संस्थापक, प्राचार्य, कुलगुरु, मंत्री पदापर्यंत पोहचले आहेत. जीवनाच्या संध्याकाळी हे विद्यार्थी आणि विद्यार्थिनी जेव्हा भेटतात, तेव्हाही वाकून नमस्कार करतात- पायावर डोके ठेवतात. एस.टी. मध्ये कंडक्टर असतील तर बसायला जागा करुन देतात. हा शैक्षणिक जीवनातील केलेल्या कामाचा फार मोठा समाधानाचा भाग केवळ गाडगे महाराज कॉलेजमध्ये प्राध्यापक, प्राचार्याचे काम केल्यामुळे मिळतो. अगदी अवर्णनीय आनंद त्यांच्या भेटीतून येतो. केलेल्या सेवेचा भरभरुन मिळणारा हा प्रतिसाद आम्हाला लाख मोलाचा वाटतो. या महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवाच्या काळात ज्यावेळी हे सोनेरी क्षण वाट्याला येतात तेव्हा कृतार्थ झाल्याचे एक वेगळेच समाधान लाभत राहते.

दुसऱ्या बाजूने या विद्यार्थ्यांना घडवीत असतांना आम्हीही घडत गेलो. वेगवेगळ्या समारंभाच्या निमित्ताने परिसरात अगदी दिल्लीपर्यंत आम्हाला व्याख्यानाची दालने खुली झाली. परिसरातील व परिरसाबाहेरील क्षितीजात देखील वेगवेगळ्या जयंती-पुण्यतिथी समारंभ, सत्कार समारंभ, सांप्रदायिक सोहळे, सांस्कृतिक विविध उपक्रम, स्नेहसंमेलने, विविध शिबीरे, सेमिनार यासारख्या विविध उपक्रमात विद्यापीठ, आंतर विद्यापीठ स्तरावर काम करावयांस मिळाले.

केवळ स.गा.म. कॉलेजमध्ये काम करावयास मिळाल्यामुळे जगाची कितीतरी दारे आम्हाला उघडली गेली. जेथे जेथे आम्ही डोकावले, तेथे तेथे आम्ही आमच्या विद्यार्थ्यांनाही उभे केले, संधी दिली, आज आमचे विद्यार्थी आमच्याही पुढे गेले आहेत. केवळ सद्गुरु गाडगे महाराज कॉलेजमुळेच हा लौकिक आम्हाला मिळाला. महाविद्यालयाच्या माध्यमातूनच माझ्या हाताखाली पाच विद्यार्थी पीएच.डी. झाले. अजून पाच विद्यार्थी नजिकच्या काळात आपले संशोधन पूर्ण करतील. तसेच वेगवेगळ्या विषयावर पन्नास विद्यार्थ्यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली एम.फिल पदवी मिळविली. यामुळेच या विषयाचा आमचा व्यासंग वाढला, महाराष्ट्रातल्या सर्व विद्यापीठात आमचे नाव आमच्या विद्यार्थ्यांनी अजरामर केले आहे. ज्या ज्या क्षेत्रात आमचे विद्यार्थी गेले आहेत तेथे तेथे ते चमकले आहेत, चमकत आहेत आणि गाडगे महाराज कॉलेजचा वारसा सांगताना आमचे नावही आदराने घेतात. केवळ प्राध्यापकी न करता कितीतरी काम करता येते याची फलश्रुती आज प्रत्ययास येते. गाडगे महाराज कॉलेजमध्ये पदार्पण करताना आमच्या जवळ आमच्या शिवाय काय होते ? पण आज गाडगे महाराज कॉलेजमुळे आमच्याजवळ केवढा मोठा वैभवाचा, यशाचा आणि विद्यार्थ्यांच्या आदराचा खजिना व निधी जमा झाला आहे ते पाहून कुबेरालासुद्धा हेवा वाटणे स्वाभाविक आहे. कृष्णा-कोयनेच्या प्रीतिसंगमावर असे कितीतरी ज्ञानप्रेमाचे संगम घडले आहेत याची धन्यता वाटते. कर्मवीरअण्णा, गाडगे महाराज आणि मुकादम तात्या या विभूतींच्या परीस स्पर्शाने केवळ मातीचेच सोने होते असे नव्हे तर आमच्यासारखे अनेकजण सोन्याची झळाळी घेऊन चमकतात यासारखे भाग्य ते कोणते ?

✦ ✦ ✦ ✦

सद्‌गुरु गाडगे महाराज कॉलेज : यशस्वी आयुष्याची पायाभरणी

प्राचार्य विश्वास सायनाकर
भवानीनगर

शिक्षण आज थांबेल, उद्या थांबेल ही शक्यता असताना जुनी मॅट्रिक रामानंदनगरच्या स्वामी रामानंद विद्यालयातून पास झालो. त्यानंतर सौ. माईंची जिद्द आणि आर.आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनामुळे 'स.गा.म.' मध्ये वसतिगृहात दाखल झालो.

दवानं भिजणारा आणि वाऱ्यानं सुकणारा हा माळ अठरापगड जातीची आणि शब्दशः बारा मुलखातली मुलं इथं दाखल झालेली. दारिद्र्याशी झुंजणारा पण शिक्षणासाठी जिद्द बांधणारा हा सजीव समूह. कोकण, नाशिक, खानदेश, मराठवाडा, सोलापूर, बेळगाव, जत असे सर्व भागातले विद्यार्थी वसतिगृहात होते. बहुतेक सर्व 'कमवा व शिका' या योजनेतून शिकण्यासाठी या महाविद्यालयात आलेले होते. घामाची भाषा एक होती. कष्टातून स्वनिर्मित प्रतिष्ठेचा सूर्य उगवणार होता. त्यासाठी वाटेल ते कष्ट उपसण्याची इर्ष्या होती.

प्राचार्य बी.ए.चौगुले हे देखील असेच जिगरबाज प्राचार्य होते. नोकरी करायची नाही म्हणून शेती करणारा हा भूमिपूत्र, रांगडा माणूस, अखंड उत्साहाने सळसळणारा, अंगात वीज पेलणारा माणूस. कापसाची, धान्याची बैलगाडी स्वतः चालवत सांगलीला जाणार, विक्री करणार, खळाळता पैसा दंडक्यात घेऊन घरी येणार. अण्णांच्या शब्दाखातर ते कराडला महाविद्यालयाचे प्राचार्य झाले.

प्राचार्यांचा बंगला कसा बांधायचा हे त्यांनी काठीने आखून दाखवले आणि फक्की टाकून बांधकाम सुरू आणि पूर्णही झाले. विटा, दगड, सिमेंट रात्री आले तर शिपाई आणि वसतिगृहातले विद्यार्थी ते ट्रकमधून उतरवून घ्यायला धाव घेत कारण काम करण्यात प्राचार्यांचा सहभाग असे. त्यांनी पुणे विद्यापीठाचे कुस्तीचे सामने यशस्वीपणे आमच्या महाविद्यालयात घेतले.

त्यांच्या काळात आमच्या महाविद्यालयात घेतलेले ॲथलेटिक्सचे सामने हा त्यांच्या जिद्दीचा कळस. या स्पर्धा पहिल्यांदाच कराडला होणार होत्या. मैदान तयार होते. पुण्याचे खेळाडू आधल्या दिवशी आले होते. ते धावण्याच्या चारशे मीटरच्या ट्रॅकवरून फिरले. त्यांनी आणि त्यांच्या संघ-व्यवस्थापकांनी प्राचार्यांनी सांगितले 'आम्ही या ओबडधोबड ट्रॅकवर पळणार नाही.''सगळे आयोजनच धोक्यात.महाविद्यालयाची प्रतिष्ठा पणाला लागलेली. प्राचार्यांनी शब्द दिला. वेळ संध्याकाळची. हाताशी असणारे प्राध्यापक, शिपाई, मजूर आणि वसतिगृहातले सर्व विद्यार्थी, प्राचार्यांच्याबरोबर कामाला लागले. ट्रॅकवर पुन्हापुन्हा माती टाकणं, छोटे छोटे खळगे भरून काढणं, पाणी मारणं, रूळ फिरवणं. जवळजवळ रात्रभर चाललं. सकाळी जेव्हा पुणेकर मंडळी ट्रॅकवर आली तेव्हा मृदूमुलायम ट्रॅक बघून आश्चर्यानं तोंडात बोटं घालायची पाळी त्यांच्यावर आली. प्राचार्यांच्या जिद्दीतून, सर्वांच्या श्रमातून, एकीतून निर्माण झालेला तो एक स्वनिर्मित चमत्कार होता.

'लेबर स्कीम' नसती तर मी शिकू शकलो नसतो ही वस्तुस्थिती आहे. शिक्षणफीसाठी श्रम, वसतिगृहातल्या भोजन बिलात सवलत मिळण्यासाठी वसतिगृहात पिण्याचे पाणी भरणे ही कामे असत. पिण्याचे पाणी अर्धा किलोमीटर अंतरावर असणाऱ्या मळ्यातल्या विहीरीतून आणत असू. माझ्या बरोबर आणखीही विद्यार्थी होते. दिवसाला प्रत्येकाला १०-१२ घागरी पाणी आणावे लागे. इतर कामामध्ये झाडे लावण्यासाठी खड्डे काढणे, इमारतीवर काम करणे, भांगलणे, खडी फोडणे यासारखी कामे असत. मोठ्या सुटीतही बरेचजण गावी न जाता पुढच्या वर्षाचे आवश्यक ते कामाचे तास सुटीत पूर्ण करत. हेतू हा की शैक्षणिक वर्षातले अभ्यासाचे दिवस पदरात पडावेत.

आमच्या श्रमशक्तीचा आणखी एक अविष्कार म्हणजे आज उभे असलेले ऑडिटोरियम. त्याचा पाया काढणं, इमारत उभी होताना गवंड्याच्या हाताखाली काम करणं, तयार भिंतीवर पाणी मारणं , सिमेंट, वीट, वाळू कामाच्या जागी पोहोचवणे ही कामे असत. प्राचार्यांच्या बंगल्याजवळ असणाऱ्या खाणीमध्ये साठलेले पाणी गाड्यावरून घागरीने आणून इमारतीवर मारले जात असे.

घागरी सर्वांनी भरून आणून गाड्यावर ठेवायच्या. एकानं गाड्याची दोरी खांद्याला अडकवायची, बाकीचे चढाला गाडा ढकलायला. प्रत्यक्षात इमारतीवर पाणी मारणारे अनेक श्रमयोजनेतील विद्यार्थी असायचे. शेवटी स्लॅब टाकायचे. त्याकाळातले प्रचंड काम. यंत्र म्हणजे फक्त पाणी. प्राचार्य, लेबर स्कीमचे सर्व विद्यार्थी, वसतिगृहामधले विद्यार्थी सर्वच कामाला लागले. काही मजूर होतेच. वीणा खाली ठेवायची नाही तसा स्लॅबही एका वेळेत पूर्ण करायचा. कुणी वाळूवर, कुणी पाण्यावर, कुणी पायाडावर, कुणी स्लॅबवर काँक्रीटच्या पाट्या वाहात होते. पहाटे स्लॅब संपला. पाट्या वाहणाऱ्या अनेकांच्या तळव्यांना छिद्र पडली होती. त्यानंतर दोनच दिवसात प्री-डिग्रीच्या आमच्या पहिल्या बॅचची परीक्षा होती. परीक्षा झाल्या, निकाल लागला. निकालाच्या आदल्या दिवशी आमचे प्राचार्य पुणे विद्यापीठातून निकाल फोनवर घेत होते. प्राचार्य निकाल घेताना थरथरत होते. त्यांना नापास विद्यार्थ्यांची चिंता होती. निकाल अवघा १४ % लागला होता. नंतर विद्यापीठाचा ATKT च्या निर्णयामुळे तो चाळीस टक्क्यांपर्यत वाढला. १९६७ मध्ये याच ऑडिटोरिमच्या उद्घाटनासाठी श्रीमती इंदिरा गांधी आल्या होत्या. तेव्हा शेतकरी व त्याची शेतकरी पत्नी यांनी शेतकरी वेशात त्यांना हार घालायची नाविन्यपूर्ण कल्पना निघाली. त्यावेळी हार घालणारा शेतकरी मी होतो.

कर्मवीर अण्णांची भेट हा महाविद्यालयातला असाच आयुष्य मारून टाकणारा योग. पूर्वीच्या मोठ्या वर्कशॉपमध्ये असणाऱ्या प्री-डिग्रीच्या वर्गात ही सभा भरली. तेव्हा इंटरला मोहिते नावाचा विद्यार्थी वर्गात पहिला आला होता. प्राचार्यांनी त्याचा सत्कार अण्णांच्या हस्ते केला. आपल्या भाषणात अण्णांनी केलेले एक विधान त्याच्या शैक्षणिक क्रांतीच्या तत्वज्ञानाचे प्रतीक आहे. आजही ते विधान कानात घुमत राहाते. अण्णा त्यांच्या घनगंभीर पहाडी आवाजात म्हणाले ''ज्या दिवशी हा इंटरला पहिला आलेला मोहिते शिक्षण पूर्ण करून आजच्या प्राचार्यांच्या खुर्चीवर प्राचार्य म्हणून बसेल तो दिवस संस्थेच्या आणि महाविद्यालयाच्या जीवनात भाग्याचा दिवस असेल.''

त्याचवेळी आमच्या वर्गात असणाऱ्या सौ. देशपांडे अण्णांना भेटल्या. त्यांची इच्छा असुनही लवकर लग्न झाल्यामुळं त्यांना शिकता आलं नव्हतं. त्या भेटल्यावर अण्णांनी प्राचार्यांना बोलावून सांगितलं ''ही माझी मुलगी आहे. हिला शिक्षणात कुठलीही अडचण येता कामा नये.'' आपल्या अशोक नावाच्या मुलाबरोबर महाविद्यालयात येणाऱ्या सौ. देशपांडे अण्णांच्या मानसकन्या झाल्या होत्या.

'लेबर स्कीमचा' विद्यार्थी असण्यामुळं आयुष्य नीरस नव्हतं. काही निष्पाप विनोद असायचे. मुलीनं बोलणं ही त्या काळातली अपूर्वाई. आम्ही काम करत असताना 'प्रभाकर' घाईनं धावत आला. त्यानं सांगितलं की त्याच्याशी कॉलेजकीन बोलली. आम्हाला कोण कौतुक आम्ही विचारलं. काय बोलली. तो म्हणाला, तिनं विचारलं 'ग्रंथालय कुठं आहे ?'' अनेक स्पर्धांनी महाविद्यालय गजबजलेलं असायचं. प्लॅनिंग फोरम, डिबेटिंग, वक्तृत्व विभाग, 'सद्गुरू' नियतकालिक कविता-कथा-निबंध स्पर्धा असत. भाग घेत अनेक पारितोषिकं मी मिळविली होती. बेळगाव वाङमय चर्चेमध्ये उत्स्फूर्त बोलताना 'चष्मा' या विषयावर बोलून मी गंगाधरराव देशपांडे ढाल मिळवली होती. 'टेबल टेनिसमध्ये' गती होती. चौफेर जडणघडण इथं झाली. महाविद्यालयानं मला अखंड 'अभंग' बनवलं.

यथावकाश मी एम्.ए. ला विद्यापीठात सर्वप्रथम आलो. यशस्वी कार्यकर्ता झालो त्याचं श्रेय या महाविद्यालयातला सर्वोत्तम 'श्रमिक' विद्यार्थी या समर्थ, अमोल प्रशस्तिपत्राला, पारितोषिकाला जाते. चौफेर जडणघडणीला जाते. महाविद्यालयाच्या आठवणींच्या आकाशगंगेतील काही 'मोजकी तेजस्वी नक्षत्र स्मरणोत्सवात मांडणं हादेखील भाग्याचा भाग.

माझी विद्यार्थीदशा 'सगाम' मध्ये १९५८ ते १९६०. छत्रपती शिवाजी कॉलेजमधून बी.ए. ला (इंग्रजी स्पे., संस्कृत, तत्वज्ञान) ऑनर्स मिळाला. श्रेय बॅ. पी.जी.पाटील आणि सौ. सुमतिबाईंचे. त्यानंतर पुन्हा ६२ नंतर एक वर्षासाठी इंग्रजीला स.गा.म मध्ये इंग्रजीचा ट्यूटर. प्राचार्य होते गनीभाई अतार. एक वादळी, निडर, बंडखोर व्यक्तिमत्व. अचानक पी.डी.ला संख्या वाढली. अडचणींना डरतील ते अतार सरच नव्हते. ऑडिटेरियममध्ये वर्ग तयार केला. विद्यार्थीसंख्या जवळजवळ दिडशे ते दोनशे. आवाज पोहोचण्यासाठी स्पीकरचा वापर. मलाही तिथं शिकवायला लावत. अख्या आयुष्यात पहिल्यांदा 'गोल्डन ट्रेझरी' मधली कविता शिकवण्यासाठी इंग्रजीत लेक्चर दिलं. सरांच्यामुळं टी.वाय् पर्यत बरीच पुस्तकं शिकवली. ती माझ्या शिक्षकी जीवनाची भरभक्कम पायाभरणी. त्यामुळं शिक्षक म्हणून कधी मागं वळून बघण्याची पाळी आयुष्यात आली नाही. माझ्या मन, मनगट, मेंदूमध्ये संजीवन भरणारं हे कॉलेज.

✦ ✦ ✦ ✦

आत्मसन्मान जागविणारा गाडगेबाबांचा मठ

प्राचार्य मा.के.यादव
गिरीजा, रयत सोसायटी, सैदापूर सातारा

वाळवा तालुक्यातील ऐतवड्याजवळचं कार्वे हे माझं गाव. लहानपणी १९५२ साली मांगले गावी मी संत गाडगे बाबांना पाहिल्याचं, त्यांचं कीर्तन ऐकल्याचं आजही आठवतं.

कर्मवीर विद्यालय, ऐतवडे बु।। मध्ये जुन्या ११ वी च्या वर्गात शिकत असताना १९५७ साली कर्मवीर अण्णा विद्यालयात आले होते. मुख्याध्यापक बी.डी.चौगुले यांनी वर्गातील हुषार विद्यार्थ्यांचा कर्मवीर अण्णांशी परिचय करून दिला. त्यात एकनाथ निकम, विजयमाला पाटील व माझाही समावेश होता. त्यावेळी अण्णांनी पुढे सातारला शिकायला या असे सांगितले होते. मार्च १९५८ मध्ये आम्ही एस.एस.सी. पास झालो. जूनमध्ये अण्णांनी श्री. हंबीरराव पाटील यांना मला सातारला घेऊन येण्यासाठी गावी पाठविले. परंतु तत्पूर्वीच मी कराडच्या सद्गुरू गाडगे महाराज कॉलेजमध्ये प्रीडिग्री आर्टस्च्या वर्गात प्रवेश घेतला होता. कराडला का ? तर सातारा गावापासून फारच लांब तर कराड त्यापेक्षा घरी येण्यासाठी सोयीचे म्हणून !

कॉलेज तसे लहान, फारशा इमारती नव्हत्या. जुन्या स्टाफक्वार्टरच्या ठिकाणी मुलांचे होस्टेल होते. मुलींचे होस्टेल नव्हते. एन.सी.सी., जिमखाना आणि प्रशस्त ग्राऊंड होते. प्री-डिग्रीचा कोर्स तर नव्याने सुरू झालेला. इंटर आर्टस्, ज्युनि.बी.ए. व सिनि.बी.ए. असे मोजकेच वर्ग. विद्यार्थी संख्या १८० च्या दरम्यान असावी. त्यात मुलींची संख्या अत्यल्प होती. वार्षिक स्नेहसंमेलनाच्या वेळी सर्वांना जेवण दिल्याचे व मुलींनी आनंदाने वाढण्याचे काम केल्याचे आठवते.

प्राचार्य बी.ए.चौगुले हे अत्यंत शिस्तप्रिय व प्रेमळही होते. ते अर्धमागधी शिकवीत. कधीकधी होस्टेलवर येऊन आम्हाला जादा तासाला घेऊन जात. प्री-डिग्रीच्या वार्षिक परीक्षेत मी कॉलेज मध्ये प्रथम व अर्धमागधी विषयात पुणे विद्यापीठात प्रथम आलो होतो. जून १९५९ पासून श्री इअर्स इंटिग्रेटेड डिग्री कोर्स सुरू झाला. आम्ही बी.ए.भाग -१ ला गेलो. त्यावेळी प्राध्यापक ही मोजकेच परंतू विद्वान होते. प्रा. शांताराम शिंदे, प्रा.डी.बी. पठाण (इंग्रजी) प्रा. पंडीत, प्रा. सुधाकर भोसले (मराठी) प्रा. मुन्शी (पर्शियन) प्रा.एन.डी.शेख (लॉजिक) प्रा.बी.के.पाटील (अर्थशास्त्र) प्रा. महाजन, प्रा. चौबळ (इतिहास) प्रा. श्री. कोटकर (कॉमर्स) प्रा. मुढाळ (भूगोल) प्रा. बादरामणी (संस्कृत) प्रा. एस.के. उनउने (लंडनहून आल्यानंतर फक्त सहा महिने) पुढे नामवंत प्राचार्य म्हणून गाजलेली ही मंडळी आम्हाला शिकवायला होती, याचा अभिमान वाटतो. तर पुढे नावारूपास आलेले प्राचार्य विश्वास सायनाकर, प्राचार्य एकनाथ निकम, प्राचार्य रघुनंदन यादव, प्राचार्य डी.डी.थोरात, प्राचार्य विजया पाटील, प्रा. विश्वनाथ जंगम, प्रा. सुधाकर आढाव, प्रा. ए.एल.पाटील, प्रा.ज.रा.दाभोळे, प्रभाकर रेळेकर, प्राचार्य बी.एस.जाधव, माजी आमदार जयंत सोहनी, उद्योगपती विलासराव पाटील वाठारकर, शशिकला पागनीस उपाध्ये, शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव कै. हणमंतराव पाटणकर इ. आमचे सहाध्यायी होते.

१९५९ साली इंदिरा गांधी यांनी कॉलेजला भेट दिली होती. मुलांनी शेतकऱ्यांच्या पोशाखात आणि मुलींनी नऊवारी साड्या परिधान करून कॉलेजच्या गेटवर दुतर्फा उभे राहून त्यांचे स्वागत केल्याचे आठवते.

फेब्रुवारी १९५९ मध्ये बरेच दिवस कर्मवीर अण्णा विश्रांतीसाठी प्राचार्य बी.ए.चौगुले यांच्याकडे होते. त्यामुळे त्यांचे दर्शन वरचेवर होई. पुढे ९ मे १९५९ रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या अस्थीविसर्जनाचा कार्यक्रम कृष्णा कोयनेच्या संगमावर झाला होता. विद्यार्थी, प्राध्यापक, हितचिंतक सारेच गहिवरले होते. प्रा. शांताराम शिंदे यांनी 'आज कृष्णा कृष्णेला मिळाली' आणि प्रा. सुधाकर के. भोसले यांनी, 'अण्णा तुम्ही चंदनासारखे झिजलात' या उत्स्फूर्त सुचलेल्या कविता वाचून सर्वांच्या भावनांना वाट करून दिली होती.

प्राचार्य बी.ए.चौगुले यांनी अर्धमागधी विषयातील माझी प्रगती पाहून मला डॉ. ए.एन.उपाध्ये यांच्याकडे राजाराम कॉलेज, कोल्हापूर येथे जाण्याचा सल्ला दिला. तिथून मी १९६२ साली बी.ए. (अर्धमागधी) व १९६४ साली एम.ए. (अर्धमागधी) व नंतर १९६६ साली एम.ए.(मराठी) झालो. पुढे संस्थेत प्राध्यापक झालो.

सातारा-दहिवडी-पंढरपूर अशा बदली निमित्त तीर्थयात्रा करीत सहिलो. संस्थेने जून १९८३ मध्ये स.गा.म. कॉलेज कराड येथे बदली केली. जिथं शिकलो तिथंच शिकवायचं. एक वेगळा अनुभव 'माझं कॉलेज' ही भावना मनात घट्ट रूजलेली. आता कॉलेजचा व्याप, विस्तार वाढला होता. आर्टस्, कॉमर्स, सायन्स - तिन्ही शाखा बहरल्या होत्या. टुमदार इमारतीही डोलात उभ्या होत्या.

मी जून १९८३ ते २० ऑगस्ट १९९० पर्यंत आठ वर्षे मराठीचा प्राध्यापक म्हणून काम केलं. त्या आठ वर्षात कॉलेजला नऊ प्राचार्य लाभले. प्रत्येकाचा स्वभाव वेगळा, वकूब वेगळा काम करण्याची पद्धत वेगळी. खूप शिकायला मिळालं. प्रशासनाचे कंगोरे टिपता आले. उथळ-खोल, भरीव-दिखाऊ यातल्या सीमारेषा ओळखता येऊ लागल्या. पुढे प्राचार्य झाल्यावर त्याचा उपयोग झाला.

दिनांक २७/२/१९८९ रोजी झालेल्या कॉलेजच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचा मी चेअरमन होतो, पाहुणे होते सुप्रसिद्ध चित्रपट अभिनेते सूर्यकांत. होस्टेलच्या मुलींनी एक स्वागतगीत सादर केले. ते सूर्यकांत यांना इतके आवडले की ते गीत त्यांनी मजकडून मागून घेतले. माझं अहवाल वाचन 'एक मास्टर पीस' होता असे प्राध्यापक म्हणाले. सूर्यकांत यांचं भाषणही रंजक झाले होते.

बी.ए. भाग-१ ला शिरवाडकरांचं 'नटसम्राट' नाटक होतं. नाटकाचं प्रायोगिक मूल्य विद्यार्थ्यांना कळावं म्हणून पंढरपूरच्या विनय बडवे यांच्या 'अभिनव नाटक कंपनीचा' कराड परीसरातील कॉलेज मधील मराठीच्या प्राध्यापक विद्यार्थ्यांसाठी फक्त १० रू. तिकीटात 'नटसम्राट' नाटकाचा प्रयोग यशवंतराव चव्हाण स्मृतीसदनात दिनांक ४/१/१९८८ रोजी आयोजीत केला. त्याला प्रचंड प्रतिसाद मिळाला होता.

योगायोगाने कॉलेजच्या मुलींच्या वसतिगृहाची रेक्टरशीप माझी पत्नी सौ. कमल हिच्याकडे आली. आम्ही दोघांनी रात्रंदिवस राबून होस्टेलला एक शिस्त लावून दिली. होस्टेलमध्ये मुलींचं नियोजन मंडळ स्थापन करून सर्व कारभार त्यांच्या हाती दिला. कर्मवीर अण्णा, सौ. लक्ष्मीबाई पाटील, सद्गुरू गाडगे महाराज, दानशूर बंडो गोपाळा कदम उर्फ मुकादम तात्या, प्राचार्या सौ. सुमतिबाई पाटील यांच्या जीवनकार्याचा, मूल्यांचा ठसा मुलींवर बिंबविण्याचा प्रयत्न केला. 'होस्टेल डे' ची प्रथा सुरू केली. वसतिगृहात भौतिक सुधारणा केल्या. प्राचार्य स्वामी यांच्या प्रेरणेने मुलींकडे पावती पुस्तके देऊन वीस हजार रूपये गोळा करून पश्चिमेकडील वाढीव चौदा खोल्या बांधण्यास हातभार लावला. मा. अप्पासाहेब पाटील व केशवराव दादा यांनी वसतिगृहातील वातावरण, शिस्त, अगत्य व जिव्हाळा पाहून कौतूक केले होते. वसतिगृहात मुलींनी कसं वागावं याचे वस्तुपाठ दिले. आजही वसतिगृहाची एखादी माजी विद्यार्थीनी किंवा त्यांचे पालक भेटले की भरभरून बोलतात तेव्हा आत्मिक समाधान वाटते.

२१ ऑगस्ट १९९० ला मी माढ्याला प्राचार्य झालो. कॉलेजने माझा सत्कार केला. वसतिगृहातील मुलींनीही स्वतंत्र सत्कार केला. तेव्हा मी म्हणालो होतो, 'मला जे प्राचार्यपद मिळाले ते कर्मवीर अण्णांची पुण्याई, मी केलेले थोडेफार कार्य, यामुळे कदाचित असेलही, पण मुलींच्या वसतिगृहात आम्ही निरपेक्षवृत्तीने जे काम केलं नि शेकडो मुलींचे दुवे मिळविले त्याचं हे फलित आहे.'

माझी दोन्ही मुलं - डॉ. सचिन, व डॉ. संदिप याच कॉलेजमधून बारावी सायन्स झाली व पुढे एम.बी.बी.एस. झाली.

माढ्याहून माझी बदली कोल्हापूरला झाली. १९९५ साली कोल्हापूरहून कराडला होणार होती. परंतू सातारला झाली. कराडला आमचे मित्र प्राचार्य ई.जी. निकम गेले. माजी विद्यार्थी माजी प्राध्यापक व प्राचार्य अशी त्यांनी हॅटट्रिक साधली. छ.शिवाजी कॉलेज हे संस्थेचे पहिले कॉलेज (१९४७) तर स.गा.म.कॉलेज हे दुसरे (१९५४) या दुसऱ्या कॉलेजचा मी माजी विद्यार्थी, माजी प्राध्यापक तर पहिल्या कॉलेजच्या म्हणजे छ.शिवाजी कॉलेजच्या प्राचार्यपदी मी विराजमान झालो. माझ्या जीवनातील कराड सातारा हा लपंडाव, हा नियतीचा खेळ खरोखर अनाकलनीय नि अचंबित करणारा आहे.

असे हे आमचे स.गा.म. कॉलेज सुवर्णमहोत्सवी वाटचाल करीत आहे. आता ते खूपच मोठं झाले आहे. सर्वार्थाने! गुणात्मक दृष्ट्या व भौतिकदृष्ट्याही. 'नॅक' मुळे तर अधिकच देखणही झालं आहे. कॉलेजला माझ्या हार्दिक शुभेच्छा!

आम्ही विद्यार्थी असताना शहरातील इतर कॉलेजची मुले जाता येता आमच्या कॉलेजला 'गाडगे बाबांचा मठ' म्हणायची. पण आम्हा सर्व विद्यार्थी, प्राध्यापकांना त्याचा राग न येता, अभिमान वाटायचा कारण तो वारसाच वेगळा होता. तो वारसा एका कर्मवीरांचा, संतांचा वारसा होता. त्यावेळी मी कॉलेजवर 'माझीया मठी' नावाची कविता केली होती. तिच्या शेवटी मी म्हटलं होतं, तेच आजही म्हणेन-

'मठी ऐसिया वसणे, भाग्य काय ते आपुले ?
ब्रम्हा, विष्णूही असतील, संधी पहात बसले!'

✦ ✦ ✦ ✦

'सगाम' मधील ओलसर आठवणी

प्राचार्य आर.के.शिंदे
माजी सहसचिव, र. शि. संस्था, सातारा

'सगाम' मधील १ जून १९८३ पासूनचा जेमतेम साडेतीन महिन्यांचा अल्पसा कालावधी. त्यातही अध्यापनासाठी मिळालेले केवळ दोन महिने. तेवढ्यातही एम्.ए.च्या वर्गावरील अर्थशास्त्र विषयाच्या अध्यापनातील अनोख्या अनुभवातून मिळालेल्या अनामिक आनंदाचा झरा उर्वरित जीवनात अधून मधून पाझरत रहातो आणि त्याच्या अमूर्त समाधानाने काही क्षण निघून जातात.

१५ जुलैपासून एम्.ए. चे अध्यापन सुरू झालेले. मी सातारा-कराड अशी ये-जा करीत होतो. माझा दररोज सकाळी ७.३० ला तास असे. पहिल्या तासाला वर्षभराचा 'प्राइस् थिएरी' या पेपरचा अभ्यासक्रम देऊन अध्यापनास सुरवात केली. आठ-दहा मिनिटांत असं जाणवू लागले की मी करीत असलेल्या विश्लेषणात फारसे कोणी सहभागी नाहीत. वर्गात चुळबूळही चालू होती. प्रतिपाद्य विषयाच्या आकलनाचा भावही कोणाच्या चेहऱ्यावर दिसत नव्हता. संभ्रमित मनःस्थितीतच तास संपला. असा पूर्णपणे अयशस्वी तास पूर्वी कधी अनुभवला नव्हता. स्टाफ्रूमच्या वाटेवर ८-१० मुलांचा एक घोळका येऊन भेटला. त्यांनी आपली अडचण सांगितली. इंग्रजी माध्यमातून अध्ययनाचा त्यांना पूर्वी कधीही अनुभव नव्हता. तेथे एम.ए. चे अध्यापन मराठीतून करण्याची प्रथा होती. तेव्हा मीही मराठीतून अध्यापन करावे असे त्यांचे म्हणणे पडले. त्यांची अडचण तशी रास्त होती. तेव्हा मी त्यांना, दुसऱ्या दिवशी वर्गातच त्यासंबंधी आपण सर्वांच्या विचाराने काय ते ठरवू, असे सांगितले.

दुसऱ्या दिवशी वर्गात दोन गोष्टी सांगितल्या. एक तर शिवाजी विद्यापीठाने एम्.ए. च्या वर्गातील अध्यापनाचे माध्यम इंग्रजीच ठेवलेले आहे. दुसरे असे की, एम.ए.च्या पातळीवर अभ्यासासाठी त्या दर्जाची मराठी माध्यमातील संदर्भ पुस्तके मुळीच उपलब्ध नाहीत. तेव्हा विषय बारकाईने आणि बिनचूकपणे समजून घेण्यासाठी आपणास इंग्रजीमधील संदर्भ पुस्तके अभ्यासणे आवश्यक आहे. मनाचा ठाम निश्चय करून, बैठक मारून वाचन कराल तर इंग्रजीतील संदर्भ ग्रंथही सरावाने समजण्यास अडचण वाटणार नाही. आपण असे करू. एक आठवडाभर मी इंग्रजीतूनच अध्यापन चालू ठेवीन. आपण लक्षपूर्वक ऐकून समजून घेण्याचा प्रयत्न करा. आठवड्यानंतरही इंग्रजीतील अध्यापन आपणास उपयोगी नाही असे वाटल्यास पुढील आठवड्यात प्रथम इंग्रजी व नंतर मराठी अशा दोन्ही माध्यमांचा आधार घेऊ. आणि त्याचाही उपयोग होत नाही असे तुम्हाला वाटल्यास मी निव्वळ मराठीतूनच अध्यापन करीन. या प्रयोगांना मुलांनी संमती दिली.

अध्यापन सुरू झाले. मी पेपरमधील मूलभूत संकल्पना सविस्तर, विविध उदाहरणांच्या सहाय्याने प्रारंभी स्पष्ट केल्या. नंतर प्रारंभीचा सिद्धांत आकृत्यांच्या सहाय्याने स्पष्ट केला. या काळात मी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यांमध्ये फरक पडत असल्याचे अनुभवत होतो. शेवटी आठवड्यानंतर मुलांना अध्यापनाच्या माध्यमाबद्दल विचारले. विशेष असे की, तेच माध्यम चालू ठेवण्याबद्दल बहुसंख्य मुलांनी सांगितले. अगदी स्तब्ध बसलेल्या मुलांना मी दिलासा दिला. मी संपूर्ण दिवसभर कॉलेजवरच असतो. जे जे समजले नसेल ते ते, त्या त्या वेळीच मला केव्हाही, कोठेही असलो तरी विचारा. प्रत्येकाने समजून घेतलेच पाहिजे असा माझा आग्रह राहील. प्रत्येक आठवड्याच्या शेवटी मी चाचणी घेत जाईन. एकदा लेखी व एकदा तोंडी. विषय समजून घेण्याचा ठाम निर्धार करा. नियमाने मनापासून समजून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करा. तुम्हाला विषय आत्मसात करताना कसा आनंद होतो याचा अनुभव घ्या.

दरम्यान पावसाने चांगलीच सुरवात केली होती. तरीही दूरवरच्या खेड्यांतून धावत-पळत, भिजून चिंब होत सकाळी साडेसातला बहुसंख्य मुले वर्गात उपस्थित रहात. दोन तीन मुले तर इस्लामपूरसारख्या दूरच्या गावापासून नियमितपणे वेळेवर उपस्थित रहात. शंका विचारणाऱ्यांची संख्याही चांगलीच वाढू लागली होती. याबरोबर अधिक दिलासा देणारी गोष्ट म्हणजे मुलांनी इंग्रजी संदर्भ वाचावयासही सुरू केलेले आढळले. ग्रंथपालांकडे चौकशी केल्यानंतर काही ग्रंथांना अधिक मागणी असून त्यांच्या प्रती अपुऱ्या आहेत असे समजले. म्हणून प्राचार्यांची परवानगी काढली. त्यांनी इतरही संदर्भ हवे असल्यास

मागवावेत असे सांगितले. नवीन पुस्तके ८-१० दिवसांतच आल्यामुळे ती गैरसोय नाहीशी झाली. आता तासाच्या वेळी विषयाचे आकलन अधिकाधिक चांगले होत असल्याचे बहुतेकांच्या चेहऱ्यांवरून दिसू लागले. त्यामुळे मला शिकविण्यासाठी अधिकच हुरूप वाटू लागला होता. महिना अखेरीस एका टॉपिकवर वर्गात चर्चासत्र घेतले. सुरवातीला मुले चाचपडत होती. मात्र थोडी धिटाई आणि आत्मविश्वास वाटू लागल्यावर चर्चेमध्ये मुलांना चांगला रस वाटू लागला. चर्चेच्या दरम्यान काहींच्या स्पष्टीकरणात मी दुरूस्त्या सुचवीत होतो. चर्चेच्या अखेरीस मी सारांशाने समारोप केला व पुढील चर्चेसाठी एक टॉपिक सांगितला. या चर्चेच्या वेळी ६-७ जण अगदीच अलिप्त असल्याचे माझ्या लक्षात आले होते. त्यांनी पुढील चर्चेच्या वेळी प्रामुख्याने सहभागी झाले पाहिजे असे त्या मुलांचा निर्देश करून मी त्यांना सांगितले.

सुरवातीपासून अध्ययनात मुले चांगला रस घेऊ लागली आहेत हे पाहून मला समाधान वाटत होते. आता वर्गाबाहेर मुलांचा परिचय वाढत चालला. अनौपचारिक संवादामध्ये मुलांच्या घरची आर्थिक, शैक्षणिक परिस्थिती मी समजून घेत होतो. प्रतिकूल परिस्थितीतील मुलांना धीर देत होतो. काही मार्गही सांगत होतो. अभ्यासाच्या बाबतीत बेफिकिर असलेल्यांना जाणीव निर्माण करून देण्याचा प्रयत्न करीत होतो. मला मुलांपेक्षा मुलींची अभ्यासासाठी अधिक धडपड आहे असे आढळून आले. एव्हाना आम्हा सर्वांचाच एक प्रकारे चांगला सुसंवाद जुळू लागला होता.

आणि एके दिवशी माझी प्राचार्य पदासाठी निवड झाल्याची व दुसऱ्या महाविद्यालयावर बदली होणार असल्याची बातमी येऊन धडकली. सर्व वर्गात ती बातमी पसरण्यास फारसा वेळ लागला नाही. मुलांमध्ये असहाय्य अस्वस्थता पसरली. वर्गाबाहेर भेटून मुले खात्री करून घेऊ लागली. बातमी खरी असल्याचे समजल्यावर ती खूप नाराज होत. जाताना एक चांगले प्रेझेंट देऊन वर्गात माझ्या सत्कारासंबंधीच्या त्यांच्या हालचाली माझ्या कानावर आल्या. मग मी वर्गामध्ये सर्व मुलांना सर्व वस्तुस्थिती सांगितली. केव्हा जाणार आहे तेही सांगितले. मात्र प्रेझेंट दिले जाणार असेल तर मला ते मुळीच आवडणार नाही. एखादा फुलांचा छानसा गुच्छ मला खूप आनंद देऊन जाईल, यावर भर दिला. 'सगाम' परिसर सोडण्याच्या दिवशी एम.ए.च्या वर्गात छोटा शुभेच्छा समारंभाचा कार्यक्रम मुलांनी आयोजित केला. माझ्या पदोन्नतीमुळे मुलांच्या भावना संमिश्र बनल्या होत्या. बोलताना मुले-मुली सद्गदित होऊन बोलत होती. स्तुतीचा वर्षाव करीत होती. गेल्या दोन महिन्यात आपणास नवी दृष्टी आणि दिशा मिळाल्याचे सांगत होती. भविष्यात मला यश मिळावे अशी प्रार्थना करीत होती. निरोपाच्या भाषणात माझ्याही हृदयात कालवाकालव झाली. ती प्रकट होणार नाही अशी दक्षता घेत मी आटोपते घेतले. वर्गाच्या बाहेर पडलो आणि मुलांचा गराडा भोवती पडण्याअगोदर झपझप पावले टाकीत स्टाफरूम गाठले.

दुपारी महाविद्यालयाने 'सत्कार व शुभेच्छा' कार्यक्रम घेतला. मी 'सगाम' चे आवार सोडण्यासाठी बाहेर पडलो. आता डोक्यात विचारांनी गर्दी केली. एक जबरदस्त आव्हान पेलण्यासाठी माझी भविष्यातील वाटचाल सुरू झाली होती. एक नवीन विनाअनुदान महाविद्यालय उभे करण्याचे हे आव्हान साधेसुधे नव्हते. संस्था व शासन यांच्याकडून कसलीही आर्थिक मदत केली जाणार नव्हती. पिंपरी (पुणे) परिसरात सर्वच अपरिचित. लोकांमध्ये कमालीची व्यापारी मनोवृत्ती. शिक्षण संस्थेशी त्यांचे कसलेही देणे-घेणे नसलेली मनोवृत्ती आणि भरीस भर म्हणजे अननुभवी व अपरिपक्व तरूण सहकारी ! या आव्हानाचे काहीसे दडपण मनावर असले तरी ही झुंझ खेळण्याची उर्मीही मनातून उसळी मारीत होती. मनात भीतीचा मात्र लवलेशही नव्हता. विचारांचे हे वादळ मनात घोंघावत असतानाच मी 'सगाम' चा परिसर सोडला.

✦ ✦ ✦ ✦

कै. मातोश्री सौ.गंगूबाई ज्ञानू पाटील यांचे स्मरणार्थ
प्रा.डॉ.भास्कर ज्ञानू पाटील (वनस्पतीशास्त्र)
मु.काले, ता.कराड यांचेकडून
महाविद्यालयाच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त
रु.८,५००/- ची देणगी.

स.गा.म.:जडणघडण

प्रा.डॉ.सुमन पाटील
'वादळवेल' विद्यानगर, कराड

१५ जून १९६६ रोजी सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालयात मी नोकरीवर हजर झाले. तेव्हाच ही सेवा आहे, नोकरी नव्हे अशी खूणगाठ मनात बांधली होती. त्यामुळे ३६ वर्षांचा नोकरीतील काळ संपला तरी या महाविद्यालातील सेवा अजूनही सुरू ठेवली आहे. 'कुणी निंदा कुणी वंदा, लोकशाहीला मजबूत करणारी सेवा करीत राहणे हाच माझा धंदा.' या निष्कर्षाला मी पोहचले आहे. एक स्त्री म्हणून त्यातूनही दैवाचा आघात झालेली स्त्री म्हणून येथील ती संकटे पार करून रंजल्या गांजल्या लोकांची सेवा करण्याची संधी या महाविद्यालयाने दिली त्यामुळे माझा बौध्दिक, मानसिक विकास झाला, मी कृतार्थ झाले असे आताच म्हणत नाही. कारण अजूनही पुष्कळशी कामे करावयाची आहेत. ही कृतीप्रवणता गाडगे महाराज आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जीवनकार्यातील, विचारातील सतत स्त्रवणाऱ्या प्रेरणेमुळेच मला प्राप्त झाली. यावर माझी श्रध्दा आहे. म.गांधीनी आफ्रिकेच्या जंगलात 'टॉलस्टॉयच्या नावाने ८० एकरात एक फार्म निर्माण करून जगाला जे पुरोगामी वळण दिले, त्याची छोटीशी प्रतिकृती म्हणजे स.गा.म. महाविद्यालय, कराड असे मला वाटते.

अमेरिकेतील अलाबामा परगण्यात तस्केगी विद्यापीठाच्या दारात जॉर्ज कार्व्हर पोहचले तेव्हा तिथे असणारे अभावाचे राज्य, तेवढ्या प्रमाणात नव्हे पण थोड्याफार प्रमाणात इथेही होते. राहण्यासाठी जागा मिळाली तिथे प्रचंड केरकचरा, एका रिकाम्या हौदात उंदीर-घुशींचा धुडगुस, उभी दुभंगलेली भिंत आणि खड्डे पडलेली जमीन होती. तो हौद फोडून काढून वसतिगृहातील मुलांच्या मदतीने माती टाकून पाणी ओतले. दमयंती पाटील या नाना पाटलांच्या नातेवाईक असलेल्या प्राथमिक शाळेतील शिक्षिकेने बसावयाच्या पाटाने जमीन सपाट केली. त्यांची मुलगी विजया माझ्याजवळ शिकायला आली आणि मुलींचे वसतिगृह सुरू झाले. वसतिगृहात १८ मुली रहात होत्या.

१९६७ साली खाण्यासाठी म्हणून गावाकडून आणलेल्या शेंगा फोडल्या आणि आता जिथे स्टाफक्वार्टर्स आहेत तिथे नांगरट करुन भुईमुगाची पेरणी केली. तीन पोती शेंगा झाल्या. त्या विकून ३३०रू. इमारत निधी म्हणून दिला. घराशेजारीच उपप्राचार्य ल.मा.सुभेदार यांचे कुटुंब राहत असे. कुटुंबात माणसे तीन. काका, काकी, आणि मुलगा विजू. सुभेदार काकी म्हणजे वात्सल्यमूर्ती. त्यांनी वसतिगृहातील मुलींना अत्यंत प्रेमाने वागविले. दररोज पहाटे त्यांच्या दारातील सडा-रांगोळी बघून मुलींनाही राहत्या जागेच्या मागे-पुढे रांगोळी घालण्याची प्रेरणा मिळाली. मागे-पुढे प्रचंड पटांगण तयार केले. फुलझाडे लावली आणि वसतिगृहाचे नंदनवन बनले. या १८ मुलींना ६० मिनिटांच्या एका तासाला ३० पैसे मजुरी देऊन दररोज ३ तास काम करून, ग्रंथालयातील ग्रंथाना नंबर घालून देखभाल करण्याचे काम दिले. मुली स्वावलंबी झाल्या.

रविवारची वृत्तपत्रे प्राचार्य पी.जी.पाटील व प्राचार्या सुमतिबाई पाटील वाचावयास देत. दुपारनंतर वृत्तपत्राचे सामुदायिक वाचन ४-५ तास चाले. सर, बाई व सुभेदार काका मुलींच्या वाचनावर लक्ष ठेवून असत. म.फुले, शाहू महाराज, डॉ.आंबेडकर, कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे, पंजाबराव देशमुख, बुकर टी.वॉशिंग्टन, अब्राहम लिंकन, आणि कर्मवीर अण्णांची उपलब्ध चरित्रे मुली आनंदाने वाचत. पुढे याच वसतिगृहाचे विशालरूप दानशूर बंडो गोपाळा मुकादम यांच्या उदार देणगीतून आकाराला आले. आणि सुमतिबाईंचे नाव वसतिगृहाला दिले. आशा कुलकर्णी, शालिनी लोहार, विद्या पाटील, चित्रा कुलकर्णी सारख्या अनेक विद्यार्थिनी निर्माण झाल्या.

१९६६ सालात पूर्व-पश्चिम उभी असणारी मुख्य इमारत अर्धवट बांधकाम झालेली होती. जिना अपुरा होता आणि इमारत गळत होती. १९६७ सालच्या अखेरीस बॅरीस्टर पी.जी.पाटील सर कोल्हापूरला कीर्ती महाविद्यालयाचे (राजर्षि शाहू कॉलेज) प्राचार्य झाले, आणि सुमतीबाई पाटील स.गा.म.च्या प्राचार्या झाल्या आणि इमारतीची दुरूस्ती करण्यासाठी वर्गणी गोळा करण्याचे ठरले. पंचक्रोशीतून देणगी गोळा करण्याच्या कामी दिनकर बंडोजी पाटील नेहमी माझ्याबरोबर असत. त्यांची खूप

मदत झाली. त्याकाळात लोकांच्याकडे देणगी द्यायला फारसे पैसे नसत. तरी ते ५-१० रूपये रयतेला द्यावयास तयार असत. एवढ्यातूनही काम भागण्यासारखे नव्हते म्हणून २-३ वर्षे 'करायला गेलो एक' 'कवडी चुंबक' 'आमचं नाव बाबूराव' इ.नाटकांचे प्रयोग करून बऱ्यापैकी पैसे मिळाले. इमारतीची डागडुजी झाली. १९७३ साली एम.ए.(मराठी) वर्ग या महाविद्यालयात प्राचार्य मगदूम यांच्या काळात सुरू झाले तेव्हा मी रामानंद नगरला होते. सरांनी एम.ए.चे वर्ग घेण्यासाठी बोलाविले. शनिवार-रविवार हे वर्ग चालत. १९७३-७५ दोन वर्ष काम केले. महाविद्यालयाकडे पैसे नव्हते. मग येण्याजाण्याच्या प्रवास खर्चाची पावती (४३०रू.) आणि रेक्टरशीप केली तेव्हा राहिलेल्या जागेचे भाडे वसूल केल्याची पावती अशा दोन्ही पावत्या दिल्या व ऑफिसमध्ये खळखळून हसलो. श्रमपरिहार झाला.

१९७७ साली पंढरपूरवरून स.गा.म.महाविद्यालयात मी पुन्हा आले. तेव्हा एम.ए.चे वर्ग स्थिर झालेले होते आणि एम.फिल सुरू करण्याचा प्रस्ताव विद्यापीठाकडे पाठविण्याचे ठरले. प्राचार्य होते डी.के.खोत, विद्यापीठाच्या कमिशनवर डॉ.गो.मा.पवार होतेच. एम.फिल सुरू करणे किती अवघड आहे याचा पाढा त्यांनी कथन केला. पण आम्ही त्यांना U.G.C. ने दिलेल्या अनुदानाची पै न पै पुस्तकासाठी खर्च करू, मान्यता द्या असे सांगितले. ७७ हजार रू.ची ग्रँट मिळाली; तेव्हा मॅजिस्टेटच्या अशोक कोठावळे यांच्या दुकानात ७७ हजार संपतील एवढी पुस्तके खरेदी केली. एम.फिलचा छान जम बसला. पहाटे २ वाजता अभ्यासाला बसावयाचे ते सकाळी १० पर्यंत अभ्यास करायचा. मग व्यक्तिगत कामे उरकून ११ वाजता आता जिथे भूगोल विभागाचे ऑफिस आहे तिथे वर्ग सुरू करावयाचा. विद्यार्थी फक्त दोन, पण प्राध्यापक म्हणून दिवस कसे गेले हे कळलेच नाही. डॉ.एस.आर.सूर्यवंशी याच कालखंडात इथे प्राचार्य होते. पुरोगामी विचारांच्या अनेक व्याख्यानांचा राबता चर्चासत्रांची लगबग, अनेक 'वादविवाद' रंगत होते. एखादा रत्नागिरी हापूस आंबा मोहरून यावा असे महाविद्यालय बौध्दीक क्षमतेच्या अखंड विलसितांनी बहरून गेले होते. विज्ञान शाखेला चांगले दिवस आले होते. आर्टस, कॉमर्स, सायन्स तिन्ही शाखा,-

''कसे निभावून गेलो कळत नाही कळले नव्हते
असे काही जवळ नव्हते नुसते हाती हात होते!''

अशा भूमिकेत परस्परांच्या सहकार्याने महाविद्यालयाची उंची वाढवित होते. कष्टही होते आणि आनंदही होता. पुढे प्राचार्य मगदूम सर या महाविद्यालयात आले. आता कर्मवीरांची जन्मशताब्दी ३ वर्षावर येऊन ठेपली. नवेनवे उपक्रम सुचवा असे संस्थेचे परिपत्रक आले आणि एका संध्याकाळी हाक मारली आणि उपक्रम सुचवा म्हणाले. मी सहज बोलून गेले, समाजाच्या अजून तळाशी जाण्याकरता कर्मवीरांच्या स्मृतीला साक्ष ठेवून १ हजार बालवाड्या संस्थेने काढाव्यात. सर हसले आणि म्हणाले म्हणजे कोणी काढाव्यात ? मी हसून म्हटले संस्थेने काढाव्यात म्हणजे काढाव्यात. यावर एक पेन आणि कागद हातात देऊन सर हसत म्हणाले, जा, कॅनालवरील झोपडपट्टीत आणि नावे लिहून आणा विद्यार्थ्यांची. नाही म्हणणे शक्य नव्हते. तासा-दोन तासात ३८ मुलांची यादी आणून सरांजवळ दिली व सरांना सांगितले, उद्या सकाळी १० वाजता ही मुले प्रेक्षागृहात येतील आणि शाळा सुरू होईल. शिक्षिका कोण ? समोर फासे सर बसले होते. सरांना त्यांनी सांगितले, उद्या सकाळी मिसेस फासे शिकवावयास येतील. दुसऱ्या दिवशी १५० मुले वेगवेगळ्या झोपडपट्टीतून आली. आण्णांचा फोटो ठेवून पूजा झाली. 'निवृत्त होईपर्यंत नव्हे तर जीवनाच्या अखेरच्या क्षणापर्यंत पाटील बाईंनी शाळा पहावी व तसे मान्य करावे. मल्लखांबावरचे भूत मल्लखांबावर सतत ठेवावे तसे हे घडले आणि पाटीलबाई कृतीप्रवण राहण्यासाठी जणू गाडगेबाबांनीच कर्मवीरांच्या या महाविद्यालयाशी जोडून दिले. पाळणाघर ते पीएच.डी.अशा पाच शाखांचे नवे पर्व विकसित होत जाईल असा विश्वास वाटतो.

आमदार केशवराव पवार हे 'रयतच्या' प्रारंभीच्या काळातील विद्यार्थी. नामांकित वकील, पुरोगामी विचारांचे पाईक आणि कर्मवीरांवर नितांत श्रध्दा असणारे रयतेचे थोर हितचिंतक. त्यांच्या सहवासात सामाजिक चळवळीतील काही महत्त्वाच्या घटना इथे घडत राहिल्या. १९७२च्या दुष्काळाच्या वेळी दहिवडी येथे पाणी परिषद झाली. वि.म.दांडेकर, द.ता.देशमुख, एस.के.लिमये, यशवंतराव चव्हाण, संतराम पाटील, जीवनराव सावंत, ही मंडळी माझ्या घरी आली. दादांची म्हणजे केशवरावांची भेट घेतली. पाणी परिषद घेण्याचे ठरले. आणि कृष्णाकाठावर पाण्याचा प्रश्न कसा बिकट होणार आहे, वेळीच सावध व्हा असा इशारा दिला. ना.यशवंतराव मोहिते यांची २ व्याख्याने महाविद्यालयात आयोजित करण्यात आली होती. पुरोगामी महाराष्ट्राचे पुरोगामीत्व नेमके कशात आहे. यावेळची ही व्याख्याने आम्हा प्राध्यापकांना उपयुक्त ठरली. लोकशाहीत तळागाळातील समाज एकत्र कसा करावयाचा हे समजून देणारे बाबा आढाव, शांताराम गरूड या महाविद्यालयात आले ते दादांच्यामुळेच.

प्रा.डॉ.एन.डी.पाटील यांच्या नेतृत्त्वाखाली 'श्वेतपत्रिकेचे कृष्ण स्वरूप' ही पुस्तिका तयार झाली. तिचे वाचन समुदायाने करून त्यावर चर्चा घडवून आणून मोर्चा काढला. तेव्हा दानशूर

बंडो गोपाळा मुकादम आणि केशवराव दादांचा पुढाकार होता. एस.एम.जोशी यांच्या नेतृत्त्वाखाली राष्ट्रीय एकात्मता परिषद गावात आयोजित करण्यात आली. महाविद्यालयाचा सहभाग महत्त्वाचा होता. दरवर्षी २२ सप्टेंबर रोजी गावातून निघणारी भव्य मिरवणूक आणि त्यात सामिल असणारे दादा ही रयतेच्या सामर्थ्याचा दिमाखदार छबिनाच होता.

मराठी विभागाचे एक चर्चासत्र U.G.C. मार्फत आयोजित केले होते. 'फुले नावाची दुर्गंधी' या ग्रंथावरील चर्चासत्र, ५० विद्यार्थ्यांच्या भाषणाने, नव्या पिढीच्या सामर्थ्यशाली बुध्दीवैभवाचा दबदबा निर्माण करणारे ठरले होते. शंकरराव खरातांच्या 'तराळ-अंतराळ', नलिनी पंडीत यांच्या 'गांधी' ग्रंथाचे वाचनवर्ग सुरू केले तेव्हा नव्या पिढीतील आकाराला येणारी दमदार व्यक्तीमत्त्वे प्रकाशाचे कोपरे धरून उजळून निघत होती. कथाकथन, काव्यवाचन, निबंधवाचन यांचा सतत राबता महाविद्यालयात जिवंतपणा आणणारा होता. वाणिज्य आणि विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांना ही पर्वणीच होती. गो.नी.दांडेकरांच्या 'तांबडफुटी' कांदबरीवर चर्चा झाली तेव्हा पॅलेस्टाईन सारा आणि हिंदू सुमित्रा या दोन गायिकांच्या व्यक्तीमत्त्वाची चर्चा करून संघाच्या पठडीतील दांडेकरांच्या मर्यादा प्राचार्य मगदुम सरांनी दाखविल्या; तेव्हा समोरच्या मुलांनी विस्फारलेले डोळे आजही मी विसरू शकत नाही. एखाद्या उधाणलेल्या क्षणात घडलेली गोष्ट म्हणजे क्रांती नव्हे तर क्रांती ही एक प्रवृत्ती असते व ती अनंतकाळ जपावयाची असते. तिला धुमारे फुटत असतात. समाज घडविण्याचे काम दीर्घसुत्री असते. माणसे रोज मरतात, पण 'माणूस' नावाची जात मरत नाही यावर श्रध्दा ठेवून-

'केला तरी पोत बळेचि खाले
ज्वाळा तरी ते वरती उफाळे'

अशा बेगुमान ध्येयवादाने वाट चालावयाची असते असे हे महाविद्यालय शिकविते.

✦ ✦ ✦ ✦

मुल सुरक्षित आईच्या कुशीत !
वाहन सुरक्षित 'अजिंक्य' च्या देखभालीत!

बजाज ऑटोचे अधिकृत सर्व्हिस सेंटर

वैशिष्ट्ये :
- ❒ बजाजची नवीन वाहन विक्री सोय.
- ❒ ओरीजनल स्पेअर्स व विक्रीपश्चात फ्री सर्व्हिस सोय.
- ❒ कंपनी प्रशिक्षीत मेकॅनिक्स्
- ❒ अत्याधुनिक ऑटोमेटेड वर्कशॉप.
- ❒ जुनी गाडी देऊन नवीन बजाज घेण्यासाठी एक्स्चेंज सुविधा व विविध फायनान्स उपलब्ध

अधिक माहितीसाठी संपर्क साधा !

अजिंक्य सर्व्हिस स्टेशन

पोलीस स्टेशनशेजारी, उंब्रज
फोन :२६४४६४,९८५०५८६२१२,९८५०६५३९९५

मन:स्वास्थ्य क्लिनिक

मानसोपचार केंद्र

डॉ.शरद व. क्षीरसागर (एम.डी.मनोविकार)

उपलब्ध सुविधा : बाह्यरुग्ण विभाग, आंतररुग्ण विभाग, फिटस् निदान व उपचार, ई.ई.जी., मनोलैंगिक समस्या

क्लिनिक : दत्तचौक, कृष्णा बँकेसमोर, भट्टड कॉम्प्लेक्स, कराड.

हॉस्पिटल : पोस्टल कॉलनी, कार्वे नाका, कराड

वेळ : रोज स.११ ते ५ मंगळवार स.१० ते दु.२ रविवार बंद

सद्‌गुरु गाडगे महाराज कॉलेज यांच्या सुवर्ण महोत्सव वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा

श्री कृष्णामाई ग्रामिण बिगर शेती पतसंस्था मर्यादित, जुळेवाडी, ता. कराड, जि. सातारा

शाखा : कार्वे नाका, कराड

विद्यमान संचालक मंडळ

मा. श्री. दादासो सहदेव सोमदे M.Sc. (Maths) ..... चेअरमन
मा. श्री. विलास किसन खोत, M.A. ..... व्हा. चेअरमन
मा. श्री. अधिक शिवाजी सोमदे, B.Sc. ..... संचालक
मा.श्री. शंकरराव सखाराम काशिद ..... संचालक
मा. श्री. अस्लम पापालाल मुल्ला ..... संचालक
मा. श्री. बबनराव परसु पाटील ..... संचालक
मा. श्री. बबनराव बाबुराव हिनुकले ..... संचालक
मा. श्री. कोंडीबा बाबुराव बाकले ..... संचालक
मा. श्री. काशिनाथ केशव सोमदे ..... संचालक
मा. श्री. शब्बीर अब्दुल पटेल ..... संचालक
मा. श्री. तानाजी आण्णा भोसले ..... संचालक
मा. सौ. जयमाला जालिंदर पाटील,B.A. D.Ed ..... संचालिका
मा. सौ. बनुबाई वसंतराव काळे ..... संचालिका
मा. श्री. राजेंद्र पांडूरंग पवार ..... सचिव

हार्दिक शुभेच्छा !...

सेवक वर्ग (कराड शाखा)

श्री. राजेंद्र शंकरराव काशिद, B.Com ..... शाखाधिकारी
श्री. मोहन रामचंद्र सावंत, B.Sc. ..... कॅशिअर/क्लार्क
श्री. संजय महादेव वडकर ..... शिपाई

सल्लागार मंडळ (कराड शाखा)

श्री. अरुण बाबुराव चोपडे, B.Com.
श्री. रफिक रमजान पटेल, M.Com.
श्री. रमेश रंगराव शिंदे, B.Com.
श्री. संभाजी महादेव कुंभार, B.A.
श्री. बाजीराव विष्णू पाटील, M.A.
श्री. जालिंदर मारुती पाटील, B.Sc., B.Ed

(Member of Deposit Guarantee Corporation Ltd.)

जी.के. गुजर मेमोरियल चॅरिटेबल ट्रस्ट, कराड

के. एन. गुजर मेमोरियल हॉस्पिटल

● *दर शनिवारी व रविवारी कॅन्सरच्या रुग्णांची तपासणी* ●

हॉस्पिटलचे इतर विभाग

☞ शस्त्रक्रिया विभाग
☞ फॅक्चर व ॲक्सिडेंट विभाग
☞ वैद्यकीय विभाग
☞ फीजीओथेरपी

कॅन्सर सेंटर

☞ मधुमेह निदान केंद्र
☞ कार्डीओग्राम-मॉनिटर व अत्यवस्थ रूण विभाग
☞ रक्तपेढी ☞ प्रयोग शाळा

मोफत फिरते रुग्णालय

☞ अल्ट्रासोनोग्राफी
☞ रुग्ण वाहिका
☞ बालरोग विभाग
☞ औषध विभाग
☞ क्षयरोग केंद्र
☞ स्त्रीरोग व प्रसुति विभाग
☞ कुष्ठरोग केंद्र
☞ वंध्यत्व निवारण केंद्र
☞ भूल तज्ञ

दर सहा महिन्यांनी मोफत कॅन्सररोग निदान शिबीर

✦ **के. एन. गुजर मेमोरियल हॉस्पिटलच्या इतर शाखा**

☞ डॉ. गुजर इन्स्टिट्यूट ऑफ मेडीकल सायन्सेस
☞ सी.पी.एस.मान्य पोस्ट ग्रॅज्युएट मेडिकल इन्स्टिट्युट,(मुंबई) D.G.O., D.C.H., D.P.B., D.Ortho., D.A.
☞ जी.के. गुजर मेमोरियल सह्याद्रि हॉस्पिटल, यशवतनगर.
☞ के.एन. गुजर हॉस्पिटल ब्लड बँक

सद्‌गुरु गाडगे महाराज : लोकशिक्षण मठ

डॉ. वसंतराव मोरे
कोल्हापूर

स्वातंत्र्यसूर्य छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजमुद्रेतील शब्द अत्यंत सार्थ आहे ''प्रतिपत्चंद्रलेखेव वर्धीष्णुर्विश्ववंदिता। शाहसूनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते ॥'' प्रतिपदेच्या चंद्रकोरी प्रमाणे विकसित होणारी आणि विश्ववंदनीय अशी, शहाजीपुत्र शिवाजीची मुद्रा, जनकल्याणसाठी शोभायमान आहे. नित्य विकसित होणार, विश्ववंदनीय होणार असा आत्मविश्वास जनकल्याणाच्या उदात्त हेतूमुळे निर्माण झाला आहे. आज शिवचरित्र व कार्य विश्ववंदनीय झाले आहे. सर्व मानवजातीस स्वातंत्र्य व जनकल्याणाचा संदेश देत आहे.

रयतेच्या राजाने मावळे, हेटकरी, सामान्यजन संगठीत करून जनकल्याण केले. प्रभु रामचंद्राने वानर सेनेच्या आधारे रावणास पराभूत केले. महात्मा फुले यांनी सामान्य शेतकऱ्यांचे प्रतिनिधित्व केले. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी जन कल्याणासाठी स्वकीयांविरूद्ध पहिला समतेचा लढा उभा केला. संत तुकाराम महाराजांच्या काव्याचा प्रमुख उद्देश जनकल्याणच आहे. या जनकल्याणासाठी आपले सर्व आयुष्य वेचणाऱ्या सद्‌गुरु गाडगे महाराजांच्या नावांने पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटलांनी हे महाविद्यालय सुरू केले. प्रतिपदेच्या चंद्रकलेप्रमाणे ते विकसित होत आहे. जनकल्याणाचे कार्यही ते करीत आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील एक नामवंत कॉलेज म्हणून आज त्याचा लौकिक झाला आहे. जर हे महाविद्यालय ॲटॉनामस झाले तर जागतिकीकरणाच्या काळात ते विश्ववंदनीय होईल याची मला पूर्ण खात्री आहे.

प्रारंभीच्या काळात १९६७ ते १९८३ पर्यंत मी १७ वर्षे सेवा केली. केवळ अध्ययन-अध्यापन करणे त्या काळी शक्य नव्हते. कॉलेजच्या उभारणीचा अत्यंत खडतर असा तो कालखंड होता. त्यामुळे इमारती बांधण्याचे काम आम्ही प्राध्यापकच करत होतो. कंत्राट देणे शक्य नव्हते. याच कालखंडात बॅरि.पी.जी.पाटील, प्राचार्य ए.बी.मगदूम, प्राचार्य सुमतिबाई पाटील, प्राचार्य एस्.आर.सूर्यवंशी या 'कमवा व शिका' योजनेत तयार झालेल्या प्राचार्यांनी समर्थ नेतृत्व केले.

कर्मवीर अण्णांनी पुण्याच्या महात्मा फुले मंडईतील भाजी विकणाऱ्या स्त्रीया व हमालांकडून एक-एक रूपया देणगी घेवून, पंचवीस हजार रूपये घोंगड्यात बांधून पुणे विद्यापीठाच्या कुलगुरूंच्या समोर ओतले. कुलगुरू चकित झाले. त्यामुळे या महाविद्यालयाच्या उद्‌घाटन प्रसंगी विशेष पाहुणे म्हणून एक ट्रक भरून पुण्याचे हमाल आले होते. महादेव मंदिराजवळ एन्.सी.सी. कार्यालयाची इमारत कराडच्या कुंभाराकडून विटा देणग्या मिळवून त्यावेळेचे प्राचार्य रा.कृ.कणबरकर यांनी बांधली. आजही ती इमारत आहे.

पूर्वीच्या उद्यमनगराच्या कांही कौलारू साध्या इमारती होत्या. त्यातच वर्ग व प्राचार्यांचे ऑफिस होते. कौलारू असल्यामुळे जळमटे निर्माण व्हायची म्हणून मी व प्रा.डॉ.एम्.ए. शेख यांनी पुस्तकांच्या पार्सलला आलेल्या गोणपाटाचे छत चार रूपयाचा हिरवा रंग आणून रंगविले व उपलब्ध असलेल्या खिळ्यांनी रविवारी बांधले. सोमवारी प्राचार्य बॅरि.पी.जी.पाटील कार्यालयात आले. आमचा अंदाज होता की आम्हास शाबासकी मिळेल. पण झाले उलटेच. त्यांनी सवाल केला, 'कोणत्या न्हाव्यांनी हा खर्च केला ?' आम्हास बोलावले. जाब विचारला. आम्ही परवानगी न घेण्याचा अगाऊपणा केला होता. सर म्हणाले ही चैन आपणास परवडत नाही. मी म्हणालो सर फक्त चारच रूपये आम्ही खर्च केले आहेत. बाकी सर्व साहित्य निकामी म्हणून इथेंच पडून होते. रयतचा प्राचार्य डामडौलात रहात नाही. साधाच असावा त्याचे कार्यालयही साधेच असावे. साधी रहाणी व उच्च विचारसरणीचा अर्थ त्यावेळी आम्हास कळला. मुख्य इमारतीचा पूर्वेकडील हॉल बांधण्याची आम्ही योजना आखली. रक्कम कमी पडू लागली म्हणून कराडमधून उधार साहित्य आणले. पी.जी.सर त्यावेळी शाहू कॉलेजला प्राचार्य होते. प्राचार्या सौ. सुमतिबाई पाटील होत्या.

रविवारी पी.जी.सरांनी बांधकामाची सुरवात पाहिली व आम्हास बोलाविले. फंडाची चौकशी केली. उधार माल कां आणला ? म्हणून जाब विचारला. मी म्हणालो सर एक काळ होता की कॉलेजला कोणी उधार देत नव्हते. ही प्रगती नाही का ? सर म्हणाले ऋण काढून सण करावयाचा नसतो. अत्यंत आर्थिक अडचणीत त्यावेळी कॉलेज होते. प्री.डिग्री वर्गाच्या दोन-दोन तुकड्या एकत्र करून लाऊडस्पिकर लावून आम्ही प्रेक्षागृहात व्याख्याने घेत असू. आज आपणास हे खरे वाटणार नाही पण सत्य आहे. स्टाफ क्वॉर्टर्स, सेवक निवास मुख्य इमारतीचा पहिला मजला, विज्ञान प्रयोगशाळा या इमारती हळू-हळू उभ्या राहिल्या. खेड्यापाड्यातून येऊन जाऊन करणाऱ्या मुलींना खूप त्रास होत असे. जर मुलींचे वसतिगृह बांधले तर त्यांची संख्या वाढेल हा विचार सर्वप्रथम प्राचार्या सुमतीबाई पाटील यांनी मांडला. दानशूर बंडो गोपाळा मुकादम त्यावेळी कॉलेजवरच रहात होते. तात्यांच्या समोर मी व प्राचार्य भोर यांनी मुलींच्या वसतिगृहाची योजना मांडली व मदतीची अपेक्षा व्यक्त केली. तात्यांनी सर्व जबाबदारी उचलली व दक्षिणेकडील खोल्या बांधण्यास तयार झाले. नंतर उत्तरेकडील भाग बांधला. तात्या म्हणाले पहिला मजला बांधू. मी विरोध केला 'तात्या म्हणाले प्रथम तळमजला होऊ दे'. तात्यांनी दोन शिव्या दिल्या पण आपल्या काठीने माप टाकले. तळमजला झाला. एके दिवशी मी तात्यांच्याकडे एक रूपया पहिल्या मजल्याच्या बांधकामाचा शुभारंभ म्हणून मागितला. तात्यांनी ओळखले व म्हणाले. काम सुरू करा. लागेल ती मदत मी देतो. वसतिगृह तयार झाले. तात्यांनी प्राचार्या सौ. सुमतिबाई पाटील वसतिगृह असे नामकरण केले. उद्घाटनास सौ. वेणुताई चव्हाण यांना बोलाविले. अध्यक्ष म्हणून मा. यशवंतराव चव्हाण यांचे नाव सुचविले. समारंभात तात्यांनी अध्यक्षांना प्रमुख पाहुण्या सौ. वेणुताईना हार घालण्याची सूचना केली. यशवंतरावांनी त्यांना हार घातला व म्हणाले लग्नानंतर प्रथमच मी त्यांना हार घातला. मी ३० वर्षांनी तरूण झालो. सभा खदखदून हसली. आपल्या भाषणांत यशवंतराव म्हणाले, 'ज्यांच्या पायाजवळ बसून कांही ज्ञान मिळवावे असे हे बॅरि. पी.जी. पाटील व सौ. सुमतिबाई पाटील दांपत्य आहे. आज ती संधी मला मिळाली. यानंतर कुलगुरू पदासाठी बॅरि.पी.जी.पाटलांचे नांव पुढे आले. शिवजयंतीसाठी सर गोव्यास गेले, मी रायगडला गेलो. परतल्यावर दौऱ्यांचा वृत्तांत देण्याची आमची प्रथा होती. मी माझा वृत्तांत दिला. सर म्हणाले अरे सावंतवाडीच्या शिवरामराजे भोसले यांच्याकडे येतांना गेलो त्यांनी मला सांगितले की कुलगुरू पदासाठी माझ्या नावाचा विचार होत आहे. मी म्हणालो छान झाले. सर म्हणाले मी कोणतीही झूल पांघरणार नाही. मी सरांना म्हणालो, 'तुमच्या व्यक्तिगत विचारांपेक्षा एक पाटील कुलगुरू होतो हा महाराष्ट्रास होणारा आनंद आपण कां नष्ट करता. आपण होकार द्यावा.'

आम्ही केवळ इमारती बांधत नव्हतो. प्राचार्य मगदूम साहेबांच्या कालखंडात आम्ही एम.ए. मराठी, हिंदी, इतिहास इ. विषय सुरू केले. विद्यापीठास फक्त १० रू. द्यावे लागत. सर्व फी कॉलेजला मिळे. दरवर्षी लाखो रूपये फी रूपाने येऊ लागले. आम्ही प्राचार्यांना सांगितले, आम्हास एम.ए. वर्गांना शिकविण्याचे मानधन देऊ नका. बाहेरून येणाऱ्या प्राध्यापकांना जरूर द्या. पण आमची एक अट आहे. आम्ही मागेल तितकी पुस्तके आम्हास दिली पाहिजेत. प्राचार्यांनी अट मान्य केली इतकेच नव्हे तर ती खऱ्या अर्थाने पूर्ण केली. याच कालखंडात ग्रंथालय अधिक समृद्ध झाले. माझे छत्रपती शिवाजी महाराजांवरील पीएच्.डी. च्या संशोधनाचे कार्य या कालखंडात सुरू होते. बॅरि.पी.जी. पाटील व प्राचार्य मगदूम साहेब जेव्हा मुंबई, पुण्यास जात. त्यावेळी शिवाजी महाराजांवरील सर्व नवीन पुस्तके ते माझ्यासाठी आणत. हे प्रेम, ही ज्ञानलालसा पाहून मी आनंदी झालो. डॉ. कोतमिरे वारणानगरहून कराडला एम.ए. अध्यापनासाठी येत. १९७४ ला त्यांना पीएच्.डी. मिळाल्याबद्दल त्यांचा सत्कार केला. सत्कारात बोलतांना मी म्हणालो 'बेगानी शादी में अब्दुल्ला दिवाना' पुढील वर्षी १९७५ ला मी पीएच्.डी. झालो. प्राचार्य मगदूम सर म्हणाले, 'आता बेगानी शादी नाही. लग्न घरचे आहे' ही आत्मियता या कॉलेजमध्ये पाहिली.

माझ्या व्यक्तिमत्त्व विकासात या कॉलेजचा सिंहाचा वाटा आहे. बॅरि. पी.जी.पाटील आपल्या व्याख्यानास मला आग्रहाने घेऊन जायचे. पण मी जेव्हा व्याख्याने देवू लागलो तेव्हा माझ्या हे लक्षात आले की वक्ता म्हणून मला तयार करण्याचा त्यांचा हेतू होता. यामुळेच देशभर, दिल्ली, पानिपत, इंदौर, देवास, चैन्नई, धारवाड संपूर्ण महाराष्ट्रात मी एक वक्ता म्हणून जात आहे.

कॉलेजच्या रौप्यमहोत्सवी अंकाचा मी संपादक होतो. बजेट नव्हते. फक्त अहवाल दिले. लेख नाहीत पण सातारा जिल्हा सहकारी बँकेच्या देणगीतून कलायोगी जी.कांबळे यांचे सुंदर रंगीत मुखपृष्ठ छापले. या सुवर्णमहोत्सवासाठी आर्थिक अडचण असणार नाही. कारण चंद्रकला आता पौर्णिमेच्या जवळ आली आहे. शाही वैभवात हा अंक निघावा ही सदिच्छा...

स.गा.म. कॉलेज : काही आठवणी

प्राचार्य शिवाजीराव भोर
माजी सचिव, र.शि.संस्था, सातारा.

सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज जीवनाची संजीवनी देणारं कॉलेज, विद्यार्थी घडवणारं कॉलेज.

१९६४ साल. जेमतेम ३०० ते ४०० विद्यार्थी. बीन प्लॅस्टरच्या भिंती असलेल्या इमारती. उजाड माळरानावर बसलेला एका महान तपस्व्याचा मठ, गरजु, शेतमजुर, कामकरी, झोपडपट्टीत राहणाऱ्यांनाच आश्रयस्थान..निसर्गाशी नात सांगणारं एक ज्ञानमंदिर. माणसाला माणूस म्हणून उभं करण्याचा प्रयत्न करणारं एक रयतेचं स्वप्न मंदिर..

इमारत नसेल परंतु इमारतीपेक्षा बौद्धीकदृष्ट्या जास्त उंचीची माणसं या कॉलेजला लाभली. कै. बॅ.पी.जी.पाटील व श्रीमती सुमतिबाई पाटील यांच्या सारखी चालती बोलती इंग्रजीची बलस्थान या कॉलेजला लाभली. 'मठ' म्हणून हेटाळणी करणारे देखील या मठातील इंग्रजीचा अभंग ज्ञानयज्ञ पाहून आचंबीत होत. याच मठात माणसं फुलु लागली. जीवंतपणा आला. या काळात महाविद्यालयाची हेटाळणी करणारे फार होते परंतु प्राध्यापकांचा त्याग व रयतेचा ध्यास असणारे मोजके व निष्ठावान विद्यार्थी, कार्यकर्ते मिळाले. त्यात कै. केशवराव पवार, कै. बंडो गोपाळा मुकादम यांची नावे घ्यावी लागतील. त्यांच्यामुळे बीन प्लॅस्टरच्या भिंती बोलू लागल्या. सहा सहा महिने पगार मिळाला नाही तरी काम करणारे प्राध्यापक मिळाले. महाविद्यालयाचं अंगण बोलू लागलं. अनेक इमारती उभ्या राहिल्या. मुलींचे वसतिगृह कै. तात्यांच्या सहकार्यातून जन्माला आलं, एका अर्धनग्न फकीराने जगाला अहिंसेचा मंत्र दिला. येथे एका कुसूरच्या फकीराने मुलींच्या जीवन पुर्ततेचा अध्याय लिहीला.

कै. बंडो गोपाळा मुकादम यांनी या महाविद्यालयाकरीता खुपच मेहनत घेतली. गाडगे बाबांना ते गुरू मानत. त्यामुळे त्यांचं या कॉलेजवर जास्त लक्ष असे. कॉलेज परीसरातच ते राहत. त्याकाळात पगार वेळेवर होत नसत. कै. तात्यांनी अनेकवेळा स्वतः पगारासाठी पैसे दिले. काही रक्कम उसनवारीने असे तर काही रक्कम देणगी म्हणून देत असत. साधी माणसे पण सुदृढ विचारांची. त्यांनीच खऱ्या अर्थाने या महाविद्यालयाचा वैचारिक पाया भक्कम केला. प्रत्येक दगडाच्या चिरा त्यागाच्या आणि कष्टाच्या विचाराने भरल्या.

कै. केशवराव पवार यांचेही सहकार्य लाभले. त्यांनी महाविद्यालयास आपलं घर मानलं. अडीअडचणीत लोकांना आधार दिला. या सर्वांच्या मदतीने कॉलेज वाटचाल करत करत वृद्धींगत होत गेलं. संख्यात्मक व गुणात्मक प्रगती दिसू लागली. विज्ञान विभाग सुरू झाला. त्यास कै. आनंदराव चव्हाण माजी केंद्रिय मंत्री, भारत सरकार यांनी मदत केली. त्यांनी यु.जी.सी.अनुदान मिळवून दिले.

देणारे देत होते, अनेक हात पुढे येत होते, हात सर्वसामान्यांचे होते. हातात व मनात निष्ठा, श्रद्धा व आत्मियता होती रयतेची.

अनेक अडचणी आल्या पण श्रद्धा बदलली नाही. माझ्याकडे इमारत विभाग होता. मदतीकरिता धान्य गोळा केले. लोकनाट्ये केली. प्राध्यापकांनी आपला एक महिन्याचा पगार देणगी म्हणून दिला. 'मठ' म्हणणारे मागे पडले, कॉलेज सर्वसामान्यांचे दैवत बनले. गरीब विद्यार्थ्यांचे जीवन फुलू लागले. या कॉलेजची खरी फुलराणी बनल्या त्या आमच्या आदरणीय श्रीमती सुमतिबाई पाटील.

एका पै च क्रेडीट नसणाऱ्या कॉलेजची पत सौ. सुमतिबाई पाटील यांच्या कारकिर्दीत वाढली. कै. बॅ.पी.जी.पाटील यांच्या परस्पर लाखो रूपयांचा माल उधारीवर आणून इमारतीचे कामकाज पूर्ण करण्यास त्यांनी परवानगी दिली श्रीमती सुमतिबाईंनी फारच धाडसाने निर्णय घेतले आणि स.गा.म.चा चेहरा मोहरा बदलून टाकला. अनेक कठीण प्रसंगात प्रशासन चालविले. त्यामुळेच संत गाडगे बाबांच एक स्मृतिस्थान डौलानं आणि अभिमानानं आज उभं आहे. ते असेच विस्तारत व फुलत राहो ही सदिच्छा...

॥ जय कर्मवीर ॥

✦ ✦ ✦ ✦

सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज यांच्या सुवर्ण महोत्सव वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा

With Best Compliments From

Ph (02164) 225640

OXFORD

Shirts

Trousers

T-Shirts

Hojiary

Jeans

Short Shirts

233, Surya Complex, Dutta Chowk, Karad
Chawadi Chowk, Karad, Dist. Satara

''भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे''

श्री स्वामी समर्थ ग्रा. बि. शेती सह. पतसंस्था मर्या.

सोनई, ता. नेवासा जि. अहमदनगर

फोन : (०२४२७) २३१५७६, २३०४७६ शाखा- करजगांव, फोन : २३२२६८, नेवासा, फोन : २४२२७६

श्री. बाबासाहेब तोडमल - व्हा. चेअरमन श्री. रावसाहेब टिक्कल - चेअरमन

संचालक मंडळ

श्री. गोवर्धनशेठ अट्टल | श्री. दशरथ जाधव - संस्थापक | श्री. जयप्रकाश बालदी | श्री. कारभारी डफाळ
श्री. श्रीकृष्ण बिबवे | श्री. राजेंद्र दरंदले | श्री. विलास गडाख | श्री. रतिलाल भळगट
सौ. आशा दरंदले | श्री. सुनिलदत्त येवले | सौ. सुजाता कुंभकर्ण

श्री. बी.ई. मराडे (व्यवस्थापक) श्री. आर.एन.सानप (व्यवस्थापक, शाखा नेवासा)
श्री. अे. आर. कानडे (व्यवस्थापक, शाखा करजगांव) सर्व कर्मचारी वृंद व दैनंदिन ठेव प्रतिनिधी

संस्थेचे आकर्षक व्याजदर

+ सेव्हींग ठेव : ४% + दैनिक ठेव : ५% + ३० ते ४६ दिवस : ९% + ४७ ते १८१ दिवस : ९.५०%
+ १८२ ते ३६५ दिवस : १०% + १३ महिने ते २४ महिने : ११% + ज्येष्ठ नागरिकांसाठी १ % वाढीव व्याजदर राहिल.
+ दामदुप्पट ठेव: ८४ महिने + रिकरींग ठेव- दरमहा १०० रू. भरल्यास ७२ महिन्यानंतर १०८८९ रू. मिळतील.

कर्जाचे व्याजदर : सर्व प्रकारच्या कर्जावरील व्याजाचा दर १५% राहिल. (तातडी, फिक्स लोन, पगारदार नोकर, हायरपरचेस कर्ज)

ठळक वैशिष्ट्ये : + संपूर्ण संगणकीकृत व्यवहार + सुरक्षागृहाची सोय + भव्य व अत्याधुनिक स्वमालकीचे कार्यालय
+ विनम्र व तत्पर सेवा + शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यात सहभाग + विविध व सुलभ कर्ज योजना

माझे दैवत : स.गा.म.कॉलेज

प्राचार्य अण्णासाहेब गरुड, (M.A.B.T.)
मु.पो.येणके

स.गा.म. कॉलेजमध्ये १३ जून १९६७ ते ९ मे १९८२ पर्यंत मी १५ वर्षे सेवा केली. या कालावधीमध्ये मी इतिहास विभागप्रमुख, जिमखाना विभागप्रमुख, एन.सी.सी. विभागप्रमुख व शिस्त समितीचा प्रमुख म्हणून नेत्रदिपक कामगिरी केली. या माझ्या विशेष कामगिरीमुळे विद्यार्थीवर्गात माझ्याबद्दल भीतीयुक्त आदर निर्माण झाला. तसेच कॉलेजमध्ये एक प्रकारची शिस्त निर्माण झाली. त्यामुळे कॉलेजचा नावलौकिक वृद्धींगत झाला. माझ्या सेवेच्या कालावधीत मला गुरूस्थानी असणारे प्राचार्य बॅ.पी.जी. पाटील, प्राचार्या सौ. सुमतिबाई पाटील व प्राचार्य मगदूम हे कॉलेजला प्राचार्य लाभले. त्यांची विद्वत्ता व स्वभाव वैशिष्ट्ये यामुळे कॉलेजच्या लौकिकात विशेष भर पडली.

माझ्या सेवेच्या काळात ११ डिसेंबर १९६७ चा भूकंप व १९७४ मधील आंध्रमधील चक्रीवादळ या मोठ्या नैसर्गिक आपत्ती घडल्या. एन्.सी.सी.छात्रांनी कोयना भूकंपग्रस्तांसाठी सर्व प्रकारची मदत केली. तसेच मोठ्या प्रमाणावर निधी व जीवनोपयोगी वस्तू गोळा करून त्यांचे मोठ्या प्रमाणावर वितरण केले. मल्लविद्येमध्ये आमचे कॉलेज विद्यापीठात अग्रेसर होते. शिवाजी विद्यापीठाचा कुस्ती संघ १९७० मध्ये मी दिल्लीस घेऊन गेलो होतो. तेथे कुस्तीगीरांनी चांगल्या प्रकारची कामगिरी केली. एन्.सी.सी. विभागात मी १३ वर्षे काम केले. कॅप्टन पदापर्यंत एन.सी.सी.मध्ये काम करून अनेक वार्षिक कँप यशस्वी केले. एन्.सी.सी. वर्धापन दिनानिमित्त शिवाजी स्टेडीयमवर अनेक प्रात्यक्षिके करून समाजातील अनेक व्यक्तींना लष्करातील उपक्रम व शस्त्रास्त्रांची माहिती दिली. सध्या कारगिल युद्धातील विजयोत्सव ज्या पद्धतीने साजरा करतात त्याची छोटेखानी प्रतिकृती आम्ही केली होती.

१९७४ च्या शिवाजी विद्यापीठ कायद्यानुसार ४ जिल्ह्यांमध्ये सिनेटच्या निवडणूका झाल्या. बॅ.पी.जी.पाटील हे कुलगुरू पदावर होते. मी सामाजिक शास्त्र या विभागातून १९७५ ते १९८१ या सहा वर्षासाठी सिनेटर म्हणून निवडून आलो. शिवाजी विद्यापीठात मी अनेक पदे भूषवली. मी पदव्युत्तर शिक्षक विधीसभा सदस्य, इतिहास अभ्यासमंडळाचा अध्यक्ष, विद्वत् सभेचा सदस्य, फॅकल्टीचा सदस्य, बी.यू.टी.आर. चा सदस्य म्हणून काम पाहिले. सर्वात मानाचे स्थान असणारे कार्यकारणीचे सदस्यत्व मी प्राचार्यांच्या मतदारसंघातून निवडणूक लढवून मिळविले. विद्यापीठ कायद्यानुसार कॉलेजमध्ये स्थानिक व्यवस्थापन समितीची स्थापना झाली. या पदावर मी बरीच वर्षे काम केले. कॉलेजमध्ये असताना आमचे पगार दोन दोन महिने होत नसत. अशावेळी आदरणीय भाई केशवराव पवार (दादा) हे कॉलेजच्या मदतीसाठी धावून येत आणि मग प्राचार्य व प्राध्यापकांना आज ऑफिसला भेट द्या असे सांगत. आम्ही कधीही पगाराबद्दल तक्रार केली नाही. रयत शिक्षण संस्था व तीर्थरूप कर्मवीर अण्णा यांना दैवत समजून कुटूंबातील घटकाप्रमाणे आम्ही वागत असू. कॉलेजची आर्थिक परिस्थिती फारशी समाधानकारक नव्हती. विद्यार्थ्यांची वाढती संख्या व अपुरे वर्ग यामुळे दरवर्षी एक हॉल बांधायचा संकल्प प्राचार्य व प्राध्यापक करीत. त्यासाठी नाटकाचे प्रयोग करून काही रक्कम गोळा केली जात असे. नाटकाची तिकिटे खपविण्याचे काम सर्व प्राध्यापक आनंदाने, जिद्दीने व नेटाने करीत. अशाप्रकारे इमारतीचे काम पूर्णत्वाकडे नेण्यात आले.

कॉलेजमधील वर्गप्रतिनीधींच्या निवडणूका व स्नेहसंमेलने म्हणजे त्या काळात हृदयाचा थरकाप उडविणारे प्रसंग ! काहीतरी अघटीत घडण्याचा संभव ! तसेच अफवांचा सुकाळ ! त्यामुळे मी व माझ्या सहकाऱ्यांनी त्यावर मात केली. काही प्रसंगी मी व माझे सहकारी कठोर बनून अतिउत्साही व दंगेखोर प्रवृत्तींना आम्ही निपटून काढले.

१९७४ साली परमपूज्य कर्मवीर अण्णा यांचा स्टँन्डवरील पुतळा बसविण्यात आला. तत्कालीन परराष्ट्रमंत्री मा. यशवंतरावजी चव्हाण यांच्या शुभहस्ते पुतळ्याचे अनावरण झाले. या कॉलेज आवारातील पुतळ्यासाठी व कोल्हापूरातील शाहू महाराजांच्या पुतळ्यासाठी मी व माझ्या सहकाऱ्यांनी एक महिन्याचा पगार दिला. अशाप्रकारे कॉलेजमध्ये असताना मी अनेक प्रकारच्या उपक्रमांमध्ये अग्रक्रमाने भाग घेतला. माझी अर्धी सर्व्हिस कॉलेजमध्ये झाल्यामुळे कॉलेजचा सर्व परीसर, तेथील माती याबद्दल माझ्या मनामध्ये नितांत आदर आहे. किंबहुना स.गा.म. कॉलेज हे माझे दैवत असून त्या परिसरामध्ये माझा आत्मा सदैव घुटमळत राहील. तेथील मातीशी माझे इमान व नाते कायमचे जडलेले आहे व राहील.

✦ ✦ ✦ ✦

WITH BEST COMPLIMENTS FROM

Divan Engineers & Consultants Pvt.Ltd.,

Cosmos Commercial Complex,
Shop No.12, 205, E,B/3,
New Shahupuri, Kolhapur - 416001
Ph : (0231) - 2660180, 2655491
Tele Fax : (0231) 2655491



With Best Compliments From
Reg.No.SAT/KRD/RSR(CR)1479/2002-03

लोकमान्य युवक नागरी सह. पतसंस्था मर्या., कराड

५३ चावडी चौक, गुरूवार पेठ, कराड जि. सातारा फोन : २२९४१३

● व्याजदर १ सप्टेंबर २००४ पासून ● आकर्षक ठेव योजना ●

सेव्हिंग्ज ठेव	४%	चालू ठेव	१%
मागणी ठेव (३० दिवस)	८ %	४६ ते ९० दिवस	८.५%
९१ ते ३६४ दिवस	९ %	१ वर्ष ते २ वर्षापर्यंत	९.५%
२ वर्ष व त्यापुढील	१० %	दामदिडपट ठेव	४ वर्ष ३ महिने
दाम दुप्पट	७ वर्ष	रिकरिंग ठेव	९.५%

☞ महिलांना मुदत ठेवीवर ०.५% जादा व्याजदर
☞ महिलांना कर्जास ०.५% व्याजदरात सुट
☞ जेष्ठ नागरिकांसाठी ०.५% जादा व्याजदर

मो. : ९८२२०७७६५१
चेअरमन: श्री. धनंजय मोरेश्वर खोत

पैशावर विश्वास ठेवण्यापेक्षा विश्वासावर पैसा ठेवा

खास वैशिष्ट्ये

☞ वर्षातील ३५९ दिवस संस्थेचे कामकाज चालू
☞ कॅश सुविधा - सकाळी ९.०० ते रात्री ९.०० वाजेपर्यंत

मागे वळून पाहतांना...

डॉ. पांडुरंग पाटील
हिंदी विभाग प्रमुख, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

श्री संत गाडगे महाराज व कर्मवीर भाऊराव पाटील या थोर महात्म्यांच्या पावन स्पर्शाने पुनीत झालेल्या कृष्णा कोयनेच्या प्रीति संगमावर स्थापन झालेले कराड नगरीतील पहिले महाविद्यालय असा लौकिक असलेल्या सद्गुरू गाडगे महाराज कॉलेजमध्ये १५ जून, १९७० पासून माझ्या प्राध्यापकीचा प्रारंभ झाला. आज जवळ-जवळ ३४-३५ वर्षांनी महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात मागे वळून पहाता ''इवलेसे रोप लाविले दारी त्याचा वेलू गेला गगनावरी ।'' आंग्ल विद्या विभूषित प्राचार्य बॅ.पी.जी.पाटील आणि श्रीमती सुमतिबाई पाटील यांच्या कुशल व प्रेरक मार्गदर्शनाखाली एस.जी.एम.कॉलेज दिवसेंदिवस विस्तारत होते. महाविद्यालयाला भव्य प्रांगण, विस्तृत क्रीडांगण, कला व वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांची मांदियाळी, जुन्या शेडमध्ये शास्त्र शाखेच्या प्रयोगशाळा, आपले अस्तित्व टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करतांना धडपडणारे आणि दिवसेंदिवस रोडावणाऱ्या विद्यार्थी संख्येमुळे चिंताक्रांत झालेले शास्त्र शाखेचे प्राध्यापक. एकीकडे कला व वाणिज्य शाखेमध्ये २००-२५० विद्यार्थ्यांच्या दिवसें-दिवस वाढणाऱ्या तुकड्या आणि दुसरीकडे रोडावणारी शास्त्र शाखा. सर्वांनी निर्णय घेण्याचा क्षण आला होता. आदरणीय प्राचार्य सुमतिबाई यांच्या कणखर, खंबीर, कुशल आणि दूरदृष्टीच्या नेतृत्वामुळे आजच्या स.गा.म. कॉलेजच्या शास्त्र शाखेच्या आदर्श प्रयोगशाळा उभारण्याचा संकल्प केला गेला आणि सहकाऱ्यांच्या एक महिन्याच्या पगाराच्या उदार देणगीतून आणि ना. आनंदराव चव्हाण, प्रेमलाकाकी यांच्या सहकार्याने आज वास्तवात उतरलेला दिसतो आहे.

नॅक च्या आगमनामुळे आणि प्राचार्य अरूण बर्गे यांच्या कर्तृत्वाने, कुशल नेतृत्वाच्या आणि धाडसी निर्णय घेण्याच्या झपाट्यामुळे आज कॉलेजचे सर्वांग परिवर्तन झालेले दिसते. प्रश्न पडतो ३५ वर्षांपूर्वीचे एस.जी.एम. ते हेच का ? आज सर्वार्थाने सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज सुंदर, डौलदार रूबाबामध्ये आपल्या अंतर्बाह्य परिवर्तनाने एका स्वतंत्र 'स्वायत्त' महाविद्यालयाच्या थाटात उभे असलेले दिसत आहे.

३५ वर्षापूर्वी नव्याने नेमणुका झालेल्या आम्हा रयतेच्या विद्यार्थ्यांची प्राध्यापक म्हणून कारकिर्द सुरू झाली. कृष्णा-कोयनेच्या खोऱ्यातील बहुजन समाजातील शिक्षण घेण्याच्या तळमळीने व जिद्दीने अनेक अडचणींवर मात करीत महाविद्यालयात प्रवेश घेणारे रांगडे, शरीराने धिप्पाड परंतु मनाने प्रांजळ, गुणी विद्यार्थी पाहून आम्हा नवीन प्राध्यापकांना भीती वाटू नये म्हणून आमचे आदरणीय प्राचार्य बॅ.पी.जी.पाटील यांनी 'संपूर्ण तयारीनिशी वर्गात जा, कोणत्याही कोपऱ्यातून प्रश्न विचारला तरी उत्तर द्यावयाची तयारी ठेवा' असा कानमंत्र दिला होता. पाठीवर थाप मारून दिलेले प्रोत्साहन आजही आठवते. मन भारावून जाते त्याकाळच्या महान प्राचार्यांच्या आठवणींनी, बॅ.पी.जी.पाटील, श्रीमती सुमतिबाई पाटील, आ.भा.मगदूम, प्राचार्य अप्पासाहेब पानवळ यांच्यासारखे दिग्गज प्राचार्य या महाविद्यालयाला लाभले, आम्हाला अनेक गोष्टी शिकता आल्या. साधी राहणी व पडेल ते काम करण्याची, कोणत्याही वर्गाचा कोणताही पेपर शिकविण्याची तयारी केल्यामुळेच सन्मानाने, आपुलकीच्या व स्नेहाच्या नात्याने विद्यार्थ्यांमध्ये एस.जी.एम.चे प्राध्यापक ओळखले जातात. जीवनामध्ये जे कांही मिळविले त्याची शिकवण या महाविद्यालयाच्या वातावरणामुळे मिळाली, हे आम्ही विसरू शकत नाही.

त्यावेळी सरकारी अनुदान ४-६ महिन्यांनी मिळावयाचे, आजच्या तुलनेत पगार कमी असले तरीही समाधान देणारे होते. विद्यार्थी व प्राध्यापकांमध्ये सहकार्याचे वातावरण होते. २-३ महिने पगार झाले नाहीत तर प्राचार्य बॅ.पी.जी.पाटील सर नेहमी स्टाफरूममध्ये येवून चर्चा करून वातावरण तणावमुक्त करीत असत आणि अनुदान मिळाले की ताबडतोबीने सर्वांना उचल देण्याची व्यवस्था करीत असत. सहकारी मित्रांचा एकमेकाला मदतीचा हात असे. प्रा.एन.डी.पाटील, प्रा. अशोक महादार, प्रा. अरूण बर्गे, प्रा. किसनराव मोहिते, प्रा. डॉ. क्रांतिकुमार पाटील, प्रा. तानाजीराव जाधव, प्रा. मोरबाळे, प्रा.जी.वाय.पाटील (दादा), प्रा. माळवे, प्रा. अण्णासाहेब गरूड, प्रा.एम.एम.कदम,

प्रा. वावडे, प्रा. (कै.) प्रकाश माने इत्यादी सहकाऱ्यांचा आपल्या कार्यकर्तृत्वामुळे व सहकार्यामुळे एक वेगळा प्रभाव निर्माण झाला होता. यांच्याकडे कोणतेही काम पूर्ण करण्याची धमक असणारी 'मधली फळी' म्हणून पहात असत. काळाने ही त्यांच्या कर्तृत्वाची साक्ष दिलेली दिसते आहे. या सर्वांच्या सहकार्यामुळे कोणत्याही प्रसंगी पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याच्या एकजुटीमुळे प्राचार्यांनी दिलेले कोणतेही काम आम्ही यशस्वीपणे करून दाखवित असू. यामध्ये शिकविणे, वर्गातील शिस्त, परीक्षेचे सुपरवायझर म्हणून निर्माण झालेला दबदबा, सायंकाळी ६ ते १ वाजेपर्यंत मोकळ्या मैदानात सर्वांसाठी खुलेपणाने होणारे स्नेहसंमेलन, कोणत्याही प्रकारचा गोंधळ होवू न देता गर्दीवर नियंत्रण ठेवण्यात आम्ही यशस्वी होत असू. कितीतरी कठीण प्रसंग आम्ही सहजपणे झेलले. एस.जी.एम. चे स्नेहसम्मेलन हा सर्वत्र कौतुकाचा विषय झाला होता. बाहेरच्या महाविद्यालयातील प्राध्यापक आम्हाला विचारत असत की तुम्ही एवढे मोठे स्नेहसम्मेलन शांततेत कसे करू शकता? आम्ही सर्वजण एकजुटीने फक्त फौजी होतो, आमचे कमांडर होते प्रा. गरूड आणि प्रा. अरूण बर्गे.

कराडच्या आसपास पाटण, तारळे, ढेबेवाडी, कार्वे, वडगांव, विटा, कडेपूर इत्यादी खोऱ्यातून येवून शिकणारे विद्यार्थी आज कोठेही भेटले तरी आपल्या खुर्चीतून बाहेर येवून आदराने 'सर' म्हणून संबोधतात. तेव्हा कर्मवीर अण्णांच्या संस्थेत शिकून, संस्थेमध्येच इमाने-इतबारे केलेली सेवा शिक्षण महर्षी कर्मवीरांच्या चरणी रूजू झाली याचे समाधान वाटते.

ज्ञानाचे आणि संस्कारांचे दीप प्रज्ज्वलीत करणारे सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालय आज के.जी.ते.पी.जी. पर्यंतचे कला, विज्ञान व वाणिज्य शाखेने विविध प्रकारच्या कोर्सेसनी बहरलेले आहे. आज सर्वत्र जागतिकीकरणाची चर्चा होत आहे. आय.टी.चा बोलबाला आहे. परदेशी विद्यापीठे येवू घातली आहेत. या परिस्थितीमध्ये सर्व प्राध्यापकांनी काळ आणि वेळेचे भान ठेवून स्वत:ला स्पर्धेसाठी पात्र बनविले पाहिजे. कर्मवीर अण्णांनी गरीब पण स्वाभिमानी विद्यार्थ्यांना, बहुजन समाजाला भगीरथ प्रयत्नाने दिलेली ज्ञानाची गंगोत्री खाजगीकरणाच्या जोखडांनी मर्यादित होवू नये म्हणून स्वत:ला अत्याधुनिक ज्ञानाने सक्षम बनवून , कर्मवीरांची आठवण उरी जपून ठेवून काळाबरोबर चालण्याची उत्तम तयारी ठेवावी. तसेच हे महाविद्यालय भविष्यात आपली ख्याती व कीर्ती वाढवत समाज सेवेचे कंकण बांधलेले व आपल्या नावाला सार्थक करणारे स्वतंत्र विद्यापीठ बनावे हीच मन:पूर्वक सदिच्छा.

हार्दिक शुभेच्छा ! हार्दिक शुभेच्छा !

ममता हॉस्पीटल

मॅटर्निटी होम, सर्जिकल होम
अल्ट्रा सोनोग्राफि, पॅथोलॉजीकल
लॅबोरेटरी, एक्स्-रे क्लिनिक

मायणी रोड, विटा. जि. सांगली फोन : २७२१४०

डॉ. विलास म. साळुंखे
एम.बी.बी.एस.

डॉ. सौ. शालिनी वि. साळुंखे
एम.बी.बी.एस्.,डी.जी.ओ.(बॉम्बे)

ACC सुरक्षा

रविंद्र गुजर
९८९०००४५६६

एसीसी सुरक्षा

मे. रविंद्र सप्लायर्स

❖ ए.सी.सी. सुरक्षा सिमेंटचे अधिकृत विक्रेते
❖ मोर छाप सनला (मनमाड) उपलब्ध

२८, भवानी पेठ, सातारा : ४१५००२

स्मृतींची चालता पाने

आजी, माजी विद्यार्थी आणि हितचिंतकांची मनोगते

१९५४ सालच्या विद्यार्थ्यांच्या संस्मरणीय आठवणी

१९५४ साली स.गा.म. कॉलेजची स्थापना झाली म्हणूनच.... तो क्षण... आयुष्यालाच वेगळे वळण लावणारा...सुवर्णसंधी देणारा ठरला. असा सार्थ अभिमान महाविद्यालयाच्या स्थापनेच्या पहिल्या बॅचच्या विद्यार्थ्यांनी सुवर्णमहोत्सवानिमित्त मनोगतातून व्यक्त केला आहे. त्यातील निवडक आठवणी.

श्री. रघुनाथ शंकर सुभेदार

निवृत्त प्राचार्य, सातारा.

५० वर्षापूर्वीचा या महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या 'मी' ला 'मी' ने नजरेसमोर आणले तर माझा मीच माझ्यावर विश्वास ठेवायला तयार होत नाही. जीवनाचा यशस्वी मार्ग आक्रमण्यासाठी जे पायाभूत तत्व 'कमवा व शिका' याचे बाळकडू स.गा.म. मध्येच मिळाले. खडी फोडणे, खड्डे खणणे, रेशमी काटे काढणे इ. कामे उत्साहाने केली. वज्रापेक्षाही कठोर व फुलापेक्षाही कोमल हृदय असलेली कर्मवीरांची मूर्ती पाहिली व सदूपदेश ऐकला, तो आचरणात आणला.

१९५५ सालची गोष्ट. कर्मवीर व सद्गुरू गाडगे महाराज इ. विभूती 'कमवा व शिका' योजनेचे प्रात्यक्षिक पहायला येणार होते. दुपारी तीन वाजता सावकाश पावले टाकीत, सर्व परिसराकडे सुक्ष्मपणे पहात अमृतवचनांची बरसात करीत या मान्यवरांनी प्रवेश केला. 'हॉल' सजवलेला होता. पण...तिकडे लक्षही न देता गाडगे महाराज बाभळीच्या झाडाजवळ गेले व सफाई करू लागले. सर्वजण स्तब्ध झाले. 'प्रथम दोन इमारतीमधील रेशमी काटे दूर करा' हा आदेश ऐकला. 'माझे नाव कॉलेजला देण्याऐवजी देणगीदारांचे नाव द्या' हे ऐकून सर्वांची मती कुंठीत झाली. मा. सणस आदि मान्यवरांनी विनंती केल्यावर ते गप्प बसले व १०० रू.ची नोट देऊन ती गरजू विद्यार्थ्यांना द्या असे सांगितले.

जन्म देणारा, सांभाळणारा पालक वर्ग, प्राचार्य कणबरकर व गुरूवर्य यांचा अमोल उपदेश, समाजऋण, देवऋण यांची परतफेड करणे अशक्यच ! असंख्य प्रसंगाची गर्दी होते, एकत्र कुटुंबासारखी असणारी महाविद्यालयाची आश्रमव्यवस्था, औपचारिकतेचा अभाव. परवानगी शिवाय भेटू नये असा दंडक लेखी स्वरूपात नव्हता. या महाविद्यालयातील ते क्षण माझ्या आयुष्याला सुवर्णसंधी देणारेच ठरले.

श्री. श्रीकांत गोपाळ खिरे

सातारा.

१९५४ सालचे हे कॉलेज नव्हते तर ते गुरूकुलच होते. या गुरूकुलातील वातावरण, आदर, प्रेम यामुळे मनावर सुसंस्कार झाले. त्या ऋणातून मुक्त होता येणारच नाही. माळरानावर तीन-चार खोल्यांचे दगडी बांधकामाचे कौलारू घर, छोट्या खोलीत ऑफीस, प्राचार्यांचे कार्यालय व जवळच वर्ग, प्रथम दर्शनी हे कसंतरीच वाटायचं. पण वर्ग सुरू झाले. प्राचार्य कणबरकर हे उत्तम प्रशासक, शिस्तीचे भोक्ते पण तेवढेच प्रेमळ, प्रा. पंडीत, काळे, देशपांडे यांच्या सारखे मन लावून शिकविणारे अध्यापक म्हणजे दुधात साखरच! हळूहळू वातावरण फुलू लागले व आम्ही एकमेकांचे सगेसोयरे झालो. प्राचार्य सायकलवरून कृष्णा कॅनॉल ते कॉलेजला यायचे. मध्ये शेती होती. त्यामुळे आम्हाला त्यांची त्यावेळी साहेबी टोपीच दिसायची. लगेच आम्ही गुपचूप वर्गात बसायचो.

'देवकी नंदन गोपाळा' हा महामंत्र देणाऱ्या गाडगे बाबांना प्रत्यक्ष पाहण्याचे भाग्य लाभले ते इथेच!

श्री. दादू लक्ष्मण जगताप

मसूर

आज सुवर्णमहोत्सवी वर्षाचा सुवर्णकलश दिसतो आहे, पण ज्या पायाच्या दगडावर हा कलश उभारला त्याकडे लक्ष जात नाही. मी भाग्यवान आहे कारण या पायाचा दगड आहे. ओसाड माळरानावरील कौलारू खोल्या, कर्मवीर अण्णा यांची 'श्रमप्रतिष्ठा', गाडगे महाराजांचे 'तत्वज्ञान' यामुळे भारावून गेलो होतो. 'कमवा व शिका' योजनेत खडी फोडताना प्राचार्यांचे

गेलेले लक्ष, त्यांनी डोळ्यावरील चष्मा पाहून प्रेमळपणे ग्रंथालयाचे दिलेले काम, हस्तलिखीत संपादनाचे केलेले काम, माधवराव बागल यांनी केलेले त्याचे प्रकाशन, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, द.वा.पोतदार या मान्यवरांचे संदेश या विविध आठवणींचा चलत-चित्रपटच नजरेसमोर उभा राहतो. या महाविद्यालयाच्या पहिल्या बॅचचे आपण भाग्यवान विद्यार्थी आहोत याचा सार्थ अभिमान वाटतो.

श्री.भालचंद्र दत्तात्रय कुमठेकर
कराड.

१९५४ ते १९५६ अखेर कॉलेजमध्ये शिक्षक नेमले. या कॉलेजचा विद्यार्थी होतो याचा अभिमान आहे. 'कमवा व शिका' योजनेमुळेच कोणतेही काम करण्यास लाज वाटली नाही. मोठे दगड फोडून खडी फोडण्याचे काम केले. स्वावलंबनाचा धडा कधीही विसरू शकत नाही.

श्री. दत्तात्रय यशवंत विदार

१९५४ साली महाविद्यालयात प्रवेश केला त्यावेळी एक हॉल, मोठा वर्ग, छोटे ऑफीस व ग्रंथालय ही अवस्था होती. प्राचार्य कणबरकर, प्रा. चित्रे, प्रा. पंडीत, प्रा. चौगुले व प्रा. जोशी यांच्या सहवासात व घरगुती वातावरणामुळे थोड्याच दिवसात रममाण झालो. प्राचार्य कणबरकर यांनी इंग्रजी विषय एवढा सोपा केला की त्याबद्दल त्यांना कितीही मार्कस् दिले तरी कमी पडतील. एक वेळी तासाला एका विद्यार्थ्याने वही, पेन काहीच आणले नव्हते तेव्हा कणबरकर सरांनी त्याला उभे केले आणि 'देवळात जाताना बोडक्या बायका कापूस तरी घेऊन जातात ?' या बोचऱ्या मान्याने कोणीही कधीही गाफीलपणा केला नाही.

श्री. सदाशिव दत्तात्रय पेंढारकर
कराड.

१९५४ साल कराडच्या इतिहासात एस.एस.सी. परीक्षेचे केंद्र व स.गा.म.कॉलेजची स्थापना! या दोन गोष्टींनी संस्मरणीय ठरले. या गोष्टी झाल्याच नसत्या तर...मी फक्त मॅट्रीकच राहिलो असतो.

पांढरा हाफशर्ट व पायजमा या वेषात महाविद्यालयात प्रवेश केला. तेव्हा सुटाबुटातले प्राध्यापक प्रथमच पाहिले. प्रा. कणबरकर सरांचे इंग्रजी अध्यापन व व्यवस्थापन व प्रा. पंडीत यांचे मराठी व संस्कृत अद्यापही आठवते. वर्गात ५० मुले व २ मुली होत्या. सौ. भाटवडेकर शारिरीक शिक्षणाचा तास घेत. एका जुन्या कारखान्याच्या जागेत कॉलेज भरत होते. खिशात दोन आणे (बारा पैसे) असले तरी चहा चिवडा मिळत असे. मी माझे भाग्य समजतो की कर्मवीर , गाडगे महाराज व डॉ. धनंजयराव गाडगीळ यांना याच कॉलेजमध्ये जवळून पाहिले. एकच वर्षाचा सहवास पण त्यामुळेच मला दरवर्षी ३०० रू. ची फ्रीशिप मिळाली व विद्येच्या माहेरघरी मी स्पर्धेत टिकून राहू शकलो. संपन्न जीवनाचा पाया याच कॉलेजने घातला हे मी अभिमानाने नमूद करतो.

श्री. प्रभाकर शामराव वाचासुंदर

१९५४ साली शालान्त परीक्षा पास झालो पण पुढे अंधारच होता. पण या अंधाराचे प्रकाशात रूपांतर केले कर्मवीर अण्णांनी ! प्रचंड पटांगण व जुन्या कारखान्याची मशिनरी काढून मोकळ्या केलेल्या हॉलमध्ये पार्टीशन घालून केलेली खोली हाच आमचा वर्ग. त्याला लागून ऑफिस व छोटी स्टाफरूम. वसतिगृह होते एका पडक्या कौलारू इमारतीत. खेड्यातील विद्यार्थ्यांनी 'कमवा व शिका' या अटीवरच प्रवेश घेतलेला. १० जुलै १९५४ साली मी धनंजयराव गाडगीळ यांच्या शुभहस्ते कॉलेजचा शुभारंभ झाला.

इमारत कसलीही असो पण शिक्षण दर्जेदार मिळाले पाहिजे हे कर्मवीरांचे ध्येय होते. प्राचार्य कणबरकर इंग्रजी विषय अत्यंत तळमळीने सोप्या व साध्या भाषेत शिकवीत. वेल (Well) हा शब्द त्यांच्या व्याख्यानात वारंवार यायचा. एका तासाला तर तो शब्द ३२५ वेळा उच्चारला होता. मराठी व संस्कृत हे दोन विषय प्रा. पंडीत शिकवीत. त्यांनी शिकवलेली ''दौलत'' ही कादंबरी आजही आठवते. संस्कृत हा विषय ते आम्हाला इंग्रजीत शिकवीत.

प्राचार्य म्हणून पुढे बी.ए. चौगुले आले. ते स्वभावाने मृदू व प्रेमळ होते. फॉर्मची फी भरण्यासाठी ४५ रू. नव्हते पण हे पैसे स्वतः प्राचार्यांनी भरले. म्हणूनच परीक्षेला बसू शकलो. हे पैसे मी परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर परत केले.

प्राचार्य कणबरकर हे उत्तम टेनिसपटू होते. सर्व खेळाचे सेक्रेटरी हे लोकशाही मार्गाने निवडले होते. सर्व खेळांची ग्राऊंडस् विद्यार्थ्यांनी श्रमदानाने तयार केली. कष्टामुळे भूक लागे तेव्हा वसतिगृहाच्या मेसवर जाऊन तेल, तिखट व भाकरी खात असू. वार्षिक क्रीडा स्पर्धा होत. गॅदरींग होई. या समारंभाना महामहोपाध्याय द.वा. पोतदार, 'पांढरे केस हिरवी मने' चे लेखक वि.द.घाटे यांनी मौलिक संदेश दिला होता.

श्री. नारायण ज्ञा. शिंदे

कराड.

वडीलांचा आधार, साथीच्या आजारामुळे संपल्याने निराश्रीत अवस्थेत जीवनाच्या प्रवासास सुरूवात झाली. आईचे पराकोटीचे कष्ट व शिकविण्याचा निर्धार. आईच्या माहेरची माया, मावशीचा आधार, कराडचे सामाजिक कार्यकर्ते बजरंग पाटील (बापू) व कै. यशवंतराव चव्हाण यांचे पुत्रवत प्रेम आणि प्राचार्य कणबरकर यांच्या मौलिक मार्गदर्शनामुळेच शिक्षण सुलभ झाले व उच्च पदांचा मान सन्मान मिळाला.

महाविद्यालयात प्रवेश घेतला तेव्हा कॉलेजचे ओसाड माळरान, काट्याकुट्यांचे रस्ते, बंद पडलेल्या कारखान्याची इमारत, पडलेल्या भींती यामुळे 'मठ' म्हणूनच ओळखला जायचा. या मठातील पहिल्या बॅचचा विद्यार्थी म्हणून मला अभिमान वाटतो. प्राचार्य कणबरकर यांचा घणाघाती, खडा आवाज, प्रा. चित्रे यांचे हसत खेळत गणित शिकविणे, हास्याचे तरंग निर्माण करणारे प्रा. पंडीत यांच्या स्मृती मनात तरळतात.

कराडच्या विद्यार्थ्यांच्या आग्रहाने जनरल सेक्रेटरी पदाची निवडणूक लढविली. पण ग्रामीण-शहरी वाद, फाटाफूट व चहापान यामुळे पराभूत झालो. या अनुभवामुळे आयुष्यात संधी येवूनही निवडणुकीस उभा राहिलो नाही. पण महाविद्यालयाच्या शिदोरीमुळेच अनेक मान-सन्मान मिळाले. यशवंतराव चव्हाण, डॉ. एरम, दादासाहेब उंडाळकर, बाबूरावजी गोखले यांचा सहवास लाभला. १९५४ साली विद्यार्थी संख्येसाठी धावपळ करणारे प्राचार्य कणबरकर व ५० वर्षाच्या काळात या ओसाड माळरानाचे 'नंदनवनात' रूपांतर करणारे अनेक प्राचार्य आणि पाच हजार विद्यार्थ्यांचे कॉलेज समर्थपणे चालविणारे, वैभवशाली कीर्ती संपादणारे प्राचार्य अरूण बर्गे हे या ज्ञानमंदीराचे कळस होत. माजी विद्यार्थी संघाचा विश्वस्त म्हणून या महाविद्यालयात प्रवेश करताना स्वाभिमानाने उर भरून येतो.

श्री. नारायण माधव आचार्य

१९५४ मध्ये कराड येथे कर्मवीर अण्णांच्या अथक प्रयत्नाने स.गा.म. कॉलेज चालू झाले. त्याच वर्षाच्या पहिल्या बॅचचा विद्यार्थी होण्याचे भाग्य मला लाभले. प्रथम वर्षाचे आम्ही विद्यार्थी होतो चौपन्न. त्यात मुली फक्त दोन. अत्यंत साध्या कौलारू इमारतीत सुरवातीला कॉलेजचे कामकाज सुरू झाले. या महाविद्यालयाचा मी दोनच वर्षे विद्यार्थी होतो पण या कालावधीत आम्हा विद्यार्थ्यांना अनेक गोष्टींचे धडे मिळाले. त्यातील अनेक आठवणी आज मनात गर्दी करून आहेत.

आम्हाला शिकवणारे सर्व प्राध्यापक, मा. प्राचार्य कणबरकरांपासून ते प्रा. पंडीत, प्रा. चित्रे, प्रा. काळे, प्रा. देशपांडे सर्वजण आम्हाला अत्यंत तळमळीने शिकवत. प्रत्येक विद्यार्थ्याला नावानिशी ओळखत. या सर्वांनी आम्हाला विविध विषयांचे संदर्भ ग्रंथ वाचनासाठी प्रवृत्त केले. त्यामुळे भावी जीवनात तर्कसंगत व सखोल अभ्यास करण्याची आम्हाला सवय जडली. पुढे प्राध्यापक सेवेत ती सवय मला लाखमोलाची ठरली. आपले ध्येय साध्य करण्यासाठी लागणारी अखंड साधना, पारदर्शकता, प्रामाणिकपणा, सामुहिक प्रयत्नांची गरज, निस्पृहता, निःपक्षपातीपणा यासारख्या सद्गुणांची शिदोरी 'सद्गुरू'तील सर्वच गुरूजनांनी आम्हाला पुरेपूर दिली. महाविद्यालयातील माझी दोन वर्षे माझ्या जीवनातील 'सुवर्णक्षण' आहेत.

अशोकराव किसनराव थोरात

M.Com.,D.C.A.
सदस्य - जिल्हा परिषद, सातारा
सदस्य - अर्थ समिती जिल्हा परिषद, सातारा.
विशेष कार्यकारी अधिकारी

पत्ता : मु.पो.मलकापूर, ता.कराड,जि.सातारा. फोन : २४१०५८.
जन्मतारीख : ३ मार्च १९४९.
प्राथमिक शिक्षणः इ.४थी पर्यंत जि.प.शाळा, जखिणवाडी- इ. ७ वी पर्यंत जि.प.शाळा, नांदलापूर.
माध्यमिक शिक्षण : यशवंत हायस्कूल, कराड.
महाविद्यालयीन शिक्षण : सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, विद्यानगर,कराड सन १९६५ ते १९६९
पदव्युत्तर शिक्षण : M.Com किसनवीर महाविद्यालय, वाई सन १९७१-७२.
व्यवसाय प्रशिक्षण : ऑडीट डिप्लोमा, नॅशनल को-ऑपरेटिव्ह ट्रेनिंग कॉलेज, पुणे १९७४-७५
नोकरी : कृष्णा सहकारी साखर कारखाना लि., शिवनगर, ऑडीट असिस्टंट १९७५ ते १९८१. कराड तालुका खरेदी-विक्री संघ, कराड, मॅनेजिंग डायरेक्टर १९८२ ते १९८७.

परदेशी अभ्यास दौरा :
(अ) दक्षिण पूर्व आशिया १९८४ - १५ दिवस.
विषय - सहकारी संस्था.

(ब) युरोप, इंग्लंड, फ्रान्स, सिंझ, जर्मनी, हॉलंड, डेन्मार्क, विषय-खत निर्मिती व दुग्ध व्यवसाय.

सामाजिक कार्य :

१. शेतकरी संघटनेच्या माध्यमातून शेतीमाल व शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सामाजिक कार्य.

- शिक्षण संस्था - श्री मळाईदेवी शिक्षण संस्था. नांदलापूर, जखिणवाडी, मलकापूर
  स्थापना दिनांक - १८/६/१९७३.
- शाखा- ना. आनंदराव चव्हाण विद्यालय, मलकापूर, स्थापना - जून १९८१.
- ना. आनंदराव चव्हाण विद्यालय, पोतले. स्थापना - जून १९८३.
- श्रीमती प्रेमलाताई चव्हाण कन्याशाळा, मलकापूर. स्थापना - जून १९८४.
- आदर्श प्राथमिक विद्यालय,मलकापूर. स्थापना-जून १९९३.
- आदर्श शिशु विहार, मलकापूर. स्थापना- जून १९९३.
- न्यू इंग्लिश स्कूल, कासारशिरंबे. स्थापना - जून १९९८.
- उच्च माध्यमिक विभाग, कला-वाणिज्य-शास्त्र. स्थापना- जून २०००.
- स्टार इंग्लिश मेडियम स्कूल, मलकापूर. स्थापना- जून २००१.
- आदर्श प्राथमिक विद्यालय, आगाशिवनगर. स्थापना - जून २००३
- आदर्श शिशु विहार, आगाशिवनगर. स्थापना जून २००३.
  श्री मळाईदेवी नागरी सहकारी पतसंस्था मर्या.
- **शाखा :** जखिणवाडी, थोरात मळा, मलकापूर, शास्त्रीनगर, आगाशिवनगर, कासारशिरंबे, कराड, वडोली-निळेश्वर, वसंतगड, मलकापूर, मार्केट यार्ड, कोडोली, विद्यानगर कराड, भाग भांडवल ५० लाख
- ग्रामपंचायत, मलकापूर - उपसरपंच १९९५ ते २०००
- पंचायत समिती सदस्य - १९९७ ते २००२.
- जिल्हा परिषद सदस्य - २००२ पासून

इतर संस्था - १. आदर्श क्रीडा संस्था, कराड २. समाज प्रबोधन वाचनालय, मलकापूर ३. विज्ञान प्रबोधिनी, कराड ४. जमना सह.ग्राहक संस्था, मलकापूर ५. संजिवनी सह.दुध उत्पादक संस्था, मलकापूर ६. जिव्हाळा महिला सह.ग्रामीण बिगर शेती पतसंस्था, मलकापूर ७. कराड तालुका हौशी व मैदानी क्रीडा संघटना, कराड. ८. विशेष कार्यकारी अधिकारी.

मी सद्गुरू गाडगे महाराज कॉलेजचा माजी विद्यार्थी असल्याचा मला आनंद व अभिमान वाटतो. कर्मवीर भाऊराव पाटलांनी स्थापन केलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालयात शिकताना अतिशय चांगले संस्कार झाले. बॅरिस्टर पी.जी.पाटील व श्रीमती सुमतिबाई पाटील यांचे प्रशासनात विद्यार्थी म्हणून वावरताना फारच आनंद मिळाला. माजी विद्यार्थी म्हणून वरचेवर महाविद्यालयात येणे-जाणे असते. महाविद्यालयाची गुणात्मक वाढ सर्वजण करत आहेत. प्राचार्य अरूण बर्गे सर व उपप्राचार्य श्री. शिवाजी जाधव सर आणि त्यांचे सर्व सहकारी यांनी महाविद्यालय अतिशय उत्तम प्रकारे चालविले आहे.

उर्वरित जीवनामध्ये संस्थेची व महाविद्यालयाची सेवा निरपेक्षपणे माझेकडून व माझे कुटुंबाकडून घडावी हीच प्रार्थना !

माझ्या महाविद्यालयास माझ्या मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा !

ॲड रविंद्र पवार

सदस्य,स्थानिक व्यवस्थापन समिती, स.गा.म.कॉलेज, कराड.

चेअरमन,स्थानिक व्यवस्थापन समिती यशवंत हायस्कूल, कराड व के.प.इंग्लिश मिडीयम स्कूल, कराड

पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील उर्फ अण्णा यांनी अनेक नि:स्वार्थी, कणखर, स्वाभिमानी, तत्त्वनिष्ठ विद्यार्थी घडवले, त्यापैकी कै.आमदार भाई केशवराव पवार उर्फ दादा हे एक होते.

दि. १३ मार्च १९१७ रोजी पाटण तालुक्यातील बहुले गावात गरीब शेतकरी कुटूंबात त्यांचा जन्म झाला. वयाच्या बाराव्या वर्षी आई वडीलांच्या प्रेमास ते पारखे झाले. मराठी ७ वी पर्यंत बहुले येथे त्यांनी शिक्षण घेतले. त्यावेळेस ती.अण्णांचे सेक्रेटरी म्हणून कै.बा.म.ठोकेसाहेब हे होते. अण्णांना जेव्हा समजले बहुले गावातील एका तरुणावर ही आपत्ती आली आहे, तेव्हा त्यांनी ठोकेसाहेब यांना सांगितले, ''त्याला पत्र पाठव व बोलावून घे.'' त्याप्रमाणे दादा हे सातारा येथे गेले तेव्हा अण्णांनी दादा यांना प्रेमाची पाखर दिली व म्हणाले तू माझ्या धनिणीच्या बागेत बोर्डींगमध्ये रहा व शिक्षण घे. धनिणीच्या बागेत तेव्हा दादांच्या प्रमाणेच अन्य जाती धर्माची अनेक मुले रहात होती. त्यात दादा जाऊन मिसळले व रयत संकुलात तेव्हापासून एकरुप व समरस झाले.

सातारा येथे अण्णांनी दादांना न्यू इंग्लिश स्कूलमध्ये घातले व दादांचे शिक्षण सुरु झाले. या वयात अण्णांनी दादांना घडवले. त्यांच्यावर अनेक संस्कार केले व त्यांना स्वाभिमानी बनवले. जीवनात यशस्वी होण्याचे तत्त्वज्ञान अण्णांनी दादांना शिकविले. त्यामुळे दादा हे अण्णा हेच दैवत समजून आयुष्यभर नतमस्तक

राहिले. दादांच्या जीवनात अनेक बरेवाईट प्रसंग आले, अनंत अडचणी आल्या परंतु त्यांनी कधी देवापुढे उभे राहून त्यास नमस्कार केला नाही, परंतु अण्णांच्या पुढे नतमस्तक राहीले, यातूनच गुरुबद्दलची दादांची निष्ठा व प्रेम दिसून येते.

अण्णांनी पुढे दादांना कोल्हापूर येथे शिक्षणासाठी पाठवले व तेथून पुणे येथे इंडीयन लॉ सोसायटीच्या लॉ कॉलेजमध्ये एल.एल.बी.चा कोर्स पूर्ण करण्याकरीता पाठवले व तेथून ते एल.एल.बी. झाले. दादांचे संपूर्ण शिक्षण अण्णांनी पूर्ण केले. दादांचे आईवडीलांनी दादांना फक्त जन्म दिला, परंतु खरे वाढवले ते अण्णांनी. धन्य ते गुरु !

१९४२ ची चळवळ सुरु असताना महात्मा गांधींनी ''आपल्या तालुक्याच्या कचेरीवर तिरंगा झेंडा फडकवा'' असे आदेश दिले तेव्हा दादांनी त्यांच्या सहकाऱ्यांसमवेत पाटणच्या मामलेदार कचेरीवर तिरंगा झेंडा दि. २४/३/१९४२ रोजी फडकवला. तेव्हा त्यांच्यावर इंग्रज सरकारने पकड वॉरंट काढले. यावर ते कोकीसरे व म्हावशीच्या जंगलात फरारी झाले. तेव्हा इंग्रजांच्या खबऱ्यांनी दादा म्हावशीच्या जंगलात असल्याची बातमी दिली तेव्हा त्यांना तेथे अटक झाली व तेथून सातारा, येरवडा, ठाणे, हिंडलगा जेल येथे त्यांची रवानगी झाली. अडीच वर्षे दादा देशाला स्वातंत्र्य मिळावे याकरीता तुरुंगात होते.

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर तर महात्मा गांधींनी काँग्रेस बरखास्त करा अस सल्ला दिला. तसेच त्यावेळचे काँग्रेसचे सरकार हे श्रमजीवी व कष्टकरी जनतेच्या हिताचे धोरण आखीत नव्हते म्हणून कै.केशवराव जेधे, शंकरराव मोरे, तुळशीदास जाधव, र.के.खाडीलकर, भाऊसाहेब राऊत ही दिग्गज मंडळी काँग्रेसमधून बाहेर पडली. तेव्हा दादाही त्यांचेबरोबर बाहेर पडले व सर्वांनी ३ जानेवारी १९४८ रोजी शे.का.पक्षाची स्थापना केली. तेव्हा दादा हे शे.का.पक्षाच्या संस्थापकांपैकी एक होते. दादांनी शे.का.पक्षाच्या विचाराचा जो झेंडा खांद्यावर घेतला होता तो मरेपर्यंत कधी खाली ठेवला नाही. म्हणूनच दादांना तत्त्वनिष्ठ, एकनिष्ठ म्हणून लोक ओळखतात. अनेक प्रलोभने, आमिषे दाखवली तरी त्यांनी पक्ष व पक्षाचा विचार सोडला नाही. हे दादा करु शकले व त्याप्रमाणे वागू शकले ते अण्णांनी केलेल्या संस्कारांमुळेच.

तद्नंतर दादांनी कराडला वकिलीचा व्यवसाय सुरु केला. नंतर दादांचे कराड येथील प्रभात थिएटरमध्ये लग्न झाले तेव्हा लग्नास अण्णा हे आवर्जून उपस्थित होते.

गोवा सत्याग्रह सुरु झाला तेव्हा दादांनी त्यात उडी घेतली. बांदा आघाडीवर सत्याग्रह करीत असताना गोळीबार झाला तेव्हा दादांचे पुढील व मागील सत्याग्रही शहीद झाले, परंतु दादा वाचले. त्यावेळेस त्यांना अटक करून तुरुंगात ठेवले. तुरुंगातून सुटका झाल्यावर दादांनी प्रथम अण्णांना तार केली व नंतर घरी आपल्या पत्नीला तार केली. अण्णा तेव्हा पुणे येथे बाबूराव सणस यांच्या घरी होते. तेव्हा अण्णा हे त्यांना भेटावयास येणाऱ्या प्रत्येकाला दादांची तार दाखवत होते व म्हणत होते, ''माझा केशव वीरासारखा लढला. तो सुखरुप आहे.'' ही आपल्या विद्यार्थ्याबद्दलची भावना. त्यातून प्रेम, आत्मीयता ओसंडत होती. धन्य ते गुरु व धन्य ते शिष्य. म्हणूनच अण्णा हे दादांचे दैवत होते. त्यामुळेच अण्णांचे विद्यार्थी अण्णांचेवर जीव टाकत होते.

दादांनी आपले संपूर्ण आयुष्य श्रमजीवी जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी घालवले. कै.यशवंतराव चव्हाण यांचेविरुध्द १९५२, १९५७, १९६२ ला त्यांनी यशस्वी लढत दिली. त्या निवडणूका अजून लोकांच्या स्मरणात आहेत. दादा हे १९७८ साली विधानसभेवर आमदार म्हणून निवडून गेले होते.

रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलची स्थापना झाल्यापासून जीवनाच्या अखेरपर्यंत दादा हे कौन्सिलचे सदस्य होते. उभ्या आयुष्यात दादांनी कधी मिटींगचा भत्ता घेतला नाही. अगर स्वत:करीता संस्थेची गाडी वापरली नाही. दादांचा दृष्टीकोन हा होता की अण्णा व रयत शिक्षण संस्था होती म्हणून मी आहे. तेव्हा संस्थेकडून मी काही न घेता संस्थेला मी जेवढे देता येईल व संस्थेकरीता जेवढे करता येईल तेवढे मी केले पाहीजे हे दादांचे विचार होते.

कराडच्या परिसरात कॉलेज काढावयाचे हे अण्णांच्या डोक्यात होते. तेव्हा अण्णा हे सैदापूरच्या माळावर (आता कॉलेज आहे तेथे) आले. दादांना बोलावून घेतले. सैदापूर व परिसरातील लोकांना बोलावून घेतले व म्हणाले की, ''मला इथे कॉलेज काढावयाचे आहे'' येथून सुरुवात झाली. कॉलेज काढावयाचे म्हटल्यावर पैशाचा प्रश्न ! तेव्हा विद्यापीठाकडे एक लाख रुपये अनामत रक्कम भरावी लागत होती. मग एवढे पैसे कोठून आणणार ? मग अण्णा हे पुणे येथे मंडईत हमालांच्याकडे गेले व त्यांनी हमालांना आवाहन केले तेव्हा हमालांनी आपल्या कष्टाचे पैसे अण्णांना जमवून दिले व तीच रक्कम अनामत म्हणून भरली तेव्हा कॉलेजला मान्यता मिळाली.

संत गाडगेबाबा हे कॉलेजच्या प्रांगणात येऊन गेले होते. तेव्हा अण्णांनी या थोर महात्म्याचे नाव कॉलेजला दिले. तेव्हा आता शिकत असलेल्या विद्यार्थ्यांनी एक गोष्ट लक्षात ठेवावी, या महाविद्यालयाच्या स्थापनेत पुण्याच्या कष्ट करणाऱ्या हमालांचा मोठा वाटा आहे. अशिक्षित कष्टकरी वर्गाने पुढील पिढी सुशिक्षित व्हावी म्हणून केलेले हे योगदान आहे. अशी पार्श्वभूमी भारतातील कोणत्याही कॉलेजला नाही.

कॉलेजची उभारणी करीत असताना अण्णा दादांच्याकडे आले व म्हणाले की, 'केशव, तू कॉलेजला काय मदत करतोस ?' तेव्हा दादा लगेच घरात गेले व आपल्या पत्नीचे अंगावरचे सर्व सोन्याचे दागिने कापडात बांधले व अण्णांच्याकडे सुपूर्द केले. अण्णांनी कपड्यात काय आहे ते पाहिले नाही परंतु अण्णांनी ते घेतले व आठ दिवसांनी अण्णा पुन्हा आले व ते दागिने दादांना परत केले व म्हणाले की, 'केशव, मी तुझे मन पाहिले,तुझ्या-सारख्या विद्यार्थ्याला मी घडवू शकलो याची मला धन्यता वाटते.'

कॉलेजला पैसे जमवायचे म्हणून दादा हे त्यांच्या कार्यकर्त्यांच्या घरी लग्न असले की कॉलेजचे पहिले प्राचार्य रा.कृ.कणबरकरसाहेब यांना बरोबर घेऊन जायचे व वधू-वर पक्षाला कॉलेजबद्दल माहिती देऊन मदत मागावयाचे व लग्नात दोन्ही पक्षांना आलेले आहेर जमा करून कॉलेजला देत होते. तसेच वेगवेगळ्या मार्गानी एक रुपयापासून पैसे व मदत गोळा करून कॉलेजची जडणघडण केली. तेव्हा कॉलेजच्या उभारणीत व जडणघडणीत दादांचे योगदान मोठे होते. तसेच कै.दानशूर बंडो गोपाळा मुकादम हे गाडगे बाबांना गुरुस्थानी मानायचे. आपल्या गुरुच्या नावे चालविलेल्या या कॉलेजला मुकादम तात्यांनीही भरघोस अर्थसहाय्य केले.

कॉलेजला ग्रामीण भागातील मुली शिकावयास येत होत्या परंतू त्यांची रहाण्याची सोय नव्हती म्हणून काही मुली शिक्षणापासून वंचीत होत होत्या तेव्हा दादांनी व कै.बॅ.पी.जी.पाटील यांनी कै.तात्या मुकादम यांना प्रवृत्त करून मुलींचे वसतिगृह बांधले व मुलींच्या राहण्याचा प्रश्न सुटला. तेव्हा दादांनी व तात्या मुकादम यांनी हट्ट धरला व वसतिगृहास सुमतिबाई पाटील यांचे नाव द्यावयास संस्थेस भाग पाडले. आर्थिक मदत त्यांनी केली परंतु नाव सुमतिबाई यांचे द्यावयास लावले. हे सर्व अण्णांच्या संस्कारामुळे घडले. आज माणूस देणगी देताना माझे नाव देणार असाल तर देणगी देतो असे म्हणतो. या पार्श्वभूमीवर कै.तात्या व कै.दादा यांचे योगदान विचारात घेण्यासारखे आहे.

मुलींचे वसतीगृह झाले परंतु मुलींच्या जेवणाचा प्रश्न कसा सुटणार, कारण मुली आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातून आलेल्या. तेव्हा दादा त्यावेळचे प्राचार्य व सर्व स्टाफला बरोबर घेऊन तालुक्यातील प्रत्येक शेतकऱ्याकडे गेले व त्यांनी त्यांच्याकडून मुलींच्या जेवणासाठी धान्य गोळा करून आणले व मुलींच्या जेवणाचा प्रश्न सोडवला.

कॉलेजमध्ये सर्व कोर्सेस सुरु झाले पाहिजेत तसेच एम.ए.पर्यंतचे शिक्षण सुरु झाले पाहिजे याकरीता दादांनी सर्वतोपरी सहकार्य केले. दादा हे कॉलेजचे आधारस्तंभ होते. कोणताही प्रसंग असो, प्रश्न असो वा अडचण असो दादा धावून जात होते व प्रश्न सोडवणेस मदत करीत होते.

मराठी माध्यमाची प्राथमिक व माध्यमिक शाळा विद्यानगरात झाली पाहिजे व याकरीता दादांनी फार मोठे सहकार्य केले.

सैदापूर येथे रयत शिक्षण संस्थेचे कॉलेज आहे, परंतु कराडमध्ये संस्थेची शाळा नाही, ती झाली पाहिजे. हा दादांचा विचार होता. कराडमध्ये राष्ट्रीय शिक्षण संस्थेचे यशवंत हायस्कूल होते. त्या संस्थेने ती शाळा रयत शिक्षण संस्थेत विलीन केली व ती शाळा रयतची झाली. यात दादांचा सिंहाचा वाटा होता. आज तेच यशवंत हायस्कूल नावारुपाला आले आहे.

इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु झाली पाहिजे हे दादांनी डोक्यात घेतले व त्याप्रमाणे कराडला पाच मुलांवर इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु केली व आज ती नावारुपाला आली असून त्या शाळेला 'कै.केशवराव पवार इंग्लिश मिडीयम स्कूल' हे नाव देण्यात आलेले आहे.

स.गा.म.कॉलेज व रयत शिक्षण संस्थेच्या जडणघडणीत दादांचे मोठे योगदान आहे. त्यांच्या पश्चात त्यांच्या कार्याचा वसा व वारसा सांभाळण्याचे काम मी तसेच पुढे चालू ठेवण्याचा यथाशक्ती प्रयत्न करीत आहे व अखेरच्या श्वासापर्यंत करीत राहिन. महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त माझ्या हार्दिक शुभेच्छा !



श्री.आनंदराव रामचंद्र जाधव
सरपंच, ग्रामपंचायत सैदापूर

गेली सलग २६ वर्षे सैदापूर या मोठ्या ग्रामपंचायतीचे सरपंच म्हणून भरीव काम. समाजातील भ्रष्टाचाराचे उच्चाटनासाठी भरीव काम. डाव्या विचारसरणीमुळे शोषण व अन्यायाविरुध्द सतत लढण्याची जिद्द. कॉलेजच्या सर्व उपक्रमांना सदैव उपस्थित राहून सतत मदतीचा हात असतो. आबालवृद्धांमध्ये परिचित. तालुक्यात 'आप्पा' या नावाने परिचित. शास्त्रीय गायनाची आवड. धार्मिक वृत्तीमुळे गावातील सर्व देवदेवतांची मंदीरे स्वच्छ व सुंदर ठेवण्याकडे कटाक्ष. कै.ह.भ.प.अण्णा येसू जाधव उर्फ 'अण्णा महाराज' या सैदापूरच्या संत सुपुत्राची योग्य आठवण ग्रामस्थांना व समाजाला रहावी म्हणून विठ्ठल रखुमाई मठाची नवीन भव्य वास्तू उभारण्यात महत्वाचे योगदान. सर्वांना सतत मदतीचा हात देणाऱ्या आप्पांचेकडून रयत शिक्षण संस्थेस व स.गा.म. महाविद्यालयाच्या सर्व प्राध्यापक, कर्मचारी वर्गाला व सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा !

श्री. विठ्ठलराव रघुनाथ जाधव
मु.पो.सैदापूर,
ता.कराड, जि.सातारा

सेवा

१) सन १९७८ पासून सलग २६ वर्षे ग्रामपंचायत सदस्य. गेली १० वर्षे उपसरपंच.

२) सैदापूर वि.का.स.सेवा सोसायटीमध्ये गेली २० वर्षे कार्यरत. १० वर्षे चेअरमन म्हणून काम पाहिले.

३) सन १९८२ ते १९९४ 'कराड तालुका सहकारी खरेदी विक्री संघा'मध्ये संचालक म्हणून काम पाहिले. सन १९८९ ते १९९१ चेअरमन म्हणून काम पाहिले.

४) शेती उत्पन्न बाजार समिती, कराड या संस्थेवर ५ वर्षे संचालक म्हणून काम पाहिले.

५) सन १९९२ पासून ग्रामीण व शहरी भागांतील गरजूंना अर्थसहाय्य करणाऱ्या राज्यांतील अग्रणी दि कराड अर्बन को.ऑप. बँकेमध्ये संचालक व उपाध्यक्ष म्हणून काम पाहिले.

६) स.गा.म.महाविद्यालयाच्या स्थानिक व्यवस्थापन समितीचे गेली १२ वर्षे सदस्य म्हणून काम.

७) स.गा.म.महाविद्यालयाच्या प्राथमिक शाळेच्या उभारणीत भरघोस आर्थिक सहाय्य व उभारणीत महत्त्वाचा वाटा.

८) श्री पावकेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना करून स.गा.म.माध्यमिक विद्यालयाच्या निर्मितीमध्ये महत्त्वाचे योगदान.

सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज : ज्ञानाची गंगोत्री

५४ विद्यार्थीसंख्येवर ५० वर्षापूर्वी सुरु झालेले सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज हे रयत शिक्षण संस्थेचे एक जुने व मोठे कॉलेज आहे. खऱ्या अर्थाने गोरगरिबांना शिक्षण, 'कमवा व शिका' योजना हे कर्मवीर भाऊराव पाटील यांचे विचार व आचार या महाविद्यालयात राबविले जातात. ग्रामीण भागातील गरीब मुलांना साधन व सुविधांचा अभाव असल्यमुळे कमी मार्कस् मिळतात. सांगली, सातारा आणि सोलापूर जिल्ह्याच्या ग्रामीण भागातून कमी गुणवत्तेच्या आलेल्या मुलांचेवर इथे शिक्षणाचे पैलू पाडण्याचे काम या कॉलेजचे प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी अविरतपणे करत असतात. या कॉलेजला ग्रामपंचायत सैदापूर व मी काम करीत असलेल्या सर्व संस्थांतून भरीव मदत करण्याचा सतत प्रयत्न केलेला आहे. वसतिगृहे, प्राध्यापकांची निवासस्थाने इत्यादी इमारती करमुक्त केलेल्या आहेत. विविध उपक्रमांना देणग्या, मुलींचे वसतिगृहांस अर्बन बँकेमार्फत वॉटरकुलर, पंचायत समिती सदस्य तानाजीराव माळी यांच्यामार्फत पाण्यासाठी कूपनलिका इत्यादी सुविधा कॉलेजला मिळवून दिलेल्या आहेत. यापुढेही या कॉलेजची गुणवत्ता व नावलौकिक वाढावा म्हणून सतत प्रयत्नशील राहणार आहे. कॉलेजचे प्राचार्य बर्गे साहेब व त्यांचे सर्व सहकारी प्राध्यापक, इतर सेवक व सर्व विद्यार्थी विद्यार्थिनींना सुवर्ण महोत्सवानिमित्त माझ्या शुभेच्छा!

ॲड.श्री.सदानंद नारायण चिंगळे
जुलै १९६८ ते एप्रिल १९७२
Pre-Degree Arts ते T.Y.B.A.
विषय - English (Special)

- विद्यार्थी दशेतील आवड - वाचन-अभ्यास, वक्तृत्व, अभिनय, विद्यापीठ स्तरावर राज्यस्तरावर वक्तृत्व स्पर्धेत यश
- कोयना भूकंप विस्थापितांच्या मदतीसाठी महाविद्यालयाचे नाटक बसवून अनेक ठिकाणी प्रयोग घडवून आणण्याचे कामी सहभाग.
- शिवाजी विद्यापीठाचे विद्यार्थी कल्याण मंडळाचे प्रतिनिधीत्व. विद्यापीठीय श्रमदान शिबीरात सहभाग.

एप्रिल १९७२ B.A.English
१९७४ M.A.Entire English - शिवाजी महाविद्यालय सातारा
१९७६ LL.B.General
१९७७ LL.B.Special विद्यापीठात सर्वप्रथम
१९७९ LL.M

- सन १९७४ जून ते १९७६ डिसें. प्राध्यापक - रयत शिक्षण संस्था: सातारा व कराड
- सन १९७७ सप्टें पासून - ॲडव्होकेट म्हणून व्यवसाय : कराड, सातारा, सांगली
- सन १९७९ ते १९८१ - बळवंत महाविद्यालय विटा- Business Law प्राध्यापक.
- डिसेंबर १९८१ ते १९८३अखेर - Civil Judge Junior Division & Judicial Magistrate First Class
- अडीच वर्षे पुणे व शिरूर घोडनदी येथे नोकरी
- १९८४ पासून पुन्हा कराड सातारा येथे वकीली
- १९९१ मध्ये पुन्हा Direct District Judge म्हणून नेमणूक झाली होती. नोकरी स्विकारली नाही
- ग्राहक दक्षता समिती, ग्राहक संरक्षण चळवळ यामध्ये सहभाग. अन्याय व भ्रष्टाचार निर्मूलनाचे कामात सतत सहभाग. वेगवेगळ्या शिक्षणसंस्थांच्या कामात सहभाग. वेगवेगळ्या आंतरराष्ट्रीय विधीज्ञांच्या परिषदेत सहभाग.

❖ स.गा.म.महाविद्यालयाच्या Local Managing Council चा सदस्य.

❖ सन १९८४ पासून आजपर्यंत कराड-सातारा येथे Practice

सन २००४-२००५ हे सगाम महाविद्यालयाचे सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे होत आहे. या बातमीमुळे महाविद्यालयाची पन्नास वर्षातील प्रगतीची वाटचाल किमानपक्षी सन १९६७-६८ पासूनची वाटचाल डोळ्यापुढे येऊन राहिली. या निमित्ताने मागे वळून पाहता हे महाविद्यालय केवळ शिक्षणदानाचे काम करणारे महाविद्यालय नसून, स्वतंत्र भारताच्या विकसनशील व प्रगतीशील वाटचालीसाठी समर्थ नागरिक बनवणारे संस्कार केंद्र आहे याचा अभिमान वाटतो. या महाविद्यालयात प्रतिवर्षी विद्यापीठाने नेमून दिलेले अभ्यासक्रम शिकवले गेले पण केवळ शिकवले गेले यापेक्षा ते कसे शिकवले गेले याबद्दलचे माझ्या महाविद्यालयीन पदवी शिक्षणाचा कालखंड आठवला म्हणजे अजूनही मन अभिमानाने डोलू लागते. शिकवण्यामागे शिक्षकाची ही एक प्रतिमा असते. पण अशी प्रतिमा असणारेच सारे प्राध्यापक आम्हाला लाभले याबद्दल वाटणारा आनंद निश्चितच वेगळा आहे.

प्राचार्य बॅरि.पी.जी.पाटील, सौ. सुमतिबाई पाटील, प्रा. सुभेदारकाका, प्रा. मुकुंद कदम, प्रा.एस.डी.भोर, प्रा.डॉ.एम.ए.शेख, डॉ.सुमन पाटील, प्रा.डॉ. कुंदप, प्रा.डॉ. वसंतरावजी मोरे अशी अनेक नावे आणि त्याचबरोबर आमचा सारा वर्गच आठवणीत येतो. रयत शिक्षण संस्थेची धोरणे, कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक तत्वज्ञान, कमवा आणि शिका योजनेतून विद्यार्थ्यांच्यात वाढीस लावलेले श्रमसंस्कार, याचबरोबर 'Do and Dare, Be and Bear' हे या महाविद्यालयाचे आत्मविश्वास वृद्धिंगत करणारे ब्रीदवाक्य सारे सारे आठवते. पण याचबरोबर आज महाविद्यालयाचा सारा नूरच बदलला आहे. पन्नास वर्षांच्या वाटचालीनंतर आता महाविद्यालयाचा परिसर खऱ्या अर्थाने नटला आहे. नवनवीन विद्याशाखांची व्याप्ती, प्रत्येक विद्याशाखेचे स्वतंत्र कार्यालय, स्वतंत्र भव्य इमारतीतील सुसज्ज ग्रंथालय, अभ्यासिका, भव्य क्लासरूम्स, टीचर रूम, वसतिगृहे, प्राध्यापकांची निवासस्थाने, या सर्वांना जोडणारे रस्ते, कर्मवीरांचा प्रवेशद्वारासमोरचा अर्ध पुतळा, त्यामागे असणारे प्रेक्षागृह व त्याकाळातील दानशूर बंडो मुकादमांचा पूर्ण पुतळा, विस्तीर्ण लॉन, फुलझाडे, लॉनवर असणारे कारंजे, भव्य क्रीडासंकुल, स्वतंत्र कार्यालय, हे सारे मनाला नवा मोह पाडते. याबरोबरच शैक्षणिक प्रगतीचा आलेख, क्रीडा क्षेत्रातील नैपुण्य, सामाजिक जाणीवांची मांदियाळी, नवनवीन संगणकांसारख्या माध्यमांचा उचित वापर. आणि परिसरातील गावागावाशी असणारा महाविद्यालयाचा सतत संपर्क हा कल्पकतेने चालू राहण्यासाठी व महाविद्यालयाच्या प्रगतीची यशोगाथा चढत्या आलेखाने राहावी म्हणून प्रयत्नशील असणारे विद्यमान प्राचार्य बर्गेसर, अन्य सर्व सहकारी प्राध्यापक, सेवक आणि विद्यार्थी या सर्वांचे प्रयत्न सुखावून जातात.

आज पन्नास वर्षांच्या वाटचालीनंतरही या विभागातील एक वेगळा संस्कारशील विद्यार्थी घडविणारे महाविद्यालय म्हणून सगाम महाविद्यालयाचे असणारे स्थान तसेच आहे. सामाजिक जाणीवांशी सतत जवळीक साधणारा या महाविद्यालयाचा विद्यार्थी बाह्यजगातील उद्याचा समर्थ नागरिक म्हणून कार्यरत राहणार यासाठीच ही कृतीशील प्रयोगशाळा आहे. बाह्य समृद्धीबरोबरच शैक्षणिक, क्रीडाविषयक समृद्धी उच्च दर्जाची ठेवणारे हे महाविद्यालय, आणि आपण त्या महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी म्हणून सार्थ अभिमान आहे. माझ्या वैयक्तिक जीवन प्रवासात जीवन जगण्याची एक नवी दिशा, एक आत्मविश्वास आणि स्वतःशी प्रामाणिक राहण्याचे इमान या महाविद्यालयाने मला पदवीबरोबर दिले आणि त्याच शिदोरीवर मी वेगवेगळ्या क्षेत्रातील वाटचाल स्वाभिमानाने आणि समर्थपणाने केली हे नम्रपणाने नमूद करताना आनंद होतो. या निमित्ताने भूतकाळातील आठवणी जागवतात. मला चिरंतन आनंदाची उब मिळाली याबद्दल धन्यवाद देण्यापेक्षा या महाविद्यालयाच्या प्रेमाचा ऋणी राहणे मला अधिक आवडेल.

शिक्षण हे मनुष्याला परिपूर्ण बनवणारे साधन आहे. प्रतिवर्षी या परिसरातील नवी पिढी परिपूर्ण करण्याचा प्रयत्न करणारे हे आमचे महाविद्यालय पन्नास वर्षाच्या वाटचालीनंतरची पुढील वाटचाल करीत असताना, पूर्वीपासूनच्या वैशिष्ट्यांबरोबरच यापुढे हे महाविद्यालय A place for cultivation of excellence of Life म्हणून या परिसराला आदर्शवत राहील हा आत्मविश्वास नमूद करताना या महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी म्हणून मनस्वी समाधान होते.

मळाई ग्रुप तर्फे स.गा.म.कॉलेजला वॉटर कुलरची भेट अंदाजे खर्च - रु. ६२,०००/-

❖ श्री.मळाईदेवी शिक्षण संस्था नांदलापूर, मलकापूर, जखिणवाडी. श्री. मळाईदेवी नागरी सह.पतसंस्था (नांदलापूर, मलकापूर, कापील)

❖ जमना सह.ग्राहक संस्था मर्या.मलकापूर.

❖ समाज प्रबोधन सार्वजनिक ग्राम वाचनालय मलकापूर.

❖ कराड तालुका हौशी व मैदानी क्रीडा संघटना, कराड

❖ जिव्हाळा महिला ग्रामीण बिगरशेती सह.पतसंस्था मर्या.मलकापूर.

❖ संजिवनी सह.दूध व्यावसायिक संस्था मर्या.मलकापूर.

❖ विज्ञान प्रबोधिनी - कराड.

श्री.संभाजी ह. मोहिते

ॲडव्होकेट आणि नोटरी, कराड

कृष्णा कोयनेच्या प्रीती-संगमावर ५० वर्षापूर्वी कर्मवीरांचे आशीर्वादाने अन मुकादम तात्यांच्या पूढाकाराने सद्गुरूंचे नामाभिधान असणारे महाविद्यालय सुरू झाले, अन् प्रीतीसंगमावर तरंग उमटले. ५० वर्षापूर्वी विद्यानगरात लावलेल्या रोपट्याचा आज डौलदार वृक्ष झाला असून या वृक्षाने कर्मवीर अण्णांची मातीशी नाते सांगणारी विचार पताका उंच उंच फडकावीत ठेवली आहे.

या प्रांगणात १९७९ ते ८३ या कालखंडात विद्यार्थी म्हणून बागडण्याची संधी मला लाभली हे मी माझे भाग्य समजतो.या काळात कला,क्रीडा,साहित्य,शिक्षण, संस्कार,एन.सी.सी.या व अनेक आघाड्यांवर मार्गदर्शन अन् संधी मिळत गेली.

या साऱ्या संस्काराच्या अन् शिदोरीच्या जोरावर ताठमानेने वाटचाल करताना कर्मवीरांच्या विचारांचा वारसा जोपासता येतोय याचा अभिमान वाटतो.

या साऱ्या वाटचालीत माझ्या सगामच्या गुणात्मक, शैक्षणीक, सांस्कृतिक आलेख वाढतोय हे पाहून मनोमन आनंद होतोय.

आपल्या सगामच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्तांच्या उपक्रमांस मन:पूर्वक शुभेच्छा !

शिक्षण : B.A.(Hons), LL.B., D.B.M., M.M.S.

स.गा.म.मधील कालावधी

१९७९ ते १९८३ १२ वी आर्टस्. ते बी.ए.

१) १९७९ - १२ वी प्रथम.

२) १९८१ - N.C.C. अंडर ऑफिसर

३) १९८२ - N.C.C. दार्जिलिंग (प.बंगाल) मधील कॅम्प मधील ट्रेझर हंट स्पर्धेतील विजेता.

४) १९८२-८३ जनरल सेक्रेटरी

५) व्हॉली बॉल, ॲथलेटीक्स, क्रीडा प्रकारात महाविद्यालयाचे संघातून प्रतिनिधीत्व.

५) गेली १३ वर्षे विविध महाविद्यालयांमधून मानद प्राध्यापक म्हणून अनेक विषय शिकविण्याची संधी.

श्री.संग्रामसिंह देशमुख

प्रत्येक माणसाच्या आयुष्यातील सर्वात आनंदी जीवनाचे रंगीबेरंगी रंगछटाचे इंद्रधनुष्य दिवस म्हणजे त्याचे महाविद्यालयीन दिवस असेच उत्तर आपणास सर्वांच्याकडून मिळेल. म्हणूनच मी सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालयाच्या स्मरणिकेसाठी माजी विद्यार्थी म्हणून हे शुभेच्छापर माझे मनोगताचे चार शब्द..

सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालयात शिक्षण घेतलेली आमची दुसरी पिढी. या महाविद्यालयाने आमच्या दोन पिढ्या सुसंस्कारीत केल्या. माझे वडील स्वर्गीय आमदार संपतराव व्यंकटराव देशमुख (अण्णा) यांचे बी.ए. पर्यंतचे शिक्षण याच महाविद्यालयात झाले याच आवारात त्यांचेवर सुसंस्कार झाले. पुढे ते गर्व्हनमेंट लॉ कॉलेज मुंबई येथून एल.एल.बी. झाले व काही काळ कराडच्या न्यायालयात फौजदारी वकील म्हणून काम केले नंतर समाजकारण व राजकारणात भरीव कामगिरी केली व पुढे आमदार झाले. महाराष्ट्राच्या विधानभवनामध्ये पाणी प्रश्नासाठी संघर्ष केला. तसेच माझे बंधु पृथ्वीराज देशमुख (बाबा) यांचेही पदवीपर्यंतचे शिक्षण याच महाविद्यालयात झाले व पुढे तेही आमदार झाले. समाजाच्या प्रश्नासाठी अहोरात्र कष्ट केले. सध्या ते एन.सी.डी.सी. न्यू दिल्लीचे संचालक म्हणून काम करीत आहेत. मीसुद्धा याच सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालयात पदवी पर्यंतचे शिक्षण घेतले आहे.

त्यावेळच्या खानापूर तालुक्यातून सध्याच्या कडेगाव तालुक्यातून शेकडो विद्यार्थी उच्च माध्यमिक व उच्च शिक्षणासाठी कराड येथे येत असत. म्हणून मीसुद्धा याच महाविद्यालयात प्रवेश घेतला व उच्च शिक्षणाची सुरूवात केली. ग्रामीण भागातून येणाऱ्या विद्यार्थ्यांची सर्वात जास्त संख्या याच महाविद्यालयात असायची त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे कॉलेज असा नावलौकिक झाला होता. रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांनी संत गाडगे बाबा यांच्या नावाने तळागाळातील ग्रामीण भागातील बहुजन समाजाच्या मुलांना उच्च शिक्षण घेता यावे यासाठी दानशूर बंडोगोपाळ मुकादम व महात्मा फुले भाजी मंडई, पुणे येथील हमाल बांधव यांच्या उदारहस्ते मिळालेल्या देणगीतून व सहकार्यातून सैदापूरच्या माळावर सध्याच्या विद्यानगर कराड येथे सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालय सुरू केले.

महाविद्यालयाच्या आवारात प्रवेश केल्यानंतर प्रथमच रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांचा अर्धपुतळा नजरेस पडतो व आम्ही नतमस्तक होतो. उजव्या हाताला कार्यालयीन इमारती, पुतळ्याच्या बरोबर पाठीमागे प्रेक्षागृह तर डाव्या हाताला सायकल स्टँड,एन.सी.सी. कार्यालय व महाविद्यालयाची भव्य अशी मुख्य इमारत, शास्त्र शाखेची (सायन्स) प्रयोग शाळा व त्याचे समोर भव्य क्रीडांगण पाठीमागे विद्यार्थी वसतिगृह, सुसज्ज ग्रंथालय, तर प्रेक्षागृहाच्या डाव्या बाजुला विद्यार्थिनीचे सौ. सुमतिबाई पाटील लेडीज होस्टेल, लागूनच प्राचार्यांचे व प्राध्यापकांची निवासस्थाने व सोबतीला नयनरम्य परिसर असे चित्र आजही महाविद्यालयीन जीवनाची आठवण झाली की डोळ्यापुढे उभे राहते व मन प्रसन्न होते.

आम्ही कडेपूरहून विटा-कराड एस.टी.ने. कॅनॉलवर (नळावर) उतरायचो व मित्रांच्या समवेत विद्यानगरमधील कॉलेजवर जायचो. याच महाविद्यालयात 'कमवा व शिका' योजनेखाली महाविद्यालयात कष्ट करून शिकणारी मुलेही होती. खऱ्या अर्थाने 'स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद' हे ब्रीद वाक्य सद्गुरू गाडगे महाराज विद्यालयाने जोपासले आहे.

स.गा.म. महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर आम्ही अनेक खेळ शिकलो. कबड्डी, खो-खो, हॉलीबॉल, क्रिकेट याचे शास्त्रशुद्ध मार्गदर्शन आम्हाला मिळाले. हॉलीबॉल (शुटींगबॉल) या खेळाविषयी मला आत्मीयता याच काळात निर्माण झाली. पुढे मी या खेळाला न्याय देण्यासाठी खूप प्रयत्न केला. महाराष्ट्रभर या खेळाला चांगले दिवस यावेत म्हणून प्रामाणिकपणे काम केले. आज मी ''महाराष्ट्र राज्य शुटींग बॉल असोसिएशनचा उपाध्यक्ष म्हणून काम करीत आहे. खऱ्या अर्थाने ही माझ्या सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालयाची देणगी आहे.

'तेथे कर माझे जुळती'



मानसिंग दादोबा जाधव
U/O, C.R., B.A. I 1979-80
यशस्वी उद्योजक,
कृष्णा कॅनाल, सैदापूर

सद्गुरु गाडगे महाराज कॉलेजचा एक माजी विद्यार्थी म्हणून मला सार्थ अभिमान वाटतो. महाविद्यालयात मला ज्ञानकण वेचता आले, कब्बडी आणि एन.सी.सी.मध्ये नेत्रदिपक कामगिरी करता आली. रयत शिक्षण संस्थेच्या धोरणानुसार 'कमवा व शिका' योजनेचे बाळकडू मला याच कॉलेजमध्ये मिळाले. म्हणूनच मी आज यशस्वी उद्योजक म्हणून स्वत:च्या पायावर उभा राहून यशस्वी जीवन जगत आहे. माझे दोन वडील बंधू देखील याच महाविद्यालयात शिकले व कबड्डीपटू म्हणून नावलौकिक मिळविला आहे. या माझ्या यशस्वितेमध्ये सध्याचे प्राचार्य अरुण बर्गे, माझे असंख्य गुरुजन, प्रशासकीय सेवक आणि सहकारी यांनी मला मोलाची मदत केली. त्याबद्दल सर्वांचे मन:पूर्वक आभार!

जीवन पवार

संचालक- स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, विद्यानगर , कराड

संपूर्ण बालपण स.गा.म.च्या प्रांगणात सुखात गेल्यावर याच महाविद्यालयात ११वी ते बी.ए. पर्यंतचे शिक्षण घेण्याचे सौभाग्य मिळाले.

११वीला १ टक्क्याने प्रथम क्रमांक गेल्याची हुरहुर आजही मनाला छेदून जाते.

प्रा. अरुण बर्गे यांच्यामुळे कॉलेज जीवनात मोठे यश प्राप्त करून कॉलेजच्या नावलौकीकात भर घातली. NCC मध्ये प्रजासत्ताक दिन संचलनासाठी नवी दिल्ली येथे झालेली निवड, त्यामध्ये मिळालेला 'राष्ट्रपती पुरस्कार' हा जीवनातील सुवर्ण क्षण आहे.

यशाबरोबर अपयश पचवायची ताकद NCC ने दिली. १९८६ साली स्पर्धा परीक्षेत झिरो बजेट योजनेमुळे प्रशासकीय सेवेत जाता आले नाही आणि यामुळेच जीवनाचा अर्थ कळला.

१९८८मध्ये आपल्या महाविद्यालयाशेजारीच MPSC, UPSC चे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुरू केले आणि ग्रामीण भागाला एक नवी दिशा दिली व सुरू केलेली चळवळ यशोशिखरावर गेली. आज या केंद्रातून शेकडो अधिकारी तयार झाले असून भारतात व राज्यात प्रथम येण्याचा उच्चांक मुलांनी केला.

२००४ मध्ये तीन राज्यस्तरीय व दोन राष्ट्रीय पुरस्कार मिळाले. याच वर्षी माझे गुरू प्राचार्य अरुण बर्गे यांचा सहवास लाभला. त्यांचा सत्कार करण्याचा योग लाभला. यामुळे जीवन कृतार्थ झाल्याचे समाधान आहे.

बरकत बकस मुजावर
पोलीस निरिक्षक,
वाहतूक शाखा, कोल्हापूर

जेव्हा जेव्हा मला स.गा.म. ची आठवण होते तेव्हा तेव्हा मन गतकाळातील स्मृतींनी भरुन जाते. मनात एक आगळी वेगळी उर्मी उत्पन्न होते. विचारचक्र एका विशिष्ट दिशेकडे झेपावू लागते.

माझ्या जीवनप्रवाहाला एक नवीन वळण लाभले ते स.गा.म. कॉलेजात. जिव्हाळा, प्रेम, आचार आणि विचार यातील सुसंवाद आणि सुरेख संगम येथेच पाहावयास मिळाला. कॉलेजने माझ्यावर केलेले अतोनात प्रेम व माझ्यातील गुणांना विकसित करण्यासाठी वेळोवेळी दिलेल्या संधी आठवल्या की मन आनंदाने उचंबळून येते, आणि कॉलेजविषयी वाटणारा आदर शतगुणित होतो.

माझा जन्म नेर्ली, ता. कडेगांव येथील. प्राथमिक शिक्षण तेथेच पूर्ण केले. दुर्दम्य आशावादाची शिदोरी बाळगून यशाकडे वाटचाल करण्यासाठी अर्थात उच्च शिक्षणासाठी पाऊल ठेवले ते स.गा.म.च्या ज्ञानमंदिरात. या ज्ञानमंदिरातून बाहेर पडलो ते B.A. Special English ची पदवी घेऊनच ! पुढे पदव्युत्तर शिक्षणासाठी दोन वर्षे शिवाजी विद्यापीठात गेलो. परंतु स.गा.म. मधील ते मंतरलेले दिवस हृदयपटलावर कायमचे कोरले गेले.

स.गा.म. मध्ये असतानाच एन.सी.सी. ऑफिसर प्रा. अरुण बर्गे यांच्या मार्गदर्शनाखाली एन.सी.सी. प्रशिक्षण पूर्ण केले. एक

कर्तव्यदक्ष प्राध्यापक व एन.सी.सी. अधिकारी म्हणून बर्गे सरांनी वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शनामुळेच मी पोलीस दलातील पोलीस निरीक्षक या पदापर्यंत येऊन पोहचलो हे नमूद करण्यास विशेष अभिमान वाटतो.

एम.ए. (इंग्रजी) झाल्यानंतर एक वर्ष डॉ. आंबेडकर कॉलेज, पेठवडगांव येथे अधिव्याख्यात्याची नोकरी करीत असतानाच स्पर्धा परीक्षेचा अभ्यास चालू ठेवला. एक वर्षातच १९८६ मध्ये पी.एस.आय.ची परीक्षा उत्तीर्ण होऊन निवड झाली. नोकरीतील बरीच वर्षे (१९८७-२००१) मुंबईत गेली. सध्या कोल्हापूर येथे ट्रॅफिक बॅचमध्ये कार्यरत आहे.

मला घडविण्यासाठी माझ्या शिक्षकांनी घेतलेले परिश्रम, प्रेम यांचे ऋण शब्दातीत आहे. माझ्यासारख्यांची लक्षावधी जीवने सुजलाम् सुफलाम् करणारी ही ज्ञानसरिता अशीच अखंडपणे वाहत राहो व हे महाविद्यालय सतत प्रगतीपथावर राहो हीच सुवर्ण महोत्सवाच्या निमित्ताने सदिच्छा!

१९५४-५५ च्या पहिल्या बॅचच्या माजी विद्यार्थ्यांकडून महाविद्यालयाच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

श्री.रघुनाथ ज्ञानू देसाई

श्री.ए.एच.मुठेकर (लोणारी)

कुशल कृषितंत्रज्ञ - 'एम.आर.डी.'बापू

शब्दांकन : प्रा.विजय पाटील

श्री. महादेव राजाराम देसाई, काल्याचे माजी सरपंच या कॉलेजचे माजी विद्यार्थी आहेत. शेतीमधील नवनवीन प्रयोग त्यांनी यशस्वी करुन कृषि प्रदर्शनामधील अनेक पुरस्कार पटकाविले आहेत. पंचतारांकित हॉटेल्समधून प्रचंड मागणी असलेल्या पालेभाज्या, सॅलडस्, फळभाज्या, कंदभाज्यांचे उत्पादन व वितरण त्यांनी कौशल्याने हाताळले आहे. त्यांच्या शेतात तयार होणाऱ्या तैवानी कांचन जातीच्या टरबुजांना भारतभर प्रचंड मागणी आहे. बाजाराच्या मागणी व पुरवठ्याचा पद्धतशीर अभ्यास करुन आपल्या शेतीत त्यांनी कमोदीया कंद, 'कांचन' टरबुज 'विशाला' हे कलिंगडाचे वाण, झेंडूचे निरनिराळे प्रकारांची पीके घेऊन त्यांनी अक्षरशः शेतीचे सोने केले आहे. ठिबकसिंचनाद्वारे सर्व शेतीला पाण्याची सोय केली.

प्लॅस्टिक कागदाचे आच्छादन, प्रकाश सापळे, गंध सापळे, फळमाशी, मीजमाशी, इ. साठी विशिष्ट सापळे एकाच ठिकाणी पहावयास मिळाले. कलाशाखेच्या पद्वीधराने केलेला शेतीचा शास्त्रशुद्ध अभ्यास व त्या अभ्यासाचे व्यावहारिक उपयोजन (Practical application) थक्क करणारे होते.

या प्लॉट शेजारीच तुरीचा प्लॉट पहावयास मिळाला. प्राचार्य साहेबांच्या आग्रहामुळेच आम्ही बापूंच्या शेतावर गेलो होतो. मनगटाएवढ्या जाडीचे सात-आठ फूट उंचीचे तुरीचे प्रत्येक झाड शेंगांच्या भाराने जमिनीस टेकले होते. प्रत्येक शेंग टपोरी,दाणेदार! बापूंनी बोलता बोलता माहिती दिली की हा प्लॉट पाहण्यासाठी कर्नाटकाहून स्पेशल गाडी करून काही शेतकरी आले होते.

सेंद्रिय शेतीबद्दलचे त्यांचे विचार अतिशय दूरदर्शीपणाचे व मूलगामी आहेत. शाश्वत विकासासाठी जमिनीची सुपिकता टिकून राहणे महत्वाचे आहे. पाणी व रसायने यांच्या माऱ्याने जमिनीचा कसदारपणा कायम स्वरुपी धोक्यात येतो ही बाब बहुसंख्य शेतकऱ्यांना त्यांनी पटवून दिली आहे.

सन १९८३ पासून 'एम.आर.डी' ग्रुप या नावाखाली ३०० ते ४०० शेतकऱ्यांचा एक गट त्यांच्या मार्गदर्शनाखाली टोमॅटोच्या उत्पादनात गुंतला आहे. देशातील सर्व प्रमुख बाजारपेठात काले गावचा टोमॅटो पोहोचला आहे व या टोमॅटोची आदर्श विक्रीव्यवस्था बापूंनी तयार केली आहे. अनेक शेतकरी बांधवांना त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ झाला आहे.

सामाजिक कार्यातही बापू आघाडीवर आहेत. गावाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सन २००१-२००२ चा आदर्श सरपंच पुरस्कार त्यांना मिळाला आहे. आपल्या सरपंच पदाच्या कारकिर्दीत त्यांनी रस्त्यांचे डांबरीकरण, स्त्रियांसाठी शौचालये, स्मशानभूमी, दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना सहाय्य, पंतप्रधान योजना-वेघरांना घरे, इ. विकास कामे पूर्ण केली आहेत.

'फळांनी झाड अधिकच झुकते' तसे ते अधिकच नम्र व शालीन झाले आहेत. आपल्या उदार हस्ते त्यांनी अनेक गरजूंना मदत केली आहे. व्यंकटनाथ मंदिर काले येथील हायस्कूल व अनेक सेवाभावी संस्थांना त्यांनी सढळ हाताने मदत दिली आहे. सद्गुरु गाडगे महाराज कॉलेजच्या सुवर्णमहोत्सवासाठी त्यांनी उत्फूर्तपणे रु. ५००० ची देणगी दिली आहे. शेती व सामाजिक क्षेत्रातील त्यांच्या प्रयोगांना अधिकाधिक वळ व फळ मिळो हीच सदिच्छा!

सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज यांच्या सुवर्ण महोत्सव वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा

महाविद्यालयाच्या सुवर्णमहोत्सवास हार्दिक शुभेच्छा !

।। गतिमान अर्थकारणातून समाज उन्नति ।।

डॉ.पतंगराव कदम नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित



कडेगाव, ता.कडेगाव जि.सांगली ४१५३०४
फोन नं.(०२३४७) २४२२०४, २४२६४४

भाग भांडवल	३५.००	लाख
ठेवी	१७.१७	कोटी
कर्जे	११.८९	कोटी
गुंतवणूक	०६.३५	कोटी

संस्थापक : सुरेशचंद्र थोरात-निर्मळ B.A.LL.B.

बी.जे.कांडलेकर — जनरल मॅनेजर
अजित शहा — व्हा.चेअरमन
जोतिराम धर्मे — चेअरमन

र.जि.१६२०६

हार्दिक शुभेच्छा !

मोरया हॉस्पिटल प्रा.लि.संचलीत

सिद्धीविनायक

हॉस्पिटल व अतिदक्षता विभाग

- Dr. D.P.Patil- M.D.
- Dr. Avinash Patil-M.D.
- Dr. Sanjay Pawar-M.D
- Dr. Vasant Deokar-M.D.
- Dr. Mrs.Mamata Kale M.D.
- Dr. Sanjay Thorat-M.D.

सुविधा

- सुसज्ज हॉस्पिटल व अतिदक्षता विभाग
- सुसज्ज ऑपरेशन थिअेटर
- सेंट्रल ऑक्सिजनची सोय
- २४ तास औषधे उपलब्ध
- नेबुलायझेशन
- २४ तास तातडीची सेवा
- कॉम्प्युटराईज्ड सेंट्रल मॉनिटर
- व्हेन्टिलेटर मशीनची सोय
- नामांकित हृदयरोग तज्ञांची भेट
- सर्व सोयींनीयुक्त रुग्णवाहिका सेवा
- इ.सी.जी.व एक्सरेची सोय

रजि.नं.SAN/KHR/RSR(CR) 912-88 Dt.6-9-88

कै.आमदार संपतराव देशमुख आधार नागरी सहकारी पत संस्था मर्या; कडेपूर.

संस्थापक : श्री.बबनराव बाबुराव यादव (भाऊसाहेब)

दि.३०।९।२००४ ची आर्थिक स्थिती लाखात ❖ संस्थेचे भागभांडवल : २१.४२ ❖
❖ गुंतवणूक : २८.३९ ❖ निधी : २१.३७ ❖ कर्जे : ८६.४३ ❖ ठेवी : ६६.०० ❖

